म. ग्रं. सं. ठाणे

विषय

सं. क्र.

हिंदुस्थानचा कथासार-

लेखक - अशोक दिनकर वांडेकर
मुंबई, ११।७।५१ कथासारांश.
कि - १रु. १२५.
५०२०४२५.

७३

हिंदुस्थानांत इंग्लिशांस व्यापाराची मोकळीक.

राष्ट्रापैकींच इंग्लंद हा एक देश आहे. आणि तेथील लोक फार सुधारलेले आहेत. तेव्हां त्यांनीं हिंदुस्थानाच्या व्यापारांत आपला पाय शिरकविण्याविषयीं किती प्रयत्न केले असतील, हें सांगावयास नको. इ० स० १६०० साल वर्षीं जे इंग्लिश लोक व्यापार करण्याकरितां हिंदुस्थानांत आले, त्यांजबरोबर, इंग्लंदाची राणी इलिझाबेथ हिनें, ह्या देशांतील राजांस प्रविष्ट करण्याकरितां पत्रें दिलीं होतीं. तीं पाहाण्यासारखीं आहेत. त्यांचें तात्पर्य असें:— 'श्रीमंत, महाराज, भूपते, परमेश्वरानें ह्या पृथ्वीवर मनुष्याच्या सुखार्थ जे पदार्थ उत्पन्न करून ठेविले आहेत, ते सर्व एका देशांत सांपडत नाहींत. कांहीं ह्या देशांत, कांहीं त्या देशांत असे सर्व पृथ्वीभर पसरले आहेत. ह्यावरून त्याचा हेतु असा दिसतो कीं, निरनिराळ्या राष्ट्रांनीं एकमेकांशीं स्नेहभावानें वागून, आपापल्या विशेष पदार्थांचा मोबदला करून, त्या सर्वांपासून सुखाचा उपभोग घ्यावा. हा हेतु सिद्धीस जावा असा आशय मनांत धरून, आणि आपल्या थोरपणाचा लौकिक ऐकून, ही मंडळी, आपल्या देशामध्यें व्यापार करण्यास पाठविली आहे. हिजवर आपली कृपादृष्टि असावी; आणि हिला आपलें साह्य असावें. * * * * अशा दळणवळणानें आपला आमचा स्नेहभाव, परमेश्वर कृपेनें, वृद्धिंगत होवो." ह्यावरून हां इकडच्या व्यापाराविषयीं तिकडच्या लोकांस किती उत्सुकता होती, हें स्पष्ट दिसून येतें.

इंग्लिश लोक इकडे येण्यापूर्वीं पोर्तुगीज वगैरे युरोपस्थ लोकांनीं ह्या देशांत प्रवेश करून, आपल्या व्यापाराचा लाग लाविला होता, हें एके ठिकाणीं सांगलेंच आहे. कोणतेंही काम झालें तरी कोणालाही एकाएकीं साधत नसतें. त्यास काल आणि इतर साधनें हीं अनुकूल पाहिजेत. आपला पाय दृढ रीतीनें हिंदुस्थानाच्या व्यापारांत शिरावा, ह्मणून इंग्लिश लोकांनीं यापूर्वी निरनिराळ्या घालून पुष्कळ दिवस यत्न चालविला होता. परंतु, पोर्तुगीज लोकांनीं त्यांच्या कामांत अनेक वेळां विघ्नें आणिलीं. त्यामुळें त्यांस बरेच वर्ष रखडत पडावें लागलें. शेवटीं उभय पक्षांचें वैमनस्य येऊन, त्यांचीं युद्धें चाललीं. त्यांत सुरतेजवळ इ० स० १६१२ त तर इंग्लिश लोकांनीं पोर्तुगीज लोकांचा खूबच फजीता उडविला. तेव्हां ते अमळ फिक्के पडले; आणि इंग्लिशांचें वजन वाढलें. शूर काय ते ते, असें लोकांस वाटलें. दिल्लीचा बादशाहा जाहांगीर, ह्याची जी कांहीं मर्जी पोर्तुगीज लोकांवर बस-

ली होती, ती सारी उडाली. तो इंग्लिशांस विशेष चाहूं लागला. आणि त्याचे मनांत आलें कीं, अशा प्रबळ व चतुर लोकांचें आपणापाशीं सख्य असणें, हें फार बरें आहे. ह्मणून त्यानें बेस्तनामक इंग्लिश सरदाराशीं, ह्मणजे ज्यानें नुकताच पोर्तुगीज लोकांवर जय मिळविला होता, त्यांशीं मित्रत्वाचा तह ठरविला. त्यांतलीं मुख्य कलमें अशीं.—"दिल्लीपतीच्या राज्यांत इंग्लिशांस व्यापार करण्यास पूर्णपणें मोकळीक असावी; ते त्याच्या मुलुखांत आहेत तोंपर्यंत पोर्तुगीज वगैरे लोकांपासून त्यांच्या जीवांचें व मालमत्तेचें रक्षण त्यानें करावें; जो माल ते आंत आणितील, त्यावर शेंकडा सवातीन रुपये मात्र जकात घ्यावी; इंग्लिश लोक मरतील त्यांजवर कर घेऊं नये; त्यांचा बिनवारशी माल होईल तो, जीं त्यांचीं गलबतें पुढें येतील, त्यांच्या हवालीं करावा; त्यांस कोणी इजा देईल, तर त्याचा बंदोबस्त तत्काळ व्हावा; आणि इंग्लिशांच्या एका वकीलास मोंगलांच्या दरबारांत राहाण्याची परवानगी मिळावी." हा तह तारीख ६ माहे फेब्रुवारी सन १६१३ इसवी रोजीं स्वाली* मुक्कामीं मोठ्या समारंभानें कप्तान बेस्त ह्याचे हातीं आला. हें एक मोठें काम झालें.

सर टामस रो हा जाहांगिराच्या दरबारीं इंग्लिश वकील होता. त्यानें बादशाहाची मर्जी धरून, इंग्लिशांस हितावह, असा दुसराही एक ठराव त्याजपासून मिळविला. त्यावरून बंगाल्यांत व्यापार करण्याविषयीं इंग्लिशांस मोकळीक झाली. परंतु, मध्यंतरीं दच वगैरे लोकांनीं पुष्कळ आडफांटे आणिले, व भारी त्रास दिला, त्यामुळें त्यांचा उदीमव्यापार वाढला नाहीं. कांहीं वेळ जशाचा तसाच राहिला. पुढें, इ० स० १६२७ त शाहाजहान गादीवर आला. त्याची मेहेरबानी इंग्लिशांवर फार असे. तेणेंकरून त्यांस पहिल्यापेक्षां अधिक स्वातंत्र्य आलें. अट ह्मणण्यासारखी एवढीच ठेविली होती कीं, इंग्लिशांचीं गलबतें पिप्ली† बंदराखेरीज दुसऱ्या कोठें नांगरूं नयेत. हें बंदर गलबतें नांगरण्यास सोईचें नव्हतें. तरी, त्याच्या लगतचा प्रदेश सुपीक होता. आणि तेथें व्यापार चांगला चालण्यासारिखा होता. हें वर्तमान इ० स० १६३४ च्या सुमारास घडलें.

पुढें बऱ्याच वर्षांनंतर शाहाजहानाची मर्जी इंग्लिशांवर फारच बसली.

---

* स्वाली ह्मणजे सुरतेजवळ बंदरवाडा आहे.

† हा गांव कलकत्त्याच्या दक्षिणेस सुमारें ७० कोसांवर, हिंदुस्थानाच्या पूर्व किनाऱ्यावर आहे.

तीस कारण असें झालें कीं, गाब्रिएल बौतन ह्मणून कोणी इंग्लिश वैद्य, सुरतेच्या इंग्लिश वखारींत असतां, त्यानें बादशाहाच्या एका आजारी मुलीस बरें केलें. त्यावरून शाहाजादा सुजा, बंगाल्याचा सुभेदार होता, त्यानें त्यास आपणापाशीं वैद्य ह्मणून ठेवून घेतलें. असें होतां होतां दरबारांत इंग्लिशांचें वजन जास्त पडत चाललें. बादशाहा व शाहाजादा ह्या दोघांचीही कृपा त्यांजवर झाली. ही उत्तम संधी पाहून, इंग्लिशांनीं शाहाजहानास एकदम ३००० रूपये नजराण्यासारखे देऊन, बंगाल्यामध्यें आपल्या मालावर कोणत्याही प्रकारची जकात बसूं नये, असें फर्मान बादशाहापासून संपादिलें. इतकी कृपा होण्यास मूळ पाया विद्या, ही गोष्ट येथें लक्षांत ठेवण्यासारखी आहे. हें फर्मान इंग्लिशांस इ० स० १६५१ त मिळालें. आणि इ० स० १६५६ त त्यांनीं हुगळी येथें किल्ला बांधिला.

ह्याप्रमाणें पुष्कळ प्रकारची मोकळीक होऊन, शिवाय मुंबई बेट लवकरच इंग्लिशांच्या हातीं आलें. त्याची हकीकत अशी. इ० स० १६६१ त, इंग्लंदचा राजा दुसरा चार्लस, ह्यानें पोर्तुगाल देशच्या राजाची कन्या क्याथेराइन आफ् ब्रागांझा ही आपणास बायको केली. तेव्हां मुंबई बेट पोर्तुगीज लोकांकडे होतें. तें त्यांच्या राजानें चार्लसास आंदण ह्मणून अर्पिलें. तें चार्लसानें हिंदुस्थानांतील इंग्लिश लोकांस आपले ताब्यांत घेण्याविषयीं हुकूम दिला. अर्ल आफ् मार्लबरो हा इंग्लिश सरदार त्या कामास निघाला. त्याचेबरोबर पांच गलबतें होतीं; व तें बेट ताब्यांत देण्यासाठीं कोणी पोर्तुगीज सरदारही त्याचे बरोबर होता. परंतु, कांहीं कारणावरून, मुंबईंतल्या पोर्तुगीज लोकांनीं त्यास हरकत केली. आणि ते भांडावयास उभे राहिले. इंग्लिशांस ते पाऊल देखील मुंबईंत ठेवूं देईनात. शेवटीं मार्लबरो निराश होऊन परतला, आणि इंग्लंदास निघून गेला. पुढें तें बेट इंग्लिश लोकांस लग्नाच्या ठरावावरून इ० स० १६६८ ह्या वर्षीं सामोपचारानेंच प्राप्त झालें. तेव्हां तें अगदीं थोडक्या लोकांच्या वस्तीचें, रानटी लोकांनीं वसलेलें, व एकादा हलक्या खेड्यासारखें दिसे. मुंबईच्या सांप्रतच्या स्थितीशीं तेव्हांची स्थिति जर लावून पाहिली, तर जमीनअस्मानाचें अंतर दृष्टीस पडतें. त्याचा एवढा भरभराट होण्यास मूळ कारण इंग्लिशांची विद्या होय. दुसरें कांहीं नाहीं.

हिंदुस्थान देशांतली मुंबई, पोर्तुगाल देशचा राजा, इंग्लंद देशच्या राजाला आंदण देतो.! ईश्वराची करणी अगाध आहे.!

गायकवाड सरकारचा वंश.

इ० स० १७१०.

गायकवाडाची गादी स्थापणारा मूळ पुरुष दमाजी ह्या नांवाचा होता. त्याची सविस्तर माहिती ग्रंथांतरीं कोठें आढळत नाहीं. परंतु, मराठ्यांचा सेनापति खंडेराव दाभाडे, हा, इ० स० १७१० च्या सुमारास मोठ्या सैन्यासहवर्तमान गुजराथेंत उतरला, त्याजबरोबर दमाजी हा होता; व मराठ्यांनीं तिकडे ज्या लढाया मारिल्या, त्यांपैकीं बाळापूर येथील लढाईंत, दमाजीनें मोठ्या पराक्रमेंकरून शत्रूचा पराभव केला, आणि त्यावरून तो मोठा शूर असा प्रसिद्धीस आला, असें एके ठिकाणीं लिहिलें आहे. पुढें दमाजी ह्यास सेनापतीच्या हाताखालीं मुख्य सरदार नेमिलें, आणि त्यास समशेरबहादर ही पदवी दिली. तो इ० स० १७२० त मरण पावला.

दमाजी गायकवाड निवर्तल्यावर, त्याचा अधिकार, त्याचा पुतण्या पिलाजी, ह्मणजे जनकोजीचा पुत्र, ह्यास प्राप्त झाला. तो गुजराथेमध्यें आपल्या सैन्यासहवर्तमान फिरत असतां, रुस्तुमअल्लीनामक मुसलमान सरदारानें सुरत शहराजवळ त्याचा पराभव केला. असें झालें असतां, त्या मुसलमान सरदारानें आपला शत्रु हामिदखान ह्याचा नाश करण्यासाठीं पिलाजीपाशीं साह्य मागितलें, तें त्यानें तत्काळ दिलें. या दोघांचीं सैन्यें एकत्र झालीं; त्यांजवर हामिदखानानें हल्ला केला; परंतु त्यांनीं त्यास पिटाळून लाविलें. त्याचें सैन्य पळत सुटलें तेव्हां त्याचा पाठलाग करण्याविषयीं पिलाजीनें रुस्तुमअल्लीस मसलत दिली. तीप्रमाणें तो त्याचे मागें लागला. ह्या प्रसंगीं पिलाजीनें असें कांहीं कपट केलें कीं, रुस्तुमअल्ली पळावयास लागल्याबरोबर त्यानें आपलें सैन्य त्याजवर हल्ला करण्यास पाठविलें. त्यानें त्यास इतकें टेंकीस आणिलें कीं, दुसरा कांहीं इलाज नाहीं असें समजून त्यानें आपल्या उरांत खंजीर खुपसून घेऊन आत्महत्या केली. ह्या प्रकारें करून पिलाजीनें आपले शत्रूचा सूड उगविला.

अशा कपटयुक्तीनें पिलाजीनें एक सरदार नाहींसा केला, तेणेंकरून मराठ्यांस मोठी खुषी झाली; व त्यानें चौथाईचा हिस्सा कंठाजी कदमाच्या हिश्शाइतका घ्यावा असें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें ते दोघे आपले हक्क

घेण्याकरितां बरोबर निघाले. पैशाच्या वांटणीवरून यांची वारंवार बोलाचाली होत असे. ते फिरत फिरत खंबायतेजवळ आले, आणि लोकांस भीति घालण्याकरितां आसपासचीं घरें जाळूं लागले. तेव्हां शहरांतल्या लोकांनीं एका मनुष्याबरोबर पिलाजीस सांगून पाठविलें कीं, तुम्ही सांगाल ती खंडणी देण्यास आम्ही कबूल आहों, पण आमचीं घरेंदारें जाळूं नका, एवढी आमची विनंती, आपले वरिष्ठ अधिकारी कंठाजी कदम ह्यांस कृपा करून कळवावी. आपण कदमाच्या बरोबरीचे असतां, लोकांनीं असा अपमानाचा निरोप कशाकरितां पाठविला, असें मनांत आणून पिलाजी अत्यंत क्रोधायमान झाला, आणि त्यानें निरोप घेऊन आलेल्या मनुष्यास कैद करून ठेविलें. त्यास सोडून देण्याविषयीं कंठाजीनें आग्रह धरिला. परंतु, पिलाजी ऐकेना. तेव्हां अर्थात् दोघांची लढाई जुंपली. तींत पिलाजी पराभव पावला, आणि मातर येथें पळून गेला. कंठाजीनें त्या शहरावर खडणी बसविली. आणि ती वसूल करून घेतली. तेथें इंग्लिशांची एक वखार होती. तिजवरच्या मुनिमापाशीं त्यानें पांच हजार रुपये मागितले. तेव्हां, आह्मांस शाहूराजानें सर्व कर माफ केले आहेत, असें त्यानें त्यास सांगितलें. तें ऐकून, ते हत्यारबंद लोक गदगदां हंसून निघून गेले.

मराठे लोक गुजराथ वगैरे प्रांतांला फार उपद्रव देऊं लागले, त्याच्या निवारणाच्या तजविजीविषयीं मोंगलांचा मुख्य सुभेदार सुरबुलंदखान ह्यानें दिल्ली सरकारास अनेक वेळां लिहिलें. परंतु, तिकडून उत्तर येईना व कांहीं बंदोबस्त होईना; ह्मणून, पिलाजी गायकवाड व कंठाजी कदम ह्यांस चौथाई देण्याचें कबूल करून, त्यांशीं त्यानें तहाचें बोलणें लाविलें. तें त्यांनीं मान्य केलें नाहीं; तेव्हां त्याचा तिकडूनही उपाय हरला. पुढें पेशव्याचा भाऊ चिमणाजी आपासाहेब, तो मोठें सैन्य बरोबर घेऊन गुजराथेंत उतरला, आणि त्यानें धोलका शहर लुटिलें. तेव्हां त्याजपाशींही सुरबुलंदखान तहाचा विचार करूं लागला. चिमणाजीआपानें त्यास स्पष्ट सांगितलें कीं, तुम्ही अमुक इतका मुलूख आह्मां पेशव्यांस द्याल, तर, तुमच्या राज्यास कोणाही लुटारू व त्रासदायक लोकांचा उपद्रव होऊं नये, असा आह्मी बंदोबस्त करूं. ह्या ह्मणण्यास सुरबुलंदखान कबूल झाला. आणि बाजीराव पेशव्यानेंही त्याविषयीं आपली मान्यता प्रगट केली. हें वर्तमान इ० स० १७२९ त घडलें.

हा तह, इतर मराठे सरदारांचा सल्ला न घेतां पेशव्यानें मोंगलांच्या सुभेदाराशीं केला, आणि त्यांत आपला मात्र फायदा करून घेतला, हें त्यांच्यानें पाहावेना. त्रिंबकराव दाभाड्यानें अति त्वरेनें पंचवीस हजार लोक जमवून, दक्षिणेवर स्वारी करण्याचा निश्चय केला. त्यास निजाम उल्मुलुख अनुकूल झाला. ह्याशिवाय, पिलाजी गायकवाड, कंठाजी व रघोजी कदम, उदाजी व आनंदराव पवार, इत्यादि कितीएक सरदार त्यास मिळाले; आणि शाहूराजाचें राज्य पेशव्यांनीं बळजोरीनें घेतलें आहे, तें त्याचें त्यास परत द्यावें, हा आपला हेतु आहे, असें चोंहींकडे प्रसिद्ध करून ३५००० सैन्यासहवर्तमान ते दक्षिणेवर स्वारी करावयास निघाले. हें वर्तमान बाजीरावास कळतांच, जितकें त्याच्यानें मिळववलें तितकें सैन्य बरोबर घेऊन, तो मोठ्या त्वरेनें नर्मदा उतरून पलीकडे गेला. तेथें पिलाजी गायकवाडाचा पुत्र दमाजी ह्यानें पेशव्यांच्या एका टोळीचा अगदीं पराभव करून टाकिला. तथापि, बाजीराव तिळप्रायही भ्याला नाहीं. तो आपलें सैन्य घेऊन तसाच पुढें चालला. शेवटीं, त्याची व त्याच्या शत्रूंची लढाई, दुभोई आणि बदोदें ह्यांच्या दरम्यान इ० स० १७३१ च्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेस झाली. या वेळीं बाजीराव एका मोठ्या घोड्यावर बसून, आपल्या लोकांस वारंवार उत्तेजन देऊन मोठ्या शौर्यानें लढत होता. आणि त्रिंबकराव दाभाडा हा हत्तीवरच्या हौद्यांत बसून, आपले लोक कसे लढतात, तें पाहात होता. त्यानें धनुष्याची दोरी आकर्ण ओढिली, आणि आतां बाण सोडणार, इतक्यांत त्यास एक बंदुकीची गोळी लागून त्याचा प्राण गेला. तेव्हां त्याचें सर्व सैन्य पळत सुटलें. आणि बाजीरावास जय मिळाला.

ह्या प्रकारेंकरून सेनापति दाभाड्यास बाजीरावानें मारिलें, तरी, तो आपला सरदार ह्मणून त्याच्या वंशजांचें हित करणें हें आपलें कर्तव्य आहे, हें तो विसरला नाहीं. त्रिंबकराव मेल्यावरोबर, पेशव्यानें सेनापतिपदवीचीं वस्त्रें, त्याचा अज्ञान पुत्र यशवंतराव ह्यास दिलीं; आणि त्याचा पिढीजाद सरदार पिलाजी गायकवाड, ह्यास त्याचा कारभार करण्यास नेमिलें. ह्याच वेळीं पिलाजीस सेनाखासखेल ही पदवी मिळाली, व गुजराथेपैकीं बराच प्रांत त्याच्या ताब्यांत आला.

आपल्या प्रांताच्या बंदोबस्ताकरितां जी व्यवस्था सुरबुलंदखानानें केली, ती दिल्ली सरकारास पसंत पडली नाहीं. ह्मणून मारवाडचा राजा अभयसिंग राठोर

ह्याची नेमणूक सुभेदारीचे जागेवर करून, सुरबुलदंखानास दिल्लीस नेलें, आणि त्याची फार अप्रतिष्ठा केली. अभयसिंगाचा अमल होतांच, बडोदें शहर, इ० स० १७३२ पावेतों पिलाजी गायकवाडाकडे होतें, तें त्याच वर्षीं या नवीन सुभेदाराच्या लोकांनीं घेतलें. तथापि, पिलाजीला पुष्कळ लोक अनुकूल असल्यामुळें त्यानें त्याशीं कितीएक लढाया करून त्यांत जय संपादिला. शेवटीं, तहाच्या बोलण्याच्या निमित्तानें, अभयसिंगानें कांहीं लोक गायकवाडाकडे डाकूर येथें पाठविले. ते त्याजपाशीं कांहीं दिवस अशा रीतीनें वर्तले कीं, त्यांजविषयीं त्यास काडीइतका देखील संशय राहिला नाहीं. एके दिवशीं ते अगदीं दिसेनासें होई तोंपर्यंत त्याजपाशीं बोलत बसले, आणि अगदीं दिवे लावण्याच्या संधीस तंबूच्या बाहेर उठून आले. नंतर, गायकवाडास कांहीं गुप्त गोष्ट सांगावयाची राहिली ती सांगतों, असा बाहाणा करून, त्यांतला एक असामी पुनः आंत येऊन त्याचे कानाशीं लागला. तो काय बोलतो तें ऐकण्यास पिलाजी पुढें सरला, तोंच त्यानें आपला खंजीर ह्याचे उरांत खुपसून त्याचा प्राण घेतला. हें वर्तमान इ० स० १७३१ त घडलें.

पिलाजीस मारण्याचा अभयसिंगाचा बेत सिद्धीस गेला; परंतु, यापासून जो फायदा होईल असें त्यास वाटत होतें, तो मात्र झाला नाहीं. कारण, पिलाजी निवर्तल्याचें वर्तमान देशांत पसरल्या बरोबर, त्याचे जुने मित्र जे भील, कोळी, पादुरा येथील देसाई, ते चोहींकडे उठून दंगा करूं लागले. पिलाजीचा भाऊ महादजी हा जंबुशेराहून आला, आणि त्यानें बडोदें घेतलें; तेव्हांपासून तें शहर आजपर्यंत गायकवाडाच्या ताब्यांत आहे. इकडे पिलाजीचा वडील पुत्र दमाजी ह्यानें मोठ्या पराक्रमानें गुजराथच्या पूर्व-भागीं बराच मुलूख काबीज केला. तेव्हां त्याजपुढें अभयसिंगाचें कांहीं चालेनासें झालें.

अशा रीतीनें दमाजीस गादी प्राप्त झाल्यावर, दोन वर्षांनीं त्यानें, कंठाजी कदम बांडे ह्यास गुजराथेंतून हांकून लाविलें. तरी, इ० स० १७३५ त, कंठाजीनें होळकराची मदत मिळवून, गुजराथ प्रांतावर पुनः स्वारी केली; आणि कितीएक गांव जाळून पोळून त्यांपासून पुष्कळ खंडणी घेऊन ते तत्काळ निघून गेले. पुढें अभयसिंगाची बदली होऊन, त्याचे जागीं नजीबउद्दौला मोमीनखान हा सुभेदार आला. त्याची आज्ञा, अमदाबादेचा

मुख्य अधिकारी भंडारीरत्नशी हा मानीना. त्यास घालविण्यासाठीं मोमीनखानानें दमाजी गायकवाडापाशीं मदत मागितली. ती देण्याचें कबूल करून, रंगाजीनामक आपला एक सरदार त्यानें मोमीनखानाकडे पाठविला. त्या उभयतांनीं भंडारीरत्नशी ह्यास हतवीर्य केलें, आणि त्याजपासून तारीख २० माहे मे सन १७३७ रोजीं, अमदाबाद घेतली. तेव्हां, त्या शहराचा अधिकार व वसूल, हे मराठे आणि मोंगल ह्यांनीं निमेनिम घ्यावे, असें ठरलें. हा ठराव पुढें अनेक कटकटींस कारणीभूत झाला.

ह्यापुढें दमाजी गायकवाडाचें प्रस्थ फारच वाढत चाललें. हा आपले राज्याविषयीं मुखत्यार असून, दाभाड्याच्या मुलुखाचाही कारभार पाहात असे. तो गुजराथेंत तर खंडणी घेत असेच; पण त्यानें आणखी काठेवाडावरही कर बसविला, आणि मोमीनखान मरेपर्यंत, ह्मणजे इ० स० १७४३ ह्या वर्षापर्यंत, तो वसूल करून घेतला.

मोमीनखानाचे जागेवर अबदुल अझीजखान ह्याची योजना झाली. तो औरंगाबादेहून येत असतां भडोच शहराजवळ अंकलेश्वर येथें उतरला. त्यास दमाजीच्या साह्यकारी लोकांनीं हल्ला करून अगदीं नाहींसें करून टाकिलें. नंतर, फकीरउद्दवला ह्या नांवाचा एक मनुष्य त्याचे जागेवर नेमिला. तो अमदाबाद घ्यावयास गेला. तेव्हां रंगाजीनें आड येऊन त्याच्या कार्यास विघ्न केलें. ह्या सुमारास दमाजी, ताराबाईस मदत करण्याकरितां साताऱ्यास गेला होता. तेथें त्यास पेशव्यानें प्रतिबंधांत ठेविलें. परंतु, त्याच्या गुजराथेंतल्या मुलुखापैकीं निमे मुलूख घेण्याचें त्याजपासून कबूल करून घेऊन त्यास सोडून दिलें.

दमाजीचा भाऊ खंडेराव ह्यानें फकीरउद्दवला ह्याशीं चांगला स्नेह ठेविला होता. परंतु, तो दमाजीस अगदीं आवडला नाहीं. ह्मणून त्यानें तो तोडून टाकिला. आणि खंडेरावानें स्वस्थ सुखांत राहावें, ह्मणून त्यानें त्यास नर्यादं परगणा वेगळा जाहागीर ह्मणून तोडून दिला, आणि भडोचच्या नायब सुभेदारीचें काम त्यास सांगितलें.

दमाजीनें पेशव्यांशीं जो करार केला होता, तो अमलांत आणण्यासाठीं राघोबादादा, ह्मणजे पेशव्याचा धाकटा भाऊ, तिकडे स्वारीस निघाला. इतक्यांत दमाजीही इकडून सुटका पाबून त्यास जाऊन मिळाला. ते दोघे देशांतून खंडणी घेत चालले. ते अमदाबादेजवळ आले. आणि पाहूं लागले,

तों सर्व शहरांत जटामर्दखाननामक मोंगलांच्या अधिकाऱ्यानें आपला अमुल बसविला आहे, आणि मराठ्यांचा अधिकार तेथें नाहींसा झाला आहे, असें त्यांच्या दृष्टीस पडलें. परंतु, त्या दोघांनीं, मोठ्या पराक्रमेंकरून, इ० स० १७५५ च्या एप्रिल महिन्यांत तें शहर घेतलें. आणि त्याचा वसूल पेशवे व गायकवाड ह्यांनीं निमेनिम घ्यावा, असें ठरविलें.

इ० स० १७६१ त पानपतची मोठी लढाई झाली. तेव्हां दमाजी गायकवाड हा मराठ्यांकडचा एक सरदार होता. तो त्या प्रसंगीं पुष्कळ लढला. परंतु, शेवटीं जेव्हां मराठे पराभव पावून पळत सुटले, तेव्हां इतर सरदारांबरोबर तो निघून दक्षिणेंत आला. दमाजी गायकवाड इ० स० १७६८ त मरण पावला. त्याला चार पुत्र होते; सयाजी, गोविंदराव, माणकोजी, आणि फत्तेसिंग. ह्यांतला सयाजी हा जन्मवेडा होता.

दमाजीच्या कारकीर्दींत गायकवाडाच्या कुळांत एक नवी चाल पडली. ती कोणती व तिचें कारण काय, हें येथें सांगणें आवश्यक आहे. एके वेळीं दमाजी हा शाहूराजाचे भेटीस गेला. तेव्हां त्याजबरोबर पुष्कळ सैन्य होतें, तें सध्यां दूर असूंद्या, असें शाहूनें त्यास सांगितलें, तें त्यानें मान्य केलें. आणि ह्यापूर्वीच त्यानें दमाजीस अभयवचन देऊन त्याच्या उजव्या हातावर टाळी दिली होती. पुढें, त्यास एकटा पाहून, शाहूनें त्यास धरण्याचा इशारा केला. तेव्हां, दमाजी आपल्या उजव्या हाताकडे पाहून म्हणाला, ज्या ह्या उजव्या हातावरचें वचन असें भंग पावलें, त्यानें मुजरा करावयाचा नाहीं. तेव्हांपासून गायकवाडाचे वंशांत डावे हातानें रामराम करण्याची चाल पडली.

दमाजी मरण पावल्यावर त्याचे गादीविषयीं त्याचे मुलांचीं भांडणें लागलीं. सयाजी हा सर्वांत वडील खरा, परंतु, दुसऱ्या बायकोचा; आणि गोविंदराव हा वयानें त्यापेक्षां लहान, परंतु, पहिल्या बायकोचा मुलगा. अशी स्थिति होती. गोविंदरावास गादी द्यावी, असें प्रथमतः माधवरावाच्या मनांत होतें; परंतु तें कृत्य न्यायशास्त्रयांस पसंत पडलें नाहीं; म्हणून, सयाजीस वस्त्रें देऊन, त्याचे राज्याचा सर्व कारभार फत्तेसिंगानें पाहावा, असें ठरविलें. पुढें माधवराव मरण पावून नारायणराव मारला गेल्यावर, पेशवाईची गादी कांहीं दिवस राघोबा दादास मिळाली होती. तितक्या अवकाशांत त्यानें, गायकवाडाच्या गादीचा मालक गोविंदराव असें ठरविलें. त्याप्रमाणें तो, फत्तेसिं-

गाशीं लढून त्यापासून आपलें राज्य घेण्याकारितां गुजरायेंत गेला. अशा प्रकारेंकरून गायकवाडांमध्यें आंतलेआंत कलह लागला.

राघोत्रा दादानें गोविंदरावास गायकवाडाच्या गादीचा मालक ठरविलें, ह्यास फार दिवस गेले नाहींत तोंच त्याची पेशवाईची गादी गेली. तथापि गोविंदरावाला त्याचा आश्रय होता. आणि फत्तेसिंगानें इंग्लिश सरकार व पुण्याचे पेशवे ह्यांचें साह्य मिळविलें. उभयपक्षांच्या अनेक झटापटी झाल्या. त्यांत शेवटीं फत्तेसिंगासच यश आलें, आणि तो गायकवाडाचे राज्याचा मालक, असें सर्वांनीं कबूल केलें. अठरा वर्षें पर्यंत मुलुखाचा कारभार केल्यानंतर, तो फत्तेसिंग, इ० स० १७८९ च्या दिसेंबरच्या ३१ व्या तारखेस माडीवरून पडून मरण पावला. तेव्हां गायकवाडाची गादी गोविंदरावास सहज प्राप्त व्हावयाची. परंतु, माणकोजी हा एक त्याचा भाऊ त्यास प्रतिपक्षी उत्पन्न झाला. त्यानें पेशव्यांस ३३१३००१ रूपयांचा नजराणा देऊन व, फत्तेसिंगाकडे ३६०००० रूपये त्यांचे मागचे यावयाचे होते ते देण्याचें कबूल करून, त्यांजकडून आपणास गादीचा मालक ठरवून घेतलें. तरी या दोघांचा वाद चार वर्षें चालून, माणकोजी इ० स० १७९३ त निवर्तला, तेव्हां तो मिटला. नंतर गोविंदरावास गादी मिळाली. तो इ० स० १८०० ह्या वर्षीं मरण पावला. त्यास, आनंदराव, फत्तेसिंग आणि सयाजी हे तिघे औरस पुत्र होते, व कान्होजी वगैरे आठ दासीपुत्र होते.

गोविंदरावाचे मागें आनंदराव गादीवर बसला. परंतु, तो जरा भोळसर असल्यामुळें त्याच्या राज्याचा कारभार फत्तेसिंग पाहात असे. त्याचा व कान्होजीचा कलह लागला. तेव्हां फत्तेसिंगानें इंग्लिशांची मदत मागितली. ती त्यांनीं तत्काळ दिली. तेणेंकरून, त्याच्या राज्यांत मल्हारराव नामक त्याच्या एका कडू सापत्न भावानें जें बंड माजविलें होतें, तें मोडिलें, आणि रोजमुऱ्याची फार बाकी राहिल्यामुळें अरब लोक फार दंगा करीत असत, त्यांचाही बंदोबस्त केला. आणि कान्होजीस धरून बडोद्यास प्रतिबंधांत ठेविलें. ह्या रोजमुऱ्याच्या फेडीचें काम उरकण्यास गायकवाडाला ४१३८७३२ रूपये कर्जी काढावे लागले. ह्यांपैकीं निमे रकम इंग्लिश सरकारानें दिली, व बाकीची निमे शेटसावकारांनीं पुरविली. ही रकम पावणोत्रा व्याजानें काढिली होती. तिजविषयींचा करार असा होता कीं, पांच वर्षांत हाप्त्याहाप्त्यांनीं सर्व रकमेची फेड झाली तर बरें; नाहींतर तिजबद्दल कांहीं प्रांत

गायकवाडानें इंग्लिश सरकारचे हवालीं करावा. शेवटीं, गोष्ट त्याच थरास आली. इ० स० १८०५ पर्यंत इंग्लिशांस कर्जापैकीं एक पैसा देखील पोहोंचला नाहीं, आणि त्याची रकम दिवसेंदिवस फुगत चालली. आणि मदतीस दिलेल्या लोकांच्या पगाराबद्दलचीही बाकी त्याजकडे पुष्कळ तुंबली. तेव्हां कर्ज फेडण्यासाठीं गायकवाडानें आपल्या राज्याचे उत्पन्नापैकीं १२९५००० रूपयांचा वसूल इंग्रज सरकाराकडे लावून दिला, आणि चौसरी, चिखली, व खेडा, इत्यादि परगणेही त्यांस अगदीं दिले. ह्याखेरीज, फौजेच्या पगाराची बाकी फेडण्याकरितां, धोलका, विजापूर, नर्याद, मुंढा, व महतर, इत्यादि परगणे, ह्मणजे सुमारें ११७०००० रूपयांचे उत्पन्नाचा मुलूख त्यानें इंग्लिश सरकारास अगदीं दिला. अशा प्रकारें त्याचा बराच मुलूख इंग्लिशांस मिळाला. तरी त्याजकडे कर्जाचीं बाकी राहिलीच होती. ह्यानंतर इ० स० १८१२ ह्या वर्षीं गायकवाडाच्या मुलुखांत मोठा दुष्काळ पडला. त्यामुळें, खजीन्यांत पैसा नाहींसा होऊन, कर्जाची रकम वाढली.

ह्यानंतर गायकवाडाचा वकील गंगाधर शास्त्री पुण्यास पेशव्यांचे दरबारीं गेला. त्यास बाजीरावानें ठार मारविलें. इत्यादि गोष्टी बाजीरावाच्या वृत्तांतांत सविस्तर लिहिल्या आहेत, ह्मणून येथें लिहीत नाहीं.

इ० स० १८१८ ह्या वर्षीं फत्तेसिंग निवर्तला, आणि पुढें लागलाच आनंदरावही मरण पावला. नंतर, त्यांचा धाकटा भाऊ सयाजी, हा गादीवर बसला.

इ० स० १८२० ह्या वर्षीं मुंबईचे गव्हरनर साहेब मौंत स्तुअर्त एल्फिन्स्तन् हे सयाजीच्या मुलाखतीकरितां बडोद्यास गेले. तेव्हां त्यांनीं आपल्या राहिलेल्या सर्व कर्जाचा निकाल लावून घेतला. त्यांस सयाजीनें असें दर्शविलें कीं, इंग्लिश रेसिदेंताचा हात आमच्या राज्यकारभारांत असल्यामुळें आह्मांस भारी अडचण पडते. त्यावरून, त्यांनीं सयाजीला त्याच्या राज्यकारभाराचा पूर्ण अधिकार दिला. परंतु, त्यास असें सांगितलें कीं, तुमच्या राहिलेल्या निमे कर्जास इंग्रज सरकार जामीन आहे, त्याचा सात वर्षांचे आंत फडशा करून टाका; नाहींतर ही वहिवाट फार दिवस नांदणार नाहीं. परंतु, त्याप्रमाणें कांहींएक झालें नाहीं. ह्मणून इंग्रज सरकारानें त्याच्या राज्यापैकीं कांहीं प्रांत वेगळे काढून, त्यांवर निराळे कामदार नेमून, त्यांचें उत्पन्न राहिलेलें कर्ज फेडण्याकडे द्यावें असें ठरविलें. तेव्हां खुद गायकवाडाकडे

असा वीस लक्षांचा मुलूख राहिला. तेव्हां त्याला थोडेंसें वाईट वाटलें. परंतु, कर्ज फिटल्याबरोबर त्याचा सर्व मुलूख त्याचे स्वाधीन केला.

सयाजी इ० स० १८४७ च्या दिसेंबर महिन्याच्या १९ व्या तारेस मरण पावला. नंतर त्याचा वडील पुत्र गणपतराव हा त्याचे गादीवर बसला. त्यानें सात वर्षें राज्य भोगिलें. तो १८५६ च्या नोवेंबरच्या १९ व्या तारखेस वारल्यावर, त्याचा भाऊ खंडेराव आपासाहेब, त्याच्या गादीवर बसला. नंतर लवकरच शिपाई लोकांनीं बंड केलें. त्या कठिण प्रसंगीं खंडेराव गायकवाड इंग्लिश सरकाराशीं फार प्रामाणिकपणानें वागला. त्याचें फळ त्याला मिळालें. तो, इ० स० १८७० च्या नोवेंबर महिन्याच्या २८ व्या तारखेस मरण पावला. नंतर त्याचे गादीवर त्याचा भाऊ मल्हारराव हा बसला. ह्या मल्हारराव महाराजांस, रेसिदेंत कर्नल फेर साहेब ह्यांस विष घालविण्याच्या आरोपाच्या संशयावरून, व राज्यांत फार अव्यवस्था असल्यावरून, इ० स० १८७५ ह्या वर्षीं गादीवरून काढून मद्रासेस नेऊन ठेविलें, आणि खंडेरावाची स्त्री राणी जमनाबाईसाहेब ह्यांस, त्यांच्या कुळांतला एक लहानसा मुलगा दत्तक देऊन, त्यास इंग्रज सरकारानें गादीवर बसविलें. त्याचें नांव सयाजीराव महाराज. ते हल्लीं* गादीवर आहेत. राज्याचा कारभार, रेसिदेंताच्या अनुमतानें दिवाण करीत आहेत.

गायकवाडाचा मुलूख औरसचौरस ४३९९ मैल असून, वसूल ७०००००० रुपये आहे. लोकसंख्या सुमारें २००००० आहे. राजधानीचें शहर बडोदें आहे. तेथें मुसलमानांच्या वेळच्या फार मोठ्या व सुंदर इमारती पुष्कळ आहेत. गायकवाडास भावनगर, पोरबंदर, इत्यादि कितीएक संस्थानांकडून खंडणी मिळते.

होळकर सरकारचा वंश.

इ० स० १७३२.

होळकर ह्यांतला मूळ शब्द होळ असा आहे. होळ हें, पुणें जिल्ह्यामध्यें नीरानदीचे तीरीं एक गांव आहे. तेथील एका धनगरास मल्हारी ह्मणून

---

* इ० स० १८८१.

मुलगा झाला. तो स्वपराक्रमानें मोठी योग्यता पावून बलिष्ठ सरदार बनला. ह्मणून त्यास मल्हारराव होळकर असें ह्मणत.

हा मल्हारी इ० स० १६९३ त जन्मला. त्याचा बाप तो पांच वर्षांचा असतांच मरण पावला. ह्मणून त्याच्या मामानें त्यास खानदेशामध्यें आपल्या घरीं नेलें. तो तरी घरचा गरीबच होता, ह्मणून त्यानें आपल्या भाच्यास आपल्या मेंढ्या राखायास लाविलें. तेव्हांची एक चमत्कारिक गोष्ट पुस्तकांतून लिहिली आहे. ती अशी कीं, मल्हारी, भरदोनप्रहरीं, आपल्या मेंढ्यांस चरायास लावून, आपण उन्हांत स्वस्थ पडला असतां त्यास झोंप लागली. त्या वेळीं, त्यास सूर्यकिरणांचा ताप लागूं नये ह्मणून त्याच्या मस्तकावर एका मोठ्या नागानें आपली फडा धरिली. हें, महत्पद प्राप्त होण्याचें सूचक चिन्ह आहे, असें कितीएक लोक समजत असत. असो.

मल्हारी अमळसा मोठा झाल्यावर, त्यास त्याच्या नीच स्थितीचा कंटाळा येऊन, त्यानें नंदूरबार येथें जाऊन, तेथें कंठाजी कदम बांडे ह्मणून एक सेनापति दाभाडे ह्याचा सरदार होता, त्याच्या हाताखालीं शिपायगिरीची नोकरी धरिली. पुढें सेनापति दाभाडे व कदम हे गुजराथेंत उतरले. तेव्हां मल्हारी हा पंचवीस स्वारांचे पदकासहवर्तमान त्यांजबरोबर होता. त्याच संधीस थोरल्या बाजीरावाची फौज माळव्यांत चालली होती. तिजमधील लोकांची व कदमाच्या लोकांची तापीनदीच्या तीरीं मोठी कलागत लागली. तिचें निवारण करितांना मल्हारीनें शौर्य व चातुर्य दाखविलें. त्याजविषयींची त्याची तारीफ बाजीरावाच्या कानावर गेली. तेव्हां, असा मनुष्य आपले संग्रहीं असावा असें त्यास वाटून, त्यानें मल्हारीस कदमापासून मागून घेतलें. तेव्हांपासून मल्हारी होळकर हा पेशव्यांचा सेवक झाला. त्यांनीं लागलाच त्याला ५०० स्वारांचा सरदार करून, त्यांच्या खर्चाकरितां, इ० स० १७२८ ह्या वर्षीं, त्यास बारा परगण्यांची जाहागीर करून दिली.

ह्या प्रकारेंकरून मल्हारी ह्मणून जो यःकश्चित् जमादार होता, तो मल्हारराव होळकर ह्या नामेंकरून मोठा सरदार बनला. दिवसेंदिवस त्याची प्रतिष्ठाहीं वाढत चालली. इ० स० १७३२ ह्या वर्षीं पेशव्यांनीं माळवा प्रांतावर स्वारी केली. तेव्हां तेथचा मोंगलांचा सुभेदार दायबाहादर हा त्यांशीं लढण्यास उभा राहिला. उभयपक्षांचें तुमुल युद्ध झालें. त्यांत तो सुभेदार पतन पावून, पेशव्यांस यश मिळालें. ह्या प्रसंगीं पेशव्यांच्या सैन्यांत मल्हा-

रराव होळकरच प्रमुख सरदार होता. ह्या मोहिमींत जो मुलूख पेशव्यांनीं जिंकिला, त्याचा इंदूर वगैरे बराच भाग त्यांनीं होळकरास सरंजामाकरितां ह्मणून दिला. नंतर नर्मदेच्या पलीकडच्या आपल्या मुलुखाचाही कारभार त्यांनीं त्यालाच सांगितला. पुढें इ० स० १७३८ त निजाम उल्मुलुख, दिल्लीच्या बादशाहाच्या वतीनें मराठ्यांशीं लढूं लागला. तेव्हांही मल्हारराववानें मोठ्या पराक्रमेंकरून त्याचा पराभव केला. तो इतका कीं, त्यानें शेवटीं तहाचें बोलणें लाविलें. तेव्हां जो तह ठरला, त्यावरून, नर्मदेपासून चंबळानदीपर्यंत सर्व मुलुखाचें स्वामित्व मराठ्यांस प्राप्त झालें. चिमाजी बल्लाळ पेशवे, ह्मणजे बाजीरावाचे धाकटे बंधु, ह्यांनीं इ० स० १७३९ सालीं पोर्तुगीज लोकांपासून वसईचा किल्ला घेतला. त्या वेळींही मल्हारराववानें त्यांस चांगलें साह्य दिलें. ह्या प्रसंगीं मराठ्यांकडचे ५०० लोक पडले, असें सांगतात. हे तिकडे गुंतले असतां नादिरशाहाची स्वारी हिंदुस्थानावर आल्याची वदंता त्यांस समजली. ह्मणून मल्हारराव कोंकणांतून निघून इकडे पेशव्यांच्या मुख्य लष्करास येऊन मिळाला. मराठ्यांनीं माळवा पूर्णपणें काबीज केल्यानंतर, इ० स० १७५० ह्या वर्षीं साडेचौऱ्याहात्तर लक्षांचा मुलूख होळकरास जाहागीर मिळाला. त्याच्या पुढच्या वर्षीं रोहिले व अयोध्येचा वजीर सफदरअल्ली ह्यांचा तंटा लागला. त्या प्रसंगीं होळकरानें वजीराचा पक्ष स्वीकारून आपला फायदा करून घेतला. इंदूर हें त्यानें आपलें राहण्याचें ठिकाण केलें, तेणेंकरून तें मोठें शहर वसलें.

इ० स० १७५७ त राघोबादादानें मोठ्या सैन्यासहवर्तमान हिंदुस्थानांत स्वारी करून मुलतान व लाहोर हे प्रांत जिंकून तेथें आपला अमल बसविला. तेव्हांही मल्हारराव त्या सैन्यांत प्रमुख होता. पुढें थोडक्याच दिवसांनीं आमेदशाह अब्दल्लीचें सैन्य हिंदुस्थानावर आलें. तेव्हां, इ० स० १७६१ त, पानपत येथें मराठ्यांची व त्याची मोठी लढाई झाली. त्या लढाईस आरंभ करणें तो जरा अवकाशानें करावा, असें मल्हारराव होळकर ह्यानें, सदाशिवराव भाऊ, ह्मणजे मराठ्यांच्या फौजेचा मुख्य सेनापति ह्यास सुचविलें. परंतु, तो गर्वानें फुगला होता; त्यानें धिःकारपूर्वक मल्हाररावास उत्तर दिलें कीं, "अशी धनगराची मसलत कोणाला पाहिजे.?" तेणेंकरून मल्हारराव अत्यंत कोपायमान झाला. आणि, मराठ्यांचा पराभव झाल्यावर जे सरदार रणभूमीवरून निघून इकडे आले, त्यांत तोही बचावून दक्षिणेत

पोहोंचला. या महासमरांगणांत तो मनापासून लढला नाहीं, आणि पळ काढण्याच्या प्रसंगाची थोडीशी तयारी यानें आधींच ठेविली होती, असें कांहीं ग्रंथकार लिहितात; आणखी या भयंकर प्रसंगांतून बचावून जे सरदार दक्षिणेत परत आले, यांत व्यवस्थित असा कायतो एकटा मल्हारराव होता. बहुत सुज्ञ लोकांचें म्हणणें असें पडतें कीं, सदाशिवरावभाऊ जर या वेळीं मल्हाररावाच्या मसलतीनें चालता, तर मराठ्यांचा इतका नाश न होता. परंतु, होणारापुढें काय उपाय.? मल्हारराव, चाळीस वर्षें शिपायगिरी गाजवून, ७६ वर्षांचा होऊन, इ० स० १७६५ त मरण पावला. याच्या शौर्यादि गुणांची लोकांत मोठी आख्या असे. ह्याच्या वेळीं जे युद्धप्रसंग झाले, यांपैकीं म्हणजे एकाद्यांत हा नव्हता, असें बहुधा आढळत नाहीं. राजकीय कारभारांत तो महादजी शिंद्याच्या खालोखाल होता. पाऊण कोटि रूपयांचा मुलूख ह्याच्या ताब्यांत होता, व सोळा कोट रूपये खाजपाशीं रोख शिल्लक होते.

मल्हाररावास खंडेराव म्हणून एक पुत्र होता, पण तो आपल्या बापाच्या आधींच निवर्तला होता. म्हणून मल्हाररावाच्या मागें, खंडेरावाची बायको अहिल्याबाई व तिचा पुत्र माळेराव, हीं राज्याचीं मालक झालीं. पेशव्यांनीं माळेरावास वस्त्रें दिलीं. परंतु तो लवकरच वारला. तेव्हां सर्व कारभार अहिल्याबाई स्वतः एकटीच पाहूं लागली. ह्या बाईस एक कन्या होती. ती जुन्नरकर रेवजी बापू पाडसे गांवढे धनगर ह्यांस दिली होती. तिचा नवरा मेल्यामुळें ती सती गेली.

माळेरावाच्या मागें राज्याचा सर्व कारभार अहिल्याबाईनें आपले हातीं घेतला. त्याला खो आणण्याचा विचार रघुनाथराव पेशव्यानें मनांत आणिला होता. परंतु, तिचा पक्ष शिंद्यानें उचलल्यामुळें त्यास तो नाद सोडून द्यावा लागला. गंगाधर यशवंत म्हणून कोणी चतुर ब्राह्मण मल्हाररावाचा एक विश्वासू नौकर होता, त्यास तिने आपला दिवाण केलें, आणि आपल्याच कुळांतला तुकोजी होळकर नामक पुरूष आपल्या सर्व फौजेवर सेनापति नेमिला. आपल्या बुद्धिबळानें व ह्या दोघांच्या साह्यानें तिनें आपल्या मुलुखाचा कारभार तीस वर्षें पर्यंत इतक्या उत्कृष्ट रीतीनें चालविला कीं, तिची प्रजा तिला शुद्ध आईप्रमाणें मानूं लागली. न्याय, नीति आणि शहाणपण ह्यांची ती साक्षात् मूर्तीच आहे, असें सर्व लोक म्हणत.

तुकोजीवर अहिल्याबाई फार लोभ करीत असे. तोही तिजशीं केवळ पुत्रत्वाच्या नात्यानें वागून तिला आई ह्मणत असे. तो तिजपेक्षां वयानें मोठा असल्यामुळें त्यास तिच्यानें दत्तक घेववेना. ह्यास्तव ती त्यास मल्हारराव्याचा पुत्र असें ह्मणवीत असे.

तुकोजीकडे होळकराच्या सर्व सैन्याचा अधिकार आला, तो सर्व राज्याचाच अधिकार आला असें ह्मटलें पाहिजे. तो प्रथम कांहीं वर्षेपर्यंत महादजी शिंद्याचा मित्र होता. इ० स० १७८० त हा शिंदा, कर्नल गोदर्द नामक इंग्लिश सरदाराबरोबर गुजराथेंत लढत होता; तेव्हां त्यास तुकोजीनें चांगली मदत दिली. पुढें तो शिंद्याशीं बांकून राहूं लागला. तो इतकाकीं, त्यांच्या कितीएक लढाया देखील झाल्या. इ० स० १७८५ त अहिल्याबाई निवर्तली. मग तर तुकोजी हा पक्का होळकर राजा बनला. सावनूरच्या नवाबास टिपूसुलतान फार त्रास देऊं लागला. तेव्हां त्या नवाबानें, तुकोजीस शरण येऊन मदत मागितली. त्याप्रमाणें त्यानें त्यास मदत देऊन, इ० स० १७८६ ह्या वर्षीं टिपूच्या सैन्याचा पराभव केला. त्यानें इ० स० १७९२ त फ्रेंच सरदार नौकरीस ठेवून, आपल्या लष्करांत चार कवाइती पलटणें तयार करविलीं. तुकोजीनें आपले सैन्याची व्यवस्था फार उत्तम रीतीनें ठेविली होती. तरी, त्याचा प्रबळ नवा शत्रु, दौलतराव शिंदा, ह्याजपुढें त्याचें कांहीं चालेनासें झालें. अजमिराजवळ लखैरी येथें त्यानें त्याच्या सैन्याचा अगदीं मोड करून टाकिला. तुकोजी होळकर इ० स० १७९७ त मरण पावला. त्याला चार मुलगे होते. त्यांपैकीं काशीराव व मल्हारराव हे दोन औरस पुत्र होते; आणि विठोजी व यशवंतराव हे दोन दासीपुत्र होते.

तुकोजी निवर्तल्यावर त्याचे गादीचे मालकीविषयीं त्याचे मुलगे भांडूं लागले. तो तंटा पुण्यामध्यें पेशव्यांचे दरबारीं आला. तेथें तरी दुफळी झालेली होती. एका पक्षाचा मुख्य नाना फडनवीस होता, आणि दुसऱ्याचें प्राधान्य दौलतराव शिंद्याकडे होतें. काशीरावानें दौलतराव शिंद्यास पुष्कळ लांच देऊन त्यास आपलेकडेस वळवून घेतलें; आणि नानानें मल्हाररावाचा पक्ष धरिला. पुण्याच्या दरबारांत ह्यांच्या भांडणाची वाटावाट चालली असतां, दौलतराव शिंद्यानें मल्हाररावाच्या तंबूंवर हल्ला करून त्यास ठार मारिलें, आणि त्याचा पुत्र खंडेराव हा त्याचे हातीं सांपडला, त्यास त्यानें प्र-

तिबंधांत ठेविलें. ह्या हल्ल्यांतून यशवंतराव बचावून पळून गेला, तो वऱ्हाडचा राजा रघोजी भोंसला ह्याचे येथें प्राप्त झाला. त्यानें त्यास धरून कैद करून ठेविलें; तेथें अठरा महिनेपर्यंत कारागृहांत राहून, तो मोठ्या युक्तीनें सुटून धार येथें गेला. तेथें आनंदराव पवारानें त्यास प्रथम आश्रय दिला. परंतु, माझ्या वैऱ्यास तुम्हीं पाठीशीं घातलें आहे, ह्याचा सूड मी खचीत घेईन, असें दौलतराव शिंद्यानें त्यास सांगून पाठविल्याबरोबर, त्यानें त्यास सोडून दिलें. नंतर, जवळचें द्रव्य खर्चून, यशवंतरावानें शेंसव्वाशें लोक नौकरीस ठेविले. ह्या लोक[illegible]स बरोबर घेऊन, यशवंतरावानें काशीरावाच्या लोकांवर हल्ला केला, आणि त्यां[illegible]ा अगदीं मोड करून टाकिला. हा जय प्राप्त झाल्यावर यशवंतरावास आ[illegible]खीही कितीएक प्रसंगीं यश मिळालें. तेणेंकरून त्याच्या शौर्याची चोहींकडे [illegible]फार कीर्ति झाली; त्याजपाशीं पुष्कळ द्रव्य जमलें; आणि त्याच्या योगानें [illegible]ास पुष्कळ सैन्य ठेवण्याचें सामर्थ्य आलें. यशवंतरावाबरोबर विठोजी देखील [illegible]पळून गेला होता. परंतु, तो पुनः पेशव्यांचे हातीं सांपडला; तेव्हां त्याजवर [illegible]दंग्यांत सामील असल्याची शाबिदी झाल्यावरून त्यांनीं त्यास हत्तीच्या पायीं [illegible]बांधून ठार मारिलें. हें घोर कृत्य दौलतराव शिंद्यानें पेशव्यांकडून करविलें, अ[illegible]मे सांगतात.

यशवंतरावास अमीरखान नामक एक मुसलमान प्रबळ [illegible]परदार अनुकूळ झाला. त्याच्या मदतीनें त्यानें मुलूख लुटण्याचा सपाटा चालविला. [illegible]नो देशामध्यें धामधूम करीत करीत, इ० स० १७९८ ह्या वर्षीं महेश्वरास आला. तेथें एके दिवशीं एक बंदूक हातांत घेऊन तो सहज पाहात बसला असतां, [illegible]रीत भरलेला बार एकदम उडून ती फुटली; तेणेंकरून त्याचा एक डोळा फुटला. त्यामुळें तो तीन महिने आजारी होता.

यशवंतराव बरेच दिवसांपासून शिंद्याच्या मुलुखांत लूट करीत असे. ह्यास्तव शिंद्यानें आपलें सैन्य त्याजवर पाठविलें. त्याच्या व यशवंतरावाच्या सैन्याच्या अनेक लढाया झाल्या. त्यांपैकीं एक मोठी लढाई, इ० स० १७९९ ह्या वर्षीं, उज्जनीजवळ झाली. त्या वेळीं यशवंतरावानें शिंद्याचा पराभव करून त्याचें उज्जनी शहरही घेतलें. ह्या संस्थानिकांची दुसरी एक मोठी लढाई इंदुराजवळ झाली. त्या समयीं, गर्वामुळें, यशवंतरावाचा इतका पराजय झाला कीं, तें त्याचें राजधानीचें शहर त्याच्या शत्रूंनीं घेतलें, आणि त्यास, निरुपायास्तव, थोडक्याशा लोकांसहवर्तमान, पळून जावें लागलें.

नंतर त्यानें रतलाम शहर लुटून पुष्कळ पैसा मिळविला. पुढें रजपूतस्थानांत व खानदेशांत धामधूम करून त्यानें इतकें द्रव्य जमविलें कीं, त्याच्या योगानें त्यास बरेंच सैन्य ठेवण्याचें सामर्थ्य आलें.

शिंद्यानें आपला फार नाश केला आहे, त्याचा सूड उगविला पाहिजे, असें यशवंतरावाच्या मनांत डांचतच होतें; आणि त्यानें व पेशव्यानें अत्यंत क्रूरपणा करून त्याच्या भावास हालहाल करून ठार मारिलें, ह्याचा त्यास अतिशयित क्रोध आला होता. व ते दोघेही पुण्यास होते. ह्मणून, यशवंतरावानें आपलें सर्व सैन्य बरोबर घेऊन त्या शहराची वाट धरिली. तो पुण्याजवळ प्राप्त होतांच, बाजीराव भयभीत होऊन, त्याशीं तहाचा विचार बोलूं लागला. परंतु तो कांहींएक ऐकेना. शेवटीं, इ० स० १८०२ च्या आक्तोबर महिन्याच्या २५ व्या तारखेस उभयपक्षांची लढाई पुण्याजवळ झाली. तेव्हां पेशवा आणि शिंदा ह्यांची एकंदर सेना सुमारें चौऱ्यायशीं हजार होती तरी, तींत शिंदा केवळ पराभव पावला, तें पाहून बाजीराव भिऊन पुण्यांतून पळून गेला. यशवंतरावानें पुणें घेतलें; आणि तेथें, पेशव्याच्या गादीवर, बाजीरावाचा भाऊ अमृतराव ह्यास बसविलें; आणि त्यानें आपणास दोन कोटि रुपये रोख आणि एक कोटि रुपयांचा मुलूख द्यावा, असें ठरवून घेतलें.

नंतर शिंदे व होळकर ह्यांचा तह झाला. खंडेराव होळकर शिंदे ह्यांच्या ताब्यांत होता, तो त्यांनीं यशवंतरावाच्या स्वाधीन केला. पुढें होळकर व इंग्लिश सरकार ह्यांचें वैमनस्य आलें. ह्याचें कारण असें कीं, तो त्यांच्या मुलुखांत लुटालूट करूं लागला. त्याजवर स्वारी करण्यास इंग्लिश लोकांनीं आपल्या जनरल लेकनामक सेनापतीस नेमिलें. त्याच्या हाताखालच्या एका टोळीनें रामपूर घेतलें. पुढें पावसाळा नजीक आला. ह्मणून लेकसाहेब बहुतेक सैन्यासहवर्तमान कानपुरास येऊन राहिला. आणि त्यानें कर्नल मानसन ह्यास पांच पलटणें, तीन हजार स्वार, आणि कांहीं तोफा, इतक्या सैन्यानिशीं मागें ठेविलें. त्याजपाशीं सैन्य थोडें आहे असें पाहून, होळकरानें त्वरा करून, चंबळानदी उतरून, त्याजवर हल्ला केला. त्यांची लढाई इ० स० १८०४ च्या जुलै महिन्यांत झाली. तेव्हां अर्थात् इंग्लिश सैन्याचा मोड झाला. लेफ्तनेंत लुकन व दुसऱ्या कितीएक इंग्लिश सरदारांस होळकरानें कैद करून नेलें. मानूसनसाहेबाच्या फौजेचा फार नाश

झाला. आणि तो मोठया संकटानें आग्र्यास येऊन पोहोंचला. ह्या पराभवाचें वर्णन तेव्हांच्या कोणींएका कवीनें करून ठेविलें आहे. त्यांत, मान्सन ह्याच्या धांदलीविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "कर्नल मान्सन हा घोड्यावर हौदा आणि हत्तीवर खोगीर ठेवून पळत सुटला!"

नंतर यशवंतराव होळकरानें मथुरा घेतली. हें वर्तमान जनरल लेकसाहेबास कळतांच तो तेथें आला. तेव्हां होळकराचे लोक तेथून निघून जाऊन, त्यांनीं दिल्लीस वेढा घातला. परंतु तेथें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. पुढें दीग किल्ल्याजवळ गोवर्धन येथें होळकर व जनरल फ्रेजर ह्यांची लढाई, इ० स० १८०४ च्या नोवेंबर महिन्याच्या १३ व्या तारखेस झाली. तींत फ्रेजरसाहेबास जखम लागून, त्याचे सुमारें ३५० लोक पडले, तरी त्यास जय मिळाला, व होळकर हा पराभव पावून यमुनेकडे पळून गेला. नंतर फ्रेजरसाहेब तीन दिवसांनीं मरण पावला. जनरल लेकसाहेब होळकराच्या मागें लागला, व पुढें त्यानें दीग किल्लाही वेढा घालून घेतला.

दीग येथें अशी अवस्था झाल्यावर, होळकराचे लोक भरतपूरच्या किल्ल्यांत जाऊन तेथील राजाची मदत घेऊन राहिले. त्यासही जनरल लेकसाहेबानें वेढा घातला. तो इ० स० १८०५ च्या जानेवारीच्या चवथ्या तारखेपासून एप्रिलच्या एकविसाव्या तारखेपर्यंत एकसारखा पडला होता. कांहीं वेळपर्यंत आंतल्या लोकांनीं बाहेरच्यांस दाद दिली नाहीं. परंतु, तीन महिने झाले तरी वेढा घालणारे आपला उद्योग सोडीत नाहींत, व त्यांची युद्धाची तयारी दिवसेंदिवस जास्त होत आहे, असें पाहून, आंतील राजानें तहाचें बोलणें लाविलें. तें इंग्लिश सरदारांनीं मान्य केलें. ह्या प्रकारेंकरून होळकराच्या लोकांस भरतपूर येथें थारा नाहींसा झाला. हें वर्तमान इ० स० १८०५ च्या अवेलीस घडलें.

तिकडे भरतपुरास असें वर्तमान चाललें होतें तों इकडे, मरेसाहेबाच्या हाताखालच्या टोळीनें धूम करीत येऊन, होळकराची राजधानी इंदूरशहर, तें घेतलें; शिवाय त्याचे चांदोर व जाल्ने हे किल्ले आणि त्यांच्या आसपासचा मुलूख, हेही इंग्लिशांच्या सैन्यानें आपल्या हस्तगत केले. पुढें शिंद्यानेंही इंग्लिशांशीं तह केला. तेव्हां, आपणास राहण्यास बळकट ठिकाण अथवा आश्रय मागण्यास प्रबळ राजा इकडे राहिला नाहीं असें जाणून, यशवंतराव हा, पंजाबचा राजा रणजितसिंग, ह्याजपाशीं साह्य मागावयास ति-

कडे गेला. परंतु, त्याचा हेतु सिद्धीस न जातां, त्याचे मागें लेकसाहेब लागला होता, त्यानें त्यास इतकें जेरीस आणिलें कीं, त्यास तहाचें बोलणें लावणें भाग पडलें. त्याप्रमाणें, इ० स० १८०५ ह्या वर्षीं उभयपक्षांचा तह ठरला. त्यावरून, होळकराचा लढाईंत गेलेला प्रांत, त्याचा त्यास परत मिळाला. नंतर त्यानें आपल्या सैन्याचा खर्च कमी करून, उत्पन्नास आणि खर्चास मेळ पडेल अशी व्यवस्था केली.

ह्या प्रकारेंकरून यशवंतराव होळकर लढाईच्या दगदगीपासून सुटला. परंतु, आपण कसे झालों तरी दासीपुत्र; आपल्या ताब्यांत आपला भाऊ काशीराव व पुतण्या खंडेराव हे होळकराच्या गादीचे औरस व सीधे वारस आहेत, ते कोणत्या वेळेस काय करतील कोण जाणे, असें त्यास भय पडलें. ह्मणून, त्यानें, इ० स० १८०६ ह्या वर्षीं, काशीराव व त्याची गरोदर स्त्री ह्यांस मारेकऱ्यांकडून ठार मारविलें, आणि पुढें थोडक्याच दिवसांनीं, खंडेराव ह्यास विषप्रयोग करून त्याचा प्राण घेतला! संपत्तिप्राप्त्यर्थ मनुष्य काय करील ह्याचा नेम नाहीं.

होळकरानें इंग्लिशांशीं तह केला, असें वर सांगितलें आहे, तें खरें आहे. तरी यशवंतरावाच्या मनांत त्यांचेविषयीं जो बहुत दिवसांचा द्वेष वाढला होता, तो नाहींसा झाला नव्हता. ह्मणून, त्यांजवर पुनः स्वारी करण्याची त्यानें सक्त तयारी चालविली. तोफा ओतण्याच्या कामीं तो जातीनें खपत असे. त्याचे त्याला अतिशयित श्रम झाले; त्याला दारू पिण्याच्या दुर्व्यसनाचा नाद फार लागला; आणि मागच्या लढाईंत फार अपमान झाल्यामुळें तो पराकाष्ठेचा रागीट आणि चिडखोर झाला होता; ह्याच्या योगानें त्यास इ० स० १८०८ ह्या वर्षीं भ्रम होऊन वेड लागलें. तें इतकें कीं, त्याच्या घरच्या माणसांनीं व दरबारच्या मुत्सद्दी लोकांनीं त्यास खोलींत कोंडून ठेविलें. या दुर्दशेंत तो एकसारखा तीन वर्षें लोळत पडून, शेवटीं इ० स० १८११ ह्या वर्षाच्या आक्तोबर महिन्याच्या विसाव्या तारखेस बांबुरा येथें मरण पावला.

यशवंतराव होळकर मनाचा धीट व शरीरानें सुदृढ असा होता. जरा जय प्राप्त झाल्याबरोबर तो मोठा उत्सव करी; आणि संकटसमयीं न घाबरतां त्याचे निवारणाचा यत्न करी. त्याची इभ्रत मोठी असून तो उदार होता. तेणेंकरून त्याचे शिपाई त्याजवर खूष असत. त्यानें मराठी व फारशी ह्या

दोन्ही लिहिण्यांचा अभ्यास केला होता. तो ठेंगणा, पुष्ट, निमगोरा, व हसतमुख असा असून, त्याचे तोंडावर राजतेज दिसत असे.

यशवंतरावास कोंडून ठेविल्यावर, कारभारी लोकांनीं, त्याची दासी तुळजाबाई ह्मणून होती, तिचे नांवानें राज्यकारभार चालविला. तिनें मल्हारराव ह्या नांवाचा एक मुलगा दत्तक घेतला. ही स्त्री उत्तम गाणारी, सुस्वरूप, आणि मोठी चित्तमोहक असल्यामुळें तिजपुढें कोणाचें चालेना. यशवंतरावाच्या वेळेपासून बाळारामशेट ह्मणून एक फार प्रामाणिक मनुष्य दिवाणगिरीच्या कामावर होता, त्यास दूर करून, गणपतराव रांडोरकर ह्या नांवाच्या नीच मनुष्यास त्याचे जागीं नेमून, त्याशीं ती अति निंद्य प्रकारचा व्यवहार करूं लागली; आणि, बाळारामशेट ह्यास तिनें विनाकारण ठार मारिलें. तेणेंकरून तिचें वजन अगदीं नाहींसें होऊन तिचे सरदारच तिचा द्वेष करूं लागले. राज्यांत अंदाधुंदी झाली. शिपाई लोकांच्या पगाराची बाकी पुष्कळ येणें राहिली. खजिन्यांत पैसा नाहींसा झाला. तेव्हां इंग्लिश सरकारचा आश्रय घेऊन ह्या संकटाचें निवारण करावें, असें तुळजाबाईच्या मनांत आलें. परंतु, तिच्या दरबारचे कारभाऱ्यांस बाजीराव पेशव्यानें द्रव्यानें अनुकूल करून घेऊन, त्यांपासून, इंग्लिशांशीं लढतेसमयीं आपणास साह्य देण्याविषयींचें वचन घेतलें. त्यास ती बाई मत देईना. ह्मणून, पठाण लोकांनीं तिला, इ० स० १८१७ च्या दिसेंबर महिन्यांत क्षिप्रा नदीमध्यें लोटून देऊन ठार मारिलें. ही घोड्यावर बसणारी फार उत्तम होती. ती स्वार होऊन बाहेर पडे, तेव्हां, मोठमोठ्या मानकऱ्यांच्या बायका आपणाबरोबर घोड्यांवर बसवून घेई. तेव्हां त्यांची शोभा अत्यंत वर्णनीय दिसे.

तुळजाबाईस ठार मारल्याचें वर्तमान इंग्लिश सरकारास समजतांच त्यांनीं आपलें सैन्य सर जान मालकम ह्याचे हाताखालीं देऊन होळकराच्या बिघडलेल्या लोकांवर पाठविलें. त्याची व होळकराच्या सैन्याची लढाई, इ० स० १८१७ च्या दिसेंबर महिन्यांत मेहिदपूर येथें झाली. तेव्हां इंग्लिशांस यश प्राप्त झालें, आणि मराठ्यांचें सैन्य पराभव पावून पळत सुटलें. त्यांचे सुमारें ३००० लोक ह्या लढाईंत जायां झाले, व इंग्लिशांकडचे सुमारें ७७८ पतन पावले. ह्या प्रसंगीं छोटा मल्हारराव हत्तीवर बसून हें युद्ध पाहात होता; त्यानें जेव्हां आपलें सैन्य जीव घेऊन पळतांना पाहिलें, तेव्हां त्याचे डोळ्यांतून टपाटप टिपें पडलीं असें सांगतात.

ह्या लढाईनंतर इंग्लिश सरकार व होळकर सरकार ह्यांचा मंदेसर येथें पुनः तह झाला. तेव्हां, असें ठरलें कीं, होळकराच्या ताब्यांतला सातपुड्याच्या दक्षिणेकडचा मुलूख इंग्लिशांस मिळावा; आणि त्यानें रजपूत राजांवरचे सगळे हक्क सोडावे; ह्या वेळीं जो मुलूख इंग्लिशांनीं घेतला, त्याचें उत्पन्न तेव्हां सगळें बारा लक्ष रुपयांचें होतें; तें आतां तीस लक्षांपर्यंत वाढलें आहे. ह्याप्रमाणें व्यवस्था इ० स० १८१८ पर्यंत झाली. पुढें मल्हारराव हा इ० स० १८३३ त मरण पावला. नंतर त्याच्या बायकोनें मार्तंडराव ह्या नांवाचा तीन वर्षांचा एक मुलगा दत्तक घेऊन राज्यकारभार चालविला. इतक्यांत हरीराव होळकर ह्मणून तुकोजी होळकराचा एक पुतण्या होता, तो सैन्यासहवर्तमान गादीवर आपला हक्क सांगावयास उभा राहिला. त्याच्या व मार्तंडरावाच्या सैन्याच्या लढाया झाल्या. त्यांत हरीरावास यश येऊन, तो, इंग्लिशांच्या साह्यानें होळकराच्या गादीवर बसला. तो अगदीं अप्रबुद्ध होता. त्याच्या दरबारांत बखेडे झाले; आणि देशाची व्यवस्था बरोबर नव्हती. ह्मणून इंग्लिश रेसिदेंतानें कारभारांत हात घालून पुष्कळ चांगली व्यवस्था केली. हरीराव इ० स० १८४३ त निवर्तला. त्याचा दत्तक पुत्र तुकोजीराव हा हल्लीं* गादीवर आहे. हे महाराज फार हुशार व सुज्ञ आहेत. ते इंग्लिशांशीं मोठ्या स्नेहभावानें वागतात. त्यांच्या राज्यांत आतां दंगाधोपा कांहीं नाहीं. त्यांस इंग्लिशांकडून एकुणीस तोफांच्या सरबत्तीचा मान आहे.

होळकराचा मुलूख सलग नाहीं. कांहीं हिकडे कांहीं तिकडे असा तुटून आहे. त्या सगळ्याचें एकंदर क्षेत्रफळ ८३१८ चौरस मैल आहे; लोकसंख्या ५७६००० आहे; आणि उत्पन्न ३००००० रुपयांचें आहे. ह्यांत गहूं, ऊंस, खसखस, तमाखू, कापूस, अफू, वगैरे पिकतात. गादीची जागा इंदूर शहर आहे. प्रजा हिंदु, मुसलमान, भिल्ल, गोंड, ह्या जातींची आहे. ह्याचे दरबारीं इंग्लिशांचा रेसिदेंत असतो.

---

* इ० स० १८८१.

लार्ड क्लैव.

जन्म, इ० स० १७२५.—मृत्यु, इ० स० १७७४.

ह्या पुरुषानें हिंदुस्थानांत इंग्लिशांच्या राज्याचा पाया घातला. तेव्हां याची बखर आमच्या जिज्ञासु तरुण वाचणाऱ्यांस फार रुचकर लागेल; असें वाटल्यावरून ती येथें संक्षेपानें लिहितों.

इंग्लंददेशांत श्रापशायरामध्यें रिचर्द क्लैव ह्या नांवाचा कोणीएक गृहस्थ राहात असे. त्यास इ० स० १७२५ च्या सप्तंबर महिन्याच्या २९ व्या तारखेस पहिला मुलगा झाला. त्याचें नांव राबर्त क्लैव असें ठेविलें. तोच पुढें स्वपराक्रमानें लार्द ही महान् पदवी पावून, लार्द क्लैव ह्या नांवानें प्रसिद्धीस आला. लहानपणीं हा मुलगा भारी व्राल्य असे. तो इतका कीं, घरांतलीं सगळीं माणसें त्याला अगदीं त्रासून गेलीं. शेवटीं, हिंदुस्थानामध्यें ईस्तइंदिया कंपनीच्या कारखान्यांत त्यांनीं त्याजकरितां एका लहानशा जागेची तजवीज केली, आणि तिजवर रुजू होण्याकरितां त्यास इ० स० १७४४ च्या सुमारास इकडे रवाना करून दिलें. तेव्हां ह्या देशांत येऊन पोहोंचण्यास त्याला एका वर्षापेक्षांही अधिक दिवस लागले. मध्यंतरीं त्याचें राहाणें कांहीं दिवस ब्राझिल देशांत झालें होतें. तेथें त्यानें पोर्तुगीज भाषेचें थोडेंसें ज्ञान संपादिलें.

क्लैवसाहेब मद्रासेस आल्यावर, त्यास ती जागा मिळाली. तें लिहिण्याचें रडकें काम त्याला आवडेना; त्याला त्याचा पगार खर्चास पुरेना; कर्ज फार झालें; हवा मानेना; आणि वरिष्ठ अमलदारांचा त्रास सोसवेना; अशी त्याची अवस्था झाली. तेव्हां तो आत्महत्या करून घेण्यास सिद्ध झाला. दोन वेळां पिस्तोलाचे बार त्यानें आपणाकडे उडवून घेतले; ते दोन्ही चुकले. तेव्हां तो म्हणाला कीं, "माझे हातून कांहीं महत्कृत्यें घडावयाचीं आहेत, म्हणून परमेश्वर माझें असें संरक्षण करितो." तेव्हांपासून पुढें त्यानें तो नाद सोडून दिला.

ह्याप्रमाणें तो दुःखांत असतां, फ्रेंचांचा सरदार लाबरदोने ह्यानें, इ० स० १७४६ च्या सप्तंबर महिन्याच्या दाहाव्या तारखेस मद्रास घेतली; आणि तेथें सांपडलेल्या सर्व इंग्लिश लोकांस कैद केलें. त्यांस, थोडीशी खंडणी घेऊन सोडावयाचें त्यानें वचन दिलें होतें; परंतु, त्याचा वरिष्ठ अधिकारी, फ्रेंचांचा दुसरा मोठा सरदार दुप्ली, हा, त्यांस आपली ठाण्याची जागा पां-

दिशरी येथें रवानां करूं लागला. त्या गडबडींत क्लैवसाहेब एकटा, ऐन मध्यरात्रीस, मुसलमानाच्या वेषानें मद्रासच्या किल्ल्यांतून बाहेर पडला; आणि, जवळच्या सेंत देविद किल्ल्यांत कांहीं इंग्लिश लोक होते, त्यांस जाऊन मिळाला. पुढें त्यानें लष्करी चाकरी धरिली. तेव्हां तो सारा २१ वर्षांचा होता.

त्यानंतर लवकरच फ्रेंच सैन्यानें सेंत देविद किल्ल्यास* वेढा घातला. तेव्हां लढाईंत क्लैवसाहेब ह्यानें, अनभ्यस्त असतांही, असें कांहीं चातुर्य व धैर्य दाखविलें कीं, तें पाहून, त्याचा अधिकारी, मुख्य सेनापति, मेजर लारेन्स होता, त्यानें त्यास फार फार शाबासकी दिली. व तेणेंकरून क्लैवसाहेबाची कीर्ति चोहोंकडे पसरली. परंतु, लागलाच युरोपामध्यें फ्रेंच व इंग्लिश ह्यांचा तह झाला; ह्यामुळें हिंदुस्थानांतील त्यांच्या लढाया बंद पडल्या. तेव्हां अर्थातच क्लैवसाहेबाला हातची तरवार टाकून देऊन पुनः लेखण्या तासीत बसणें प्राप्त पडलें. तरी छोटामोठा प्रसंग आल्यास, तो लढाईस जाण्यास टळत नसे.

इ० स० १७४८ च्या अखेरीस निजामउल्मुलुख एकशें चार वर्षांचा होऊन मरण पावला. त्याचे गादीवर त्याचा दुसरा पुत्र नासिरजंग हा बसला. कारण, त्याचा वडील पुत्र गाजीउद्दीन हा दिल्लीच्या दरबारीं मोठ्या कामावर होता. तसाच अर्काटच्या नवाबाच्या गादीवर अनवरुद्दीन होता. ह्या दोघांस दोन वैरी उत्पन्न झाले. नासिरजंगाचा शत्रु मुजफरजंग, हा निजाम उल्मुलुखाचे मुलीचा मुलगा होय. आणि अनवरुद्दीनाच्या शत्रूचें नांव चंदासाहेब, हा अर्काट येथील पूर्वीच्या नवाबाचा जांवाई होय. ह्या दोघांनीं मिळून एकंदर ४०००० सैन्य मिळविलें, आणि फ्रेंचांचें साह्य मागितलें. त्यांनीं, तत्काळ, २००० काळे, व ४०० गोरे, इतकें सैन्य त्यांजकडे एका सरदाराबरोबर रवाना केलें. त्या एकत्र झालेल्या सैन्यानें अंबूर† येथें इ० स० १७४९ च्या जुलै महिन्यांत अनवरुद्दीनावर हल्ला केला. तेथें तो २००० लोकांनिशीं त्याशीं लढला; परंतु, शेवटीं पराभव पावून, तेथेंच गोळी लागून मारला गेला. त्याचा पुत्र महमदअल्ली, तेथून पळून जाऊन त्रिचनापल्लीस राहिला. त्या किल्ल्यास चंदासाहेबाच्या व फ्रेंचांच्या सैन्यानें वेढा

---

* हा किल्ला मद्रासच्या दक्षिणेस १०० मैलांवर आणि पांदिशरीच्या दक्षिणेस १४ मैलांवर, पेन्नार नदीजवळ आहे.

† अर्काटापासून पन्नास मैलांवर आहे.

घातला. महमदअल्लीचा पक्ष इंग्लिशांनीं आधींच उचलिला होता, यामुळें त्रिचनापल्लीचा वेढा हरतऱ्हेनें उठवून, आपला दोस्त महमदअल्ली ह्यास मुक्त करण्याचा अभिमान यांस पडला. याविषयीं ते विचार करूं लागले.

ह्या पंचाइतींत इंग्लिश लोक असतां, नुकताच कप्तान ही पदवी पावलेला, व केवळ २६ वर्षांच्या वयाचा जो हुशार क्लैवसाहेब, त्यास संकट निवारणाची युक्ति सुचली. ती अशी कीं, शत्रूची बरोबरी करण्याचें आपणास सामर्थ्य नाहीं, याअर्थीं, आपलें सैन्य, त्याची आवडती राजधानी अर्काट शहर, ह्याजवर पाठवावें, ह्मणजे त्याच्या रक्षणार्थ त्रिचनापल्लीच्या वेढ्याचें सैन्य अर्थातच निघून जाईल, आणि आपला दोस्त महमदअल्ली सहज मोकळा होईल. ही युक्ति त्यानें आपले वरिष्ठांस कळविली. यांनीं तत्काळ त्याचीच योजना या कामावर करून, त्याजबरोबर २०० गोरे व ३०० काळे लोक आणि आठ तोफा दिल्या. तेव्हां पाऊस लहान धार मुसळाएवढी, विजांचा चकचकाट, मेघांचा गडगडाट, अशी स्थिति असतां, क्लैवसाहेब शांतपणानें आपलें सैन्य घेऊन अर्काटावर गेला. तों तेथें फारसा बंदोबस्त नव्हता. त्यामुळें तें शहर व तेथला किल्ला हीं यास सहज घेतां आलीं. ही गोष्ट, इ० स० १७५१ च्या आगष्ट महिन्याच्या ३१ व्या तारखेस घडली.

ही बातमी समजतांच, चंदासाहेबानें आपला पुत्र राजासाहेब ह्यास ४००० इतर फौज व ३०० फ्रेंच इतक्यांसहवर्तमान त्रिचनापल्ली येथून अर्काटावर रवाना केलें. त्यानें तेथें जाऊन या शहरास वेढा घातला. हें भवितव्य आधींच समजून, क्लैवसाहेब दारूगोळा व अन्नसामग्री ह्यांची जमवाजमव करून सिद्ध होऊन राहिला होता. हा वेढा पन्नास दिवसपर्यंत पडला होता. शेवटीं, क्लैवसाहेबानें बाहेरच्या लोकांवर आंतून गोळ्यांचा एकसारखा भडिमार चालविला. व गुट्टीचा संस्थानिक मुरारीराव हा मराठा यास ६००० लोकांनिशीं साह्य देण्यास सिद्ध झाला. हें पाहून अर्काटास वेढा घालणारे लोक भयभीत होऊन रात्रीच्या रात्रीं पळून गेले. ह्याप्रमाणें क्लैवसाहेबाच्या युक्तीनें महमदअल्लीची सुटका होऊन इंग्लिशांस वर्चस्व प्राप्त झालें. तेव्हांपासून क्लैवसाहेबाची कीर्ति दिवसेंदिवस अधिकाधिक वृद्धि पावूं लागली.

राजासाहेब पुनः लोकांची जमाजम करून, मद्रासेच्या आसपास आला; व यानें साहेब लोकांच्या बंगल्यांचा व बागांचा नाश मांडिला. त्याजवर

पुनरपि क्लैवसाहेबानें हल्ला करून, त्याचे १०० फ्रेंच लोक मारिले, व बाकीच्यांस पळायास लाविलें.

क्लैवसाहेब, लहानपणच्या स्वभावावरून पाहिला असतां, युक्तिवान् आणि कीर्तिवान् पुरुष निपजावा, असें कोणाला वाटलें नव्हतें. मेजर लारेन्स साहेब याविषयीं एके ठिकाणीं असें लिहितो कीं, "लोक क्लैवसाहेबाला नुसता दैवशाली ह्मणोत; परंतु, त्याची जी माहिती मला आहे, तिजवरून माझें मत असें आहे कीं, जें कांहीं यास प्राप्त झालें आहे, तें त्याच्या योग्यतेप्रमाणें यास बरोबर आहे. दृढ निश्चय आणि समयसूचकता, हीं ह्या पुरुषांच्याठायीं निरंतर जागृत असतात. हा पुरुष उपजतयोद्धा आहे."

पुढें इ० स० १७५२ च्या सप्तेंबर महिन्यांत फ्रेंचांच्या ताब्यांतले कावेलंग* व चिंगलपट† हे दोन किल्ले क्लैवसाहेबानें मोठ्या शौर्यानें घेतले. या वेळीं याजवरोबर २०० गोरे व ५०० काळे, मिळून सगळे ७०० लोक होते; आणि यांसही लढाई ह्मणजे कशी असते, व कवाईत ह्मणजे काय, हें मुळींच माहीत नव्हतें. तरी त्यांचेच हातीं ते किल्ले या शूरानें धेवविले. तेव्हां त्याची शाबास नव्हे काय!

सदरील दोन किल्ले घेऊन तो मद्रासेस परत आल्यावर, तेथें त्यानें मास्कोलेन नामक एका स्त्रीशीं लग्न केलें. नंतर, हवेनें व श्रमानें प्रकृति बिघडल्या कारणानें तो, आपल्या पत्नीसहवर्तमान, इ० स० १७५३ ह्या वर्षीं स्वदेशीं निघून गेला. तेथें पोहोंचल्यावर लोकांनीं त्याचा बहुमान केला. व त्याच्या पराक्रमाबद्दल त्यास तेथच्या सरकारी कामदारांनीं एक रत्नजडित मुठीची तरवार बक्षीस द्यावयास काढिली. तेव्हां, मेजर लारेन्स साहेबाचा असा कांहीं बहुमान झाल्याखेरीज ही मला नको, असें ह्मणून त्यानें तें बक्षीस घेतलें नाहीं. ह्या खेपेस पुष्कळ द्रव्य त्यानें बरोबर नेलें. त्यापैकीं कांहीं बापास दिलें, व कांहीं ऐषआरामांत खरचिलें. पार्लमेंतांत जागा मिळविण्याविषयींही त्यानें पुष्कळ प्रयत्न केले. पण ते सर्व व्यर्थ गेले. आणि हिंदुस्थानांत फ्रेंच व इंग्लिश ह्यांचें युद्ध लागण्याचा रंग दिसून आला. ह्मणून, सेंत' देविद किल्ल्याच्या गवरनराची जागा पतकरून, तो पुनः इ० स० १७५५ ह्या वर्षीं हिंदुस्थानाकडे येण्यास निघाला.

---

* मद्रासेच्या दक्षिणेस पंचवीस मैलांवर आहे.

† कावेलंगाच्या नैर्ऋत्येस वीस मैलांवर आहे.

हिंदुस्थानांत पोहोंचल्यावर, प्रथमतः त्यानें इ० स० १७५६ च्या फेब्रुवारी महिन्यांत आंग्र्याचें गिर्या हें ठाणें घेतलें. तेथें त्याला २०० तोफा, पुष्कळ दारूगोळा, आणि बारा लक्ष रुपये रोख सांपडले. ह्या कामांत त्याला पेशव्याच्या सैन्याची पुष्कळ मदत होती. तरी, या रकमेंतला एक पैसा देखील त्यानें त्यास दिला नाहीं. पुढें जून महिन्यामध्यें, बंगालचा सुभेदार सुराजउद्दवला, ह्यानें इंग्लिशांचें कलकत्ता शहर घेतलें. तेथें १४६ इंग्रज लोक त्याच्या हातीं सांपडले, त्यांस त्यानें एका लहान अंधारकोठडींत कोंडून ठेविलें. त्यांतले २३ मात्र जीवंत निघाले, आणि बाकीचे मेले, इत्यादि कच्ची हकीकत ह्या पुस्तकामध्यें एका वेगळ्याच लेखांत दिली आहे, ह्मणून तत्संबंधीं आणखी माहिती येथें सांगण्याचें प्रयोजन नाहीं.

ह्याप्रमाणें क्रूरपणा करून, कलकत्त्यामध्यें इंग्रज लोकांच्या खजीन्यांत द्रव्य सांपडलें तें घेऊन, आणि तेथें आपले लोक ठेवून सुराजउद्दवला मुर्शिदाबादेस निघून गेला. ही वार्ता मद्रास येथें आगष्ट महिन्यांत कळल्यावर, तेथून पांचसहा मोठ्या लढाऊ गलबतांचें आरमार, आणि ९०० गोरे लोक व १५०० काळे लोक, इतकें सैन्य, कलकत्ता परत घेण्याकरितां जलमार्गानें रवाना झालें. त्यापैकीं आरमाराचें आधिपत्य आदमिरल वातसन ह्या साहेबाकडे होतें, व फौजेचा सर्व अधिकार क्लैवसाहेबाकडे होता. ह्या सेनेनें पहिल्या तडाक्यासरसा कलकत्त्याचा किल्ला घेतला. हें वर्तमान सुराजउद्दवल्यास कळलें, तेव्हां तो मोठ्या तयारीनें लढण्यास सिद्ध झाला. परंतु, इंग्लिशांपुढें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं, असें त्यास वाटल्यामुळें, त्यानें इंग्लिशांशीं तह करून परत आपल्या राजधानीची वाट धरिली.

नंतर, या अस्थिर बुद्धीच्या दुष्ट नवाबास फ्रेंच लोक साह्य करणार, असें इंग्लिशांस समजलें. तेव्हां क्लैव व वातसन ह्या साहेबांनीं स्वारी करून इ० स० १७५७ च्या मार्च महिन्यांत त्यांचें चंद्रनगर घेतलें, व तेथें ५०० फ्रेंच लोक पाडाव केले.

सुराजउद्दवला हा स्वतः फार त्रासदायक होता. तो इतका कीं, त्याचा खजीनदार रायदुल्लभ, सेनापति मीरजाफर, आणि सावकार जगत्शेट, ह्या त्याच्याच लोकांनीं त्यास पदच्युत करण्याचा कट केला, आणि तो त्यांनीं गुप्तपणें कलकत्ता येथील इंग्लिश लोकांस कळविला. त्यास ते प्रथम रुकार देईनात. परंतु, क्लैवसाहेबानें त्यांचीं मनें वळवून त्यांजकडून रुकार देवविले-

ला. नंतर ह्या उभयपक्षांमध्ये असा ठराव झाला कीं, अगदीं आणिबाणीच्यावेळीं मीरजाफरानें आपल्या सैन्यासहवर्तमान येऊन इंग्लिशांस मिळावें, आणि इष्ट कार्य सिद्धीस गेल्यावर मीरजाफरानें यथाशक्ति इंग्लिशांचें उतराई व्हावें. ह्या कटाचा बेत उमीचंद ह्या नांवाचा सावकार फोडूं लागला. यास पैसा देण्याविषयीं बनावट करारनामा करून क्लैवसाहेबानें फसविलें. ती गोष्टही फार चमत्कारिक आहे. ती ह्या पुस्तकांत वेगळी लिहिली आहे.

नवाबास गादीवरून काढण्याच्या कटाची आंतून सर्व तयारी झाली, तरी क्लैवसाहेबानें त्यास बाह्यात्कारें असें खुषीचें व आर्जवाचें पत्र पाठविलें कीं, तें पाहून तो खुशाल चैन करीत राहिला. ज्या जासुदाबरोबर हें कपटाचें पत्र रवाना केलें, त्याचेच हातीं त्यानें वात्ससाहेबास लिहून कळाविलें कीं, "कांहीं झालें तरी भिऊं नको; कधीं अपयश पावावयाचे नाहींत अशा ५००० लोकांसह, मी तुला, होईल तितक्या त्वरेनें येऊन मिळतों; कांहीं झालें तरी मी तुला अंतर देणार नाहीं; असा माझा निरोप मीरजाफराला अगत्य अगत्य कळवा."

सैन्याची सर्व तयारी झाल्यावर क्लैवसाहेबानें नवाबास असें लिहिलें कीं, तुम्हीं आम्हांस दिलेलीं दुःखें आमच्या लक्षांत आहेत, त्यांचीं कारणें पुसण्यास आम्ही सैन्यासह तुम्हांकडे येत आहों, तयार असावें. ह्या सूचनेचें तात्पर्य नवाब तत्काळ समजला. त्यानें लागलीच फौज तयार केली. ती ५०००० पायदळ, १८००० स्वार, आणि ५० तोफा, इतकी होती. तिचा तळ प्लासीच्या मैदानांत पडला. क्लैवसाहेबही आपले फौजेसहित काशिमबाजाराजवळ आला. उभयपक्षांची लढाई प्लासीच्या मैदानांत, इ० स० १७५७ च्या जून महिन्याचे २३ वे तारखेस झाली. तींत नवाब पराभव पावला, व क्लैवसाहेब विजयी झाला. नवाब समरांगणांतून पळून गेला. क्लैवसाहेबानें मीरजाफरास नवाब केलें, व त्याजपासून पुष्कळ पैसा घेतला. खुद क्लैवसाहेबाला सुमारें तीस लक्ष रुपये ह्या घडामोडींत मिळाले.

नंतर क्लैवसाहेबाची नेमणूक बंगालच्या गवरनरचे जागेवर झाली. इतक्यांत, म्हणजे इ० स० १७५९ च्या मार्च महिन्यांत दिल्लीच्या बादशाहाचा पुत्र शाहाआलम ह्यानें ४०००० सैन्यानिशीं बंगाल्याकडे चाल केली. यास मीरजाफरानें पुष्कळ द्रव्य देऊं करून अभयवचन घेऊन माघारें लाविलें. हें क्लैवसाहेबास न आवडून, त्यानें मीरजाफरास लिहिलें कीं, "तुम्हीं असा भयाळपणा कराल, तर लवकर भिकेस लागाल;" शाहाआलमानें पाटणा

२१४

शहरासही वेढा घातला, परंतु क्लैवसाहेब आपणावर ससैन्य येत आहे, असें नुसतें समजल्याबरोबर तो आपले फौजेसह पळून गेला. एवढी क्लैवसाहेबाची जरब होती.! त्यानें शाहाआलमाची अशी दाणादाण केलेली ऐकून, मीरजाफर फार संतोष पावला; आणि त्यास शाबासकीबद्दल दरसाल तीस हजार रूपये इनामा दाखल मिळावे, अशी त्यानें तजवीज केली.

मीरजाफर इंग्लिशांच्या साह्यानें नवाब झाला खरा, परंतु पुढें पैसा वगैरे देण्याच्या जिकीरीवरून त्याचें व ह्यांचें वैमनस्य आलें. तो त्यांस अगदीं पाण्यांत पाहूं लागला, व त्यांस देशांतून घालवून देण्याच्या मसलतीस लागला. त्याच्या गुप्त सूचनेवरून १५०० दच लोक त्यास मदत करण्यासाठीं हुगळी नदींत जाहाजांतून आले. त्यांजवर क्लैवसाहेबानें कर्नल फोर्द ह्यास पाठवून त्यांचीं जाहाजें घेतलीं; व चिनसुरा येथील त्यांच्या अधिकाऱ्याकडून आपणास पाहिजे तसा ठराव कबूल करविला. नंतर इ० स० १७६० च्या मार्च महिन्यांत तो पुनः स्वदेशीं निघून गेला. त्यानें अठरा लक्ष रूपये दच लोकांच्या मार्फत स्वदेशीं पाठाविले; मद्रासेस असतां त्यानें अडीच लक्षांचें नुसतें जवाहीर घेतलें; त्यास हिंदुस्थानांत दरसाल दोन लक्ष सत्तर हजार रुपयांचें उत्पन्न होतें; एकंदर, क्लैवसाहेबाचें दरसालचें उत्पन्न सुमारें चार लक्ष रुपयांचें होतें; असें मालकम साहेबानें लिहिलें आहे.

क्लैवसाहेबानें आपल्या मातापितरांस, इष्टमित्रांस, व लारेन्स साहेबास, पूर्व उपकार स्मरून पैसा दिला. व जमीनजुमला विकत घेऊन पार्लमेंतांत जागा मिळविली. तेथें सुलेवन ह्मणून कोणीएक त्याचा वैरी होता. त्याचे खटपटीमुळें, क्लैवसाहेबास शाहाआलमाचे गर्दींत मिळालेलें उत्पन्न सरकारांत परत द्यावें लागलें.

पुढें इ० स० १७६५ च्या मे महिन्यांत क्लैवसाहेब पुनः बंगाल्याचा गवरनर व मुख्य सेनापति होऊन हिंदुस्थानांत आला. तेव्हां बंगाल्यांत जुलूम व लोकांची दुर्दशा होती. तीस कारण इंग्लिश लोकांचा व्यापार व द्रव्यलोभ, असें त्यानें पाहिलें. तेव्हां, सरकारी कामदारांनीं व्यापार बिलकूल करूं नये, असा त्यानें ठराव केला. त्यामुळें थोडासा दंगाही झाला. पण तो त्यानें तत्काळ मोडिला. तेव्हां, कोणी इंग्लिश लोक त्यास मारावयास टपल्याची बातमी त्याला कोणीं सांगितली. या वेळीं तो ह्मणाला, "हे इंग्लिश लोक सरकारी कामदार आहेत; मारेकरी नाहींत."

तो आला तेव्हां बहारच्या सरहद्दीवर अयोध्येचा नवाब अफगाण व मराठे ह्यांच्या फौजा जमवून राहिला होता. पण, हा सिंह स्वदेशाहून आला, असें कळल्याबरोबर ज्यांनीं त्यांनीं आपापली वाट धरिली; व त्यांजपासून क्लैवसाहेबानें पाहिजेत तसे करार करून घेतले.

नंतर, आगस्त महिन्यांत दिल्लीच्या बादशाहास कांहीं नजराणा देऊन क्लैवसाहेबानें त्याजपासून इंग्लिशांच्या नांवानें बंगाल, बहार, व ओढ्या ह्या तीन प्रांतांच्या वहिवाटीची सनद घेतली. ह्या खेपेस त्यानें अमार्गानें द्रव्य मिळविलें नाहीं. अयोध्येच्या नवाबानें त्यास जवाहीर भरून एक पेटी पाठविली होती, ती त्यानें परत केली. मीरजाफरानें मरतेसमयीं साहा लक्षांचा ऐवज क्लैवसाहेबाकरितां ठेविला होता, तो त्यानें प्रथम घेतला; पण, तो कांहीं वेळानें त्यानें थकलेल्या शिपायांस वांटून देण्यासाठीं कंपनीकडे जमा केला. नंतर तो, इ० स० १७६७ च्या जानेवारी महिन्यांत स्वदेशीं निघून गेला. तेव्हां त्याची हिंदुस्थानांतली कारकीर्द संपली.

विलायतेस क्लैवसाहेबाची चौकशी होऊन त्याचा फार छळ झाला. तथापि पार्लमेंतानें शेवटीं त्याची मुक्तता केली. तरी अपमानदुःखामुळें त्याला भ्रम झाला. त्या स्वदुःखाचा विसर पाडण्यासाठीं तो अफू खात असे. हा उपजतयोद्धा, पराक्रमी पुरुष, इ० स० १७७४ च्या नोवेंबर महिन्याच्या बाविसाव्या तारखेस, आत्महत्या करून घेऊन मरण पावला. तेव्हां तो ४९ वर्षांचा होता.

शिंदे सरकारचा वंश

इ० स० १७३०.

साताऱ्यापासून साहा कोसांवर कोरेगांव तालुक्यांत कण्हेरखेड ह्मणून एक गांव आहे. तें शिंद्यांचें मूळ ठिकाण होय. व तेथील पाटीलकीही त्यांजकडेस असे. त्यांपैकीं राणोजी शिंदा ह्मणून एक हुशार पाटील शिलेदारीच्या बाण्यानें राहात असे. त्यानें शाहूमहाराजांचे कारकीर्दींत बाळाजी विश्वनाथाची चाकरी धरिली. व पुढें तो बाजीराव पेशव्याचा हुजऱ्या झाला. तो, एके दिवशीं, पेशव्यांचे जोडे उराशीं धरून निजलेला बाजीराव ह्या दृष्टीस पडला.

यावरून, याच्या एकनिष्ठ सेवेविषयीं यास पराकाष्ठेचें नवल वाटलें; आणि यानें याला लागलेंच आपल्या लष्करांत एक अमलदारीची जागा दिली. पुढें समरांगणीं कितीएक प्रसंगीं यानें आपलें शौर्यबळ चांगलें दाखविल्यावरून, लोकांत यार्चें वजन वाढत चाललें. आणि इ० स० १७३० त तो चांगला फौजबंद सरदार बनला. इ० स० १७३८ ह्या वर्षीं बाजीराव नर्मदा उतरून पलीकडे गेला. याशीं, दिल्लीच्या बादशाहाच्या वतीनें निजामउल्मुलुख लढूं लागला. परंतु, बाजीरावानें त्याचा पराभव करून, त्यापासून, नर्मदा व चंबळा ह्या नद्यांच्या मधील मुलुखाचें आधिपत्य व पांच लक्ष रुपये, इतकें घेण्याचें ठरवून, त्यास सोडून दिलें. ह्या प्रकरणांत राणोजी शिंदा मुख्य होता. इ० स० १७४३ त पेशवे व निजाम ह्यांच्यामध्यें तह ठरला. त्यांतील करारांप्रमाणें वागण्याबद्दल निजामानें पेशवे ह्यांजकडून तीन जामीन घेतले. त्यांमध्यें हा शिंदा एक होता. इतकें या वेळीं त्याचें वजन असे. पेशव्यांस जो मुलूख हिंदुस्थानांत मिळाला, त्यांतला अर्धा मुलूख, सैन्याच्या खर्चाकरितां जाहागिरीदाखल त्यांनीं शिंद्यास दिला. राणोजी हा मल्हारराव होळकराचा परम मित्र असे. आपणास इतक्या योग्यतेस चढण्यास पेशव्यांची कृपा मूळ कारण आहे असें समजून तो त्यांचे जोडे नेहमीं आपल्या बगलेंत बाळगीत असे, व त्यांस मोठा मान देत असे. राणोजी शिंदा इ० स० १७५० त मरण पावला. तेव्हां त्याजकडे बराच मुलूख होता, आणि यास सुमारें साडेसव्वीस लक्षांचें उत्पन्न होतें; तरी मल्हारराव होळकर ह्याचा पुष्कळ पैसा त्याजकडे येणें होता.

राणोजीस तीन औरस पुत्र होते; जयाजी, जनकोजी, आणि दत्ताजी; यांच्या आईचें नांव मैनाबाई; आणि महादजी व तुकोजी असे दोन दासी पुत्र होते; त्यांची आई कोणी रजपुतीण होती. त्यांपैकीं तुकोजी हा कांहीं अपघातानें पूर्वीच निवर्तला. राणोजी मरण पावल्यानंतर त्याच्या मुलुखाचें आधिपत्य पेशव्यांनीं जयाजीस दिलें. इ० स० १७५९ त राघोबादादा पेशव्यांनीं मुसलमानांपासून अमदाबाद घेतली; त्या समयीं सयाजी हा फौजेसहवर्तमान त्यांजबरोबर होता. पुढें, इ० स० १७५९ त, जोधपूरचा राजा विजयसिंग हा नागोरांत असतां जयाजी हा त्यास वेढा घालून बसला. असें असतां एके दिवशीं या राजाकडील मारेकरी अकस्मात् त्याच्या तंबूंत येऊन, त्यांनीं त्याचा प्राण घेतला. हें पाहून महादजीस अतिशयित वाईट वाटलें.

आणि त्यानें त्या राजाचा सूड उगाविण्याच्या निश्चय केला. त्याप्रमाणें क्रम चालू होऊन विजयसिंग अगदीं जेरीस आला. आणि त्यानें जेव्हां अजमीर शिंद्यास दिलें, तेव्हां त्याचा कोप शमला.

ह्याप्रमाणें जयाजी मरण पावल्यावर त्याचा पुत्र जनकोजी ह्मणून होता, तो जाहागिरीचें वगैरे सर्व काम पाहूं लागला. पुढें इ० स० १७६१ त, पानपत येथें प्रसिद्ध मोठी लढाई मराठे व अफगाण लोक ह्यांच्यामध्यें झाली; त्या समयीं हा जनकोजी, आणि ह्याचे चुलते जनकोजी, दत्ताजी, व महादजी, हे तेथें होते. ह्यांपैकीं दोघे चुलते समरांगणांत पडले; गादीचा मालक जनकोजी, तो अबदल्लीच्या हातीं सांपडला, त्यास त्यानें ठार मारिलें. आणि महादजी हा एका मोठ्या दक्षणी घोडीवर बसून पळत सुटला. त्याचे मागें एक अफगाण स्वार लागला. तो पुढें आणि हा मागें, असें होतां होतां महादजीची घोडी थकली, आणि एका खंदकांत पडली. तेव्हां अर्थात्, महादजीही खालीं पडून त्या अफगाणाचे हातीं सांपडला. त्यानें एका फरशीनें त्या शिंद्याचा उजवा पाय तोडून, त्याच्या आंगावरचे दागिने काढून घेऊन, त्यास तसेंच तेथें टाकून दिलें, आणि आपण निघून गेला. महादजी तेथें कण्हत पडला असतां, मराठ्यांच्या लष्करांतला राणाखान ह्या नांवाचा कोणी भिस्ती तिकडून चालला होता, त्यानें त्यास पाहिलें. त्यानें त्यास आपल्या पखालीच्या बैलावर बसवून दक्षिणेंत आणिलें. नंतर, शिंद्याच्या गादीवर कोणास बसवावें, ह्याचा विचार चालणार इतक्यांत पुण्यामध्यें नारायणराव पेशवा मारला गेला. तेव्हां तेथचा मुख्य कारभारी नानाफडनवीस ह्यास अनुकूल करून घेऊन, त्याच्या साह्यानें महादजीनें शिंद्याची गादी संपादिली. त्या वेळीं त्याच्या मुलुखाचें उत्पन्न सुमारें चौसष्ट लक्ष रूपयांचें असावें, असें सांगतात.

पानपतच्या लढाईंतलीं संकटें महादजी शिंदा जन्मभर आठवीत असे. जनरल पामर साहेब त्याचे दरबारीं इंग्लिश रेसिदेंत होता; त्याजपाशीं तो वारंवार असें सांगे कीं, मी पुढें आणि अफगाण स्वार मागें, धूम पळत आहों, असें स्वप्न पडल्याखेरीज कितीएक दिवसपर्यंत मला एक देखील झोंप आली नाहीं. राणाखान ह्याचे उपकार महादजी विसरला नाहीं. तो त्यास भाई असें ह्मणत असे; आणि सख्या भावाप्रमाणें मानीत असे. पुढें त्यानें त्याला मोठ्या पदवीसही चढविलें. माधवराव पेशवा ह्यानें मोठें सैन्य जमा

करून, तें, इ० स० १७६९ ह्या वर्षीं, विसाजी कृष्ण नामक सरदाराबरोबर नर्मदेच्या पलीकडे पाठविलें. त्यांत नुसते स्वार ५०००० होते. ह्या सैन्याबरोबर महादजीशिंदा व तुकोजीहोळकर हे सरदार पेशव्यानें दिले होते. त्यांनीं प्रथम रजपूत संस्थानांवर हल्ला करून, त्यांजपासून, खंडणीची बाकी म्हणून दाहा लक्ष रुपये घेतले. नंतर, यमुनानदीच्या पश्चिमेस जो जाट लोकांचा मुलूख होता, त्यांत ते शिरले. ते लोक तरी मोठे शूर होते. तथापि मराठ्यांचें सैन्य प्रचंड असल्यामुळें त्यांचा कांहीं उपाय चालेना. शेवटीं भरतपुराजवळच्या लढाईंत ते केवळ पराभव पावले; आणि मराठ्यांस दाहा लक्ष रुपये रोख, व पन्नास लक्ष रुपये हाप्त्याहाप्त्यांनीं देण्यास कबूल झाले. नंतर हें मराठ्यांचें सैन्य दिल्लीकडे वळलें. तेथें नजीतउद्दवला नामक रोहिला सरदार, शाहाआलमाचा वडील पुत्र ज्वानबखत ह्यास तक्तावर बसवून आपण सर्व कारभार पाहात होता. तो भिऊन गेला, आणि त्यानें मराठ्यांशीं तहाचें बोलणें लाविलें. तेव्हां, पानपतच्या लढाईंत त्यानें मराठ्यांचा फार नाश केला होता, त्याबद्दल त्याचा सूड घ्यावा, असें महादजी शिंद्याचें म्हणणें पडलें. म्हणून तें सगळेंच प्रकरण विसाजीनें पेशव्यांकडे पाठविलें. त्यांचे मनांत शाहाआलमास पुनः गादीवर बसवावें असें होतें; आणि ह्या कामीं नजीतउद्दवला आपणांस अनुकूळ असला म्हणजे बरें, असें त्यांस वाटल्यावरून त्यांनीं त्याशीं तह ठरविण्याविषयीं हुकूम दिला. परंतु ह्या सर्वच गोष्टी मनचेमनांत राहिल्या. कारण, नजीतउद्दवला हा इ० स० १७७० च्या आक्तोबर महिन्यांत मरण पावला. नंतर, त्याचें काम त्याचा पुत्र जाबताखान हा पाहूं लागला.

ह्या वर सांगितलेल्या मोहिमींत खुद महादजीचे १५००० स्वार होते. व ह्या स्वारींत कोणतें कांहीं करणें सवरणें झाल्यास तें त्याच्या विचारानें होत असे. मराठ्यांनीं इ० स० १७७१ त जाबताखानाचे मुलुखांत स्वारी करून त्यास घाबरविलें, ह्या मसलतीस मूळकारण महादजी होय. ह्या मोहिमींत मराठ्यांनीं सगळी अंतर्वेदी काबीज करून, दिल्लीमध्यें इतकें वर्चस्व मिळविलें कीं, शाहाआलम बादशाहा, हा त्यांच्या हातीं कैदी होऊन राहिला. ह्या सर्व कृत्यांत महादजी शिंदा प्रमुख होता. ह्या खटपटींत त्यानें बराच मुलूख संपादिला, व आपली स्वतंत्रता चांगली स्थापित केली.

राघोबादादा पेशवाईची गादी मिळविण्याचा विचार करूं लागला, तेव्हां,

मी तुह्मांस मदत देईन, असें महादजी शिंद्यानें त्यास वचन दिलें होतें. परंतु राघोबानें इंग्लिशांचें साह्य घेतलें असें पाहिल्याबरोबर, तो नानाफडनविसाच्या मसलतीस अनुकूल होऊन माधवराव पेशव्यास मिळाला. पुण्याच्या दरबारांत त्याचें माहात्म्य बरेंच वाढलें. पुढें राघोबाच्या वतीनें इंग्लिश लोक मराठ्यांशीं लढूं लागले. ह्या प्रकरणांत मराठ्यांकडचा प्रमुख सरदार महादजी शिंदा होता. ही लढाई चालू असतां इ० स० १७७९ च्या जानेवारी महिन्यांत वडगांव येथें मराठ्यांनीं इंग्लिश सैन्यास कोंडिलें. या प्रसंगीं एका दिवसांत, इंग्लिशांकडचे मेले, जखमी झाले, आणि पळून गेले, ह्यांची एकंदर गणती ३५२ भरली. तेव्हां तेथले इंग्लिश लोक इतके जेरीस आले कीं, मराठ्यांनीं जें जें ह्मटलें तें तें सर्व त्यांनीं कबूल केलें. त्यांत असें ठरलें कीं, इसवी सन १७७३ पासून मराठ्यांचा जो मुलूख इंग्लिशांनीं घेतला असेल, तो त्यांनीं त्यांचा त्यांस परत द्यावा; भडोचेमध्यें जो इंग्लिशांचा अंश होता, तो त्यांनीं शिंद्याचे हवालीं करावा; व त्याच्या नौकरांस मेहेनतीबद्दल बक्षीस वांटण्यासाठीं त्यांनीं ४१००० रुपये त्याजकडे पाठवावे. हे करार इंग्लिशांनीं बिनचूक पाळावे, ह्मणून त्यांजकडचे फार्मर आणि स्तुअर्त हे दोन गोरे लोक ओलीस घेऊन, शिंद्यानें त्यांस वडगांव येथून जाऊं दिलें. आणि ह्याच ठरावावरून राघोबादादा महादजीच्या स्वाधीन झाला.

इतकें वर सांगितल्याप्रमाणें व्हावयाचें ठरलें मात्र; पण तें मुंबई सरकारास अमान्य झाल्यावरून, मराठे व इंग्लिश ह्यांचें युद्ध पुनः जुंपलें. इकडे जनरल गोदर्द साहेबानें इ० स० १७८० च्या फेब्रुवारी महिन्यांत अमदाबाद घेतली. आणि तिकडे ग्वाल्हेरचा किल्ला मोठ्या पराक्रमानें फाफम साहेबानें आगस्त महिन्यांत शिंद्यापासून घेऊन त्यांत आपला अमल बसविला. अमदाबाद घेण्याच्या कामीं, मेले आणि जखमी झाले ह्यांची गणती १०६ झाली; पण ग्वाल्हेर घेतांना एक देखील मनुष्य जायां झालें नाहीं. शेवटीं, इंग्लिशांनीं राघोबादादास आश्रय दिला हें ठीक नव्हे, अशी हिंदुस्थान सरकारची सूचना आल्यावरून, व ह्या युद्धांत कांहीं फायदा नाहीं असें इंग्लिशांस वाटल्यावरून, सालबाई मुकामीं, तारीख १७ मे स० १७८२ इ० रोजीं उभय पक्षांचा तह ठरला. ह्यांत सर्व मराठ्यांच्या वतीनें मुखत्यार महादजी शिंदा होता. त्याला स्वतःला ह्या तहापासून अनेक लाभ झाले.

त्यांत विशेष हा कीं, तो जर स्वपराक्रमेंकरून इतर संस्थानिकांचीं राज्यें घेऊं लागला, तर त्यास इंग्लिशांनीं हरकत करूनये, असें ठरलें.

पुढें तिकडे दिल्लीमध्यें दरबारांत दुफळी झाली. त्या दोन्ही पक्षांनीं महादजी शिंद्यापाशीं साह्य मागितलें. तेव्हां तो एकाचें बोलणें मान्य करून, बादशाहाची स्वारी आग्र्याकडे होती, तिकडे तो जावयास निघाला. उभयतांची मुलाखत झाल्यावर, एका पक्षाचा पुढारी आफ्रासियाबखान ह्यास कोणी ठार मारिलें. त्यानंतर जी गडबड झाली तींत शिंद्यानें राहिलेल्या दुसऱ्या पक्षास एकीकडे टाकून दरबारामध्यें आपण श्रेष्ठत्व मिळविलें. तें इतकें कीं, तेथील बादशाह, अमीरउल्उमराव ह्मणजे वजीर, ही पदवी त्यास देऊं लागला. तेव्हां त्यानें त्यास असें सांगितलें कीं, माझे यजमान पेशवे, त्यांचा असा कांहीं सन्मान झाल्याखेरीज मी हा मान घेणार नाहीं. ह्मणून, पेशव्यास वकीलमुतलक ह्मणजे प्रतिनिधि असा अधिकार व किताब देण्याचें ठरून, ह्या नवीन अधिकाराच्या संबंधानें त्यांचें काम पाहणारा महादजी शिंदा हा पूर्ण मुखत्यार आहे असें बादशाहानें ठरविलें. ह्या प्रकारेंकरून, इ० स० १७८४ ह्या वर्षीं, दिल्ली व आग्रा ह्या प्रांतांमध्यें महादजी शिंदा करील तें प्रमाण, असें झालें.

दिल्लीच्या दरबारचा कारभार वगैरे अनेक मोठालीं कामें महादजीस मिळाल्यामुळें त्याचें प्रस्थ फारच वाढलें. तें इतकें कीं, बहुतेक माळवा व दक्षिणेतील कितीएक उत्कृष्ट प्रांत इतका मुलूख जरी त्याजकडे होता, तरी त्याचे उत्पन्न त्याच्या खर्चास पुरेना. ह्मणून त्यानें शाहाआलमाच्या जोरावर कितीएक मुसलमान सरदारांच्या जाहागिरी जप्त केल्या. आणि जैपूर वगैरे रजपूत संस्थानांशींही त्यानें तोच क्रम आरंभिला. त्याजकडे फौजेच्या पगाराची बाकीही पुष्कळ राहिली. आणि पैसा तर कोठें मिळेना. अशा संकटामध्यें महादजी शिंदा असतां, त्याचा मुसलमान सरदार इस्माल बेग हा त्यास सोडून गेला. हा एकटाच काय, ह्याचे मागून आणखीही कितीएक सरदार ८० तोफा घेऊन त्यास सोडून निघून गेले. त्या संधीस त्याशीं लढण्यास रजपूत राजांनीं एकत्र होऊन कंबर बांधिली. इस्मालबेग गेला त्यास, जाबताखानाचा मुलगा गुलामकादर हा सैन्यासहवर्तमान जाऊन मिळाला. त्या दोघांनीं एका लढाईंत शिंद्याचा पराभव करून, इ० स० १७८८ च्या जून महिन्यांत दिल्ली घेतली. तिचें रक्षण करण्याचा कांहीं यत्न शाहाआलमानें

केला होता, तो द्वेष मनांत आणून, गुलामकादरानें त्याचे डोळे काढिले. हें त्या दोघांचें वर्चस्व फार वेळ टिकलें नाहीं. महादजी शिंद्यानें पुढें थोडकेच दिवसांत त्या दोघांस दिल्लींतून काढून लावून तेथें पुनः आपला अमल स्थापिला. आणि त्या आंधळ्या वृद्ध शाहाआलमास त्यानें पुनः त्याच्या तक्तावर बसविलें.

इंग्लिशांचा गवनर जनरल लार्ड कार्नवालिस ह्यानें, टिपूसुलतानावर स्वारी करण्याकरितां मराठे व निजामअल्ली ह्यांशीं ठराव केला होता. त्याप्रमाणें आपणांशीं ठरवावा असें महादजीच्या मनांत होतें; व त्याप्रमाणें त्यानें आपला हेतु लार्ड कार्नवालिस साहेबास कळविला होता सुद्धां; परंतु तो त्यानें कबूल केला नाहीं. हें अपमानाचें कृत्य शिंद्यास न सोसून, त्यानें इंग्लिशांशीं उघड वैर मांडण्याचा निश्चय केला. आणि त्याच हेतूनें तो इ० स० १७९२ त हिंदुस्थान सोडून पुण्याकडे यावयास निघाला. तेव्हां त्यानें बाह्यात्कारें असें दाखविलें कीं, शाहाआलमानें वकीली मुतल्कचीं जीं वस्त्रें पेशव्यांकरितां मजपाशीं दिलीं आहेत, तीं ज्यांचीं त्यांस प्रविष्ट करण्यास मी तिकडे जात आहें. फ्रेंच अमलदार आपले नौकरीस ठेवून महादजीनें १६ पलटणींस उत्कृष्ट कवाईत शिकविली होती; शिवाय त्याजपाशीं १००००० स्वार, व ५०० तोफा होत्या; आणखी त्यास दिल्लीच्या बादशाहाची दिवाणगिरी मिळालेली; एवढें मोठें वैभव ईश्वरकृपेकरून प्राप्त झालें असतां, तो इ० स० १७९३ त पुण्यास आला, तेव्हां तो शहरच्या वेशींतच आपल्या हत्तीवरून खालीं उतरला. नंतर तो पेशव्याच्या वाड्यामध्यें कचेरींत गेला, तेव्हां त्यास सवाईमाधवरावानें बसा ह्मणून सांगितलें. परंतु, येथें सरकारासमोर बसण्याचा मला अधिकार नाहीं, असें ह्मणून तो उभाच राहिला. पेशवा गादीवर बसल्यावर, महादजीनें आपले बगलेंतून जोडे काढून त्याच्या पायांशीं ठेविले, आणि तो ह्मणाला, " माझें काम हें आहे; पूर्वी माझा बापही हेंच करीत असे. " ही त्याची नम्रता पाहून लोकांस फार आश्चर्य वाटलें. तो प्रकार नानाफडनविसास आवडला नाहीं. शिंदा बरेच दिवस पुण्यांत राहिला. तितक्या अवकाशांत त्यानें युक्तिप्रयुक्तीनें सवाई माधवरावास अगदीं आपलेसें करून टाकिलें; तें इतकें कीं, राज्यकारभारांतदेखील शिंद्याची मसलत चालूं लागली. नानाफडनविसाचें तेज कमी झालें. तो अपमान नानास दुःसह होऊन, त्यानें श्रीमंतांपाशीं काशीयात्रेस जाण्यास निरोप मागितला.

तेव्हां माधवरावानें त्याचें सांत्वन करून त्यास तसेंच राहून घेतलें.

पेशव्यांस वस्त्रें देण्याचा सभारंभ झाल्यावर आधीं निजामाचा नाश करावा आणि मग इंग्लिशांच्या मागें लागावें अशा इराद्यानें मराठ्यांनीं टिपूशीं तह ठरविला. नंतर महादजी, पुण्याजवळ वानवडीवर त्याच्या लष्कराचा तळ पडला होता, तेथें जाऊन राहिला. त्या ठिकाणीं त्यास एके दिवशीं मोठा ज्वर येऊन, त्याच्या योगानें तो, इ० स० १७९४ च्या फेब्रुवारी महिन्याच्या १२ व्या तारखेस मरण पावला. तेणेंकरून मराठ्यांची मोठी हानि झाली.

महादजी शिंदा हा स्वभावानें कपटी, महत्वाकांक्षी, आणि स्वकार्यसिद्धयर्थ प्रसंगानुसार वागणारा होता. वडगांवच्या तहाच्या वेळीं दोन साहेब लोक त्याजकडे ओलीस दिले होते. त्यांस त्यानें चांगल्या रीतीनें वागविलें, व कारण सरल्यावर सुरक्षितपणें इंग्लिशांच्या स्वाधीन केलें; आणि ह्या मेहेरबानीस्तव इंग्लिशांनीं भडोच किल्ला व परगणा, हे त्यास दिले. ह्यावरून त्यास सुराजनीति अवगत होती, असें स्पष्ट दिसतें. सालप्याच्या तहाच्या वेळीं असें ठरलें होतें कीं, मराठे व इंग्लिश ह्यांपैकीं ज्यांकडून तो तह प्रथम मोडला जाईल, त्यांचा पक्ष सोडून शिंद्यानें दुसऱ्या पक्षास मिळावें, आणि दोघांनीं एकत्र होऊन मर्यादोल्लंघन करणाऱ्या पक्षाचें पारिपत्य करावें. ह्यावरून, त्या प्रसंगीं महादजी शिंद्याचें बळ व वजन किती होतें, हें सहज लक्षांत येतें. तो शरीरानें स्थूळ, काळासांवळा आणि सदा आनंदमुख असा असे.

महादजी शिंद्यास पुत्रसंतति नव्हती. ह्मणून, त्याचा सखा भाऊ तुकोजी, ह्मणजे जो पानपतच्या लढाईंत पडला, त्याचा तिसरा मुलगा आनंदराव ह्मणून होता, त्याचा पुत्र जो दौलतराव, त्यास आपण दत्तक घ्यावें, असें त्याच्या मनांत होतें. परंतु ती गोष्ट घडून आली नाहीं. तथापि महादजीच्या मागें त्याच्या इच्छेप्रमाणें दौलतरावच त्याचे गादीवर बसला. ही गोष्ट, महादजी शिंद्याची बायको लक्ष्मीबाई हिच्या मनास आली नाहीं. परंतु, कारभारी लोक त्यास अनुकूल होते, ह्मणून तिचें काहीं चाललें नाहीं. दौलतराव गादीवर बसला तेव्हां तो १५ वर्षांचा होता. त्यानें नानाफडनविसाचा लोभ संपादिला.

दौवलराव शिंदा ह्यास सखाराम घाटगे सर्जेराव ह्याची रूपवती कन्या बाइजाबाई ही दिली होती. आणि तो घाटगा, आपला जांवाई लहान ह्मणून, इ० स० १७९६ ह्या वर्षीं त्याचे मुलुखाचा सर्व कारभार पाहूं लागला.

तो अतिशय द्रव्यलोभी व पराकाष्ठेचा निर्दय होता. तो इंग्रजांच्या अनुमतानें वागेना, व दरबारांत बंदोबस्त अगदीं कमी असे, तेणेंकरून अनेक अनर्थाच्या गोष्टी घडून आल्या. पुढें शिंदे व होळकर ह्यांच्या लढाया चालू झाल्या. त्यांपैकीं एक मोठी लढाई, इ० स० १७९९ त उज्जनी जवळ झाली. तेव्हां यशवंतराव होळकराचा जय झाला. आणि तें शहर त्यानें घेतलें. ह्यावेळीं लुटालूट न करितां त्यानें लोकांपासून खंड घेऊन पुष्कळ द्रव्य मिळविलें. पुढें ह्यांची दुसरी एक मोठी लढाई इंदुराजवळ जुंपली. तींत होळकर इतका पराभव पावला कीं, थोड्याशा लोकांनिशीं त्यास महेश्वर येथें पळून जावें लागलें.

पुण्याचे दरबारीं महादजी शिंद्याचें जें वजन होतें, त्याहीपेक्षां दौलतरावाचें अधिक पडलें. नानाफडनवीस हा मोठा राजकारस्थानी आणि शाहाणा पुरुष इ० स० १८०० च्या मार्च महिन्याच्या १३ व्या तारखेस मरण पावला. तेव्हांपासून तर बाजीराव पेशवा दौलतराव शिंद्याच्या ओंजळीनें पाणी पिऊं लागला. नानाफडनवीस मेला त्याची दौलत फार मोठी होती; तिजविषयीं पेशवा व शिंदा ह्या दोघांस लोभ उत्पन्न झाला. तेव्हां अर्थातच उभतांचें वैमनस्य आलें. दौलतरावानें बाजीरावास, त्याच्याच वाड्यांतल्या एका दिवाणखान्यामध्यें अगदीं प्रतिबंधांत ठेविलें, आणि राज्याचा सर्व कारभार आपले हातीं घेतला.

थोडे वर्षांपूर्वीं तुकोजी होळकर मरण पावल्यानंतर, त्याचे गादीविषयींचा तंटा तोडतांना, यशवंतराव होळकराचा सखा भाऊ विठोजी ह्यास पेशव्यांनीं पुण्यास अडकवून ठेविलें होतें. तो नानाफडनविसाचा पक्षपाती होता, असें दौलतराव शिंद्यानें बाजीरावाच्या मनांत भरवून देऊन, त्याजकडून त्यास हत्तीच्या पायीं बांधवून मारविलें. त्या दोघांचाही सूड उगविण्यासाठीं यशवंतराव होळकरानें पुण्यावर स्वारी केली. त्या शहराजवळ लोणी येथें शिंदा व होळकर ह्यांची मोठी लढाई आक्तोबरच्या २५ व्या तारखेस झाली. ती चालली असतां, आपली फौज किंचित् कचरली असें पाहून होळकर निराशेच्या स्वरानें ह्मणाला, "आज जर मला अपयश आलें, तर मी जीव ठेवणार नाहीं. तें अपयश घेऊन मी पळूं तरी कोठें?" परंतु, तसा कांहीं प्रकार झाला नाहीं. शिंदा पराभव पावला. तेव्हां अर्थात् त्याच्या जिवावर उड्या मारणारा बाजीराव, तोही फार घाबरून पळत सुटला. आणि पुणें होळकरानें घेतलें.

पुढें, इ० स० १८०२ च्या दिसेंबर महिन्याच्या ३१ व्या तारखेस वसई येथें इंग्लिश सरकार आणि बाजीराव ह्यांचा तह ठरला. त्याप्रमाणें इंग्लिशांनीं बाजीरावास तारीख १३ माहे मे स० १८०३ इ० रोजीं पुण्यास गादीवर पुनः बसविलें. ह्या कामांत शिंद्याला नुसतें विचारिलें सुद्धां नाहीं. आणि पेशवा ह्मणजे त्याच्या अर्ध्या वचनांत वागणारा, त्यास इंग्लिशांनीं आश्रय देऊन गादीवर बसविलें, हें पाहून त्याला अत्यंत कोप आला. आणि त्यानें सैन्यासहवर्तमान पुण्याची वाट धरिली. हें इंग्लिशांस समजतांच त्यांनीं आपला वकील त्याजकडे पाठविला. त्याजपाशीं निश्चितपणें कांहींएक गोष्ट न बोलतां शिंदा आसई मुक्कामीं आला. तेथें त्यास नागपूरचा राजा भोंसला हा येऊन मिळाला. ह्या दोन्ही एकत्र झालेल्या सैन्यांची व इंग्लिशांकडील सैन्याची मोठी लढाई झाली. तींत मराठ्यांचें सैन्य पराभव पावलें. ह्याविषयींची कच्ची हकीकत ह्याच पुस्तकांत 'आसईची लढाई' ह्मणून एक विषय लिहिला आहे, त्यांत पाहावी.

आणखीही कितीएक लढायांत शिंदा पराभव पावला. त्यांत अल्लीगडच्या समरांत तर त्याच्या सैन्याची फारच दुर्दशा झाली. ती इतकी कीं, परेन ह्या फ्रेंच सरदारानें, निराश होऊन त्याची चाकरी सोडिली. तेव्हां निरुपाय होऊन त्यानें, इ० स० १८०३ च्या दिसेंबर महिन्याच्या ३० व्या तारखेस सर्जेअंजनगांवीं इंग्लिशांशीं तह ठरविला. त्यावरून गंगा व यमुना ह्या नद्यांच्या मधील किल्ले व मुलूख, व जयपूर, जोधपूर, आणि गोहद ह्यांच्या दक्षिणेकडील कांहीं प्रांत, त्यानें इंग्लिशांस दिला. त्यांनीं ह्यापैकीं कांहीं अंश निजामास व थोडासा भाग पेशव्यांस देऊन बाकी सर्व मुलूख आपणांकडे ठेविला. ह्या तहांत असें ठरलें होतें कीं, कारण पडेल तेव्हां १०००० फौज शिंद्यानें इंग्लिशांस द्यावी, व इंग्रजांनीं त्यास ६ पलटणें द्यावीं.

ह्याप्रमाणें शिंद्यानें इंग्लिशांशीं तह ठरविला. तरी त्याचें मन त्यांजविषयीं शुद्ध नव्हतें. कांहीं कारणावरून इंग्रजांशीं लढण्याची संधी येईल केव्हां, आणि आपण त्यांचा सूड उगवूं केव्हां, असें, दीर्घद्वेषी जो सर्जेराव घाटगा, शिंद्याचा मुख्य कारभारी, त्याचे मनांत होतें. पुढें असें झालें कीं, होळकरानें पुणें घेतलें होतें तें परत घेऊन तेथें इंग्लिशांनीं बाजीरावास गादीवर बसविलें, ह्यावरून होळकर व इंग्लिश ह्यांचें वैमनस्य पडून लढाया सुरू झाल्या. तेव्हां शिंद्यानें होळकराचा पक्ष धरण्याचा विचार करून,

त्याचे दरबारीं जेनकिन्स साहेब ह्मणून एक इंग्लिशांचा रेसिदेंत होता, त्याच्या बंगल्यावर लोक पाठवून, आंतले सर्व सामान लुटून, स्वतः त्यास कैद करून नेलें. आणि त्यास त्यानें आपल्या स्वारीबरोबर हिंडधून त्याचा फार अपमान केला. ही गोष्ट इ० स० १८०५ च्या फेब्रुवारी महिन्यांत घडली.

पुढें, इ० स० १८०५ च्या नोवेंबर महिन्याच्या सुमारास शिंदे व इंग्लिश सरकार ह्यांच्यामध्यें दुसरा तह ठरला. त्यावरून, जोधपूर व अंतर्वेदी वगैरे शिंद्याकडचा मुलूख जाऊन, चंबळानदी उभयपक्षांच्या राज्यांची सरहद्द ठरली. तिच्या पलीकडे इंग्लिशांचा अमल, त्यांत शिंद्यास यावयास अधिकार नाहीं, असें झालें. महादजी शिंद्याची कन्या बाळाबाई, व बाइजाबाईची कन्या चिमाबाई ह्यांजकडे एकंदर मिळून तीन लाखांचा मुलूख ठेविला. खुद शिंद्याकडे एक कोटि चाळीस लक्षांचा मुलूख राहिला. पण खर्च दोन कोटींचा होता; तो कमी केला नाहीं. तेणेंकरून कर्ज झालें. देशांतला बंदोबस्त मोडला.

पुढें, पेंढाऱ्यांचें पारिपत्य करण्याचा विचार जेव्हां इंग्रज सरकारानें मनांत आणिला, तेव्हां, ह्मणजे इ० स० १८१७ च्या नोवेंबर महिन्यांत शिंद्याशीं आणखी एक तह ठरला. त्यावरून, रजपूत संस्थानांवरचा शिंद्याचा अमल कमी होऊन, त्यांत इंग्लिशांनीं आपलें वर्चस्व स्थापिलें. आणखी शिंद्यानें असें कबूल केलें कीं, माझ्या राज्यांत जेथें मी आपलें सैन्य ठेवीन तेथून तें इंग्रज सरकारच्या आज्ञेवांचून हालविणार नाहीं. ह्याच वर्षीं अशीरगड हा किल्ला त्यांनीं शिंद्यापासून घेतला. त्यांत जें कांहीं सांपडलें त्यावरून असें स्पष्ट दिसून आलें कीं, शिंद्याचे मनांत त्याचे रक्षणार्थ कांहीं चकमक झाडावयाची होती; परंतु तें साधलें नाहीं.

दौलतराव शिंदा इ० स० १८२७ च्या मार्च महिन्याच्या २१ व्या तारखेस मरण पावला. तेव्हां तो ४८ वर्षांचा होता. त्यानें तेतीस वर्षें पर्यंत आपले गादीचा उपभोग घेतला. त्याचें लष्कर मोठें होतें; परंतु, तो मोठा योद्धा होता असें नाहीं. ह्याचे कारकीर्दीत मुलुखांत अव्यवस्था फार होती; व ह्याला कर्ज फार झालें होतें.

दौलतरावास पुत्रसंतान नव्हतें. ह्मणून, तो मरण पावल्यावर, त्याची बायको बाइजाबाई हिनें, जून महिन्याच्या २७ व्या तारखेस मुकुटराव ह्मणून एक मुलगा दत्तक घेतला. आणि त्याच दिवशीं सेनापती दाभाडयाच्या एका

मुलीशीं त्याचें लग्न लावून दिलें. नंतर दुसरे दिवशीं, त्यास जनकोजीराव असें नांव देऊन, इंग्लिश सरकारच्या मान्यतेनें गादीवर बसविलें. तो वयानें अकरा वर्षांचा होता, म्हणून बाइजाबाई ही सर्व राज्याचा कारभार पाहात असे. या कामीं, तिचा भाऊ हिंदुराव, हा तिला फार मदत करीत असे.

पुढें, कांहीं दिवसांनीं जनकोजीचें व बाइजाबाईचें वैमनस्य आलें. तिनें त्याला प्रतिबंधांत ठेविलें. त्यांतून, तो, इ० स० १८३२ च्या आक्तोबर महिन्यांत, गुप्तपणें पळून इंग्लिशांकडे आला. नंतर, गव्हरनर जनरल लार्ड विलियम बेंतिक ह्यानें स्वत: ग्वाल्हेरीस जाऊन उभयतांचा समेट करून दिला. तो सात आठ महिने चालल्यावर, पुन: कलह उत्पन्न होऊन, जनकोजीराव पुनरपि इंग्लिशांकडे गेला. आणि सगळें सैन्य बंडावल्यासारखें दिसलें. यावरून त्यांनीं असें ठरविलें कीं, बाइजाबाईनें ६ लक्षांची नेमणूक घेऊन स्वतंत्र राहावें; त्याप्रमाणें ती वागूं लागली. पुढें इ० स० १८६२ त ती मरण पावली. जनकोजीराव कारभार पाहूं लागला तेव्हां त्याजपाशीं १०००० पायदळ, १५००० स्वार, आणि २५० तोफा होत्या. त्याचे वेळीं कांहीं विशेष गोष्ट घडली नाहीं. तो इ० स० १८४३ च्या फेब्रुवारी महिन्यांत निवर्तला. तेव्हां तो ३७ वर्षांचा होता. त्याची पत्नी ताराबाई हिनें भागीरथराव नामक एका आठ वर्षांच्या मुलास दत्तक घेतलें; आणि जयाजीराव असें त्याचें नांव ठेवून, त्याच्या नांवानें सर्व राज्यकारभार चालविला. त्यांत मुख्य दिवाणगिरीचें काम, जनकोजीरावाचे मामा ह्यांस दिलें. ते इतिहासांत मामासाहेब ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत.

मामासाहेब हा गव्हरनर जनरलाच्या संमतीनें शिंद्याच्या राज्याचा कारभार करीत असतां, दादा खासगीवाला म्हणून कोणी पुरुष त्यास प्रतिपक्षी उत्पन्न झाला. पण दादास आपल्या स्वाधीन करून घेऊन, तो दंगा इंग्लिशांनीं बराच लवकर मोडिला. परंतु, इश्रीशिंगाच्या हाताखालची शिंद्याची फौज पूर्वीच एकदा विथरली होती. तो विघाड पुढें आणखी पसरून त्यापासून इतका त्रास झाला कीं, त्याच्या बंदोबस्ताचा विचार करणें इंग्लिश सरकारास भाग पडलें. तेव्हां गव्हरनर जनरल साहेब स्वत: सैन्य घेऊन निघाले. त्यांच्या लष्कराची व शिंद्याच्या विथरलेल्या सैन्याची एक मोठी लढाई महाराजपूर येथें इ० स० १८४३ च्या दिसेंबरच्या २९ व्या तारखेस झाली, व दुसरी एक पन्यार येथें झाली. ह्या दोहोंतही शिंद्याचे

फौजेचा पराभव झाला. नंतर, शिंदे व इंग्लिश ह्यांचा नवा तह ठरला. तो असा. राजा लहान आहे तोंपर्यंत राज्याचा कारभार इंग्लिश रेसिदेंताच्या विचारानें चालवावा; इंग्लिशांचें ७००० पायदळ व ३००० स्वार इतकें कुमकेचें लष्कर शिंद्याकडे असावें; त्याच्या खर्चाबद्दल अठरा लक्ष रूपयांच्या उत्पन्नाचा मुलूख त्यानें त्यांस तोडून द्यावा; आणि शिंद्याचें लष्कर ३००० पायदळ, ६००० स्वार, २०० गोलंदाज, आणि ३२ तोफा इतकें असावें. ह्याप्रमाणें, शिंदा जो ह्या वेळेपर्यंत स्वतंत्र होता, तो इतर संस्थानिकांसारखा परतंत्र झाला.

इ० स० १८५४ त जयाजीराव महाराज वयांत येऊन आपल्या राज्याचा कारभार पाहूं लागला. इ० स० १८५७ ह्या वर्षीं बंगाल्यांतल्या शिपाई लोकांनीं मोठें बंड केलें, तेव्हां जे शिपाई काल्पी येथें होते, ते बिथरून नीट ग्वाल्हेरीवर आले. त्यांजपाशीं लढण्यास शिंद्यानें आपलें लष्कर पुढें केलें. परंतु, त्यांजपुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. तेव्हां शिंदा ग्वाल्हेरींतून पळाला, तो आग्र्यास गेला. इकडे बंडवाल्यांनीं तें शहर घेऊन, नानासाहेबाचा चुलत भाऊ रावसाहेब, ह्यास तेथील गादीवर बसविलें. हें वर्तमान, इंग्लिश सैनेचा शूर सरदार सर ह्यू रोजसाहेब ह्यास कळतांच, तो सैन्यासह वर्तमान तेथें येऊन बंडवाल्यांशीं लढूं लागला. बंडवालेही मोठ्या शौर्यानें लढले. परंतु, शेवटीं ते पराभव पावले. रोज साहेबानें इ० स० १७५८ च्या जून महिन्याच्या १९ व्या तारखेस ग्वाल्हेर परत घेतली. तेव्हांच्या कत्तलींत झांशीची राणी पडली. नंतर जयाजीराव महाराज ह्यांस तेथें परत आणून पुनः त्यांचे गादीवर बसविलें. हे महाराजच हल्लीं* गादीवर आहेत. त्यांस इंग्रज सरकाराकडून १९ तोफांच्या सरबत्तीचा मान आहे.

शिंद्याच्या मुलुखाची आकृति अगदीं वांकडी आहे. त्याची लांबी २५२ मैल, रुंदी १७० मैल, व क्षेत्रफळ ३३००० चौरस मैल आहे. ह्याचें उत्पन्न ९३१०००० रूपयांचें आहे. ह्यांतून तापी व चंबळा ह्या नद्या वाहातात. तांदूळ, गहूं, ज्वारी, मका, हीं धान्यें पिकतात. मुख्य व्यापार अफूचा आहे. प्रजा हिंदु व मुसलमान आहे. ग्वाल्हेर हें राजधानीचें शहर आहे. ह्या राज्यास इंग्लिशांचा आश्रय आहे. त्यांचा रेसिदेंत ह्याच्या दरबारीं असतो.

---

*इ० स० १८८१.

निजाम सरकारचा वंश.

इ० स० १७३२.

हैदराबादेच्या निजामाचा मूळ पुरुष मीर कमरुद्दीन उर्फ चिनकिलिच-खान हा होय. त्याचे बापाचें नांव गाजीवदीन असें होतें. मीर कमरुद्दीन हा औरंगजेब बादशाहाच्या लष्करांत वाढत वाढत मोठी योग्यता पावला. त्याजवर बादशाहाची कृपा असे. त्यास त्यानें पांच हजार स्वारांची मनसब देऊन, विजापूरच्या सुभेदारीचे जागेवर नेमण्याचा विचार केला; आणि असोफजा निजाम उल्मुलुख हा किताब दिला. ह्याचा अर्थ चांगली राज्यव्यवस्था करणारा असा होतो. पुढें औरंगजेब मरण पावल्यावर, फिरुकशेर ह्यास गादीवर स्थापण्याचे कामीं चिनकिलिचखानानें चांगलें साह्य केलें. तेव्हां अर्थात् या नव्या बादशाहाची त्याजवर फार मर्जी बसली. ती इतकी कीं, त्यानें त्यास आपली वजीरी दिली.

फिरुकशेर बादशाहाच्या मागें दिल्लीमध्यें फार अंदाधुंदी चालली. अबदुलखान व हुसेनअल्लीखान, हे दोघे सय्यद बंधु, बादशाहास व इतर मुत्सद्यांस एकीकडे ठेवून, मनास येईल तशी राज्यव्यवस्था करूं लागले. तेव्हां या दरबारामध्यें त्यांजविषयीं फार द्वेष उत्पन्न झाला. ह्या वेळीं निजामउल्मुलुख माळव्याच्या सुभेदारीवर होता. तो मोठा अभिमानी, कपटी, आणि महत्वाकांक्षी असे. आणि त्याजपाशीं सैन्यही बरेंच होतें. त्याचे मनांत सय्यद बंधूंविषयीं मत्सर उत्पन्न झाला. त्यानें असा निश्चय केला कीं, ह्या दोघां पुंडांच्या अमलाचा जो एवढा बोजा आपणावर आहे, तो उडवून देऊन, आपण दक्षिण प्रांत जिंकून घेऊन स्वतंत्र व्हावें. ह्या उद्देशानें त्यानें बारा हजार सैन्य मिळविलें. त्यासहवर्तमान तो नर्मदा नदी उतरून अशीरगड किल्ल्याजवळ आला. तेथच्या किल्लेदारास त्यानें द्रव्य देऊन तो किल्ला हस्तगत करून घेतला. नंतर बऱ्हाणपूर व खानदेश सुभा हींही त्यास मिळालीं. शिवाय, संभाजी राजाचे सरदार, चंद्रसेन जाधव निंबाळकर, व रावरंभा निंबाळकर, हे, सैन्यासहवर्तमान त्याच्या लष्करांत नौकरी धरून राहिले. तेणेंकरून निजामउल्मुलुखाचें प्रस्थ बरेंच वाढलें. हा मोठा पराक्रमी सरदार आहे, अशी लोकांत त्याची मोठी ख्याति झाली; आणि, आपणांस हा एक

मोठा शत्रुच उत्पन्न झाला आहे, असें त्या सय्यद बंधूंस वाटून, त्यांनीं त्याजवर लष्कर पाठविण्याची तयारी केली.

प्रथमतः औरंगाबादचा अधिकारी अलंअल्लीखान ह्यानें निजामउल्मुलुखावर चाल केली. ह्या दोहों पक्षांची लढाई वऱ्हाडांत पैनघांटानजीक बाळापुराजवळ झाली. तींत निजामउल्मुलुखानें आपल्या शत्रूचें लष्कर अडचणीच्या जागीं गांठून त्याचा पराभव केला. हें वर्तमान दिल्लीस समजलें, तेव्हां सय्यदांस फार भय वाटलें, व दुःखही झालें; परंतु, बादशाहा अंतःकरणांत आनंद पावला. निजामउल्मुलुख हा शत्रु, सामान्य सरदारांस आटोपत नाहीं, असें पाहून, सय्यदांपैकीं धाकटा भाऊ हुसेनअल्ली, हा त्याच्या पारिपत्यास निघाला. त्यानें आपणाबरोबर महमदशाहा बादशाहा व पुष्कळ सैन्य घेतलें. तो दिल्लीपासून कांहीं मजला पुढें गेला. तेव्हां निजामउल्मुलुखाच्या मित्रांनीं व सरदारांनीं त्याचा प्राण घेण्याचा बेत केला, व तो सिद्धीसही नेला. त्याचा प्रकार असा. हुसेन हा एके दिवशीं आपल्या पालखीमध्यें स्वस्थ बसला असतां, मीरहीदर ह्या नांवाचा एक मनुष्य, हातांत एक कागद घेऊन त्याजपाशीं आला. तो कांहीं अर्ज आहे, असें समजून, हुसेनानें तो त्याचे हातांतून घेऊन वाचण्यास आरंभ केला. इतक्यामध्यें मीरहीदरानें त्याच्याजवळ जाऊन, त्याच्या उरांत आपला खंजीर खुपसून, त्यास ठार मारिलें. ह्याप्रमाणें हुसेनाचा परिणाम झाल्यावर, बादशाहा, त्याचे सरदार, व सर्व सैन्य ह्यांसुद्धां ही स्वारी दिल्लीस परत गेली. तेथें, बंधूंपैकीं अबदुल्लखान राहिला होता, त्यासही त्यांनीं जिवें मारविलें, आणि, सर्व राज्यसत्ता आपल्या हातीं घेतली. सय्यदांच्या जाचांतून आपण सुटलों, असें, बादशाहा, सरदार, व इतर लोक ह्यांस वाटून मोठा संतोष झाला. आणि हें इतकें सगळें फळ निजामउल्मुलुखाच्या खटपटीचें आहे, असें समजून त्यांनीं त्याचे फार आभार मानिले. आणि तेव्हांपासून त्याची मानमान्यता फारच वाढली. हें वर्तमान इ० स० १७१९ त घडलें.

सर्व लोकांस व बादशाहास सय्यद बंधूंच्या जाचांतून काढण्याविषींचा कट प्रथमतः महमदअमीरखान नामक एका तुर्की सरदारानें करविला, आणि तो यथास्थितपणें सिद्धीस गेला. ह्मणून ह्या नवीन व्यवस्थेंत त्याला वजीरीचीं वस्त्रें दिलीं. परंतु, तो पुढें लवकरच मरण पावला. तेव्हां ती महत्त्वाची जागा निजामउल्मुलुखाकरितां बुद्धया राखून ठेविली. परंतु, तो दक्षिणेंत, नवीन घेतलेल्या मुलुखाची व्यवस्था करण्यांत गुंतला होता. ह्मणून

त्यास तिकडे जावयास दोन वर्षेंपर्यंत बनलें नाहीं. तो इ० स० १७२२ च्या जानेवारी महिन्यांत दिल्लीस पोहोंचला. तेव्हां, तेथील दरबारची अव्यवस्था पाहून त्यास फार चमत्कार वाटला. महमदशाहा ऐषआरामांत मग्न होता. त्याच्या एका राखेनें त्यास इतकें ग्रासिलें होतें कीं, त्याच्या दरबारचें मुख्य मोर्तब तिनें आपणाजवळ घेऊन ठेविलें होतें. त्याच्या योगानें ती मनास येईल त्यास पाहिजे तशी सनद करून देत असे, असें सांगतात. सगळा राज्यकारभार अप्रतिष्ठित, हलक्या व व्यसनी अशा मनुष्यांचे हातीं सोंपिला होता. यांचा सर्व काळ खुषमष्करींत जात असे. कोणाची कांहीं तरी कुचेष्ठा करून बादशाहास खूष करावें, हेंच कायतें आपलें कर्तव्यकर्म आहे, असें ते समजत, आणि त्याप्रमाणें वागत. निजामउल्मुलुख हा औरंगजेबाचा मुत्सद्दी, तो त्यासारखाच मोठा सभ्य, प्रौढ बुद्धीचा आणि कडक स्वभावाचा होता. त्याला ते पोरकट चाळे आवडेनातसे झाले. दरबारच्या कामांत त्याचें लक्ष लागेना; आणि त्याची मसलत दरबारचे लोक सिद्धीस जाऊं देईनात. हा अपमान त्याला सोसवत नसे. अशी स्थिति असतां, या खुषमष्कऱ्यांनीं एके दिवशीं खुद त्याचीच कांहीं थट्टा करून बादशाहास हंसविलें. तेणेंकरून निजामउल्मुलुखास इतकें वाईट वाटलें कीं, त्यानें तत्काळ आपले कामाचा राजीनामा बादशाहापुढें ठेविला, आणि आपण, इ० स० १७२३ च्या आक्तोबर महिन्यांत दक्षिणेंत निघून आला. तेव्हां, आपणास फार नाखुषी झाली, असें बादशाहानें बाह्यात्कारें दाखविलें खरें, परंतु, त्यास मनांत फार आनंद झाला. इतकेंच केवळ नव्हे; तर, निजामउल्मुलुख जो इतक्या तोऱ्यानें दक्षिणेंत गेला आहे, त्यास तिकडेही कांहीं मिळूं नये, आणि त्याची फजीती व्हावी, असा विचार त्यानें मनांत आणिला. त्याचा सुभेदार मबारीजखान हैदराबादेस होता. त्यास त्यानें गुप्तपणें असें लिहून पाठविलें कीं, तुम्हीं निजामउल्मुलुख ह्यास त्याचे इष्ट स्थानीं जाऊं देऊं नका; हें काम तुमचे हातून शेवटास गेलें तर तुम्हांस दक्षिणेच्या साहा सुभ्यांचा अधिकार मिळेल. इतकें नुसतें लिहूनच बादशाहा राहिला नाहीं. त्यानें या पत्राबरोबर या प्रांतांबद्दलची त्याचे नांवाची सनदही त्याचेकडे पाठवून दिली. ह्याचें नांव बक्षीस. ! चांगलें काम केल्यावर सुज्ञ राजे कोणालाही बक्षीस देतात; परंतु, नुसतें काम करायास सांगून, त्यास आरंभ होण्याचे पूर्वीच बक्षीस देणें, हें काम सामान्य सुज्ञ राजांचें नव्हे. !! असो.

निजामउल्मुलुख इकडे आला असें कळतांच, बादशाहाच्या आज्ञे प्रमाणें, मबारीजखानानें त्याशीं लढण्याची तयारी केली. तेव्हां निजामउल्मुलुखानें त्याशीं तहाचें बोलणें चालविलें. परंतु, तें त्यानें मान्य केलें नाहीं. शेवटीं, इ० स० १७२४ च्या आगस्त महिन्यामध्यें उभय पक्षांची लढाई शकरखेडा ह्या गांवाजवळ झाली. तींत मबारीजखान लढतां लढतां पडला, त्याचे दोन पुत्र प्राणांस मुकले, आणि दोन जखमी झाले. मबारीजखान पडल्यावर निजामउल्मुलुखानें त्याचें शिर कापून दिल्लीस बादशाहाकडे पाठविलें, आणि त्या सोबतच्या विनंतीपत्रांत त्यास असें लिहिलें कीं, सरकारच्या पायांच्या कृपाप्रसादेंकरून मीं हा जबरदस्त बंडवाला मारिला आहे. !! दिल्लीसरकारास ह्या वेळीं ऐषआरामानें व व्यसनानें इतकें ग्रासून टाकिलें होतें कीं, निजामउल्मुलुखाच्या ह्या कृत्याकडे व त्याच्या पत्राकडे नुसतें कोणी पाहिलें सुद्धां नाहीं. !!

निजामउल्मुलुखाच्या चरित्रांत ही लढाई फार महत्वाची समजली पाहिजे. कारण, ह्या लढाईनें दक्षिणेचें आधिपत्य मोंगलांकडून निघून निजामउल्मुलुखास प्राप्त झालें, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. शकरखेड्याचा जय मिळाल्यानंतर, निजामउल्मुलुख हैदराबादेस गेला. तेथें, मबारीजखानाचा पुत्र खवाजाआहद, ह्याशीं सल्ला करून, त्यानें, गोवळकोंडा व इतर सर्व किल्ले हस्तगत केले, आणि आपले राज्याची गादी हैदराबाद येथें स्थापिली. हें वर्तमान दिल्लीस समजलें. तेव्हां, माळवा व गुजराथ हे जे दोन प्रांत पूर्वी निजामउल्मुलुखाकडे बादशाहानें दिले होते, ते त्याजपासून परत घेऊन, त्यांजवर दोन वेगळे सुभेदार नेमिले. ते शाहाणे व प्रबळ नव्हते, ह्मणून मराठे लोक त्यांत स्वाऱ्या घालूं लागले. त्यांजकडे निजामउल्मुलुखानें अगदीं देखील लक्ष्य पुरविलें नाहीं. कारण, ज्या मोंगल सरकारच्या मनांत आपणाविषयीं इतकें वैमनस्य आलें आहे, त्याची कोणत्या तरी प्रकारें हानि व्हावी, असें तो नेहमीं पाहात असे. दिल्लीसरकारचा सूड उगवावा, अशा बुद्धीनें त्यानें औदासिन्य धरिलें खरें. परंतु, त्याच्या योगानें मराठ्यांचा लाग चांगला साधला. ' दोघांचें भांडण आणि तिसऱ्यास लाभ ' असें जें ह्मणतात, त्याचें हें एक चांगलें उदाहरण आहे.

मोंगलांचा नाशहेतु मनांत धरून निजामउल्मुलुखानें मराठ्यांकडे काणाडोळा केला; परंतु ते पुढें प्रबळ झाल्याकारणानें व त्यास उपद्रव देऊं लागल्यामुळें, तो फार पश्चात्ताप पावला. त्याची राजधानी हैदराबाद, येथील

चौथ व सरदेशमुखी घेण्यासाठीं मराठे प्रतिवर्षी तेथें येत, त्यांच्या योगानें त्याच्या राज्यास व मुलुखास अतिशयित त्रास होई. हा संबंध तोडून टाकावा, ह्मणून त्यानें शाहूराजास कांहीं रोख पैसा व इंदापुराजवळचा कांहीं मुलूख दिला. ह्या गोष्टीस शाहू मान्य झाला. परंतु, त्याचा मुख्य कारभारी बाजीराव पेशवा, ह्यास ती गोष्ट अगदीं अप्रशस्त वाटली. आणि ह्या ठरावांत मध्यस्थी प्रतिनिधीनें केली होती, ह्मणून त्याचें व बाजीरावाचें मोठें वैमनस्य पडलें.

मराठ्यांच्या दरबारांत आपसामध्यें कलह चालला आहे असें पाहून, यापासून आपणास फायदा करून घेतां येईल असें निजामउल्मुलुखास वाटलें. मग जेव्हां मराठ्यांनीं चौथसंबंधी पैशाची मागणी केली, तेव्हां निजामानें त्यांस असें स्पष्ट उत्तर दिलें कीं, मराठ्यांच्या राज्याचा खरा धनी कोण, ह्याचा निर्णय ठरेपर्यंत सर्वच वसूल मजकडे जप्त असूंद्या; मग मी त्याचा न्याय करीन.

निजामउल्मुलुखानें ह्या भाषणांत मराठ्यांचा किती अपमान केला, व आपणाकडे केवढें श्रेष्ठत्व घेतलें, हें बाजीरावानें शाहूराजास उघड करून सांगितलें. तेव्हां त्यास इतका संताप आला, कीं, निजामउल्मुलुखावर आपण स्वतः चालून जावें, असा त्यानें निश्चय केला. तो विचार रहित करवून, बाजीराव, बरोबर पुष्कळ सैन्य घेऊन निजामउल्मुलुखाचे पारिपत्यास निघाला. त्यानें कितीएक लढाया देऊन, निजामउल्मुलुखास अगदीं मट्टयास आणिलें. तेव्हां त्यानें पेशव्याशीं तह ठरविला. नंतर कांहीं दिवसांनीं बाजीराव व निजामउल्मुलुख ह्यांच्या समक्ष भेटी झाल्या. हें वर्तमान इ० स० १७२८ त घडलें.

बाजीराव पेशव्यानें फौज पुष्कळ ठेविल्यामुळें, त्याचें उत्पन्न त्याचे खर्चास पुरेनासें होऊन, त्यास अतिशयित कर्ज झालें. तेव्हां त्यानें पुष्कळ सैन्य तयार करून, मागची कांहीं कुरापत काढून, दिल्लीवर स्वारी करण्याचा विचार मनांत आणिला. त्याचें मागणें प्रथम थोडें होतें; परंतु, आपण तें देण्यास कबूल आहों असें बादशाहानें जरा कबूल केल्याबरोबर, पेशव्यास अधिकाधिक आशा सुटली, आणि तो अव्वाचे सव्वा मागणीं करूं लागला. तेव्हां, ह्याशीं लढाई केल्याशिवाय हें झट सुटत नाहीं, असें दिल्लीच्या दर-

वारच्या लोकांनीं पक्कें जाणून, व आपलें सामर्थ्य किती हें मनांत आणून, निज़ामउल्मुलुखास लिहून पाठविलें कीं, तुम्हीं दिल्लीस लवकर यावें, न आलां तर मुसलमानांचें राज्य खेंचीत बुडेल. असा बादशाहाचा निरोप पोहोंचतांच निजामउल्मुलुख दिल्लीस गेला. तेथें बादशाहानें त्याचा बहुमान करून त्यास गुजराथ आणि माळवा ह्या प्रांतांच्या सुभेदारीचें काम दिलें, आणि मराठ्यांवर रवाना केलें. इकडे बाजीराव नर्मदा उतरून पलीकडच्या मुलुखांत शिरला. त्याजपाशीं ८०००० फौज होती. मराठ्यांची खबर घेण्याकरितां निजामउल्मुलुख निघाला, तो भोपाळानजीक आपल्या ३४००० सैन्याचा तळ देऊन राहिला. त्याजपाशीं तोफखाना चांगला तयार होता, आणि पेशव्यांकडे तो मुळींच नव्हता, त्यामुळें तो आपल्या घमंडींत स्वस्थ होता. परंतु, समोरासमोर लढाईचा प्रसंग न आणितां त्याच्या भोंवतालच्या प्रांतांत मराठ्यांचें लष्कर पसरलें. त्यानें निजामउल्मुलुखाच्या सैन्यास दाणा, चारा, वैरण, व पाणी ह्यांचा इतका दुष्काळ पाडिला कीं, तेणेंकरून तो अगदीं गाय होऊन गेला. त्यानें पेशव्यांशीं तहाचें बोलणें लाविलें. त्याजपाशीं बाजीरावानें जे जे करार करून मागितले, ते ते त्यानें निमूटपणें कबूल केले. त्यावरून माळव्याचें व चंबळा नदीच्या किनाऱ्यापर्यंतच्या सर्व मुलुखाचें स्वामित्व मराठ्यांस मिळण्याचें ठरलें. आणखी शिवाय ९००००० रुपये पेशव्यास देण्यासही तो मान्य झाला. हा तह इ० स० १७३८ च्या फेब्रुवारी महिन्यांत ठरला.

नादिरशाहानें, इ० स० १७३९ त दिल्ली घेतली, त्या गर्दीच्या वेळीं निजामउल्मुलुख तिकडेच होता. बादशाहा दिल्लींतून निघून गेल्यावर तेथें पुनः दुफळ्या पडून कज्जे चालू झाले. त्यांत निजामउल्मुलुख तुराणी सरदारांच्या पक्षाकडचा प्रमुख होता.

पळून गेलेला दिल्लीचा बादशाहा महंमदशाहा हा इ० स० १७४८ च्या एप्रिल महिन्यांत मरण पावला, तें वर्तमान ऐकून त्याचा पुत्र अहमदशाहा हा दिल्लीच्या गादीवर बसला. त्यानेंही निजामउल्मुलुखास आपली वजीरी पतकरण्याविषयीं फार आग्रहानें विचारिलें. त्यावर त्यानें स्पष्ट उत्तर दिलें कीं, आतां माझें वय फार झालें आहे, ह्मणून माझ्यानें हें काम होणार नाहीं; तें मला नको.

ह्या गोष्टींवरून निजामउल्मुलुख हा कोणत्या प्रकारचा मनुष्य होता हें

सहज लक्षांत येईल. सदरींसांगितलेली गोष्ट घडल्यानंतर, दीड महिन्यानें, जून महिन्याच्या १९ व्या तारखेस, निजामउल्मुलुख, बऱ्हाणपूर येथें मरण पावला. तेव्हां तो एकशें चार वर्षांचा होता, असें सांगतात. ह्याला साहा पुत्र होते. पहिला गाजीवदीन, दुसरा नासिरजंग, तिसरा सलाबतजंग, चवथा निजामअल्ली, पांचवा महमदसरीफ, आणि साहावा मीरमोंगल. ह्यांपैकीं पहिले दोघे एका आईचे पोटीं झालेले होते; आणि बाकी चौघांच्या आया वेगळ्या होत्या.

निजामउल्मुलुख मरण पावला, तेव्हां त्याचा वडील पुत्र गाजीवदीन हा दिल्लीच्या दरबारीं कांहीं मोठया अधिकारावर होता. ह्मणून दुसरा मुलगा नासिरजंग, तोच त्या वेळीं हैदराबादेच्या गादीवर बसला. इतकें झालें खरें; परंतु, गादीच्या वारशाच्या भांडणास जी गोष्ट पुढें कारणीभूत झाली, व ज्या गोष्टीच्या योगानें फ्रेंच व इंग्लिश ह्यांस हिंदुस्थानाच्या राज्यव्यवस्थेंत हात घालावयास संधी सांपडली, ती गोष्ट येथें सांगितली पाहिजे. ती अशी. निजामउल्मुलुखाची वडील मुलगी दरबारच्या एका उमरावास दिली होती; तिचा पुत्र मुझफरजंग*, हा, आपले आजाचा, ह्मणजे निजामउल्मुलुखाचा फार लाडका होता; आणि आपले मागें हैदराबादेच्या गादीवर ह्या नातवानें बसावें, अशी आपली इच्छा निजामउल्मुलुखानें एके वेळीं प्रकट केली होती.

ह्या कारणावरून, मुझफरजंगानें निजामाची गादी मिळविण्याचा प्रयत्न चालविला. अर्काटचा नवाब अनवरुद्दीन ह्यास चंदासाहेब ह्मणून एक शत्रु उत्पन्न झाला. त्याचीही बहुतेक सर्व स्थिति मुझफरजंगाप्रमाणें होती. ह्मणून ते समदुःखी पुरुष एकचित्त झाले. त्या दोघांनीं आपलीं सैन्यें एकत्र करून फ्रेंचांची मदत मागितली. ती त्यांस त्यांनीं तत्काळ दिली. ह्या एकत्र झालेल्या सैन्यांची व अनवरुद्दीनाच्या सैन्याची लढाई अंबुरानजीक झाली. तींत अनवरुद्दीन पडला. एवढ्यानेंच मुझफरजंग आपणास हैदराबादेचा निजाम, व चंदासाहेब हा आपणास अर्काटचा नवाब ह्मणवूं लागला. आणि हें सगळें फ्रेंचांच्या साह्याचें फळ आपणांस प्राप्त झालें, असे त्या दोघांस वाटलें, व त्याबद्दल त्यांनीं त्यांचे आभार मानिले.

तिकडे नासिरजंगानें आपल्या एतद्देशीय दोस्त राजांपाशीं व इंग्लिशांपा-

---

* ह्याचें मूळचें नांव हिरायत मोहिदीनखान असें होतें. मुझफरजंग ह्याचा अर्थ 'युद्धांत विजयी' असा होतो.

शीं साह्य मागितलें. तें त्यास मिळाल्याकारणानें त्याजपाशीं एकंदर ३००००० सैन्य जमलें. ह्यांत ६०० गोरे (इंग्लिश) लोक होते. त्यांजवर मेजर लारेन्स ह्या नांवाचा साहेब मुख्य होता. मुझफरजंगाकडे फ्रेंच लोक होते. त्यांजवर मुख्य अधिकारी डीआटिल ह्या नांवाचा होता. नासिरजंगाकडचे लोक एकीनें राहून युद्धाची कडीकोट तयारी करीत होते. परंतु, मुझफरजंगाच्या लष्करांत अशी कांहीं बेबंदी झाली कीं, तेथें कोणी कोणाचें ऐकेना. फ्रेंच लोक देखील आपल्या अमलदारांस उलट्या गोष्टी सांगूं लागले. तेव्हां, नासिरजंगापुढें आपला टिकाव निघावयाचा नाहीं, असें मनांत पक्कें समजून मुझफरजंग त्याच्या स्वाधीन झाला. त्यास त्यानें एकदम प्रतिबंधांत ठेविलें. इतकें झाल्यावर तरी नासिरजंगानें फ्रेंच लोकांविषयीं सावधगिरीनें वागावयाचें होतें. पण तसें न करितां तो स्वस्थ राहिला. फ्रेंच महा उद्योगी पडले, ते बळावत चालले. तेव्हां, निरुपाय होऊन, त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांशीं त्यानें तह केला. असा बाह्यात्कारीं स्नेहभाव दाखवून, गुप्तपणें, जिंजीचा सुभेदार व कडाप्याचा नवाब ह्यांस वश करून घेऊन, फ्रेंचांनीं नासिरजंगाशीं लढण्याची तयारी केली. शेवटीं, इ० स० १७५० ह्या वर्षीं, जिंजी येथें उभय पक्षांची लढाई होत असतां, कडापा येथील नवाबानें नासिरजंगास ठार मारिलें. आणि, मुझफरजंग हा त्याच्या कैदेंत होता, त्यास बंधमुक्त करून गादीवर बसविलें, आणि तो हैदराबादचा निजाम, असें चोहींकडे प्रसिद्ध केलें. तेव्हां तो फ्रेंचांच्या हातानें पाणी पिऊं लागला. आणि त्यांचें सैन्य आपले चाकरीस ठेवून, त्याच्या खर्चाबद्दल त्यांस त्यानें, नार्दर्न सरकार्स ह्मणून एक प्रांत आहे, तो लावून दिला. पांदिशरीस जाऊन, त्यानें मोठा उत्सव करून, लोकांस सुमारें दोन कोटि रुपये वांटिले.

मुझफरजंगास गादी मिळाली. परंतु, तिचा उपभोग त्यानें फार दिवस घेतला नाहीं. स्वतःस राज्याभिषेक करून घेतला तेव्हां त्यानें आपणास आपल्या योग्यतेप्रमाणें बक्षीस दिलें नाहीं, असें मनांत आणून, सूड उगविण्याकरितां, कर्नूलच्या नवाबानें बंड उभारून मुजफरजंग हा पांदिशरीपासून ऐशीं नव्वद कोस आला नाहीं तोंच, त्याच्या उरांत भाला भोंसकून त्यास ठार मारिले. नंतर त्याची गादी, त्याचा मामा सलाबतजंग ह्यास मिळाली. ह्यास, ह्याचा वडील भाऊ गाजीवदीन ह्याचें किंचित भय वाटत असे. परंतु, तो

भाऊ, इ० स० १७९२ त आपले गादीचा वारसा खरा करण्याकरितां दिल्लीहून दक्षिणेंत येत असतां, निजामअल्लीची आई औरंगाबादेस होती, तिनें त्यास मेजवानीस बोलावून, अन्नांत विष घालून ठार मारिलें. हें कृत्य तिनें निजामाची गादी सलाबतजंगाचे मागें आपले मुलास मिळावी, ह्या हेतूनें केलें. तेणेंकरून सलाबतजंगास भीति नाहींशी झाली.

मुझफरजंगाचे दोन पुत्र जीवंत असतां निजामाची गादी सलाबतजंगास मिळाली, हें फ्रेंच लोकांच्या मदतीचें फळ होय. हें सलाबतजंग विसरला नाहीं. फ्रेंचांचा सरदार बुसी हा त्याचे दरबारांत होता. त्याचें त्याजपाशीं इतकें वजन असे कीं, तो त्याच्या मसलतीवांचून कांहींएक करीत नसे. ह्या संधीस त्या फ्रेंच सरदारानें नवीन निजामापासून पुष्कळ द्रव्य उपटलें. शिवाय आपले स्वारांच्या नेमणुकीबद्दल दरसाल एक मोठी रकम देण्याविषयीं त्याजपासून कबुलायत घेतली. नंतर फ्रेंच लोक निजामाच्या दरबारांतून निघून गेले. तेव्हां, सलाबतजंग विषयी व आळशी असल्यामुळें, सर्व राज्याचा कारभार निजामअल्ली पाहूं लागला. पुढें, इ० स० १७९६ त, सदाशिव चिमणाजी पेशवे ह्यांनीं, निजामाकडचा विजापूर प्रांत जिंकून घेतला. नंतर कर्नल फोर्द ह्या इंग्लिश सरदारानें, स्वारी करून, नार्दर्न सरकार्स प्रांतांत फ्रेंचांचा पराभव करून, त्यांच्या ताब्यांतल्या मछलीपट्टण किल्ल्यास वेढा घातला, आणि तो घेतला. तेव्हां, सलाबतजंगाची त्यांजवरची निष्ठा उडाली, आणि इ० स० १७९९ ह्या वर्षीं त्यानें इंग्लिशांशीं तह केला. त्याचा मुख्य हेतु असा होता कीं, फ्रेंच लोकांस दक्षिणेंतून अजीं हांकून द्यावें. हा हेतु त्याच्या इच्छेप्रमाणें तावडतोब सिद्धीस गेला नाहीं, तरी ह्या खटपटींत इंग्लिशांस मछलीपट्टण मिळालें.

इकडे पुण्यामध्यें बाळाजीबाजीराव पेशवा मरण पावला, आणि त्याच्या कारभारी लोकांत भांडणें लागलीं, ही संधी पाहून, निजामअल्लीनें आपलें सैन्य पुण्याजवळ आणिलें. तेव्हां, आपला सर्व मुलूख पेशव्यांपासून सोडवून घ्यावा, असा त्याचा इरादा होता. परंतु, तो सोडून देऊन, त्यानें पेशव्यांशीं तह ठरविला. कारण, त्यास हैदराबादेची गादी हस्तगत करून घ्यावयाची होती. ह्मणून तो बेदराकडे गेला. तेथें सलाबतजंगाची स्वारी होती. त्यास त्यानें कैद करून एकदम प्रतिबंधांत ठेविलें, आणि सर्व राज्यसूत्र आपले हातीं घेतलें. ही गोष्ट इ० स० १७९२ च्या जुलै महिन्यांत घडली.

पुढें पंधरा महिन्यांनीं निजामअल्लीनें या बिचाऱ्या सलाबतजंगास ठार मारविलें. तेव्हां नांव आणि कृति ह्या दोन्ही पर्यायांनीं निजामअल्ली हा दक्षिणेचा सुभेदार झाला.

ह्याप्रमाणें निजामअल्लीस हैदराबादची गादी मिळाल्यावर, इ० स० १७६५ त त्यानें कर्नाटकांत स्वारी केली. तिच्या योगानें त्याची जरब अशी पडली कीं, इंग्लिश लोकांनीं कर्नल कालियद ह्यास त्याजकडे पाठवून इ० स० १७६६ च्या नोवेंबरच्या १२ व्या तारखेस त्याशीं तह ठरविला. त्यावरून नार्दर्न सरकार्स प्रांताबद्दल इंग्लिशांनीं त्यास दरसाल ८ लक्ष रुपये देण्याचें, आणि कांहीं सैन्य पुरविण्याचें कबूल केलें. परंतु, तो तह फार दिवस टिकला नाहीं. कारण, पुढें थोडक्याच दिवसांनीं म्हैसूरचा राजा हैदरअल्ली हा इंग्लिशांवर उठला, त्यास निजामअल्ली मिळाला. त्या दोघांनीं आपलीं सैन्यें एकत्र केलीं. तेव्हां त्यांजपाशीं एकंदर ४२८६० स्वार, २८००० पायदळ, आणि १०९ तोफा, इतकी युद्धोपयोगी सेना जमली. ह्यांशीं टक्कर देण्यास इंग्लिशांकडचा कर्नल स्मिथ नामक साहेब नेमिला होता. त्याजपाशीं १०३० स्वार, ५८०० पायदळ, आणि १७ तोफा इतकें सैन्य होतें. उभय पक्षांची एक लहानशी लढाई त्रिनोमाली येथें झाली. तींत ते दोघे पराभव पावले, व निजामअल्ली तर पळत सुटला; आणि स्मिथ साहेब विजयी झाला. नंतर हैदर व निजामअल्ली हे बारामहालप्रांतीं परत गेले. तेथें, ह्या पराभवाचें त्यांस इतकें दुःख झालें व इतकी लाज वाटली कीं, ते एक महिनापर्यंत एकमेकांस नुसते भेटले सुद्धां नाहींत. परंतु, अशी हिम्मत खचूं देणें आपणांसारख्या शूरांस योग्य नाहीं, असें मनांत आणून त्यांनीं एकचित्त होऊन, पुनः लढाईची तयारी चालविली.

हें युद्ध सुरू झाल्यावर, निजामअल्ली व हैदर ह्यांचीं मनें एकमेकांविषयीं कांहीं कारणावरून विटलीं. आणि आपण इकडे गुंतलों तर आपल्या राज्याचें व राजधानीचें संरक्षण यथास्थितपणें व्हावयाचें नाहीं, असा विचार करून, निजामअल्ली हैदरास सोडून निघाला. आणि त्यानें कर्नल स्मिथ साहेबापाशीं, इ० स० १७६८ च्या फेब्रुवारी महिन्याच्या २३ व्या तारखेस मित्रत्वाचा तह ठरविला. त्यावरून उभयपक्षीं असें कबूल केलें कीं, हैदरअल्ली हा बंडवाला आहे; त्याचा बंदोबस्त करण्याची तजवीज लवकर योजावी; नार्दर्न सरकार्स ह्या प्रांतांच्या वहिवाटीबद्दल इंग्लिशांकडून निजामास दरसाल

पांच लक्ष रुपये मिळत जावे; ह्यांपैकीं दोन लक्ष रोख द्यावे, व, लढाईच्या खर्चाबद्दल निजामअल्लीकडून इंग्लिशांस जे २५ लक्ष रुपये मिळावयाचे, त्यां पैकीं सालीना तीन लक्ष रुपये वजा करून घेत जावें. हा तह विलायत सरकारानें अगदीं नापसंत केला. ही गोष्ट घडण्यापूर्वीच, गंतूर वगैरे चार परगण्यांची जाहागिरीबद्दलची सनद इंग्लिशांनीं दिल्लीच्या बादशाहापासून मिळविली होती. तीप्रमाणें मुलूख हातीं येण्यास पुष्कळ प्रयत्न पडले. शेवटीं सात लक्ष रुपये इजारा ठरवून ते निजामानें त्यांजकडे दिले.

इ० स० १७६८ ह्या वर्षीं, निजामअल्लीनें, टिपूसुलतान, ह्मणजे हैदरअल्लीचा पुत्र ह्याशीं, व इंग्लिश गव्हरनर जनरल लार्ड कार्नवालिस ह्याशीं वेगवेगळे तह करण्याचा विचार मनांत आणून, त्यांजकडे वकील पाठविले. टिपूनें निजामाच्या वकीलास उत्तर दिलें कीं, तुमच्या धन्याचा आह्मांशीं शरीरसंबंध झाल्यास पुढें पाहिजे तो दुसरा विचार करूं. हें बोलणें निजामअल्लीस मानवलें नाहीं. तेणेंकरून तें तहाचें प्रकरण तसेंच राहिलें. इंग्लिशांकडे गेलेल्या वकीलाची अशीच कांहीं अवस्था झाली. शेवटीं, दोहींकडचे त्याचे यत्न फुकट गेले.

टिपूसुलतान उन्मत्त होऊन, इंग्लिश सरकारचा दोस्त जो त्रावणकोरचा राजा, त्यास उपद्रव देऊं लागला. तेव्हां गव्हरनर जनरल लार्ड कार्नवालिस ह्यानें निजाम व पेशवे ह्यांशीं वेगवेगळे तह ठरविले. आणि ह्या त्रिकुटाचें एकमत, इ० स० १७९० च्या जुलै महिन्यांत. झालें. त्याप्रमाणें इ० स० १७९२ पर्यंत टिपूशीं लढून त्यांनीं त्यास अगदीं जेरीस आणिलें, आणि त्याजपासून त्याचें निमे राज्य घेऊन, तें तिघांनीं सारखें वांटून घेतलें. ह्या वेळीं निजामअल्लीला सुमारें ३३ लक्ष रुपयांचा प्रांत मिळाला.

निजामअल्लीस मराठ्यांचें भय वाटत असे. ह्मणून, त्यांजपासून आपणास त्रास पोहोंचूं नये, अशाविषयीं तो इंग्लिश सरकारापाशीं खातरी मागूं लागला. परंतु, मराठे लोक आपलें ऐकत नाहींत असें पाहून, इंग्लिश सरकारानें कानावर हात ठेविले. तेव्हां, आपल्या बचावाकरितां निजामअल्लीनें रेमंड ह्या नांवाचा एक फ्रेंच सरदार आपले लष्करांत चाकरीस ठेविला; आणि त्याजकडून आपल्या पलटणींस कवाईत शिकविण्याचें काम चालू केलें.

इ० स० १७९५ त मराठे व निजामअल्ली ह्यांची प्रसिद्ध लढाई खरडें मुकामीं झाली. ती वर्णनीय आहे. तिचें वर्णन ह्या पुस्तकामध्यें एका वेग-

ळ्याच निबंधांत केलें आहे. ह्मणून तिजविषयीं येथें विशेष लिहीत नाहीं. परंतु, इतकें मात्र सांगतों कीं, तींत निजामअल्ली पराभव पावला. आणि मार्च महिन्याच्या १५ व्या तारखेस उभयपक्षांचा तह ठरला. त्यांत, पस्तीस लक्षांचा मुलूख आणि लढाईच्या खर्चाबद्दल तीन कोटि रुपये निजामानें मराठ्यांस देण्याचें कबूल केलें.

फ्रेंच लोकांचा प्रवेश निजामाच्या दरबारीं होऊन, तेथें त्यांचें प्राबल्य वाढत चाललें, हें इंग्लिश सरकाराच्यानें पाहवेना. ह्या सुमारास जेमानशाहाच्या स्वारीची बातमी उठली, हें एक; मशीर उल्मुलुख बरेच दिवस पर्यंत मराठ्यांच्या कैदेंत राहिल्यामुळें मागें फ्रेंच सरदारांनीं दरबारांत आपली छाप फारच वाढविली होती, हें दुसरें; आणि ते सरदार गुप्तपणें इतर राजांशीं मसलती करीत, हें तिसरें; ह्या तीन कारणांवरून, ते त्या दरबारास नकोसे झाले. ह्या संधीस इंग्लिशांनीं निजामअल्लीपाशीं नवीन तह ठरवून, त्याचे मदतीस आपले लोक देऊन, हैदराबादेमध्यें जें फ्रेंचांचें महत्व होतें, तें कमी करून टाकिलें. तें इतकें कीं, त्यानें त्यांस तेथून एकदम निघून जा ह्मणून सांगितलें. हें वर्तमान इ० स० १७९८ त घडलें.

इ० स० १७९९ त मराठे, निजाम, व इंग्लिश, ह्यांनीं टिपूसुलतानास मारून त्याचें राज्य घेतलें. तेव्हां त्या घालमेलींत निजामास सुमारें तेरा चवदा लक्षांचा मुलूख मिळाला; शिवाय पुष्कळ रोख पैसाही त्याचे वांटणीस आला. निजामअल्लीनें स्वसंरक्षणार्थ इंग्लिशांची पुष्कळ फौज* आपले चाकरीस ठेविली, तिच्या मुशाहिऱ्याबद्दल त्याजकडे इंग्लिशांची पुष्कळ रकम येणें राहिली. तिच्या फेडीस्तव निजामअल्लीनें, म्हैसूरच्या राज्यापैकीं मिळालेला सर्व मुलूख, इ० स० १८०० ह्या वर्षीं त्यांजकडे दिला; आणि त्यांच्या ऋणाचें ओझें आपल्या डोक्यावरून उतरिलें.

निजामअल्लीच्या पदरीं मुनीरउल्मुलुख ह्मणून एक त्याचा मुख्य दिवाण होता. त्याजकडे सर्व कारभार सोंपविलेला असे. त्याचे हाताखालीं चंदुलाल ह्मणून एक कायस्थ ब्राह्मण कारभारी होता. तो काय तो त्या वेळीं निजामाच्या राज्यांत मुख्य मनुष्य झाला होता. तो इतका कीं, खुद निजामअल्लीस सुद्धां त्यानें आपल्या मुठींत आणून ठेविलें होतें. तें निजामअल्लीस सोसेना. ह्मणून तो त्यास काढून टाकण्याचा विचार करीत असे. आणि

* आठ हजार पायदळ, एक हजार स्वार, आणि तोफखाना.

निजामअल्लीच्या अगदीं गुप्त मसलती काय चालल्या आहेत, हें आपणास कळावें ह्मणून त्या ब्राह्मणानें लांच देऊन इतकी तजवीज ठेविली होती कीं, निजाम-अल्लीची प्रत्यक्ष सासू देखील त्यास घरांतलें यत्किंचित् वर्तमान कळवीत असे.

निजामअल्ली इ० स० १८०३ ह्या वर्षीं मरण पावला. तेव्हां तो १०० वर्षांचा होता. त्याला आठ पुत्र होते. त्यांपैकीं शिकंदरजाहा हा त्याचे मागें त्याचे गादीवर बसला.

इ० स० १८१७ त इंग्लिश आणि पेशवे ह्यांच्या लढाया चालल्या. त्या समयीं शिकंदरजाहा ह्यानें इंग्लिशांस चांगली मदत केली. तिजबद्दल त्यास साहा लक्षांचा मुलूख मिळाला. इ० स० १८२० त ह्याचें राज्य सुमारें एक कोटि वीस लक्षांचें होतें; व इंग्लिशांची दाहा हजार फौज त्याचे तैनातीस होती. तींत १५०० साहेब लोक अमलदार होते. त्यांच्या व सर्व फौजेच्या खर्चाबद्दल निजाम (शिकंदरजाहा) इंग्लिशांस दरसाल ४०००००० रुपये देत असे. इ० स० १८२१ त नवीन तह ठरला. त्यांत इंग्लिश व निजाम ह्यांच्या राज्यांची सरहद्द सीनानदी कायम झाली. त्या वर्षीं शिकंदरजाहाचे सर्व राज्याचा वसूल १८९३३५५० रुपये आला; पैकीं, १७५११४०० रुपये खर्च झाला; आणि बाकीची रकम खजीन्यांत शिलक राहिली.

शिकंदरजाहा, इ० स० १८२८ ह्या वर्षीं मरण पावला. तेव्हां तो ५९ वर्षांचा होता. नंतर त्याचा पुत्र नासिरुद्दवला हा त्याचे गादीवर बसला. त्याचा किताब असा होता; "मुझफरूल् ममालिक निजामउल्मुलुख मीरजाफर खंदे अल्लीखान बहादर फत्तेजंग;" हें नांव फार लांब ह्मणून हैदराबादचे गादीवाल्यांस 'निजाम' असें सामान्यतें ह्मणतात.

इ० स० १८५५ त रायचूर, वऱ्हाड वगैरे ५०००००० रुपयांचा मुलूख फौजेच्या खर्चाच्या बाकीबद्दल निजामानें इंग्लिशांस दिला. पुढें इ० स० १८५७ च्या बंडांत निजाम फार उपयोगीं पडल्या कारणानें, त्यास रायचूर, नलदुर्ग, धारूर, इत्यादि प्रांत इंग्लिशांनीं परत दिले. आतां फक्त बऱ्हाड मात्र इंग्लिशांकडे आहे. नासिरुद्दौला इ० स० १८५७ त निवर्तला. नंतर त्याचा पुत्र अफजुलुद्दौला हा त्याचे गादीवर बसला. तो इंग्रज सरकाराजवळ उत्तम स्नेहभावानें वागला. ह्मणून त्यास व्हिक्तोरिया महाराणीसाहेबांनीं 'स्तार आफ् इंदिया,' हा किताब दिला. हा पुरुष ४३ वर्षांचा हो-

ऊन इ० स० १८६९ च्या फेब्रुवारी महिन्याच्या २६ व्या तारखेस हैदराबाद येथें मरण पावला. नंतर, त्याचा पुत्र मीरमैबुत ह्यास त्याचे गादीवर बसवून, मुख्य दिवाण सर सालरजंग व इंग्लिशांचा रेसिदेंत ह्यांनीं राज्यकारभार चालविला. तो सांप्रतं तसाच चालला आहे. गादीवर बसविलेला मुलगा बारा चौदा वर्षांचा आहे.

निजामाकडे हैदराबाद, औरंगाबाद, बेदर, व वऱ्हाडचा कांहीं भाग इतके प्रांत आहेत. ह्यांची लांबी ४७५ मैल, रुंदी बहुधा तितकीच, व क्षेत्रफळ सुमारें ९५३३७ चौरस मैल आहे. याचा वसूल १५५००००० रुपये आहे. राजधानीचें शहर हैदराबाद आहे. गोंवळकोंड्याच्या किल्ल्यांत निजामाचा खजीना असतो.

बादशाह.

लोकांत बादशाह आणि बिरबल ह्यांच्या पुष्कळ गोष्टी सांगतात. त्यांत बादशाहावर बिरबलाची छाप, असें बहुधा दिसून येतें. राजे, बादशाह, हे लटले ह्मणजे बहुधा मूर्ख, असा जनांत सामान्य समज आहे. 'तुह्मी राजे अहांत' ह्याचा अर्थ, तुह्मांला कांहीं कळत नाहीं, असा करितात. हा लोकांचा दोष नव्हे. कारण, ह्या देशांत जे राजे व बादशाह पूर्वी होऊन गेले, त्यांपैकीं बहुतेक पुरुष सदरील अर्थास अनुकूल अशा प्रकारचे होते, असें इतिहासावरून स्पष्ट दिसून येतें. तथापि, तेवढ्यावरून, सगळे राजे व बादशाह मूर्ख होते, असें कोणी समजूं नये. तर, कांहीं उत्तमही होते. पण तसे पडले फार, ह्यामुळें तो आळ सगळ्यांवर आला, तेथें इलाज नाहीं. असो. ह्या लेखांत हिंदुस्थानांतील कितीएक बादशाहांचें वर्णन करावयाचें आहे, त्यास आह्मी आतां आरंभ करितों. प्रथमतः बाहमनी वंशांतील बादशाहांविषयीं जें कांहीं चमत्कारिक ह्मणून आह्मांस वाटतें, तें सांगून, मग दिल्लीच्यांविषयीं पाहूं.

बाहमनी वंशास कोणी ब्राह्मणी वंश असेंही ह्मणतात. त्याचें राज्य १५० वर्षें चाललें. ह्याचा मूळ पुरुष हसनगंगू, ह्या नांवाचा एक दिल्ली ये-

---

* इ० स० १८८१.

थील मुसलमान होता. त्यानें आपली राजधानी कलबुर्गे येथें केली. ह्या राज्यामध्यें कृष्णा व तुंगभद्रा ह्या नद्यांमधील मुलूख, तैलंगणाचा बराच भाग, राजमहेंद्री व मच्छलीपट्टण हे प्रांत, आणि कोंकणांचा कांहीं अंश, इतके प्रांत मोडत होते. ह्या गादीवर एकंदर १६ बादशाह बसले.

ह्या बादशाहांपैकीं दुसरा बादशाह सुलतानमहंमद, हा इ० स० १३५८ त राज्य करूं लागला. तो हिंदु राजांशीं इतका वैरभावानें वागे कीं, त्यांचीं नाणीं त्याच्या हद्दींत आलीं कीं तीं तो तत्काळ गाळून टाकी. कोणे एके समयीं एका गवयानें उत्तम गाणें ऐकवून त्यास बहुत खूष केलें, तेव्हां त्यानें त्यास पैसा मिळण्याकरितां विजयनगरच्या स्वतंत्र राजावर वरात दिली. ती पाहून तो राजा अत्यंत क्रोधायमान झाला; आणि ज्या जासुदानें ती वरात आणिली होती, त्याची त्यानें गाढवावर बसवून धिंड काढविली. त्यावरून महंमदसुलतानानें एक लक्ष पायदळ, तीस हजार स्वार, व एक हजार हत्ती, इतक्या सैन्यानिशीं त्याजवर स्वारी केली. तिचा परिणाम असा भयंकर झाला कीं, सुमारें एक लक्ष मनुष्यांच्या रक्ताचे पूर वाहले.

पांचवा बादशाह महमूद, तो, इ० स० १३७८ त गादीवर बसला. ह्याला एकच बायको होती. अशी गोष्ट मुसलमान बादशाहांमध्यें बहुधा आढळत नाहीं. त्या संबंधानें पाहिलें असतां, त्याचा हा एक सद्गुण समजला पाहिजे. त्याला कविता फार आवडत असे. तो फार साधा पांढरा शुभ्र पोषाक करी. त्यानें कलबुर्गे, बेदर, इलिचपूर, दौलताबाद, चेऊल, दाभोळ, इत्यादि ठिकाणीं अनाथ मुलांकरितां शाळा घातल्या, व त्यांच्या पोषणास्तव द्रव्य दिलें. कुराणाचा अर्थ सांगण्याकरितां त्यानें उपदेशक नेमिले; व आंधळ्यापांगळ्यांच्या पोटाची सोय केली. ह्याच्या दयाळूपणाचा कित्ता हल्लींच्या पुष्कळ राजांनीं घेण्यासारिखा आहे, असें झटलें तरी चालेल. ह्याच्या कारकीर्दीत, इ० स० १३९६ ह्या वर्षापासून एक मोठा भयंकर दुष्काळ पडला, तो बारा वर्षें राहिला. तेव्हां गुजराथ व माळवा ह्या देशांतून पुष्कळ धान्य आणून तें गरिबांस सस्त दरानें विकण्याकरितां बुद्धया १००० बैलांचा तांडा त्यानें नेहमीं चालू ठेविला होता. ह्याचें नांव प्रजापालन !

फिरूजशाह ह्या नांवाचा आठवा बादशाह त्या वंशांत होऊन गेला, तो इ० स० १३९७ त गादीवर बसला. तो मोठा धर्माभिमानी असे. तो दररोज कुराणाच्या १६ पानांची प्रत स्वतः आपल्या हातानें करी. त्याला

३०० बायका होत्या. त्यांत अरबस्तान, सर्काशिया, तुर्कदेश, रूसदेश, इत्यादि देशांतल्या स्त्रिया होत्या; त्यांजशीं तो त्यांच्या वेगवेगळ्या भाषांनीं बोलत असे, असें सांगतात. विजयनगरच्या हिंदु राजाच्या कन्येशीं त्यानें बलात्कारानें आपलें लग्न लाविलें. विद्वान् लोकांच्या मंडळींत वादविवाद करण्याची त्याला फार आवड असे. तो मध्यरात्रीपर्यंतदेखील त्यांच्याशीं बोलत बसे. वनस्पति, भूमिति, न्याय, इत्यादि विषयांवर तो व्याख्यानें देखील देई. हा इ० स० १४४२ त मरण पावला.

पुढें, अल्लाउद्दीन हा दाहावा बादशाह गादीवर असतां, विजयनगरच्या राजानें आपल्या प्रधानांची व सरदारांची मोठी सभा भरवून, मुसलमान लोकांचा उत्कर्ष आपल्या देशांत कशानें झाला, ह्याचा विचार केला. तेव्हां कितीएक म्हणाले, मुसलमानांनीं हिंदूंवर ३०००० वर्षें राज्य करावें, असा ईश्वरी संकेत आहे. कोणी शहाणे होते त्यांचें मत पडलें कीं, दक्षणी घोड्यांपेक्षां मुसलमानांचे घोडे बळकट, व त्यांच्या लष्करांत कुशल तिरंदाज पुष्कळ, म्हणून ते इतकें श्रेष्ठत्व पावले. ह्या विचारानंतर, राजानें मुसलमान लोक आपले चाकरीस ठेविले, राजधानींत एक मशीद बांधिली, आणि त्यांच्या धर्माचा छळ कोणीं करूं नये, असा सक्त हुकूम फिरविला. आपण हिंदु, तेव्हां मुसलमान लोकांनीं आपणास मुजरा केला असतां, त्यांच्या शास्त्राप्रमाणें म्हटलें असतां पाप घडतें, हें बरोबर नाहीं, असें त्याला वाटलें. ह्यास्तव त्यानें आपले सिंहासनाजवळ एक मोठें मेज मांडून त्याजवर एक कुराणाची प्रत ठेविली.

अल्लाउद्दीन ह्यानें अमदाबाद येथें एक अनाथगृह बांधिलें. तेथें पुष्कळ अनाथांचा सांभाळ होत असे. अजारी लोकांस औषध देण्यासाठीं तेथें दोन वैद्यही ठेविले होते. आळशी गरीब लोक रस्त्यांत भटकत फिरत, त्यांचे गळ्यांत सांकळदंड बांधून, त्यांस तो रस्ते झाडावयास लावी. दारूबाज लोकांस, एक, दोन, तीन वेळां चांगली कानउघडणी करून सांगितलें असतांही जर त्यांनीं आपलें दुर्व्यसन सोडिलें नाहीं, तर त्यांच्या घशांत शिशाचा रस ओतावा, असा त्याचा हुकूम असे. तरी, तो स्वतः फार मद्यपान करीत असे. ब्राह्मण व ख्रिस्ती ह्यांजपाशीं तो नुसता बोलत देखील नसे; मग त्यांस कामेंकाजें सांगण्याची वार्ता कशास पाहिजे.? तो हिंदूंची देवालयें मोडून टाकून त्यांचे जागीं मशीदी बांधी. व मशीदींत उभा राहून स्वतः उपदेश करी.

हुमायून, हा अकरावा बादशाह, इ० स० १४५७ त राज्य करूं लागला. तो फार निर्दय असे, ह्मणून त्याचें नांव जालीम असें पडलें. त्यानें राज्य सगळें तीन वर्षें केलें. पण तितक्या अवकाशींत त्यानें ७००० पुरुष, बायका, व मुलें ह्यांचे प्राण घेतले. कांहीं अपराधावरून त्यानें शहरच्या कोतवालाला कैदेंत ठेविलें होतें. आणि त्याचेच अंगाचें मांस तोडून काढवून तें त्यास तो दररोज खायास घालवीत असे. केवढें घोर कर्म हें! हें कर्म करून त्यानें मनुष्यजातीस बट्टा लाविला! ईश्वर करो, आणि असे राक्षस मानवयोनींत कधींही न जन्मोत.

दिल्लीचा नामांकित बादशाहा अकबर, ह्यानें आपला प्रधान बहिराम ह्याचे हातून सगळा राज्यकारभार आपणाकडे घेतला, त्या वेळीं त्यास त्यानें जो निरोप पाठविला, त्याचें तात्पर्य असें:—"आजपर्यंत आमचें सगळें लक्ष विद्याभ्यास आणि लहानपणचे खेळ ह्यांत गुंतलें होतें. त्यांतून तें आतां मोकळें झालें आहे. ह्यास्तव, ह्यापुढें सगळा राज्यकारभार आपण स्वतः चालवावा, असा आह्मीं निश्चय केला आहे. तर, तुह्मीं ह्या ऐहिक व्यवहाराच्या घोंटाळ्यांतून मोकळें व्हावें, हें तुह्मांस योग्य आहे. तुह्मी आमचे खरे हितचिंतक आहां हें आह्मी कबूल करितों; आणि ह्मणून तुह्मांस असें सांगतों कीं, तुह्मी आतां मक्केस जाऊन तेथें आपलें राहिलेलें आयुष्य स्वस्थपणें परमेश्वरप्रार्थनेंत घालवावें."

नादिरशाहाची स्वारी.

इ० स० १७३९.

हिंदुस्थान ह्मणजे संपत्तीचें केवळ घर, अशी फार दिवसांपासून प्रसिद्धि आहे. तिजवरूनच परके लोक त्याजवर स्वाऱ्या करण्याविषयीं मोहित होतात. सर्व लहानमोठ्या स्वाऱ्यांचें वर्णन अशाप्रकारच्या वेंच्यांच्या पुस्तकांत आवश्यक आहे, असें नाहीं. त्यांतल्या मुख्य मुख्य लिहिल्या ह्मणजे बस आहेत. नादिरशाहाची स्वारी वर्णनीय आहे; ह्यास्तव तिची हकीकत येथें दाखल करितों.

नादिरशाहा हा इराणचा बादशाहा. त्या देशास इंग्लिश लोक पर्शिया

असें ह्मणतात. तेथची गादी यानें तमहास्प ह्याह पदच्युत करून इ० स० १७३७ ह्या वर्षीं मिळविली. त्यानें ८०००० सैन्य बरोबर घेऊन, त्याच वर्षीं कंदाहारास वेढा घातला. तें शहर तेव्हां खिलजी लोकांचे ताब्यांत होतें. त्याच्या रक्षणाविषयीं त्यांनीं आपली पराकाष्ठा करून पाहिली, परंतु कांहीं चाललें नाहीं. शेवटीं तें नादिरशाहाचे हातीं लागलें. आधीं हिंदुस्थानावर त्याचा डोळा होताच; आणखी कितीएक अपराधी अफगाण लोक इराणांतून पळून येऊन दिल्लीच्या बादशाहाच्या मुलुखांत राहिले होते; ते आमचे आह्मांकडे परत पाठवावे, असें पत्र कंदाहारच्या वेढ्यांतून नादिरशाहानें दिल्लीच्या दरबारीं पाठविलें. तेथें त्याची त्यांनीं अगदीं चेर करून सोडिली; आणि, तुह्मी मुळीं इराणच्या गादीचे मालक तरी खरे आहांत काय? अशी उलट शंका घेतली. आणि दुसरा हलकारा दुसरें एक पत्र घेऊन आला, त्यास तर जलालाबादेस ठार मारिलें. एवढा अपमान नादिरशाहाला कोठून सोसणार.? त्यानें हल्ला करून लागलेंच काबूल घेतलें, तों इतक्यांत हिंवाळा लागला. तेव्हां, आतां नादिरशाहा पुढें येत नाहीं, असें दिल्लीपतीस वाटलें; आणि तो स्वस्थ राहिला. परंतु इराणी लोक उगीच बसले होते असें नाहीं. इ० स० १७३८ च्या नोवेंबर महिन्यांत, नावांच्या पुलावरून नादिरशाहा आपल्या ६५००० सैन्यासहवर्तमान सिंधुनद उतरून पंजाबांत आला. हें ऐकतांच दिल्लीचा बादशाहा महमदशाहा, ह्याची पांचावर धारण बसली.

यमुनेच्या कांठीं कर्नूलानजीक, दिल्लीच्या बादशाहाचा सरदार निजामउल्मुलुख हा आपल्या गोटासभोंवतीं खंदक खणून व मोर्चेबंदी करून मोठ्या बंदोबस्तानें राहिला होता. तेथें नादिरशाहाचें सैन्य येऊन ठेपलें. इतक्यांत अयोध्येहून सादतखाननामक सरदार बरोबर पुष्कळ फौज घेऊन त्यास मिळाला. उभयपक्षांची लढाई सुरू झाली. तींत परिणामीं निजामउल्मुलुख केवळ पराभव पावला. महमदशाहानें जयप्राप्तीची आशा सोडिली. तो जातीनें इराणी बादशाहाच्या छावणींत जाऊन, कांहीं तहाचें बोलणें लाविता झाला. त्यावर नादिरशाहानें असें उत्तर दिलें कीं, आह्मी येथें कांहींएक ऐकत नाहीं; दिल्लीशहरांत गेल्यावर मग काय असेल तें पाहूं. नंतर महमदशाहा केवळ प्रतिबंधांत असल्याप्रमाणें बरोबर घेऊन, नादिरशाहा, आपल्या विजयी सैन्यासहवर्तमान, इ० स० १७३९ च्या मार्च महिन्यांत दिल्लीस आला. त्याचे मनांत, दोन कोटि रुपये खंडणी घेऊन, दिल्लींतून निघून

जावयाचें होतें; परंतु, राज्याच्या महत्वाच्या मानानें ती रकम अगदीं थोडी आहे, असें सादत्तखानानें त्याच्या मनांत भरविलें. त्यामुळें तो विचार तसाच राहिला. सादत्तखानाला एवढ्या भानगडींत पडण्याचें कारण एवढेंच होतें कीं, आपसांतल्या कांहीं चुरशीवरून त्याचे मनांत दिल्लीच्या बादशाहाचा सूड घ्यावयाचा होता.

नादिरशाहा महमदशाहाचे वाड्यांत राहिला. नंतर एक नवेंच विघ्न उत्पन्न झालें. तें असें. दुसरे दिवशीं, नादिरशाहा मरण पावला, अशी कंडी कोणीं उठविली. ती कानीं पडल्याबरोबर दिल्लीच्या लोकांनीं, कांहीं विचार न करितां, शहरामध्यें जे इराणी लोक हातीं लागले, त्यांची कत्तल उडविली. हें नादिरशाहास कळतांच, तो अत्यंत कोपायमान झाला; आणि त्यानें आपले सैन्यास तत्काळ हुकूम केला कीं, शहरचे जे लोक तुह्मांला सांपडतील ते तुह्मीं बेलाशक कापून काढावे. तेव्हां सूर्योदयापासून रात्र पडेपर्यंत शहरांत २०००० लोकांची एकसारखी दांडगाई चालली होती. या प्रसंगीं ८००० माणसें प्राणांस मुकलीं. रस्त्यांतून प्रेतें इतकीं पडलीं होतीं कीं, त्यांत पाऊल ठेवण्यास देखील जागा मिळेना; शिवाय त्या प्रसंगीं तेथें जितका दुराचार आणि जुलूम झाला, तितका कधीं कोठें झाला नसेल.

नादिरशाहा हा महमदशाहाच्या वाड्यांत राहिला असतां, एके दिवशीं एक चमत्कारिक गोष्ट घडली. ती अशी. हे दोन्ही बादशाहा, एका मोठ्या आणि भव्य सुशोभित दिवाणखान्यांत गोष्टी बोलत बसले होते, इतक्यांत चाहाची वेळ झाली. तेव्हां, दिल्लीच्या दरबारचा कोणी चतुर पुरुष, एका सुवर्णाच्या ताटांत रुप्याचे दोन पेले चाहानें भरून घेऊन, दिवाणखान्याच्या दरवाजाशीं आला. आणि पुढें पाऊल टाकण्यास जरासा घोंटाळला. कारण, ह्यांतला एक पेला प्रथम नेऊन जर आपला अन्नदाता जो महमदशाहा ह्यास द्यावा, तर नादिरशाहास या अपमानाचा क्रोध येऊन तो कदाचित् आपलें डोकें उडवील; आणि तोच पेला जर आधीं नादिरशाहास द्यावा, तर परक्याच्या भयानें आपण आपल्या प्रभूचा अपमान केला, असा दोष माथीं येणार; असे विचार त्याचे मनांत घोळूं लागले. परंतु, त्या प्रसंगीं त्यास अशी एक युक्ति सुचली कीं, ती पाहून सर्व मंडळी आश्चर्य करीत राहिली. ती युक्ति अशी. तो त्यांतला एक पेला घेऊन स्थिरपणानें समोर मदमदशाहापाशीं गेला. आणि अतिनम्रपणानें त्यास ह्मणाला; " महाराज

हे राजाधिराज आपलेकडचे पाहुणे आहेत; ह्यांचेपुढें पेला करण्याची माझी पामराची योग्यता नाहीं; आणि ह्यांचें आदरातिथ्य आपणांखेरीज इतर जनांच्या हातून व्हावें, 'हें आपणांसही प्रशस्त वाटावयाचें नाहीं. ह्मणून हा पेला आणिला आहे खाविंद.—'' महमदशाहानें तो पेला उचलून नादिरशाहाचे पुढें केला. तो घेतेसमयीं नादिरशाहा जरा हांसून महमदशाहास ह्मणाला, '' अहो, ह्या पुरुषाप्रमाणें जर तुमचे सर्व नौकर आपलें कर्तव्यकर्म जाणते, आणि तें करते, तर माझे पाय ह्या दिल्लीराजधानींत कधींहि लागतेना. ह्या मनुष्याचा चांगला सांभाळ करा. ह्यांत तुमचें हित आहे. आणि असे लोक तुह्मांला जितके मिळतील तितके मिळवा. '' समयसूचकता हा गुण अमोलिक आहे.

कत्तल आटोपल्यावर लूट सुरू झाली; ती पुढें कितीएक दिवसपर्यंत चालली. दिल्लींतले मोठमोठाले मोलवान् दागिने ह्या वेळेस गेले. शाहाजाहानानें ६०००००० रुपये खर्चून केलेलें रत्नखचित मयुरासन नादिरशाहानें नेलें. लुटीची किंमत बरोबर समजली नाहीं. तथापि, अगदीं कांहीं नाहीं ह्मटलें तरी ३०००००००० रुपयांची संपत्ति इराणी लोकांस ह्या स्वारींत मिळाली असावी, असें सुज्ञ ग्रंथकारांचें अनुमान आहे. किती पैसा हा. ! इतक्या प्राचीन काळापासून परके लोक हिंदुस्थानास बुचाडीत आहेत; तरी तें अद्याप संपत्तीनें भरलें आहे. केवढा आमचा देश धनवान् हा. !

नादिरशाहा ५८ दिवस दिल्लीस राहून निघून गेला. ह्या वेळीं महमदशाहा बादशाहाची व त्याच्या राज्याची दुर्दशा झाली. प्रजा तर दुःखांत बुडून रसातळास पोहोंचली. ह्या संधीस मराठ्यांचा लाग चांगला साधण्यासारखा होता. परंतु त्यांचा मुख्य, बाजीराव बल्लाळ पेशवा, ह्याचें चित्त स्वस्थ नव्हतें; ह्मणून तो तसाच दक्षिणेंत परत आला. ह्याचें मूळ कारण पाहूं गेलें असतां असें होतें कीं, नागपूरचा रघोजी भोंसला व बडोद्याचा दमाजी गायकवाड हे त्याचें न्यून पाहून होते; व ते त्याची उचलबांगडी करण्यास टपले होते. बाजीरावानें ह्या संकटीं एकदा असें देखील ह्मटलें ह्मणून सांगतात कीं, '' मी दुःखसागरांत बुडालों आहें; कर्जानें मला ग्रासलें आहे; मला आतां कशाचीही आशा नाहीं; मी विष खाऊन मरण्यास तयार आहें; मला मरण येईल तर फार बरें होईल.'' असो.

नादिरशाहानें हिंदुस्थानास असा जबरदस्त धक्का दिला कीं, ह्या वेळीं झा

लेलें नुकसान कधींही भरून यावयाचें नाहीं. विपुल संपत्तीपासून आमचे देशास सुख व्हावयाचें, तें कोणीकडेसच राहिलें. तिजमुळें उलटें आमच्या हिंदुस्थानचे लोक परक्यांच्या तरवारीखालीं चरचरां कापले जातात. हेंच काय संपत्तीचें फळ.? दुग्ध हें ह्या लोकीं अमृत आहे खरें. पण कोणाला.? निरोगी मनुष्याला. आणि ज्वरिताला तें विष होतें. हा दोष दुधाचा काय.? संपत्तीपासून आह्मांस दुःख होऊं नये; पण ती सांभाळण्याचें सामर्थ्य व शहाणपण आह्मांमध्यें पडलें कमी, ह्मणून आह्मी दुःख पावतों. येथें बिचाऱ्या संपत्तीनें काय करावें.?

नादिरशाहा हा सुनी पंथाचा होता. त्यास इ० स० १७४७ च्या जून महिन्यांत शिया पंथाच्या मारेकऱ्यांनीं ठार मारिलें. ज्यानें हजारों माणसें चरचरां चिरविलीं, त्याला सुखाचें मरण कोठून येणार.?

कलकत्त्यांतील कोंडमारा.

इ० स० १७५६.

सांप्रत काळीं इंग्लिश लोकांनीं हिंदुस्थानचा बहुतेक भाग जिंकिला आहे. त्यावर ते राज्य करितात. तें प्राचीन एतद्देशीय राजांच्या सारखें बेबंद, ढिलें, आणि जुलुमाचें नाहीं. जिकडे तिकडे बंदोबस्त उत्तम प्रकारचा आहे; न्याय लवकर व यथास्थित होतो; आणि रयतेच्या कैंसासही कोणी विनाकारण धक्का लावूं शकत नाहीं; अशा उत्कृष्ट तजविजीनें ते राज्यकारभार चालवितात. त्यांची जरब मोठी आहे. पूर्वीच्या राज्यांत जीं कामें करण्यास सैन्य पाठवावें लागे, तीं ह्यांच्या राज्यांत एका चिठीनें होतात. जो अनीतीनें वर्त्तेल, त्यास केव्हांना केव्हां तरी शासन झाल्याखेरीज राहावयाचें नाहीं, आणि जे नीतीनें चालतील, त्यांस तिळभरही इजा व्हावयाची नाहीं, अशी त्यांची राजरीति आहे. त्यांचें सामर्थ्य फार मोठें आहे. त्यांच्याच आश्रयानें हल्लीं हिंदुस्थानांतलीं बहुतेक इतर राज्यें चाललीं आहेत. एवढें ज्यांचें प्राबल्य सांप्रत ह्या देशांत आहे, त्यांच्या शेंदीडशें लोकांस सुमारें शेंसव्वाशें वर्षां पूर्वीं, बंगाल्याच्या नवाबाच्या शिपायांनीं कलकत्त्यामध्यें एका लहानशा

अंधारकोठडींत कोंडून मारिलें, तरी त्यांस नुसतें कोणीं पुसलें देखील नाहीं, असें जर कोणास सांगितलें, तर तें त्यास खरें तरी वाटेल काय? वाटणार नाहीं. तथापि ती गोष्ट अगदीं सत्य आहे. इतिहासांत ती चांगली तपशीलवार आढळते. ती फार चमत्कारिक आहे. ह्मणून तिचें येथें संक्षेपानें वर्णन करूं.

बंगाल्याचा सुभेदार अलिवर्दीखान ह्याचे मुलीचा मुलगा, मिरझा महमूद, हा इ० स० १७५६ त सुराजउद्दवला हें नांव घेऊन आजाचे गादीवर बसला. तो लहानपणापासून स्वभावानें इतका क्रूर व निर्दय होता कीं, त्याचे तावडीस सांपडलेला मनुष्य अथवा दुसरा कोणताही प्राणी दुःख पावल्यावांचून राहिला नाहीं. इंग्लिश लोक बरेच दिवसांपासून बंगाल्यांत व्यापार करीत असत, व काशीमबाजार वगैरे ठिकाणीं त्यांच्या वखारी होत्या. ते सुराजउद्दवल्याच्या डोळ्यांत रेतीच्या कणांप्रमाणें खुपत. अपरिमित पैसा ते व्यापारांत मिळवितात, व त्यांजपाशीं द्रव्यानें भरलेलीं भांडारें आहेत, असा त्याचा समज होता. आणि कोणत्या तरी एकांद्या गोष्टीची कुरापत काढून त्यांचे खजिने लुटावे व त्यांस बंगाल्यांतून काढून लावावें, असा विचार त्याचे मनांत पुष्कळ दिवस घोळत होता. अखेर तशी वेळ बनून आली. राजराजवल्लभ ह्या नांवाचा एक श्रीमान सावकार ढाका येथें सुभेदार होता, त्याचा मुलगा किसनदास हा, सुराजउद्दवल्याचें व त्याचें कांहीं कारणावरून वैमनस्य आल्यामुळें, आपल्या मुलांमाणसांस बरोबर घेऊन, सर्व संपत्तीसहवर्तमान कलकत्ता येथें इंग्लिशांच्या आश्रयास येऊन राहिला. त्याचा त्यांनीं चांगला आदरसत्कार केला. हें वर्तमान सुराजउद्दवल्यास कळलें. तेव्हां काय विचारतां? त्याच्या पायांची आग मस्तकास गेली. ह्या तांबडतोंड्यांस आतां चावूं का खाऊं, असें त्याला झालें. आणि तो आपलें सैन्य घेऊन कलकत्त्यावर हल्ला करण्याकरितां मुर्शिदाबादेहून निघाला.

ज्याचें व आपलें बहुत दिवसांचें हाडवैर, व ज्याच्या क्रूरपणास मर्यादा नाहीं, असा दुरात्मा सुराजउद्दवला सैन्यासहवर्तमान आपल्या नाशार्थ येत आहे, असें जेव्हां कलकत्त्यांतील इंग्लिश लोकांस समजलें, तेव्हां त्यांचे हातपाय गळाले. आणि ती फौज जवळ येतांना त्यांनीं पाहिली, त्या वेळीं तर त्यांस दे माय धरणी ठाय असें झालें. इतरांची गोष्ट एकीकडे असो. मुख्य गवरनर ड्रेकसाहेब, तो भयभीत होत्साता होडींत बसून पळून गेला. बरें,

फौजेचा अधिपति कप्तान मिंचिनसाहेब, त्यानें तरी कांहीं धैर्य धरावयाचें होतें. ! त्यानेंही गवरनराबरोबर पोबारा झटला. मग मागची तजवीज काय पुसतां. ? सगळ्यांच्या तोंडचें पाणी पळालें. आणि आतां जीव वांचवावे कसे, असा त्यांस विचार पडला. शत्रु, दूमदूम करीत, एकामागून एक अशीं ठाणीं घेत चालले. इ० स० १७५६ च्या जून महिन्याच्या २१ व्या तारखेस कलकत्ता शहर व किल्ला हीं त्यांच्या हस्तगत झालीं. त्या दिवशीं सायंकाळीं सुमारें दोन घटिका दिवस राहिला होता, तेव्हां सुराजउद्दवल्याची स्वारी आंत गेली. तेव्हां त्याच्या बरोबर मिरजाफर व दुसरे कितीएक सरदार होते. त्यांची कचेरी भरल्यावर किसनदास, व कलकत्त्यांतला दुसरा एक श्रीमान् व्यापारी उमीचंद ह्या दोघांस प्रथम त्यानें आपणापुढें आणविलें; आणि त्यांशीं बऱ्याच सौम्य रीतीनें तो दोन शब्द बोलला. नंतर, इंग्लिशांच्या कारखान्यावरचा गुमास्ता हालवेल साहेब, ह्यास सुभेदारसाहेबांपुढें हजर केलें. त्यास पाहतांच, तो फार खवळला. आणि त्यास पुष्कळ अद्वातद्वा बोलून म्हणाला कीं, तुमची ठेवरेव कोठें काय आहे ती लवकर सांगा; नाहींतर पाहा तुमचें काय होईल तें. बिचाऱ्या हालवेलानें आपला खजीना त्यास लगेच दाखविला. तों त्यांत अवघे ५०००० रुपये मात्र निघाले. इंग्लिशांच्या संपत्तीविषयींचा आपला अजमास फार चुकला, असें पाहून आणि बहुत निराश होऊन सुराजउद्दवला अतिशयित खिजला. हालवेल साहेबाला पुनः बोलावून आणून, त्यानें आणखीही विचारपूस केली, पण तिजपासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं. इतकें होतां होतां दोन तीन घटिका रात्र पडली. नंतर, इंग्लिश बंदीवानांस रात्रीं संभाळा, बेसावध राहूं नका, अशी खरमरीत ताकीद आपल्या शिपायांस देऊन सुभेदारसाहेब निजावयास निघून गेले.

ह्या स्वारीच्या तावडीस कलकत्त्याच्या किल्ल्यामधले फक्त १४६ इंग्लिश लोक सांपडले. ह्यांस शत्रूंनीं कैद करून प्रथमतः एका पडवींत बसविलें होतें. आंतल्या दोन्ही वखारी त्यांनीं पूर्वीच पेटविल्या होत्या, त्या धडधडां अधिकाधिक भडकून, ज्वाळांचा एकच डोंबाळा झाला; आणि सुराजउद्दवल्याचे शिपायी हातांत भलेभले दिवटे घेऊन पिशाचांप्रमाणें धूम इकडे तिकडे फिरत, त्यावरून, बिचाऱ्या कैद्यांस असें भय पडलें कीं, हे यमदूत आतां आह्मांला ह्या प्रचंड अग्नींत टाकून आमचे प्राण घेतात कीं काय

कोण जाणे. पण इतकें सुलभ मरण त्यांच्या प्रारब्धीं कोठचें ? विस्तवांत देह दग्ध होऊन मृत्यु येण्याच्या वेदनांपेक्षांही अति दुःसह वेदना त्यांच्या कपाळीं भोगावयाच्या होत्या. कांहीं वेळ गेल्यावर, सुभेदाराचे शिपाई, हातांत बंदुका व तरवारी घेऊंन, इंग्लिश कैद्यांजवळ आले; आणि त्यांनीं त्यांस खूब जरब देऊन, किल्ल्यामध्यें, अठरा वीस औरसचौरस फूट एक लहानशी अंधारकोठडी होती, तींत शुद्ध मेंढरांप्रमाणें कोंबकोंबून भरिलें. आणि दरवाजा लावून घेऊन कडीकुलूप केलें. तों प्रहर रात्रीचा सुमार आला. तेव्हांपासून त्या हतभाग्य बंदीवानांच्या यातनांस आरंभ झाला. आंत हवा जाण्यास त्या कोठडीस पश्चिमेच्या बाजूला मात्र दोन लहानशा खिडक्या होत्या; दुसरें एकही द्वार तिला नव्हतें. तेणेंकरून, आरंभीं, त्या कैद्यांच्या अंगाचे इतकें पाणी पाणी झालें कीं, खोलीची जमीन सुद्धां अगदीं चिब्ब भिजली. ते एकमेकांच्या अंगांवर पडून मोठमोठ्यांनीं ओरडत, पण त्यांजकडे कोणी पाहीना देखील. मग घसे सोखले; शोष पडला. तेव्हां, "पाणीरे पाणी" असा त्यांनीं एकच कोल्हाळ मांडिला. हालवेल साहेबानें खिडकीजवळची जागा आधींच साधिली होती, ह्मणून त्यास थोडी हवा मिळून तो अमळ सावध होता. त्यानें बाहेरच्या पाहरेकऱ्यांस हात जोडून पायां पडून विनविलें कीं, आमच्यांतले कांहीं लोक दुसऱ्या कोठडींत नेऊन ठेवाल, व आमचे प्राण वांचवाल, तर मी तुह्मांला २००० रुपये देईन. परंतु, त्यांनीं त्यास एकच उत्तर केलें कीं, प्रातःकाळीं सुभेदारसाहेब उठल्याखेरीज, तुमची कोठडी खुली केली जाणार नाहीं. आंत ते लोक "पाणी पाणी" करून ओरडत, तेव्हां बाहेरचे कितीएक क्रूर व पाषाणहृदयाचें शिपाई, त्या खिडक्यांवाटे त्या खोलींत थोडेंसें पाणी ओंजळीनें फेंकीत; आणि त्यासाठीं कैदी लोक कसे एकमेकांवर उड्या घेतात, ह्याची मौज मशाली लावलावून पाहात ! हा आक्रोश सुमारें प्रहरभर चालला. अंगांतून अपरिमित घाम वाहून, आणि चेंगराचेंगर होऊन त्यांचे हातपाय थकले; आणि श्वासोच्छ्वासास नवी हवा न मिळाल्यामुळें, व ओरडून ओरडून गात्रें विकळ झाल्यामुळें ते खालीं एकमेकांवर पडून तडपडूं लागले. ह्या दुःसह वेदना कांहीं वेळ भोगिल्यावर, मृत्यूनें त्यांस त्यांजपासून सोडविलें.

पुढें उजाडलें. सुभेदारसाहेब उठले. कोठडी उघडण्याची परवानगी मिळाली. तिची कडी काढून फळी आंत लोटूं लागले, तों ती हालेना सुद्धां;

कारण, तिच्या मागें प्रेतांचा खच पडला होता. मोठ्या कष्टानें, कसेंबसें करून, दार खोललें. आणि आंत पाहतात तों सगळा मढ्यांचा बाज़ार भरला आहे; ह्याचें डोकें त्याच्या पायांत, आणि त्यांचें तोंड ह्याच्या हातांत, अशी सगळी भयंकर अवस्था दृष्टीस पडली. तीं पाहून अंगावर रोमांच उभे राहणार नाहींत, असा जर कोणी मानव ह्या दुनयेंत असला, तर त्याचें हृदय पाषाणापेक्षांही कठीण, असें ह्मटलें पाहिजे. असो. सुभेदाराच्या आज्ञेवरून तीं सगळीं प्रेतें खोलीच्या बाहेर काढिलीं. आणि पाहूं लागले तों २३ असामी मात्र जीवंत, आणि बाकीचीं सगळीं प्रेतें. जीवंत होते त्यांचेवर तर मेलेल्यांपेक्षांही अधिक मढेकळा आली होती. त्यांमध्यें एक स्त्री फार सुरूप होती; ती, सुभेदाराचा सेनापति मीरजाफर ह्याचे मनांत भरली. तिला तो आपणाबरोबर मुर्शिदाबादेस घेऊन गेला, आणि त्यानें तिला आपले जनानखान्यांत ठेविलें. ही चमत्कारिक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

तेवीस माणसें मरणोन्मुख झालीं होतीं, त्यांस उभें देखील राहवेना, तरी या चांडाळ सुभेदारास त्यांची कींव आली नाहीं. तशा अवस्थेंत त्यानें हालवेल साहेबास व आणखी दोघांजणांस आपणासमोर आणून जरब देऊन, खजीना कोठें आहे तो दाखवा, असें सांगितलें. पण खजीना मुळीं नव्हताच, तेव्हां ते बिचारे कोठला दाखवितील.? त्या तिघांस बेड्या घालून कैदेंत ठेविलें, आणि बाकीच्यांस सोडून दिलें.

ह्या हल्ल्यानें कलकत्त्यांत सुमारें एकंदर ४००००० रूपयांची लूट झाली. ही इतर लोकांची गोष्ट. इंग्रिज लोकांची रोकड, माल, जाळापोळा, मिळून २००००० रूपयांची रकम बसली. केवढी हानि ही.! पण बापड्या सुराजउद्दवल्यास तिचें कांहींएक वाटलें नाहीं. मोहीम केल्यासारखा नफा कांहीं झाला नाहीं, असें मनांत आणून तो अमळसा खट्टू झाला. त्यानें कलकत्ताशहरास अलिनागोर ह्मणजे देवबदर असें नवें नांव दिलें, आणि धरून ठेविलेल्या तीन कैद्यांस मुर्शिदाबादेस पाठविलें. ह्या दोन गोष्टी ह्या स्वारींत आपण भूषणप्रद केल्या, असें समजून, तेवढ्यानेंच त्यानें आपलें चित्त संतोषविलें. खरोखर पाहिलें असतां ह्यांत कांहीं तरी पुरुषार्थ आहे काय.? शेवटीं आपला सरदार मोनीचंद ह्यास ३००० फौजेनिशीं किल्ल्याच्या रक्षणार्थ ठेवून, सुराजउद्दवल्ला कलकत्त्याहून निघून गेला.

ज्या अंधारकोठडींत पूर्वोक्त अनर्थ गुदरला, तीस इतिहासामध्यें ब्लाक-

होल असें इंग्रजी नांव प्रसिद्ध आहे. तींत जे १२३ असामी मरण पावले, त्यांचीं प्रेतें, सगळीं एकाच खाड्यामध्यें सुराजउद्दवल्याच्या लोकांनीं झुगारून दिलीं होतीं. पुढें तो खाडा बुजला. 'तरी हालवेलसाहेब गवरनर, ह्यानें पुढें कांहीं दिवसांनीं या हतभाग्य लोकांच्या मरणाच्या स्मरणार्थ त्यावर मोठें थोरलें एक थडगें बांधिलें. तें अद्यापि दृष्टीस पडतें.

या अंधारकोठडीमध्यें हालवेलसाहेबास इतक्या यातना भोगाव्या लागल्या, व प्रतिबंधादिकांनीं त्याचे पुढेंही पुष्कळ हाल झाले, तरी तो त्या महत्संकटानंतर आणखी ४२ वर्षें वांचला. तो इ० स० १७९८ त मरण पावला, तेव्हां त्याचें वय ८७ वर्षांचें होतें.

शीक लोकांविषयीं.

ह्या पृथ्वीच्या पाठीवर नवीन धर्म स्थापणारे जे अनेक बुद्धिवान् आणि पराक्रमी पुरुष होऊन गेले, त्यांतच नानकशाहाची, ह्मणजे शीक धर्म उत्पन्न करणाऱ्याची गणना करणें योग्य आहे. हा पुरुष पंजाबामध्यें बियास नदीच्या कांठीं रायपूर ह्मणून गांव आहे, तेथें इ० स० १४६९ त जन्मला. त्याचा बाप मिठाचा व दाण्यांचा व्यापार करीत असे. तो जातीचा क्षत्रिय होता. त्याचा मुलगा नानक ह्यास बरेंच समजूं लागल्यावर, हिंदु धर्म खोटा आहे, असें त्यास वाटून त्यानें मुसलमानी धर्म स्वीकारिला, आणि हसनदर्वेष नामक फकीराचा उपदेश घेतला. नंतर त्यानें बहुत कष्ट सोसून, हिंदु व मुसलमानी ह्या दोहों धर्मांत सांगितलेलीं पवित्र क्षेत्रें पाहिलीं; व पुष्कळ श्रम करून दोन्ही धर्मांच्या खरेपणाविषयींची माहिती मिळविली. तिचा पूर्ण विचार करून पाहिल्यावर त्याची अशी पक्की खातरी झाली कीं, ह्या दोहोंपैकीं एकही धर्म खरा नाहीं. ह्मणून त्यानें एक नवाच पंथ स्थापण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें त्यानें या दोन्ही धर्मांतलीं शुद्ध मतें निवडून काढून, तीं लोकांस शिकविण्याचा क्रम चालविला. तीं कांहीं लोक शिकूं लागले; यावरून यांस इतर लोक शीक ह्मणूं लागले. हें त्यांच्या नांवाचें कारण एका पुस्तकांत लिहिलें आहे.

नानकास कितीएक हिंदु व कितीएक मुसलमान शिष्य मिळाले. त्यांतले

मुसलमान आपल्या मूळच्या आचाराप्रमाणें वागतात, व हिंदुही आपल्या जाति कायम ठेवून आहेत. परंतु ते सर्व नानकास गुरु मानितात. हा गुरु, मुलतानाहून किंतरपुरास येत असतां, रावी नदीच्या कांठीं, इ० स० १५३९ त मरण पावला. त्यानें पुष्कळ ईश्वरी साक्षात्कार करून दाखविले, असें त्याच्या चरित्रांत लिहिलें आहे. परमेश्वराची भक्ति आणि मनुष्यमात्रावर समान प्रीति, हें त्याच्या सर्व सूत्रांचें सार आहे.

नानकाचे मागें, त्याचा प्रीतींतला चेला अगडशाहा हा शिकांचा गुरु झाला. तो फार दिवस वांचला नाहीं. त्याचे मरणानंतर त्याचा चेला अमेरदास ह्यास गुरुस्थान मिळालें. त्यानें उपदेशाचें काम चांगल्या रीतीनें चालवून पुष्कळ लोक आपले धर्माकडे वळविले. तो अमृतसर येथें मरण पावला. नंतर, त्याचा पुत्र रामदास ह्यास गुरुपण प्राप्त झालें. त्यानें आपलें काम चांगल्या रीतीनें चालविलें. तो मृत्यु पावल्यावर त्याचा पुत्र अर्जुनमल हा गुरु झाला. तो फार शाहाणा होता. त्यानें नानकाच्या लेखाच्या आधारानें ग्रंथ ह्या नांवाचें एक पुस्तक रचिलें. तेंच शीक लोकांचें धर्मशास्त्र होय. ह्या पुस्तकांत घालण्यास एका दिंदूनें कांहीं दिलें असतां, तें वाईट ह्मणून अर्जुनमलानें एके बाजूस ठेविलें. त्यावरून, त्यास कितीएक हिंदु लोकांनीं कैद केलें आणि शेवटीं ठार मारिलें.

अर्जुनमलाची अशी अवस्था झाली, ती पाहून शीक लोकांनीं साधुपणा टाकून शिपाईपणा धरिला. हरगोविंद, ह्मणजे अर्जुनमलाचा मुलगा, हा त्यांचा मुख्य झाला. ते सर्व हत्यारें घेऊन राहूं लागले. त्यांच्या व मुसलमानांच्या फौजेच्या अनेक चकामकी झडल्या. पुढें त्याचे पुत्र हरिराय व हरिकिसन हे झाले. परंतु, तेगीबहादर ह्या नांवाचा मनुष्य मुख्य गुरुस्थान पावला. त्यास अलमगीर बादशाहानें ठार मारविलें. त्याचा पुत्र गुरुगोविंद नामें होता. त्यानें आपलें धर्मपुस्तक सुधारलें; व मुसलमानांशीं लढाया केल्या. त्याचा शिष्य बंदागुरु नामें होता. त्यानें तर मुसलमान लोकांच्या बायकापोरांचा देखील संहार मांडिला. तेव्हांपासून शीक व मुसलमान हे एकमेकांचे अगदीं हाडवैरी झाले. पुढें मुसलमानांचें राज्य मोडावत चाललें, तसतसा ह्या लोकांनीं जोर केला, आणि पंजाबांत मुसलमानांचा अमल अगदीं नाहींसा करून टाकिला. शीक लोकांच्या धर्मांतील मुख्य मुख्य मतें येणेंप्रमाणें आहेत.—

"देव एक आहे. देवानें सर्व मनुष्यें सारखीं निर्माण केलीं आहेत; ह्मांत जातिभेद नाहीं; ह्मणून जातिभेद मानणें हें मोठें पाप आहे. मूर्तिपूजा करण्यानें देवास फार राग येतो; ह्मणून ती करूं नये. सज्जनांस देवलोकीं अप्रतिम सुख प्राप्त होतें. "गाईचें मांस खाऊं नये. गरीबांस धर्म करावा; ह्यांत परमेश्वरभक्तांकडे फार लक्ष असावें. खालशाकरितां ह्मणजे शीक धर्माच्या संरक्षणाकरितां युद्ध करणें हें सशास्त्र आहे; ह्या धर्माच्या संरक्षणाच्या कामीं जीव आणि जिनगी ह्यांचा जरी नाश झाला, तरी तें कृत्य देवास रूजू व मान्य आहे. आपल्या पूर्व धर्मांतलें अज्ञान जाणून, समजून उमजून जो शीक धर्म स्वीकारील, त्यास ह्या धर्मांत घ्यावें."

शीक लोकांत अनेक पंथ आहेत. त्यांत जाट शीक ह्मणून जे लोक आहेत, त्यांमध्यें एक चाल फारच चमत्कारिक आहे. ती अशी कीं, एक भाऊ निवर्तला, तर त्याची बायको त्याचा भाऊ घेतो. आणि त्यापासून तिला जीं मुलें होतात, त्यांचे हक्क इतर सरळ रीतीच्या मुलांप्रमाणें मानिले जातात. एखाद्याची बायको पळून गेली, आणि तिला दुसऱ्याच्या पोटचीं मुलें झालीं, तरी त्यांसुद्धां तो तिला पुनः घेतो. इतकेंच केवळ नव्हे, तर, बायको मला इतके दिवस मिळाली नाहीं ह्याबद्दल व तिला शोधण्याचे कामीं मला जो खर्च व श्रम झाला, त्याबद्दल हीं मुलें मला मिळालींच पाहिजेत, असा दावा करितो. त्यांच्यांत सती जाण्याची चाल होती. ज्या बायका सती जात, त्या बहुधा लोकलज्जेस्तव किंवा लोकभीतीस्तव जात. एखादी बायको जर त्या प्रसंगीं सती जाण्यास नानू करूं लागली, तर सगळी जात तिच्या घरांत जमे, आणि तिला बोलबोलून लाज आणून सती जाण्यास सिद्ध करीत. ! ही भयंकर चाल आलीकडे इंग्रज सरकारानें मना केली आहे ही गोष्ट फार संतोषकारक होय.

शीक लोक मोठे अमली आहेत. त्यांस तमाखूची मनाई आहे; परंतु, दारू, अफू, आणि भांग ह्यांत ते बहुधा नेहमीं चूर असतात. दिवस मावळल्यावर शीक शिपाई ह्मणजे शुद्धीवर सांपडेल, असें कधीं व्हावयाचें नाहीं. त्यांच्यांत लग्नें अगदीं लहानपणीं होतात; ते आपल्या बायकांस पाहिजेत तशा मोकळ्या सोडितात. आणि त्या इतक्या दुराचारी व बेशरम आहेत, कीं त्यांचें वर्णन करण्यास देखील आह्मांस संकोच वाटतो.

ऐहिक सुख तुच्छ मानून ईश्वरप्राप्त्यर्थ देह कष्टविणारे, असे साधुही शीक

लोकांत कांहीं असतात. ब्रह्मांडीं प्राण नेणें ह्मणून जी कल्पना आमच्या लोकांमध्यें समजतात, ती कितीएक शीक साधूंस साध्य होती असें वाटतें. ह्या विषयींची एक खरी गोष्ट, शिकांचा राजा महाराज रणजितसिंग ह्याचे कारकीर्दींत लाहोर येथें घडली. ती येथें लिहून हा विषय पुरा करितों.

एके दिवशीं एक शीक फकीर महाराजांच्या कचेरींत येऊन उघडपणें बोलला कीं, मला तुह्मी जमिनींत पाहिजे तितके दिवस पुरा; तरी मी मरावयाचा नाहीं; आणि खरें झालें, तर मला बक्षीस द्या, नाहीं तर देऊं नका. हा मनुष्य वेडा असेल, असें समजून महाराजांनीं प्रथमतः त्याजकडे दुर्लक्ष केलें. परंतु, तो फकीर वारंवार कचेरींत येऊन त्यांस दुराग्रहानें त्रास देऊं लागला. तेव्हां, हा काय ह्मणतो तें एकदा करून पाहावें असें रणजितसिंगानें आपल्या सेवकांस सांगितलें. त्यास दाहा दिवस झाल्यावर, मी तयार आहें, असें त्या फकीरानें येऊन कळविलें. त्याप्रमाणें सर्व सिद्धता झाली. राजासमक्ष तो एका पोत्यांत बसला. तें पोतें चारी बाजूंनीं बळकट शिवलें. नंतर तें एका मोठ्या लांकडी पेटींत घातलें. ती पेटी बंद केली. तिजवर खुद राजानें आपणासमक्ष मोहरा करविल्या. मग ती पेटी एका विटबंदी कमानींत खळग्यामध्यें बसविली. आणि वर माती लोटली. आणखी त्याजवर समाधीसारखें कांहीं बांधिलें. तें कोणी उकरील ह्मणून तेथें रणजितसिंगानें सक्त पाहारा ठेविला. इतकेंच नव्हे, तर त्या जमीनीवर व थडग्यावर धान्यही पेरिलें; तें अशासाठीं कीं, तें कदाचित् कोणीं उकरल्यास लागलेंच समजावें. ह्या गोष्टीस चाळीस दिवस लोटल्यावर, सर्व लोकांसमक्ष महाराजांनीं ती पेटी उकरून काढविली. आणि तींत पाहातात तों, तो बुवा प्रेत झालेला त्यांच्या दृष्टीस पडला. नंतर, त्यानें पूर्वी सांगून ठेविल्याप्रमाणें, ऊन ऊन भाकऱ्या त्याच्या पायांस व डोक्यास बांधिल्या, आणि त्यास ऊन पाण्यानें स्नान घातलें. नंतर दोन तासांनीं त्यास जीव आल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं; आणि दुसरे दिवशीं तर तो चांगला सावध झाला. त्या चाळीस दिवसांत त्याचीं नखें व केंस हीं मुळींच वाढलीं नाहींत, पाहिलीं होतीं तशीं होतीं, असें पुष्कळांच्या सांगण्यांत आहे. ह्यावरून त्या चाळीस दिवसांत त्याच्या शरीरांतले रुधिराभिसरणादि सर्व व्यापार चालले नव्हते, असें ह्मणावें लागतें. ही गोष्ट खरी किंवा खोटी ह्याचा संशय वाटतो; तथापि ज्यापक्षीं इतके लोकांसमक्ष असें कृत्य घडलें ह्मणतात, त्यापक्षीं त्याविषयीं संशय घेणें योग्य नाहीं.

अशी शीक लोकांची सामान्य हकीकत आहे. त्यांच्यामध्यें रणजितसिंग हा पराक्रमी राजा होऊन गेला, त्याची व त्याच्या वंशजांची गोष्ट ह्या ग्रंथांत वेगळीच लिहिलीं आहे.

मराठी भाषेंतील प्रख्यात कवि.

ह्या पुस्तकामध्यें हिंदुस्थानाच्या इतिहासांतील रसाळ रसाळ तितक्या गोष्टी याव्या, असा मुख्य हेतु आहे. आणि कवि झटले झणजे रसांचें अगदीं आगर समजावयाचें; तेव्हां त्यांच्या कांहीं गोड गोष्टी येथें सांगणें आवश्यक आहे. ह्यास्तव आम्ही मराठी मुख्य मुख्य कवींविषयीं येथें थोडथोडें लिहितों.

१ ज्ञानेश्वर.—ह्यास कोणी ज्ञानोबा असेंही झणतात. हा इ० स० १२८० ह्या वर्षीं आळंदीस जन्मला. याला आणखी तीन भावंडें होतीं; निवृत्तिनाथ, सोपानदेव, आणि मुक्ताबाई. ह्यांच्या बापाचें नांव विठोबा, व आईचें नांव रखमाबाई असें होतें. विठोबानें काशीक्षेत्रीं जाऊन संन्यासग्रहण केलें. परंतु, एका सिद्धाच्या सांगण्यावरून, त्यानें पुनः गृहस्थाश्रम स्वीकारिला. झणून ज्ञानेश्वरास संन्याशाचा पुत्र असें कोणी झणतात. ह्यानें अमृतानुभव आणि ज्ञानेश्वरी असे दोन ग्रंथ केले, ते ओवीबद्ध असून हल्लीं सर्वप्रसिद्ध व सर्वमान्य आहेत. पहिल्यांत एक हजार व दुसऱ्यांत दाहा हजार ओव्या आहेत. हा कवि १६ वर्षांचा होऊन, इ० स० १२९६ त आळंदी येथें मरण पावला.

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ ज्ञानेश्वरानें शके १२१२ ह्या वर्षीं समाप्त केला, असा याच ग्रंथाच्या शेवटीं लेख आहे. तो असा.—

ओंवी.

शके बाराशें बारोत्तरें, तैं टिका केली ज्ञानेश्वरें;
सच्चिदानंदबाबा आदरें, लेखक झाला.

कविचरित्रांत असें लिहिलें आहे कीं, "ज्ञानेश्वरी हा ग्रंथ करतेवेळीं ज्ञानेश्वर एका खांबावर कोळशानें लिहीत असत." होय. ही गोष्ट खरी

आहे. हा खांब नगर जिल्ह्यांत नेवासेंखुर्द ह्या गांवीं आहे. तो स्वतः आह्मीं पाहिला आहे. तो सुमारें एक हात औरसचौरस जाड असून तो जमिनीच्या वर सुमारें अडीच हात आहे. त्याच्यावर एक लहानसें देवालय बांधिलें आहे. त्या दगडास लोक देव मानून त्याची पूजाअर्चा करितात. ह्या खांबावर बसून ज्ञानेश्वरी ग्रंथ ह्या पुरुषानें रचिला, असें नेवाशाच्या जुन्या लोकांच्या माहितीवरून कळतें. त्या खांबाच्या पुढच्या बाजूवर अक्षरांच्या सात ओळी खोदलेल्या दृष्टीस पडतात. त्यांत अनुष्टुप छंदाचे दोन संस्कृत श्लोक आहेत. त्यांमध्यें ज्ञानोबाविषयीं कांहीं नाहीं. तर, त्या देवालयाकडे दरमहा साहा रुपये तेलवातीकरितां निरंतर चालविण्याविषयीं आग्रहपूर्वक सांगितलें आहे.

'सच्चिदानंदबाबा' ह्मणून जो वरच्या ओंवींत सांगितला आहे, तो नेवासेंबुद्रुग येथील कुळकर्णी होता. तो मोठा देवभोळा असून, तो ज्ञानदेवाची सेवा करीत असे. ज्ञानेश्वरानें ओंवी रचावी, आणि त्यानें लिहावी, असा नित्यक्रम चालत असे, असें सांगतात.

ज्ञानेश्वराचे ग्रंथ सहज समजण्यासारखे नाहींत. त्यांस गुरुमुख, अथवा शब्दार्थादि चांगलें साहित्य पाहिजे. ज्ञानेश्वरींत छप्पन्न भाषांतले शब्द आहेत, ह्मणून तिचा बरोबर अर्थ कोणासही लवकर कळावयाचा नाहीं, असा कांहीं लोकांचा समज आहे. परंतु तो सर्व खरा नाहीं. तिजमध्यें फार प्राचीनकाळचे चमत्कारिक अवघड शब्द पुष्कळ आहेत हें खरें; तथापि, लोकांनीं तिचा जेवढा बाऊ करून ठेविला आहे, तितका तो ग्रंथ खरोखर कठीण आहे, असें ह्मणवत नाहीं.

ह्या कवीविषयीं आणखी तपशीलवार खरी माहिती मिळत नाहीं, ही मोठी दुःखाची गोष्ट होय. तथापि, त्याचा जो वृत्तांत उपलब्ध आहे, यावरून, तो विलक्षण बुद्धीचा पुरुष असावा, असें ह्मटल्यावांचून आमच्यानें राहावत नाहीं. पहा, तो सगळीं १६ वर्षें ह्या पृथ्वीवर होता. त्यांपैकीं, निदान सात वर्षें तरी त्याचे बालत्वांत गेलीं असलीं पाहिजेत. बाकी राहिलीं नऊ वर्षें. त्यांत ज्ञानसंपादन, ऐहिक सुखाची खंती, आणि परमार्थप्राप्तीची मति त्यास होऊन, त्यानें, जनांचे डोळे उघडण्यासाठीं ज्ञानेश्वरीसारखे ग्रंथ लिहिले, हें सामान्य बुद्धीचें काम नव्हे.! ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव ह्या दोन ग्रंथांच्याच एकंदर ओंव्या पाहिल्या तर ११००० आहेत. शिवाय, पांच साहा ग्रंथ एवढ्याशा अल्प आयुष्यामध्यें एवढ्या गहन विषयांवर अशा

उत्कृष्ट रीतीनें लिहिण्यास मनुष्याचे ठायीं बुद्धिबळ केवढें असलें पाहिजे, ह्याचा अजमास आमच्या सुज्ञ वाचकांनींच करावा.

ज्ञानदेवाची विचार करण्याची शैली फारच गहन आहे. आणि ती त्यास अल्पवयांत साधली, हें पाहून मोठा चमत्कार वाटतो. सांप्रतकाळीं बऱ्याच बुद्धिमान् मनुष्यास सोळा वर्षांच्या उमरीमध्यें सामान्य व्यवहारज्ञान व्हावयाची देखील पंचाईत. असें असतां आणि, इतक्या प्राचीन काळीं विद्याभ्यासास कांहीं विशेष साधनें नसतां, त्यानें ईश्वर, आत्मा, ब्रह्म, अशा गहन विषयांवर निर्विवाद सिद्धान्त लिहिले, ही केवढी नवलाची गोष्ट आहे! त्याच्या विचारांचा व भाषेचा मासला वाचकांस कळावा, ह्मणून आह्मी त्याचा एक लहानसा वेंचा येथें देतों—

ज्ञानेश्वरींतील भगवद्भक्तलक्षणें.

ओंव्या.

उत्तमातें धरिंजे, अधमातें अव्हेरिंजे,
हें कांहींच नेणिजे, वसुधा जेवीं. १.
वोखटें का गोमटें, हें कांहींच जया नुमटे,
रात्र दिवस न घटे, सूर्या जेवीं. २.

अशीं भगवद्भक्तलक्षणें त्यानें सांगितलीं आहेत. ह्या लक्षणांप्रमाणें पाहिलें असतां, जीवव्यापार खेरीज करून, एकादा अचेतन पदार्थ आणि भगवद्भक्त ह्यांच्या मध्यें स्वरूपतः कांहीं अंतर नसावें, असा ज्ञानेश्वराचा विचार दिसतो. मनुष्याच्या ठायीं अशी वृत्ति उत्पन्न होण्यास त्याच्या मूळ स्वभावाचा अगदीं पालट झाला पाहिजे. सामान्यत्वें पाहिलें असतां त्याचें अंतःकरण कामलोभादिकांच्या स्वाधीन झालेलें असतें. तें त्यांच्या पाशांतून निघून परमार्थाकडे वळण्यास परमेश्वराची कृपा पाहिजे.

ज्ञानदेवाचे अंभगही असेच गहन विचारांनीं भरलेले आहेत. त्याचा एक मासला—

अभंग.

मळियानळ सीतळू, पालवीं नये गाळूं,
सुमनाचा परिमळू, गुंफितां नये. १.

मोतियाचें पाणी, भरितां नये रांजणीं,
गगना गवसणी, घालितां नये. २.
कापुराचें कांडण, कांडितां नये आंकण,
साखरेचें गोडपण, पाखांडतां नये. ३.
डोळियांतिल बाहुली, करितां नये वेगळी,
सखी ह्मणूनि सांवली, वरितां नये. ४.
विठ्ठल रुक्मिणीचें भांडण, कोण करी बुझावण,
निवृत्तिचरणीं शरण, ज्ञानदेव. ५.

२ **नामदेव**.—हा उद्धवाचा अवतार ह्मणतात. हा कवि पंढरपुराजवळ गोकुळ ह्या गांवीं, इ० स० १२७८ ह्या वर्षीं जन्मला. ह्याच्या बापाचें नांव दामाशेटी शिंपी, आणि आईचें नांव गोणाई असें होतें. हा लहानपणापासूनच ईश्वरभक्तीकडे वळला. त्याची पुढें बरीच कीर्ति झाल्यावरून त्याला पुष्कळ संतमंडळी मिळाली. तो आपल्या चारशें मंडळीसहवर्तमान एके ठिकाणीं उत्सवास जात असतां, त्याला कोणीं लोकांनीं धरून नेलें. तेथें त्यानें मेलेली गाय जीवंत केली, व आणखी कितीएक दैवी चमत्कार करून दाखविले. यांवरून त्यास सोडून दिलें, असें सांगतात. असें ह्मणतात कीं, नामदेवास शतकोटि अभंग करण्याविषयीं दृष्टांत झाला; यावरून त्यानें व त्याच्या कुटुंबांतिल माणसांनीं मिळून एकंदर ९९ कोटि ९६ लक्ष अभंग रचिले; आणि चार लक्ष राहिले ते तुकारामानें पूर्ण केले. हे सर्व अभंग सांपडत नाहींत, ही फार दुःखाची गोष्ट होय. नामदेवानें आपल्या अभंगांच्या शेवटच्या चरणांत "नामा ह्मणे" असें पद घातलें आहे. ह्याची कविता सरळ व गोड आहे. हा इ० स० १३२८ ह्या वर्षीं मरण पावला. तेव्हां तो ९० वर्षांचा होता.

३ **तुकाराम**.—हा कवि महा साधु होता. तो, पुण्यापासून नऊ कोसांवर देहू ह्मणून एक गांव आहे तेथें इ० स० १५८८ ह्या वर्षीं जन्मला. त्याच्या बापाचें नांव वाल्होबा, व आईचें नांव कनकाई असें होतें. तुकारामाला एक भाऊ होता. त्याचें नांव सावजी असें होतें. तुकारामाचें लग्न झालें होतें. तरी, तो इतका ईश्वरभक्त बनून गेला होता कीं, त्यानें संसारसुखाचा उपभोग तिळभर देखील घेतला नाहीं. तो कथा करीत असे. त्याच्या वेळेपासून कथा करण्याची चाल पडली, असें ह्मणतात. त्याची बायको जिजाई ही त्याची सेवा करी; परंतु तिला कांहीं राग आला ह्मणजे ती त्याला मारी सुद्धां; तरी त्यानें

तिला ब्र बोलूं नये, असें सांगतात. तो विठ्ठलभक्त होता. भक्तीविषयीं त्याचा इतका प्रेमा असे कीं, झोंपेमुळें तिला जर विघ्न झालें, तर त्याला फार वाईट वाटे. ह्याविषयीं भक्तलीलामृतांत असें लिहिलें आहे कीं,

ओंवी.

शेंडीस बांधोनियां दोरी, आपुल्या हातें टांगी वरी,
ह्मणे मानेशीं आंसडा बैसल्यावरी, मग निद्रा दुरी पळेल. १.

तुकारामानें अनेक चमत्कार लोकांस दाखविले. त्यांचें वर्णन ग्रंथांतरीं पुष्कळ आढळतें. तो निस्सीम ईश्वरभक्त होता. यानें आपलें सगळें आयुष्य देवाच्या भजनांत वेंचिलें. तो हातांत वीणा घेऊन कथा करीत असे. व तिजमध्यें तेव्हांच्या तेव्हांच रचून अभंग ह्मणत असे. ईश्वराची भक्ति करण्याविषयीं तो लोकांस आग्रहपूर्वक उपदेश करीत असे. तथापि, संसार आणि बायकामुलें सोडून, गोंसावी बनूनच भक्ति केली पाहिजे, असें त्याचें मत नव्हतें. मनुष्य कोणत्याही स्थितींत असो, यानें इमानेंइतबारें वागून परमेश्वरास शरण जावें, हीच भक्ति, असें तो सांगत असे. ह्याचे अभंग सर्वत्र प्रसिद्ध आहेत. ह्याची कविता सरळ, गोड, आणि प्रासादिक अशी आहे. लहानपणीं ह्याला विद्येचा फारसा संस्कार झालेला नसतां, व ह्याचें ग्रंथावलोकन विशेष नसतां, ह्याच्या कवितेमधील शब्दप्रौढी, व दृष्टांतयुक्त मनोरंजक रचना ह्या पाहून मोठें आश्चर्य वाटतें. हा साधु इ० स० १६२८ त भजन करतां करतां गुप्त झाला, असें सांगतात.

ह्या कवीच्या कवितेंत जुने शब्द फारसे आढळत नाहींत. ह्यानें आपले अभंग सहज रचिले, तसे ते लोकांस बहुधा सहज समजतात. कोणतीही गोष्ट मनांत बिंबे अशी सांगण्याविषयीं तुकारामाचा हातखंडा असे. आतां त्याचे एक दोन चमत्कारिक अभंग येथें घेऊन हा विषय पुरा करितों.

१

उरा लावीं उर, आलिंगितां कांता,
संतांसी भेटतां, आंग चोरी. १.
अतीत देखुनी, होय पाठमोरा,
त्याह्याशी सामोरा, जाय वेगीं. २.
संतां नमस्कारा, मनीं भाव कैंचा,

तुर्काचे दासीचा, लेख होय. ३.
तुका ह्मणे तुह्मीं, रागासी न यावें,
स्वभावा करावें, काय कोणीं. ४.

२

दुधाळ गाढवी, जरी झाली आहे,
पावेल ती काय, धेनु सरी. १.
कागाचिया गळां, पुष्पांचीया माळा,
हंसाची ते कळा, काय जाणे. २.
मर्कट आंघोळी, लावियेले टिळे,
ब्राह्मणाचे लळे, वर्तूं नेणें. ३.
जरी तो ब्राह्मण, झाला कर्मभ्रष्ट,
तुका ह्मणे श्रेष्ठ, तिहीं लोकीं. ४.

३

वाघें उपदेशिला कोल्हा, सुखें खाऊं देरे मला. १.
अंतीं मरसी न चुके, मज कां मारितोसी भुकें. २.
येरू ह्मणे भला भला, तुझे तोंडें निवाड झाला. ३.
देह तो जाणार, मंज घडेल परोपकार. ४.
येरू ह्मणे मनीं, ऐसें जावें समजोनी. ५.
गांठी पडली ठका ठका, त्यांचें वर्म बोले तुका. ६.

४

पापाची वासना, नको देऊं डोळां,
ह्याहूनी आंधळा, बराच मी. १.
निंदेचें श्रवण, नको माझे कानीं,
बधिर करूनी ठेवीं देवा. २.
अपवित्र वाणी, नको माझ्या मुखा,
ह्याजहुनी मुका, बराच मी. ३.
नको मज कधीं परस्त्रीसंगती,
जनांतूनि माती, उठतां भली. ४.
तुका ह्मणे मज, अवघ्यांचा कंटाळा,
तूं एक गोपाळा, आवडसी. ५.

एवढ्यावरून; आह्मीं जें काय वर लटलें आहे, त्याचें खरेपण वाचणाऱ्यांच्या लक्षांत अल्पतरी येईल. तुकारामाच्या कवितेंत शब्दांचा अध्याहार फार असतो, हें सहज लक्षांत येण्याजोगें आहे. परंतु, त्याची शक्ति अशी कांहीं विलक्षण आहे कीं, जो अर्थ आणण्यास दुसऱ्या एकाद्यास १०० शब्द लागावयाचे, तितका अर्थ हा पांच शब्दांत मनामध्यें भरवितो. ही गोष्ट त्याच्या पुष्कळ कविता पाहिल्यावर ह्याहून विशेष स्पष्ट होईल. आलीकडे युरोपांतल्याही कितीएक विद्वानांचें लक्ष मराठी भाषेकडे लागलें आहे. त्यांपैकीं एक थोर मनुष्य तर असें स्पष्ट ह्मणत असे कीं, मराठी कवींमध्यें तुकारामासारखा दुसरा कवि नाहीं.

४ **रामदास.**—गोदावरीच्या कांठीं जामगावीं सूर्याजीपंत ह्मणून एक कुळकरणी होता, त्यास, त्याची स्त्री राणूबाई हिच्या पोटीं इ० स० १६०८ ह्या वर्षीं एक पुत्र झाला. त्याचें नांव नारायण असें ठेविलें. तो रामभक्ति करूं लागला; ती इतकी कीं, ऐहिक सुखाची आशा अगदीं सोडून देऊन त्यानें परमार्थसाधनाचा मार्ग धरिला. त्यावरून त्यास रामदास असें नांव पडलें. ह्याला एक वडील भाऊ होता, त्याचें नांव रामीरामदास होतें. तोही साधु आणि कवि होता. रामदासाच्या प्रसादिकपणाचे साक्षात्कार ग्रंथांवरून व दंतकथांवरून पुष्कळ समजले आहेत. हा शिवाजीराजाचा गुरु होता. ह्यावरूनच शिवाजीनें आपल्या स्वारीच्या पुढें भगवा झेंडा धरण्याचा पाठ घातला, असें सांगतात. आणि 'राम राम' करण्याची चालही त्यानेंच पाडिली, असें एके ठिकाणीं लिहिलें आहे. ह्याचे कांहीं ओंवीबद्ध, व कांहीं श्लोकबद्ध ग्रंथ प्रसिद्ध आहेत. शिवाय, त्यानें अभंगही पुष्कळ केले आहेत. 'मनाचे श्लोक' ह्मणून जें त्याचें एक प्रकरण आहे, तें फार सुरस व प्रसिद्ध आहे. व त्यांतील बोध खरोखरच सर्वोत्कृष्ट आहे. ते श्लोक वाचून जो मनुष्य थोडासा विचार करील, त्याचे अंतःकरणांत उजेड पडल्यावांचून खचीतच राहावयाचा नाहीं. संसारसुखाची खंती त्यास इतकी होती कीं,

ओंवी.

मूर्खांमाजी परम मूर्ख, जो संसारीं मानी सुख,
संसारदुःखाएवढें दुःख, आणीक नाहीं. १.

असें त्यानें एके ठिकाणीं लिहिलें आहे. देवाविषयीं तो ह्मणतो.—

अभंग.

देवें जन्मासी घातलें, नाना सुख दाखविलें. १.
कुळ समूळ सांभाळिलें, नाना प्रकारें पाळिलें. २.
त्यासी कैसें विसरावें, पुढें कैसेनी तरावें. ३.
दास ह्मणे देवाविण, दुजा सांभाळितो कोण. ४.

आणखी, मनुष्याच्या स्थित्यंतराविषयीं त्यानें असें ह्मटलें आहे—

अभंग.

डोळे चिरींव चांगले, वृद्धपणीं सरक्या झाले. १.
मुख रसाळ चांगलें, पुढें अवघें सुर्कूतलें. २.
रम्य नासीक सरळें, सर्वकाळ पाणी गळे. ३.
कर्णभूषणें सुंदर, पुढें जाहलीं बधीर. ४.
बरवी दंतांची पंगती, परि ते उन्मळोनी पडती. ५.
बरवे कर आणि चरण, परि ते झाले निष्कारण. ६.
अंगकांती होती बरी, झाली चिरगुटाचे परी. ७.
केश होताती पांढरे, लाळ गळतां नाधरे. ८.
बहुसाल होतें बळ, परि तें जाहलें निर्बळ. ९.
देहे होते जे निर्मळ, तेचि झाले अमंगळ. १०.
सर्व तारूण्यें चांगला, प्राणी दीनरूप झाला. ११.
वोले मातीचा भरंवसा, काय मानीसी माणसा. १२.
रामीरामदास ह्मणे, आतां सावधान होणें. १३.

रामदासकृत दासबोधांत फार उत्तम उपदेश आहे. त्याचा एक मासला.

ओंव्या.

वाट पुसल्यावीण जाऊं नये, फळ ओळखिल्यावीण खाऊं नये,
पडली वस्तु घेऊं नये, एकाएकी. १.
अति वाद करूं नये, कपट पोटीं धरूं नये,
शोधिल्यावीण वरूं नये, कुलहीन कांता. २.
विचारेंवीण बोलूं नये, सभेमध्यें लाजूं नये,
विवंचनेवीण चालूं नये, कांहीं केल्या. ३.

जनीं आर्जव सोडूं नये, पापद्रव्य जोडूं नये,
पुण्यमार्ग सोडूं नये, कदा काळीं. ४.
कोणाचा उपकार घेऊं नये, घेतला तर ठेऊं नये,
परपीडा करूं नये, विश्वासघात. ५.
बहु अन्न खाऊं नये, बहु निद्रा घेऊं नये,
बहु दिवस राहूं नये, पिशुनाचे घरीं. ६.

एवढ्या कवितेच्या मासल्यांवरून, रामदासाची कविता कशी रसाळ, सरळ, आणि मनावर ठसणारी आहे, हें सहज लक्षांत येईल. लोकांस बोध व्हावा आणि त्यांनीं शुद्धीवर यावें, हाच कायतो एक हेतु ह्या कविता करण्याचा असावा, असें स्पष्ट दिसतें. हा कवि ७३ वर्षांचा होऊन, इ० स० १६८१ ह्या वर्षीं मरण पावला. त्याची समाधी साताऱ्यानजीक परळीच्या किल्ल्यावर आहे. त्या ठिकाणास सज्जनगड ह्मणतात.

५. **वामनपंडित.**— हा कवि सातारा व कोल्हापूर येथें राहात असे. ह्यानें श्लोक पुष्कळ केले. ते सर्वत्र प्रसिद्ध आहेत. ह्याचे संस्कृत ग्रंथही बरेच आहेत. ह्याच्या विषयींच्या दंतकथेवरून असें अनुमान करितां येतें कीं, हा आपले वेळीं अद्वितीय पंडित झाला होता, व त्यानें काशीपासून रामेश्वरापर्यंत गांवोगांवच्या पंडितांपासून जयपत्रें मिळविलीं होतीं. ह्यानें श्लोकबद्ध अशीं एकंदर छत्तीस प्रकरणें लिहिलीं. त्यांपैकीं भामाविलास, रुक्मिणीविलास, हरिविलास, इत्यादि कितीएक प्रकरणें प्रसिद्ध आहेत. निगमसार ह्मणून त्याचा एक ओंवीबद्ध ग्रंथ आहे. तोही फार चांगला आहे.

वामनाच्या संस्कृत कवितेविषयीं आह्मी येथें कांहीं बोलत नाहीं, व बोलण्याचें कारणही नाहीं. त्याच्या प्राकृत कवितेविषयीं पाहूं लागलें असतां असें दिसून येतें कीं, ती जागोजाग चांगली रसभरित, व चित्तवेधक आहे. कितीएक श्लोकांचा अर्थ तर फारच खोल आहे. हा कवि उत्कृष्ट वेदांती होता. तेणेंकरून, त्या गहन विषयाची झांक ह्याच्या काव्यांत जागोजाग आढळते.

ह्या कवीस अनुप्रास फार आवडत असत. आणि एकादे वेळीं त्यांजवरच त्याची लहर लागली, ह्मणजे असें होत असे कीं, त्या अनुप्रासांच्या नादामुळें, काव्यांत व्याकरणशुद्धता आणि अर्थगौरव, ह्यांची उणीव पडे. ही गोष्ट वामनासच काय, परंतु दुसऱ्या पाहिजे त्या कवीस लागू करतां येईल. शब्दालंकाराकडे विशेष लक्ष दिलें कीं, अर्थालंकारांत तितकें न्यूनत्व यावयाचें,

असा बहुतकरून सर्वसाधारण नियम आहे. आम्ही हें जें म्हणतों, त्याची सत्यता ह्या पुढच्या श्लोकांच्या रचनेवरून थोडी तरी लक्षांत येईल.

श्लोक.

वंशी नादनटी तिला कटितटीं खोंवोनि पोटीं पटीं,
कक्षे वामपुटीं स्वशृंगनिकटीं वेताटि ही गोमटी;
जेवी नीरतटीं तरूतळवटीं श्रीश्यामदेहीं उटी,
दाटी व्योमघटीं सुरासुर लुटी घेती जटी धूर्जटी. १.

ह्या श्लोकांत 'टी' ह्या अक्षरावरच भर आहे. आणखी—

श्लोक.

घे हातीं कवळा मनांत कमळा त्या सुंदरा गोंवळा,
चित्तालागिं वळा स्वसत्व निवळा ध्या सांवळा गोंवळा;
कीर्तींचा ढवळा सुधाब्धि धवळा जो भक्तिचा जावळा,
प्रेमातें खवळा उठे कळवळा त्या प्रीतिनें आंवळा. २.

ह्या श्लोकांत 'ळा' ह्या अक्षराकडे सगळी नजर आहे.

मनास बोध करण्याची वामनाची शैली सर्वोत्कृष्ट आहे. पाहा. नामस्मरण केव्हां करावें ह्याविषयीं तो म्हणतो,—

श्लोक.

अहो यैतां जातां बसत उठतां कार्य करितां,
सदा देतां घेतां वदनिं वदतां ग्रास गिळितां;
घरीं दारीं शय्येवरि रतिसुखाचे अवसरीं,
समस्तांची लज्जा त्यजुनि भगवच्चिंतन करीं. १.

आणखी, आयुष्याच्या चंचल गतीवर त्याचा असा श्लोक आहे,

कुऱ्हाडीच्या घायाप्रति तरू जसा कां तुटतसे,
अहो आयुष्याचे दिन रजनिघायें स्फुट तसे;
न देहाची ऐशा वय समजतां ऊर उलतो,
तया साधे ऐसा कुनर विषयातेंच भुलतो. २.

अशा चमत्कारिक कविता त्याच्या अनेक आहेत. जो रस ध्यावा, तो

उत्तम खुलवून दाखवावा, अशी वामनपंडिताचेठायीं शक्ति होती. हा कवि, इ० स० १६७३ त, वांईजवळ पांडववाडी ह्मणून एक गांव आहे, तेथें मृत्यु पावला. ह्याचे वंशज अद्यापि काशीक्षेत्रीं आहेत, असें सांगतात.

६ मुक्तेश्वर.— ह्या कवीच्या बापाचें नांव विश्वंभरबावा, व आईचें नांव लीलाबाई असें होतें. तो इ० स० १६०९ त जन्मला. तेव्हां तो मुका होता. त्यास एकनाथस्वामीच्या कृपाप्रसादानें वाचा आली, असें सांगतात. भारत आणि रामायण ह्या संस्कृत ग्रंथांतील विषयांवर त्यानें पुष्कळ प्रकरणें ओंवीबद्ध लिहिलीं आहेत. त्याचे श्लोकही क्वचित् आढळतात. ह्याची कविता फार रसाळ आहे. ह्याची ग्रंथरचनाशक्ति इतकी उत्तम आहे कीं, जी गोष्ट ह्याचे पुस्तकांत वाचावी, ती, आपणासमोर सध्या होत आहे कीं काय असें वाचणाऱ्यास वाटतें. ह्याच्या कवितेचे एक दोन मासले येथें दाखवितों.

जो अर्थ संस्कृत उत्कृष्ट ग्रंथांमध्यें प्राचीन कवींनीं बांधिला आहे, तोच प्राकृत भाषेच्या द्वारें कथिला असतां त्याची रुचि कमी होत नाहीं, असा अभिप्राय प्रकट करण्याच्या हेतूनें मुक्तेश्वरानें आदिपर्वांत एके जागीं लिहिलें आहे,—

ओंव्या.

वेदशास्त्रस्मृति पुराणें, नाना इतिहास व्याकरणें,
गाळून विचार रसायणें, द्वैपायनें कुशलत्वें, १.
सुरस सुंदरी पवित्र सृष्टी, पक्वान्नें निपजवूनि पाठी,
संस्कृत शब्द सुवर्णताटीं, श्रेष्ठां श्रेष्ठां वोगरिलीं[1]. २.
तेंचि रसायन दुर्बलपणीं, महाराष्ट्रभाषा रंभापणीं[2],
वाढिलें तरी भुकाळू जनीं, न सेविजे किमर्थ. ३.
मुख्य अर्थीं घालितां दृष्टी, न ह्मणावें संस्कृत मऱ्हाटी,
रत्नकुंभीं कीं मृत्तिकाघटीं, गंगोदक सारिखें. ४.

आणखी सज्जनदुर्जनांविषयीं—

ओंव्या.

दोष न देखती जे लोकीं, ते सर्वत्र सदा सुखी,
दोषदुःखें स्वयेंच दुःखी, दुःख देती पुढिलातें. १.

---

१ व्यासानें. २ वाढिलीं. ३ केळीच्या पानीं.

मुख्य साधूचें लक्षण, परदोष न वदे गेल्या प्राण,
पैशून्य बोले कारणें विणें, तोचि दुर्जन दुरात्मा. २.

आणखी—

ओंव्या.

वैरी थोर अथवा सानू, ययासीं यत्नें जागिंजे सावधानू,
काळसर्प कीं हुताशनू, वाढल्या सर्वथा नावरे. १.
कंटक भेदला असतां चरणीं, गोमक्षिका रिघाली कर्णीं,
कण खुपत असतां नयनीं, स्वस्थ कैसें वसावें. २.
आपुली अंगना रतली परा, स्वताची लक्ष्मी आणिका घरा,
जातां खेद राजेश्वरा, कोविं तोंडें बोलावा. ३.

कोण कोणत्या गोष्टी कुलवती स्त्रीस दोषास्पद आहेत; त्यांचें वर्णन करितांना मुक्तेश्वर लिहितो—

ओंव्या.

स्वयें नर्तन गायन, गीतनृत्य अवलोकन,
शृंगारकामशास्त्रश्रवण, हेंचि दूषण कुलवंते. १.
परघर अटण परघर वस्ती, जारजारिणींची संगती,
एकट शय्या एकट पंथी, हें कुलक्षण कुलवंते. २.
क्षणक्षणा चंचलपणें, चिरिनिरिया सरसावणें,
कच्छ फेडणें घालणें, हें कुलक्षण कुलवंते. ३.
हृदय दावून घाली पदर, पुरुष देखोनि वाढवी हार,
परकियासीं एकांत विचार, हें कुलक्षण कुलवंते. ४.
बहु हांसणें बहु बोलणें, सदां हांसत गोष्टी करणें,
परतपरतोनि निरखणें, हें कुलक्षण कुलवंते. ५.

ह्या अल्प मासल्यांवरून, मुक्तेश्वराच्या कवितेच्या सौरस्याची कांहीं तरी कल्पना आमच्या वाचकांचे मनांत येईल, असा आमचा अदमास आहे. ह्या कवीचें मरणवृत्त कोठें आढळत नाहीं. तथापि, हा शिवाजी राजाच्या वेळीं असावा, असें कविचरित्रांत लिहिलें आहे.

७ **श्रीधर.**— पंढरपुराजवळ नाझरें ह्मणून एक गांव आहे, तेथें ब्रह्मानंद ह्या नांवाच्या कुळकरण्यास, इ० स० १६७८ ह्या वर्षीं एक मुलगा

झाला. त्याचें नांव श्रीधर असें ठेविलें. त्याच्या आईचें नांव सावित्रीबाई होतें. यानें चवदावे वर्षींच चतुर्थाश्रम घेतला. मग तो बहुधा पंढरपुरास राहात असे. तेथें यानें, हरिविजय, रामविजय पांडवप्रताप, शिवलीलामृत, काशीखंड, जैमिनीअश्वमेध, पांडुरंगमाहात्म्य इत्यादि ग्रंथ लिहिले, ते बहुतेक ओंवीबद्ध आहेत. ह्याची वाणी फार सरळ आणि गोड आहे.

हा कवि प्राकृत कविता करण्याचा हेतु एके ठिकाणीं असा दर्शवितो—

ओंव्या.

अबलांस न कळे संस्कृत वाणी, जैसें आडांतील गोड पाणी,
परि तें दोरपात्रावांचुनी, अशक्त जना केविं निघे. १.
तेंच तडागासी येतां त्वरें, तात्काळची तृषा हरे,
अबलाजना तारावया ईश्वरें, प्राकृत ग्रंथ निर्मिले. २.

श्रोते पंडितांपुढें आपलें कथावर्णन अगदीं यःकश्चित् आहे, असें प्रदर्शित करीत असतां कवि ह्मणतो.—

ओंव्या.

सूर्यापुढें जैसा दीप देख, जान्हवीस न्हाणी थिल्लरोदक,
कीं कनकाद्री अति सुरेख, त्यासि अळंकार पितळेचे. १.
कामधेनूस अर्पिलें अजाक्षीर, चंद्रासि शीतळ करी रंभापत्र,
कल्पतरू कल्पिलें देणार, त्यासि निंबोळ्या समर्पिल्या. २.
रत्नकरापुढें काचवाटी समर्पिली, तैशी माझी आर्ष बोली,
परी तुह्मीं प्रीति ठेविली, प्राकृत ग्रंथीं नवल हें. ३.

हा कवि इ० स० १७२८ त पैठण येथें मरण पावला.

८ अमृतराय.— हा कवि औरंगाबादेस विसोमोरो ह्या मुत्सद्याचे घरीं राहात असे. ह्यानें अनेक कटाव केले. यांत अर्थगौरवापेक्षां शब्दगौरव विशेष आहे. परंतु ह्याची वर्णन करण्याची शैली फार चित्तवेधक असल्यामुळें आणि ह्याच्या कवितेंत प्रास व यमकें फार आहेत ह्मणून ह्याची कविता लोकांस आवडते. दामाजीपंताची रसद, शुकचरित्र, ध्रुवचरित्र, इत्यादि पद्यें प्रसिद्ध आहेत. अमृतराय इ० स० १७५३ त वारला.

९ मोरोपंत पंडित.— पुण्यापासून २५ कोसांवर बारामती ह्मणून एक

गांव आहे, तेथें बाबूजी नाईक जोशी, बाळाजी विश्वनाथ भट्ट पेशवे ह्यांचे जामात, हे जहागीरदार राहात असत, त्यांच्या पदरीं रामचंद्रपंत पराडकर ह्मणून एक कारकून होता; त्याचा मुलगा मोरोपंत. त्याच्या आईचें नांव लक्ष्मीबाई. तो इ० स० १७२९ ह्या वर्षीं पन्हाळगडीं जन्मला. तो कोल्हापुराजवळ पन्हाळा ह्या गांवीं राहात असे. तो कारकून होता. त्यानें एक पाव आण्याची चूक शोधून काढण्यास लागोपाठ तीन रात्री जागरण केलें. हें पाहून त्यास त्याचा यजमान ह्मणाला, "मोरोबा, पाव आण्याच्या शोधाकरितां त्वां जितके श्रम केले, तितके जर ईश्वरशोधार्थ होते, तर व्यर्थ जाते काय?" हें ऐकून पंतास अनुताप झाला, आणि त्यानें यजमानाचा निरोप मागितला. तेव्हां त्या यजमानानेंच त्यास ५०० रूपये साल करून पुराण सांगावयास आपले घरीं ठेविलें, असें एके ठिकाणीं लिहिलें आहे. परंतु एका विद्वान् व शोधक गृहस्थाच्या सांगण्यावरून असें समजतें कीं, मोरोपंत कधींही कोणाकडे राहिला नव्हता. असो.

ह्या कवीची आर्यांवरून फार प्रसिद्धि आहे. एकादी उत्तम आर्या कानीं पडली, कीं ही मोरोपंताची, असें मनांत आल्यावांचून राहात नाहीं. ह्याची कविता करण्याची शैली सर्वोत्कृष्ट असून, मराठी भाषा ह्मणजे ह्याचे पुढें साक्षात् जशी हात जोडून उभी होती, असें दिसतें. ह्याच्या पूर्वी जे मराठी कवि झाले, त्यांच्या ग्रंथांत अर्थगौरव, व अर्थगांभीर्य, हे गुण विपुल आढळतात. हे गुण तितक्याच मानानें मोरोपंताच्या काव्यांत असून शिवाय, अनुप्रास, यमक, व श्लेष, हे गुण मागच्या सर्व कवींपेक्षां ह्यास विशेष साधले आहेत, असें ह्मटल्यास चिंता नाहीं. ह्याचे पांच चार मासले दाखवितों.—

आर्या.

तूं समर करूनि न मर, भ्रमरसम रघूत्तमांघ्रिं नवपद्मीं,
रम रस घे अमराचि हो, भ्रमरहित स्वस्थ नांद निज सद्मीं. १.
राय असें आयकतां, हाय ह्मणे वायको न हे कृत्या,
काय करूं जाय वना, बा यश जोडीं करोनि सत्कृत्या. २.
गरसम घर समजुनि जे, हरिनामामृतरसांत तरतरले,
तरले तेचि न केवळ, त्यांचे भवसागरीं पितर तरले. ३.

गाजत वाजत साजत, आज तया जतन करूनि आणा हो,
मज मागें मच्छांचा, हा रिपु शाशिबाहु राहु राणा हो. ४.

श्लोक.

वाचाळ मी नीट, पाचाहितों धीट, ह्याचा नयो वीट साचा हरी,
खोटा जरी मी चखोटांमधें तूंच मोटां कृपेचा न तोटा घरीं,
दाता सुखाचा सदा तारिता आपदाताप हे एक दाता पटीं,
या संतसेवाव्हया संपदा दे भया संघ नाशील या संकटीं. ५.

अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. आर्यांच्या शेवटीं भिन्न अर्थांचें यमक असतें. इतकेंच केवळ नव्हे; तर कितीएक आर्यांचे दुसरे व चवथे हे चरण स्वरूपतः अगदीं एकसारखे असतात. कांहीं आर्या तर अशा आहेत कीं, त्यांचीं पूर्वार्द्धें आणि उत्तरार्द्धें हीं अगदीं सारखीं आहेत.

हा कवि रामोपासक होता. त्यानें १०८ प्रकारचीं रामायणें आर्याबद्ध रचिलीं आहेत. 'परंतुरामायण,' त्यांतील प्रत्येक आर्येंत 'परंतु' हा शब्द यावयाचा; 'निरोष्ठरामायण' त्यांतील आर्या म्हणतांना ओठाशीं ओठ लागावयाचा नाहीं; अशीं तीं रामायणें फार चमत्कारिक आहेत. ह्याच्या कवितेचे मासले घ्यावे तितके थोडेच वाटतात. भीम आणि दुर्योधन ह्यांचीं भाषणें एके ठिकाणीं वर्णिलीं आहेत. तीं अशीं—

आर्या.

भीम म्हणे रे अधमा, केलें त्वां आणि तुझ्या तातें,
चित्तांत आठवावें, पदरीं फळ घ्यावया कुजाता तें. १.
विष चारिलें बुडविलें, डोहांत करावयासि वध मातें,
स्मर वारणावतींचें जतुसद्म छद्मकर्म अधमा तें. २.
कपटद्यूतें हरिलें सर्वस्व पुढें करोनि कितवातें,
नेली सभेंत साध्वी, व्हावें शिवतां जिला चकित वातें. ३.
त्वां नागवी करविली, सुगुणांची प्रीतिहेतु जीव सती,
छळिली परोपरि खळा, अस्मत्सर्वस्व कीर्ति जी वसती. ४.
कुरूराज म्हणे मंदा, मेळविलें बहु विकत्थनें काय,
हाय म्हणवितों युद्ध श्रद्धेसह भोगितों तुझा काय. ५.

वंदलासि दुर्विंचेष्टित, माझें जें जें खरेंचि भीमा तें,
मंदा न तदेकप्रति—कृत घडलें म्हणुनि लाज भी मातें. ६.
म्यां करुनि तुह्मां वल्कलधर दीन सुचिर वनोवन फिरविलें,
अज्ञातवास दास्यहि करवुनि निज तेज दुःसह मिरविलें. ७.
तुज लाविलें स्वतेजें, म्यांचि कढी भात वरण घाटाया,
वांटाया प्राज्य पुरण, पापड पोळ्या प्रभूत लाटाया. ८

केकावली म्हणून ह्या कवीची एक अत्युत्तम कविता भक्तिपर आहे. ती समजण्यास कठीण आहे.

मोरोपंताच्या आर्येचे दाहादाहा अर्थ होतात, असा पूर्वी कांहीं लोकांचा समज असे, तो आतां जात चालला आहे. ह्याच्या काव्यांत श्लेष फार, तेणेंकरून लोकांचा ग्रह असा झाला असावा. आलीकडच्या विद्वानांच्या मतें, मोरोपंतापेक्षां तुकाराम श्रेष्ठ कवि होय. गोष्ट खरी आहे. तुकारामाच्या कवितेंत, मोरोपंताच्या कवितेपेक्षां प्रसाद पुष्कळ अधिक आहे, हें कबूल केलें पाहिजे. मोरोपंताचीं बहुतेक प्रकरणें तीं प्राचीन पुराणांचीं भाषांतरें आहेत; त्याच्या अगदीं नव्या स्वतःच्या कविता अशा थोड्या आहेत. आणि तुकारामाचें बहुतेक सर्व नवेंच. आणखी असें दिसतें कीं, तुकारामानें आपली सर्व काव्यरचनाशक्ति केवळ अर्थ रसभरित करण्याकडे खर्चिली; आणि मोरोपंताचें लक्ष अर्थरचना व शब्दरचना ह्या दोहोंकडे सारखें विभागलें गेलें होतें; म्हणून त्यांच्यामध्यें एवढा भेद पडला असावा. मोरोपंत हा नुसता कवि होता, आणि तुकाराम हा साधु असून कवि होता. तो, आपली कविता बरोबर घेऊन, इ० स० १७८८ ह्या वर्षीं काशीस गेला. तेथल्या पंडितांस ती कविता पसंत पडली. मोरोपंताच्या कवितेमध्यें संस्कृत वाक्यें इतकीं आहेत कीं, त्याच्या सर्व आर्या जर कोणीं सामान्य मनुष्यानें चांगल्या लावून घेतल्या, तर त्यास बरेंच संस्कृत कळेल. हा कवि इ० स० १७९४ त मरण पावला.

चार कवींच्या कवितेविषयीं कोणीं एकानें एक आर्या केली आहे.

आर्या.

सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची;
ओंवी ज्ञानेशाची, किंवा आर्या मयूरपंताची. १.

त्याप्रमाणें एकाच्या मोरोपंतावर एक जुनी आर्या आहे.

आर्या.

आर्याछंदें जोडुनि, रामायण भारतादि आयकवी;
नायक वीर कवींचा, ऐसा होईल अन्य काय कवी. १.

तशीच एक फार सुंदर नवी आर्या आढळली:—

आर्या.

श्रीमन्मयूरकविची, देते संतोष मानवां कविता;
असता जरि भूमिवरी, सुरगुरु तरि तोहि मान वांकविता. १.

१० **रामजोशी.**—हा कवि इ० स० १७६२ त जन्मला. तो देशस्थ होता. त्याच्या अनेक नीतिपर लावण्या व छंदोमंजरी ह्मणून एक ग्रंथ प्रसिद्ध आहे. तो बहुधा सोलापुरास राहात असे. रामजोशी पन्नास वर्षांचा होऊन मरण पावला. ह्यानें मोरोपंताची कविता प्रसिद्धीस आणिली, असें सांगतात. तो इ० स० १८१२ त मरण पावला.

हा लेख आधींच आमच्या नियमाहून अधिक झाला आहे; ह्मणून आतां येथें इतर कवींविषयीं आमच्यानें लिहिवत नाहीं. मराठी भाषेंत उत्तम कवि झाले नाहींत; ह्याचें कारण असें कीं, तीस राजाश्रय किंवा जनाश्रय जसा मिळावा, तसा कधीं मिळाला नाहीं.

देशांतील लोकांची इतर सुधारणा जसजशी वृद्धि पावत जाते, तसतशी त्यांची कविताशक्ति कमी होत जाते, असा एक सिद्धान्त आलीकडच्या विद्वान् लोकांनीं काढिला आहे. तो इतिहासांतील उदाहरणांवरून अगदीं शब्दशः खरा वाटतो. ह्या गोष्टीचा विचार करून पाहिलें असतां, ह्यापुढें हिंदुस्थानांत चांगले कवि निपजण्याची आशा अगदीं कमी आहे, किंबहुना नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल.

मुसलमान लोकांविषयीं.

मुसलमानी धर्माची स्थापना करणारा, महंमद, हा इ० स० ५६९ ह्या वर्षीं अरबस्थान देशामध्यें मक्का शहरांत जन्मला. त्याचा बाप तो लहान असतांच निवर्तला होता, ह्मणून त्याचें पालनपोषण त्याचा चुलता, अबुतालिब,

ह्यानें केलें. तो जरा मोठा झाल्यावर त्यानें त्याला व्यापारांत घातलें. त्यामुळें महंमदास मक्का आणि दमास्कस ह्यांच्यामध्यें हमेषा खेपा कराव्या लागत. त्यास फारशी भाषा व तींतील विद्या येत नव्हती, तरी त्याची बुद्धि अशी चमत्कारिक असे कीं, तो ज्यांत लक्ष घाली, तें तो तत्काळ समजे. आणि त्याची कल्पनाशक्ति व दूरदृष्टि इतकी प्रखर होती कीं, अमुक गोष्ट करावयाची, तिला कोणतीं साधनें अनुकूळ पाहिजेत, व तिच्या सिद्धीच्या आड येणाऱ्या कोणत्या विघ्नांचें निवारण कसें करावें, ह्या गोष्टींचा विचार करून मग तो तिला हात घाली. अशी बुद्धि फार थोड्या मनुष्यांस असते. महंमद २८ वर्षांचा होई तोंपर्यंत ह्या व्यापाराच्या कामांत होता. त्याच वर्षीं त्यानें खुदैजा नामक एका संपत्तिमान् विधवेशीं लग्न लाविलें, तेणेंकरून त्याला खूब पैसा मिळाला. नंतर त्यानें कांहीं दिवस व्यापार केला. परंतु त्याला लहानपणापासून अनेक धर्मांविषयीं विचार करण्याची सवय असे; आणि त्याच्या प्रवासांत त्याला नानाप्रकारच्या लोकांविषयीं माहिती झाली होती; तेणेंकरून त्याचें मन त्या विषयाकडे विशेष लागलें. आणि विचारांतीं त्यास असें वाटलें कीं, आपण पाहातों हे सर्व धर्म* खोटे आहेत, ह्यांच्या द्वारें खऱ्या देवाची खरी भक्ति होत नाहीं, ह्यास्तव एक नवाच पंथ काढून लोकांस सत्यभक्तिमार्ग दाखविला पाहिजे. ह्मणून तो शहरांतून निघून जाऊन, जवळ एक मोठी गुहा होती तींत राहिला. तेथें मी एकटा आहें, असें तो लोकांस दाखवी; परंतु एक यहुदी व एक ख्रिस्ती असे दोन बुद्धिमान् पुरुष त्यानें आपणाजवळ ठेविले होते. तेही आपापले धर्म उत्तम प्रकारें जाणत असत. महंमद आपला कांहीं वेळ एकांतीं ईश्वरभजनांत घालवी, व बाकीचा वेळ तो आपल्या दोघां मित्रांशीं धर्मसंबंधीं वाद करण्यांत खर्चीत असे. एक वेगळाच नवा धर्म स्थापावयाचा, असा त्याचा निश्चय झाला होता, त्या हेतूनें त्यानें तेथें एक पुस्तक रचिलें. त्याचें नांव कुराण. कुराण ह्या शब्दाचा अर्थ ग्रंथ असा आहे.

कुराणाची खरी हकीकत अशी असतां, त्यानें लोकांस असें सांगितलें कीं, हें पुस्तक मला परमेश्वरानें, गाब्रीएलनामक देवदूताच्या द्वारें दिलें आहे, हें खरें धर्मशास्त्र आहे, ह्याप्रमाणें लोकांनीं वर्तावें. आपल्या वयाच्या ४० व्या

---

* यहुदी लोकांस व ख्रिस्ती लोकांस ईश्वरानें दिलेलें शास्त्र आहे, असें महंमद मानीत असे; परंतु त्या लोकांनीं आपापलें शास्त्र फिरविलें असें तो ह्मणे.

वर्षीं तो आपणास पैगंबर ह्मणवूं लागला, व आपल्या नवीन ग्रंथांतील मतें लोकांस शिकविण्यास त्यानें आरंभ केला. तेव्हां त्याला सगळे ८ शिष्य मिळाले. महंमदाचा हा अध्यापनक्रम लोकांस आवडला नाहीं. ह्मणून त्यांनीं त्याचा छळ मांडिला. तेव्हां तो, इ० स० ६२२ ह्या वर्षीं, जुलै महिन्याच्या १५ व्या तारखेस मदिना येथें पळून गेला. ह्याच वर्षापासून हिजरी सन चालू झाला. अरबी भाषेंत 'हिजरा' ह्याचा अर्थ पलायन असा होतो. यावरून हिजरी हा सन पडला.

ह्या विलक्षण बुद्धीच्या पुरुषानें मदीना येथील लोकांस असा मनोवेधक बोध केला कीं, यांपैकीं बहुतेक लोक त्याचे शिष्य बनले. तीन वर्षांमध्यें शिष्यांची एवढी मंडळी त्याजपाशीं जमली, व तिजमध्यें स्वधर्माचा इतका आवेश आला कीं, आपला धर्म तरवारीच्या बळानें आपण आतां पाहिजे त्या लोकांकडून घेववूं, अशी महंमदास पक्की उमेद आली. त्याचे आज्ञेप्रमाणें वागणारे त्याचे भक्त १५०००० याजवळ असत. त्यांनीं त्यास मदीना शहरामध्यें, इ० स० ६२७ ह्या वर्षीं राजाप्रमाणें गादीवर बसवून, हा पैगंबर ईश्वराकडून आलेला भविष्यवादी आहे, असें चोहींकडे प्रसिद्ध केलें. नंतर जे लोक त्याच्या मताचे आड येत, त्यांचा पराभव करून, त्यानें त्यांजकडून आपला धर्म घेवविला. ह्या प्रकारेंकरून, महंमद हा बलिष्ठ राजा व नवीन धर्मसंस्थापक असा जवळच्या देशांमध्यें प्रसिद्धि पावला. तो आपल्या चातुर्यानें व कपटरीतीनें, लोकांस असे कांहीं चमत्कार दाखवीत असे कीं, ते दैवी आहेत, असें पाहणारांस खचीत वाटे. हा पराक्रमी पुरुष, इ० स० ६३२ ह्या वर्षीं, ६३ वर्षांचा होऊन मदीना शहरांत मरण पावला.

महंमदाच्या मागें त्याचे गादीवर, त्याचा सासरा अबुबेकर, व त्या नंतर हजरतउमर, हजरतउसमान, व हजरतअल्ली, असे चार इमाम, ह्मणजे मुसलमानी धर्माचा प्रसार करणारे राजे झाले. ह्या इमामांनीं मोठाल्या फौजा जमा करून, तुर्कस्थान, सीऱ्या, इराण, काबूल, तार्तरी, ह्या देशांत स्वाऱ्या घालून, तेथील लोकांकडून आपला धर्म स्वीकारविला, आणि तेथें आपल्या धर्माच्या राज्याची स्थापना केली. ते राजेही आपणांस इमाम ह्मणवून स्वधर्माचा प्रसार करीत चालले. तेणेंकरून यूरोप व आफ्रिका ह्या खंडांतही हा धर्म बराच पसरला. एक ग्रंथकार असें ह्मणतो कीं, एका हातांत कुराण आणि दुसऱ्या हातांत तरवार, अशा उपायानें ह्या धर्माचा प्रसार इमामांनीं

केला. ह्याचा अर्थ असा कीं, परधर्मी कोणी माणूस ह्यांच्या तावडीस सांपडला, ह्मणजे, तरवार घे नाहींतर कुराण घे, ह्मणजे मर किंवा मुसलमान हो, असें ते त्याला सांगत. आणि प्रत्येक प्राण्यास 'सबसें जी प्यारा' असल्यामुळें, लोकांनीं मुसलमानी धर्म स्वीकारून, आपल्या प्राणांचें रक्षण केलें. अशा प्रकारेंकरून महंमदी धर्म वाढत चालला. सुमारें १५० वर्षांत या धर्माची प्रजा अदमासें २० कोटि झाली.

ह्या धर्मांतील मूलतत्त्वें हीं आहेत. १ धर्मार्थ लढाईंत मरण्याएवढें पुण्य नाहीं. २ मूर्तीस भजूं नये. ३ नित्य पांच वेळां ईश्वराची प्रार्थना करावी. ४ देव एक आहे. ५ कुराण हें ईश्वरदत्त शास्त्र आहे. ६ गरीबांस धर्म करावा. ७ जो येईल त्यास आपले धर्मांत घ्यावें. ८ मद्यपान वर्जावें. ९ ईश्वराचें नांव घेऊन हिंसा केली तर तें पाप नाहीं. १० डुकराचें मांस, आपोआप मेलेल्या जनावरांचें मांस, आणि ईश्वराचें नांव घेतल्याखेरीज मारलेल्या जनावराचें मांस खाऊं नये. ११ अनुकूळ असल्यास मक्केची यात्रा करावी. १२ सुंता करावी.

. मुसलमान लोकांत मुख्य बारा इमाम मानितात. त्यांचीं नांवें.—

१ अल्ली.	४ दुसरा अल्ली.	७ सुमा.	१० चवथा अल्ली.
२ हसन.	५ महंमद.	८ तिसरा अल्ली.	११ हसन.
३ हुसेन.	६ जाफर.	९ महंमद.	१२ महंमद.

हा शेवटचा इमाम महंमद हा इ० स० ८७९ ह्या वर्षीं १२ वर्षांचा असतां मरण पावला.

सर्व मुसलमान लोक महंमदास मोठा पैगंबर, ईश्वरी पुरुष, असा मानितात. ते त्याचें नांव नुस्तें कधीं घेत नाहींत. तर त्या बरोबर लागलाच आशीर्वादही ह्मणतात. तो असा.—

महंमद मुस्तफासल्लल्लाहो.
अलेहे व आलेही व सल्लम.

ज्यास मुसलमान व्हावयाचें असतें, त्यास खालीं लिहिलेला कलमा विश्वासानें पढावा लागतो.

लाइला हाइल्लाला, महंमदुर्रसूलुल्ला.

ह्याचा अर्थ, देव एक आहे; अनेक नाहींत; व महंमद त्याचा पैगंबर

आहे, त्यानें महंमदास खरा धर्म प्रसिद्ध करण्यास योजिलें. अकबर बादशाहाचे वेळीं ज्या मोहोरा पाडिल्या, त्यांच्या एका बाजूवर हा कलमा लिहिला आहे; ह्मणून, ती मोहोर फार शुभदायक असें पुष्कळ लोक मानितात.

कोणत्याही कामास हात घालण्यापूर्वी मुसलमान लोक,

बिसिमल्ला हिर्हरमानिर्रहीम.

ह्या मंत्राचा उच्चार करितात. ह्याचा अर्थ, 'परम दयाळु परमेश्वराच्या नांवानें' असा होतो. ते परमेश्वरास 'अल्ला हुताला' ह्मणतात. कुराण हें त्यांचें धर्मशास्त्र होय. तें ते ईश्वरदत्त मानितात. दिवसांतून पांच वेळ प्रार्थना करणें ह्यास ते निमाज पढणें ह्मणतात. ते पश्चिमेकडे तोंड करून उभे राहून निमाज पढतात. निमाजाची वेळ झाली ह्मणजे,

'अल्लाहो अकबर'

ह्या निमंत्रणानें सर्वांस बोलाविताात. ह्याचा अर्थ देव थोर आहे, असा होतो. कुराणाचे अध्याय ११४ आहेत; व त्यांत पद्यें एकंदर ३००० आहेत.

मुसलमानांमध्यें मुख्य पंथ दोन आहेत. त्यांपैकीं एकाचें नांव शिया, आणि दुसऱ्याचें नांव सुनी. ह्यांचे पोटभेद पुष्कळ आहेत. शिया मुसलमान इराणांत फार आहेत; हिंदुस्थानांत थोडे आहेत. विजापूरचे बादशाहा शिया पंथाचे होते.

हिंदुस्थानामध्यें मुसलमानांचा प्रवेश कधीं झाला, व त्यांच्या राज्याचा पाया ह्या देशांत कसा पडला, ह्याविषयीं एक वेगळा निबंध ह्या पुस्तकांत पूर्वीच घातला आहे. ह्मणून त्याविषयीं येथें कांहीं लिहीत नाहीं. हिंदुस्थानामध्यें मुसलमान बहुतेक सर्वत्र आढळतात. कोंकणांत कांहीं कमी; परंतु, देशावर मुसलमान नाहीं असा बहुधा एक देखील गांव सांपडणार नाहीं. ह्या देशामध्यें जे मुसलमान आपल्या दृष्टीस पडतात, ते सर्व अस्सल मुसलमान नव्हत. त्यांमध्यें हिंदूंचे मुसलमान झालेले पुष्कळ आहेत. ह्याची सत्यता पाहाण्यास फार प्रयास नकोत. कितीएक मुसलमान कुळांस हिंदूंचीं आडनावें अद्याप चालू आहेत. इतकेंच केवळ नव्हे; तर, त्यांपैकीं कितीएक लोक शिवरात्र व एकादशी ह्यांचे उपास करितात, व कितीएकांकडे नवरात्रांचे घटही बसविताः ही गोष्ट ऐकींव नाहीं. तर आह्मीं खुद पाहिली आहे. त्यांतले एक

दोन ह्यातारे आह्मांपाशीं इतकें देखील एकदां बोलले कीं, आह्मी जसे महंमदास भजतों, तसे शिव व विष्णु ह्यांसही पूज्य मानितों.!

हिंदूंपेक्षां मुसलमान लोक फार कडक व चिडखोर असतात. त्यांस तिळभर देखील अपमान सोसावयाचा नाहीं. इकडचे नवीन झालेले मुसलमानांची गोष्ट असो; परंतु जे अस्सल मुसलमान हैदराबाद, औरंगाबाद, वगैरे शहरीं आढळतात, ते इतके तापट व स्वाभिमानी असतात कीं, जरा कांहीं झालें ह्मणजे लागलेच ते मारामारीवर येतात. ह्या गोष्टीचीं उदाहरणें मोंगलाईंत पाहिजेत तितकीं दृष्टीस पडतात. हल्लींचे राज्यकर्ते इंग्रज लोक, हे देखील मराठ्यांपेक्षां मुसलमानांशीं फार जपून वागतात, व त्यांचा योग्य मान ठेवितात; पाहिजे तसें त्यांस उगाच अद्वातद्वा बोलत नाहींत. हा प्रकार हरहमेषा पाहाण्यांत येतो.

सारख्या प्रतीच्या मुसलमान लोकांत एकमेकांची प्रतिष्ठा ठेवण्याची कांहीं पराकाष्ठा आहे. चिलीम भरून आणिली, ह्मणजे "आप लेओ, आप लेओ," ह्मणतां ह्मणतां ती निम्मे जळून जाते. उठून जावयास निघाले, ह्मणजे "आप चलो, आप चलो," ह्यावरींच घटका दोन घटका मोडतात. ते एकमेकांना सलाम कितीवेळां व किती लवून करितात, ह्याचा तर सुमारच नाहीं. कोणीं कांहीं वस्तु दिली कीं सलाम, थोडी स्तुती केली कीं सलाम, बसा ह्मटलें कीं, सलाम, असे घडोघडी सलाम होतात.

मुसलमान लोकांत स्वधर्मनिष्ठ लोक पुष्कळ आढळतात. ते निमाज पढल्याखेरीज बहुधा राहात नाहींत. कोणास इतर कांहीं विद्या येत असो किंवा नसो; परंतु निमाजाचे वेळीं जें ह्मणावें लागतें, तें, बहुतेकांस येतें. त्यांच्यांत लग्नाच्या ठरावाची रीति बहुधा हिंदूंमधील रीतीप्रमाणें आहे. ह्मणजे, तो सर्व अधिकार वधूवरांच्या आईबापांकडे असतो. परंतु अंतर एवढेंच कीं, त्यांच्यांत मुली लग्नांत बऱ्याच मोठ्या असल्या तरी चालतात. लग्नें लावण्याचा अधिकार एका काजीला मात्र दिलेला असतो. त्याखेरीज, अथवा त्याच्या हुकुमाखेरीज, लग्न लागूं नये, असा त्यांच्यांत निर्बंध आहे. ते बायकांस लिहिणें वाचणें घरींच शिकवितात. त्यांची पडदपोशी फार आहे. त्या कधींही उघडपणें जातांना पुरुषांच्या दृष्टीस पडत नाहींत. तथापि हा गोशा हलक्या प्रतीच्या मुसलमानांत नसतो.

मुसलमानांमध्यें हा एक गुण फार विलक्षण आहे कीं, ते, आपल्या वाड-

वडिलांच्या धर्माविषयीं, रीतीभातींविषयीं, व विद्येविषयीं विचार न करिता, व त्यांत बरें वाईट काय आहे हें न पाहतां, नेहमीं त्यांस धरून राहातात; इतकेंच केवळ नव्हे, तर आपले लोकांची स्थिति दुसऱ्या लोकांच्या स्थितीशीं ताडून पाहात नाहींत, आणि इतरांची तशी कां व आपली अशी कां ह्याचा विचार करीत नाहींत. हें चांगलें नव्हे. ह्या रीतीनें त्यांची सुधारणा व्हावयाची नाहीं. आतां ह्मणतों ह्याची सत्यता पाहाणें असल्यास ह्या देशांतील शाळांकडे किंचित् लक्ष द्यावें. ह्मणजे असें सहज लक्षांत येईल कीं, अहमदनगरासारख्या शहरांत, ह्मणजे जेथें हिंदु व मुसलमान ह्यांची बहुधा सारखी वस्ती आहे, अशा ठिकाणीं, शाळांतील मुलांमध्यें शेंकडा १० किंवा १५ मुसलमानांचीं मुलें सांपडतात. ह्याचें कारण हेंच कीं, देशांतील इतर लोकांच्या स्थितीमध्यें जरी इतका फरक पडला आहे, तरी ते लोक आपल्या पूर्वजांची रीति न सोडितां, ती होईल तितकी बळकट धरून चालण्याविषयीं नेहमीं यत्न करीत असतात. आणखी दुसरें प्रमाण; मुसलमान लोक ह्मटले ह्मणजे पहिल्यापासून शिपाई; त्यांस कारकुनीचा धंदा ठाऊक नाहीं; ह्मणून ते लोक सांप्रतकाळीं जितके लष्करामध्यें आढळतात, तितके इतर कचेऱ्यांतून आढळत नाहींत.

मुसलमान लोक शरीरानें सुदृढ, दिसण्यांत सुरेख, आणि मतीनें बुद्धिमान् आहेत. ते बहुधा इमानी असतात. ते आधीं कोणाच्या वाटेस जावयाचे नाहींत; आणि त्यांस विनाकारण कोणीं त्रास दिला, तर त्याची खोड मोडल्याखेरीज ते राहावयाचे नाहींत. ते आपणांस इमानी ह्मणवितात. धर्माच्या संबंधानें अथवा स्त्रियांच्या संबंधानें त्यांची कोणीं चेष्टा केली, तर ती त्यांस सोसत नाहीं. आजपावेतों इंग्रज सरकारच्या राज्यांत ह्या लोकांच्या हातून जे दंगे झाले, त्यांपैकीं बहुतेकांस धर्मसंबंधी कारण होतें, असें इतिहासावरून स्पष्ट दिसून येतें.

प्लासीची लढाई.

इ० स० १७५७.

इंग्लिशांस हिंदुस्थानामध्यें राज्य मिळालें, त्याचा मूळ पाया, त्यांनीं प्लासीची लढाई जिंकिली तेव्हां पडला, असें झटल्यास चिंता नाहीं. बंगाल्याचा सुभेदार सुराजउद्दवला ह्याचें त्यांशीं किती रहस्य होतें, हें कलकत्त्याच्या कोंडमाऱ्याच्या हकीकतीवरून वाचणाऱ्यांच्या लक्षांत आलेंच असेल. तो अनर्थ गुदरल्यानंतर इंग्लिशांनीं कलकत्ता परत घेतला, सुभेदारास चांगला हात दाखविला, त्याची बरीच खोड मोडिली, आणि कितीएक वेळां त्यानें त्यांशीं तहाचें बोलणें लाविलें. पण हा सगळा जुलमाचा रामराम होता. उभय पक्षांचे मनांत परस्परांविषयीं द्वेषाग्नि धुमसत होता. त्यांत सुराजउद्दवल्याचें आचरण इतकें त्रासदायक असे कीं, त्याचा जाच त्याच्या दरबारच्या लोकांस दुःसह होऊन, त्यांनीं त्यास पदच्युत करण्याचा गुप्त बेत ठरविला. सुभेदाराचा सेनापति मीरजाफर हा त्यांत मुख्य होता. कट करणाऱ्यांनीं असें मनांत आणिलें कीं, इंग्लिश लोक ह्या चांडाळास पाण्यांत पाहात आहेत, आणि ते ह्यास पुरून उरण्यासारखे प्रबलही आहेत, ह्यास्तव ते ह्या प्रसंगीं आपणांस अनुकूल होतील तर बरें होईल. ह्मणून तो विचार त्यांनीं गुप्तपणें कलकत्ता येथील इंग्लिश लोकांस कळविला. आपण एवढ्या साहसकर्मांत पडावें, किंवा न पडावें, ह्याविषयीं तेथें पुष्कळ वाटाघाट होऊन, शेवटीं, रावर्ट क्लैव नामक साहेबाच्या आग्रहावरून, मुर्शिदाबादकरांच्या बेतास इंग्लिशांनीं रुकार दिला. ह्यास मूळ कारण त्यांनीं असें लाविलें कीं, इ० स० १७५७ च्या फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस सुराजउद्दवल्यानें जो तह त्यांशीं ठरविला होता, त्याप्रमाणें त्याजकडून आचरण झालें नाहीं.

सुराजउद्दवल्यास पदच्युत करून मीरजाफरास गादीवर बसविण्याचा निश्चय झाल्यावर, नवीन होणाऱ्या सुभेदारानें इंग्लिश लोकांशीं कांहीं करार केले. त्यांतील हांशील येणेंप्रमाणें.— " १, माझ्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी ह्या खालीं लिहिलेल्या करारांप्रमाणें वागेन, हें मी परमेश्वरस्मरण करून शपथपूर्वक सांगतों. २, युरोपांत किंवा आशियांत जे इंग्लिशांचे शत्रु ते माझे शत्रु, असें मी समजेन. ३, बंगाल, बहार, आणि ओढ्या, ह्या

प्रांतांतील फ्रेंचांच्या वखारी जप्त करून, त्यांतला माल मी इंग्लिशांस देईन; आणि त्या लोकांस मी आपल्या राज्यांत राहूं देणार नाहीं. ४, इंग्लिश कंपनीच्या नुकसानीबद्दल, व त्यांच्या फौजेच्या खर्चाकरितां एक कोटि रूपये देईन. ५, कलकत्त्यांत राहणाऱ्या इंग्लिश लोकांस ५००००० रूपये देईन. ६, कलकत्त्यांतील हिंदु व मुसलमान लोक ह्यांस २००००० रूपये देईन. ७, आर्मिनियन लोकांस ७००००० रूपये देईन. ८, जमीनदार लोकांची मराठादिच्च्या* आलीकडील जमीन व शिवाय पलीकडील ६०० यार्द जमीन मी इंग्लिशांस देईन; तिजबद्दल त्यांनीं रीतीप्रमाणें सारा भरावा. ९, कलकत्त्याच्या दक्षिणेकडे †कालपीपर्यंत जमिनीची जमीनदारी मी इंग्लिश कंपनीस देईन; तिचाही सारा त्यांनीं दिला पाहिजे. १०, मला मदत देण्याकरितां जें सैन्य इंग्लिशांस ठेवावें लागेल, त्याचा खर्च मी पुरवीत जाईन. ११, हुगळीच्या खालीं गंगानदीजवळ मी किल्ले बांधणार नाहीं. १२, सदरीं सांगितलेल्या रकमा मी गादीवर बसल्यावर देईन.'' इतके करार मीरजाफराच्या पक्षाकडून झाल्यावर, खालीं १३ वा करार इंग्लिशांनीं असा कबूल केला कीं, ''आह्मी खालीं सह्या करणारे इंग्लिश लोक स्वधर्माप्रमाणें ईश्वरस्मरण करून असें सांगतों कीं, सदरहू सुभेदारानें लिहून दिलेले करार त्याजकडून पुरे झाल्यावर, त्याचें साह्य करण्यास व इष्ट कार्य साधण्यास आह्मांकडून किमपिही अंतर होणार नाहीं.''

सुराजउद्दवल्याशीं खचीत युद्धप्रसंग करावयाचा; युद्ध चाललें ह्मणजे मीरजाफर त्याचें सैन्य सोडून इंग्लिशांकडे यावयाचा; आणि त्यानें तसें केलें ह्मणजे सुराजउद्दवल्याचा खचीत पराभव व्हावयाचा; असा सिद्धांत ठरला. क्लैवसाहेब २१०० काळे लोक व ९०० गोरे लोक बरोबर घेऊन तत्काळ निघाला, तो प्लासीच्या मैदानांत येऊन तळ देऊन राहिला. तिकडून सुभेदारही, ५०००० पायदळ, १८००० स्वार, आणि ५० तोफा, अशा प्रचंड सैन्यासहवर्तमान तेथें पूर्वीच येऊन दाखल झाला होता.

---

* दिच्च हा इंग्रेजी शब्द आहे, त्याचा अर्थ खंदक. मराठे लोकांपासून संरक्षण व्हावें, ह्मणून कलकत्त्यातील लोकांनीं एक खंदक खणला, त्यास मराठादिच्च ह्मणत.

† यमुनेच्या काठीं मोठें कालपीशहर आहे तें वेगळें; ही कालपी कलकत्त्यापासून सुमारें १५ कोसांवर आहे.

तारीख २३ माहे जून सन १७५७ रोजीं प्रातःकाळीं युद्धास आरंभ झाला. प्रथम सुभेदाराने तोफांची सुरवात केली. परंतु इंग्लिश सैन्य उतरलें होतें त्या आंबराईभोंवतीं उंच दरड होती, तेणेंकरून त्यांचा पुष्कळ बचाव झाला. इंग्लिशांकडे तोफा सगळ्या आठ होत्या. परंतु ते तेवढ्याच बरोबर नेम धरून मारीत, तेणेंकरून शत्रूचा फार नाश होई. असें दुपारपर्यंत चाललें. पुढें एक मोठी पावसाची सर आली. तेव्हां सुभेदाराकडच्या तोफा बंद पडल्या. ह्मणून तिकडचे स्वार मोठ्या आवेशानें इंग्लिशांच्या फौजेवर पडण्यास निघाले. परंतु ते, इकडील तोफांच्या नेमशुद्ध भडिमाराच्या योगानें मागें हटले. तीन वाजले. इतक्यांत सुभेदाराच्या मीर मदेननामक एका मोठ्या सरदारास गोळी लागून, तो मरण पावला. आणि मीरजाफरानें, निमकहरामपणानें, सैन्यास मागें फिरण्याचा हुकूम केला. तेणेंकरून तें पळत सुटलें. खुद सुराजउद्दवला देखील घाबरला. आपणास यश खचीत मिळत नाहीं, असें त्यास वाटलें. ह्मणून त्यानेंही लोकांस मागें फिरण्यास हुकूम केला. त्याप्रमाणें ते निघाले, असें पाहून क्लैवसाहेब त्यांचेमागें लागला. तो त्यांचा पाठलाग करीत अगदीं त्यांच्या छावणीपर्यंत आला. आणि तेथें जो हल्ला त्यानें त्यांजवर केला, त्याच्या योगानें ते अतिशयित नाश पावले. त्यांच्या पराभवाविषयीं व इंग्लिशांच्या जयाविषयीं कांहीं संशय राहिला नाहीं. ह्या समरांत इंग्लिशांकडचे ७२ मात्र लोक जायां झाले; परंतु सुराजउद्दवल्याचे निदान ५०० तरी शिपाई प्राणांस मुकले असावे, असें स्वतः क्लैवसाहिबानें एके ठिकाणीं लिहिलें आहे.

मीरजाफर हा इंग्लिशांस जाऊन मिळाल्याचें वर्तमान सुराजउद्दवल्यास कळतांच तो एका सांडणीवर बसून जो तेथून पळाला, तो नीट मुर्शिदाबादेस आपल्या वाड्यांत आला. पण तितक्यांत त्या शहरामध्यें मीरजाफर प्राप्त झाला, अशी वार्ता समजतांच तो आपल्या एका प्रिय वेश्येसहवर्तमान तेथून पळून गेला. पुढें त्याला पकडलें; आणि मीरजाफराचा मुलगा मीरन ह्यानें त्यास त्याच्या वाड्यांतल्या एका कोठडींत कोंडून मारेकऱ्यांचे हातून ठार मारविलें. या वेळची अशी एक गोष्ट सांगतात कीं, त्या चांडाळांनीं त्यास अंतकाळीं देवाचें नांव घेण्यास देखील अवकाश दिला नाहीं. पहा, पाप्यांचा शेवट कसा भयंकर होतो तो. !

प्लासीच्या विजयानंतर क्लैवसाहेब व मीरजाफर हे मोठा जयजयकार क-

रीत मुर्शिदाबादेस गेले. क्लैवसाहेबानें मोठा समारंभ करून मीरजाफरास सुभेदारीचे गादीवर बसविलें. मी आज कृतकृत्य झालों, असें त्या वेळीं मीरजाफरास वाटलें. नंतर इंग्लिशांकर द्रव्याचा केवळ पाऊस पडला. नवा सुभेदार समजूं लागला कीं, माझे पुरस्कर्ते कायते हे; तेव्हां मीं ह्यांस जितकें द्रव्य अर्पावें तितकें थोडेंच. ७२७१६६६ नक्त रुपये, ७०० पेट्यांमध्यें गच्च भरून, त्या १०० होड्यांवर लादून, इंग्लिशांनीं गाजतवाजत मुर्शिदाबादेहून कलकत्त्यास आणिल्या. ओर्म ह्मणून एक विख्यात ग्रंथकार ह्याविषयीं असें लिहितो कीं, एवढी रोख रकम आणि एकदम, अशी इंग्लिशांस ह्या पूर्वी कधींही मिळाली नव्हती.

ह्या समरांगणामध्यें इंग्लिशांनीं आपला प्रबळ शत्रु नष्ट केला, इतकेंच नाहीं; तर, बंगाला, बहार, आणि ओढ्या ह्या प्रांतांचें राज्य मिळविलें, असें ह्मटलें पाहिजे. कारण, सुराजउद्दवल्याचे मागें, इंग्लिश लोक करतील तो बंगाल्याचा सुभेदार, असें झालें. मीरजाफर गादीवर बसला, आणि त्यानें इतकें द्रव्य त्यांस दिलें, तरी थोडक्याच महिन्यांनीं पुढें उभयपक्षीं कुरबुरी उद्भवून वैमनस्य पडलें. इंग्लिशांनीं मीरजाफरास गादीवरून काढून, मीरकासिम नामक मनुष्यास सुभेदार केलें. त्याशींही त्यांचें नीटसें बनेना. ह्मणून त्यास पदच्युत करून, त्यांनीं मीरजाफरास पुनः सुभेदारीचीं वस्त्रें दिलीं. ही इतकी खटपट पैशासाठीं. जो पुष्कळ पैसा देईल, व आपले ह्मणण्याप्रमाणें वागेल, त्यास नवाब करावयाचा, असा त्यांचा क्रम चालला. असें होतां होतां बंगाल्याच्या गादीच्या मूळ मालकाच्या वंशजांस कांहीं वेतन ठरवून देऊन, त्यांचें सर्व राज्य इंग्लिशांनीं आपणांकडे घेतलें. ह्या प्रकारेंकरून इंग्लिशांस बंगाल्याचें राज्य मिळालें.

हिंदुस्थानच्या इतिहासामध्यें प्लासीची लढाई ही मोठ्या महत्वाची गोष्ट होय. कारण, तिजवरून सर्व देशाच्या स्थितींत विलक्षण फेरफार झाले. मल, सार्वभौम राजाचा असो, अथवा अजिंक्य पंडिताचा असो, त्यापासून दुर्गंधि, आणि या दुर्गंधीपासून त्रास, हा खचीत उत्पन्न व्हावयाचा. सुराजउद्दवला आपल्या दुर्गुणांनीं बुडाला. त्याजपाशीं फौज कमी नव्हती. इंग्लिशांच्या फौजेच्या सोळापटीहूनही थोडी अधिक होती, असें ह्मटल्यास चिंता नाहीं. शिवाय फ्रेंच लोक त्याला सहाय होते. इतकें असून तो पराभव कसा पावला? इंग्लिशांच्या पक्षीं जास्त ह्मणण्यासारखी काय ती कवाईत होती.

तीही सुभेदाराच्या सैन्यास अगदींच माहीत नव्हती, असें नाहीं. तरमग त्याचा मोड कां झाला. ? ह्याचें उत्तर आमच्या बुद्धीस असें येतें कीं, हा इतका दुष्ट परिणाम फितुरदनें केला. आधींच सर्व लोक सुभेदारास त्रासलेले, आणि त्यांत मुख्य सेनापति प्रतिपक्षास अनुकूल, मग जय कोठून प्राप्त होणार. ? मीरजाफर अमळ कच्चा धैर्याचा ह्मणून. नाहींपेक्षां, युद्ध सुरू होतांच आपले लोकांसहवर्तमान जर इंग्लिश लोकांस येऊन मिळता, तर इतका समर माजताही ना. सुराजउद्दवला फटकर हातीं लागता, इतके जीव विनाकारण मेले नसते, व इंग्लिशांस फार श्रमही न पडते. पण तसें झालें नाहीं. असो.

इंग्लिश लोकांचें दैव मोठें. त्यांस हिंदुस्थानामध्यें आधीं बंगाला मिळाला. त्याच्या राज्यक्रांतीच्या खटपटींत त्यांनीं पापपुण्य न्यायान्याय न पाहतां पाहिजे त्या कर्मानें इतका पैका ओढिला कीं, त्याच्या रकामा लिहिल्या असतां कोणाला खऱ्या देखील वाटावयाच्या नाहींत. मीरजाफराला प्रथम गादी मिळाली, तेव्हां खुद क्लैवसाहेबाचे एकट्याचे वांट्यास सुमारें ३००००० रुपये नक्त आले. इ० स० १७६० त मीरकासिम सुभेदारीवर आला, तेव्हां ग्वायर नामक साहेबास एकट्यास ९००० मोहरा मिळाल्या. अशा रकमा दाहा पांच नाहींत; शें पन्नास नाहींत; तर पांच चारशें आहेत. त्यांची बेरीज किती घ्यावी. ? आणि घेऊन तरी उपयोग काय. ? तें सगळें भांडार आपल्या देशाबाहेर गेलें. हें हिंदुस्थान त्यास आतां मुकलें. हें कशामुळें. ? तर सुराजउद्दवल्यासारखे दुर्गुणी राजे गादीवर आल्यामुळें. ! अशा पुरुषाचे तीं राष्ट्र जाणें, हें त्या राष्ट्राचें मोठें दुर्दैवच समजलें पाहिजे. बोलून चालून दैवच तें ! देवापेक्षां देखील एक मात्रा त्याला जास्ती ! तेव्हां त्याजपुढें कोणाचें चालणार. ?

उमीचंद.

इ० स० १७५७.

द्रव्यलोभी मनुष्य पैशाकरितां काय करील, त्याचा नेम नाहीं. लोभ, क्षोभ, माया, ममता, स्नेह, शत्रुत्व, हीं सर्व त्यार्चीं द्रव्यार्थ असतात. कोणी मरो

कीं तरी, तो आपली सर्व नजर द्रव्यावर ठेवितो; पैसा मिळावयाचा प्रसंग आला, ह्मणजे लाज किंवा लौकिक ह्यांजकडे तो पाहात नाहीं. पांचचारशें वर्षांचें आपल्या कुळाचें नांव गेलें, तरी कबूल; पण कशी तरी पिशवी भरो, असें त्याला वाटतें. पैसा त्याचा देव आणि तो पैशाचा भक्त, असें ह्मटलें तरी चालेल. अशा पुरुषास दुरून नमस्कार असो. शाहाण्यानें त्याचे वाऱ्यास देखील उभें राहूं नये. असे लोक ज्या कामांत पडतील, त्याची घाण झाल्यावांचून रहावयाची नाहीं. ज्याचें नांव आह्मीं ह्या विषयाच्या माथ्यावर लिहिलें आहे, तो मनुष्य ह्या प्रकारचा होता. ह्याची चमत्कारिक गोष्ट वाचणाऱ्यांस येथें सादर करितों.

उमीचंद ह्मा एक बंगाली व्यापारी होता. तो मोठा श्रीमान् असून कलकत्त्यांत राहात असे. इंग्लिश लोक त्याला शाहाणा व चतुर समजत. सुराजउद्दवल्यास गादीवरून काढण्याच्या कटांत, इंग्लिशांच्या वतीनें दोन असामी प्रमुख होते; एक वाट्ससाहेब, आणि दुसरा उमीचंद. एवढ्या मोठ्या महत्वाच्या कटांत इंग्लिशांनीं आपले पक्षाकडे ह्मा बंगाली सावकारास घेतलें, ह्याचें कितीएकांस नवल वाटतें. परंतु, तो कट एतद्देशीय लोकांच्या अनुमतानें व करारानें पुरा व्हावयाचा होता, व सिद्धीस जावयाचा होता, तेव्हां त्यांच्यांतला कोणी खांचीखोंची जाणणारा मनुष्य आपलेकडे अवश्य पाहिजे, असें त्यांस वाटल्यावरून त्यांनीं त्यास अनुकूल करून घेतलें असावें, असा अदमास आहे. आणखी असें कीं, सुभेदारानें कलकत्त्यावर धाड घातली, तेव्हां त्या सावकाराचें फार नुकसान झालें होतें. तेणेंकरून तो त्याचे नांवानें दगड फोडीतच होता. तथापि, इंग्लिश लोक व मूर्शिदाबादचें दरबार ह्यांचें मध्यस्थपण तो करी. त्यांत पुष्कळ वेळां त्यास शाबासकीही मिळाली. स्वजातीच्या लोकांत त्याचें वजन फार असे. तो मोठा धूर्त, चाणाक्ष, चतुर, दृढ निश्चयाचा, कवडीसाठीं प्राण देणारा, आणि विश्वासघातकी, असा होता.

सुराजउद्दवल्याच्या नाशाविषयींचा कट अगदीं पक्क झाला. त्यांत कांहीएक उणिव राहिली नाहीं. आणि त्या कृत्यास आतां एकदम आरंभ करावयाचा, इतक्यांत क्लैवसाहेबास असें वर्तमान समजलें कीं, उमीचंदास त्याच्या हानीबद्दल जी रकम द्यावयाची ठरली आहे, तेवढीनें तो तृप्त न होतां, कांहीं कपट कर्में करून आणखी पैसा मिळवूं इच्छितो; आणि जर त्याची

इच्छा पूर्ण न होईल, तर तो हें सगळें खलबत सुराजउद्दवल्याचे कानावर घालणार. आणि सगळ्या कटवाल्यांस खचीत ठाऊक होतें कीं, जर हा बंगाली पुरुष सुभेदाराच्या कानांत मुद्याचे एकदोन शब्द बोलला, तर मीरजाफर, वात्ससाहेब, व इतर मसलती लोक, ह्यांचें तो तत्काळ चंदन उडवील. उमीचंदाचें मागणें तरी लहान होतें काय.? तो ह्मणे कीं, तीस लक्ष रुपये मला पाहिजेत; आणखी सर्व देणग्यांवर शेंकडा पांच रुपयेप्रमाणें मला दस्तुरी मिळाली पाहिजे; तें सर्व मला मिळावें, अशाविषयीं नुसतें तोंडचें वचन उपयोगीं नाहीं; तर, मीरजाफर व इंग्लिश ह्यांचा जो करारनामा ठरला आहे, त्यामध्यें हें कलम घातलें पाहिजे; आणि जेव्हां मी स्वतः नजरेनें तें त्यांत पाहीन, तेव्हांच स्वस्थ राहीन. हें ऐकून सर्वांस मोठा विचार पडला. आतां काय करावें.? कोणाला कांहीं तोड सुचेना. पण क्लैवसाहेब शेरास सव्वाशेर भेटला. त्यानें बोलतां बोलतां उमीचंदाचे डोळ्यांत माती टाकिली. ती अशी. त्यानें दोन करारनामे तयार केले; एक पांढऱ्या कागदावर आणि दुसरा तांबड्या कागदावर. त्यांपैकीं पांढऱ्यावरचा खरा, त्यांत उमीचंदाचें नांव देखील नव्हतें. आणि तांबड्यावरचा खोटा, त्यांत त्याचे ह्मणण्याप्रमाणें कलम घातलें होतें. तो तांबडा कागद त्या अधाशी सावकारास दाखविला. त्यांतलें आपणाविषयींचें कलम पाहून तो परम समाधान पावला. त्याला वाटलें कीं, आतां आपल्या तीस लक्ष रुपयांस आणि वरच्या दस्तुरीस कांहीं मरण नाहीं. ह्या खोट्या कागदावर वात्सनसाहेब सही करीना. ती क्लैवसाहेबानें हुबेहुब त्याच्यासारखी आपल्या हातानें काढिली. हें त्यानें फार वाईट व पाजीपणाचें कृत्य केलें, असें मोठमोठ्या विचारी इंग्लिश ग्रंथकारांचें ह्मणणें आहे.

हे करारनामे तयार होऊन दप्तरांत पडले; प्लासीची लढाई झाली; सुराजउद्दवला मारला गेला; मीरजाफर गादीवर बसला; आणि जिकडे तिकडे बंदीच स्वस्थता झाली. इंग्लिश लोक अत्यंत समाधान पावले. पुढें, एके दिवशीं, करारनाम्याप्रमाणें सगळी व्यवस्था लावण्याकरितां, कटांतील सारी मंडळी जगत्शेट ह्मणून एक मोठा श्रीमान् सावकार होता त्याचे घरीं जमली. त्या वेळेपर्यंत क्लैवसाहेब उमीचंदाशीं अशा उत्कृष्ट बाह्यप्रेमानें वागत होता कीं, माझा खरा हितकर्ता काय तो क्लैवसाहेब, असें त्यास वाटत होतें. सर्व मंडळी बसल्यावर, पांढऱ्या कागदावरचा करारनामा वाचिला. नंतर क्लैव-

साहेब, स्क्राफ्तन नामक दुसऱ्या एका साहेबाकडे तोंड करून इंग्रजींत बोलला, "अहो, आतां ह्या उमीचंदाची टाका शांति फेडून परती एकदा." हें ऐकून तो साहेब, उमीचंदाकडे वळून हिंदुस्थानी भाषेंत ह्मणाला, "शेट-साहेब, तांबडा करारनामा खोटा आहे; तुह्मांला कांहींएक मिळावयाचें नाहीं." हे शब्द कानीं पडतांच, तो महान् द्रव्यलोभी सावकार बेशुद्ध होऊन, मागें हुजऱ्ये उभे होते, त्यांचे अंगांवर धाडकन पडला, परंतु थोड-क्याच वेळानें तो पुनः सावध झाला. तरी तेव्हां त्याचे मनाला जो धक्का बसला, तो बसलाच. तो त्याचा शेवटपर्यंत गेला नाहीं. पुढें तो भ्रमिष्ट झाला. आणि तशीच त्याची प्रकृति दिवसें दिवस बिघडत जाऊन, शेवटीं दिवाना होऊन तो मरण पावला. अति द्रव्यलोभाचा परिणाम पहा कसा दुःखप्रद होतो तो.

उमीचंदाची गोष्ट, कुत्रा आणि त्याचें प्रतिबिंब, ह्या गोष्टीसारखी झाली. जें काय सुख आहे तें संपत्तींत, जितकें जितकें द्रव्य अधिक, तितकें तितकें मनुष्यास सुख अधिक, असें तो समजे. आणि आपल्या पूर्वीच्या दौलतीस तीस लाख रुपयांहून अधिक भर घातली, ह्मणजे आपल्या सुखास भर पडेल, अशी त्याला आशा होती. ह्मणून तो तें मिळवावयास गेला. पण संपादनमार्ग पडला खोटा. तो कशाचें त्याला सुख मिळूं देतो.? त्या कपट-पातकानें त्यास जास्ती तर सुख प्राप्त झालें नाहींच; पण पूर्वीच्या द्रव्यापासून जें कांहीं त्याला सुख होत असे, तें मात्र त्याचें नाहींसें केलें. ह्मणजे असें कीं, तो त्या धक्क्यानें दिवसें दिवस वेडाळत चालला. तेव्हां त्याला सुख काय आणि दुःख काय.? सगळेंच सारखें वाटूं लागलें. ह्यावरून लोभातिशयानें उमीचंदास कसें मातीस मिळविलें, हें सहज लक्षांत येईल.

ह्या लेखांत आणखी एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे. ती ही. क्लैवसाहेबानें बंगाली कपटी मनुष्यास खोट्या कागदाचें कपट करून फसविलें, हें चांगलें कीं वाईट ? ह्याविषयीं ग्रंथकारांचीं मतें भिन्न भिन्न पडतात. कोणी क्लैवसाहेबाला शाबास ह्मणतात, व कोणी दोष देतात. वास्तविक पाहिलें असतां, क्लैवसाहेबानें त्या नीच कर्मे करून इंग्लिशांच्या नांवास बट्टा लाविला, ह्यांत कांहीं संशय नाहीं. कितीएक असें ह्मणतात कीं, उमीचंदास कुमार्गानें फसविलें, ह्यांत क्लैवसाहेबानें मोठें शहाणपण केलें असें नाहीं; कारण, तें कोणीही सामान्य मनुष्य करता. अनीतीच्या कामास न प्रवर्तता

जर तो दुसरी तजवीज काढून आपलें कार्य साधिता, तर त्यास मोठा चतुर ह्मणण्यास व मोठेपण देण्यास कांहीं हरकत नाहीं. खुद क्लैवसाहेबाचें मत, तो मरेपर्यंत देखील एकसारखें असें होतें कीं, "उमीचंदाविषयीं जें मीं केलें, तें अगदीं बरोबर केलें, आणि कपटी मनुष्याशीं मला पुनः तसा प्रसंग आला, तर मी पुनरपि शतदा तसेंच करीन." असें तो दाहा लोकांत स्वमुखें बोलत असे. त्याचें मत असें होतें कीं, जो कांटा आहे, तो कांट्यानेंच काढावा; तेथें केशरकस्तूरी किंवा मोहोर ह्यांचा कांहीं उपयोग नाहीं. तो कांहीं ह्मणो. दुष्कर्म त्याचे हातून घडलें, ह्याविषयीं कांहीं संशय नाहीं. आणि ही गोष्ट लिहिण्यास इंग्लिश ग्रंथकारांस पराकाष्ठेची लाज वाटते. सोमल खरोखर विष आहे; परंतु मनुष्याला कितीएक रोग असे जडतात कीं, त्यांच्या निवारणार्थ तें विष सेवावें लागतें; एरव्हीं ते दूर होतच नाहींत. त्याप्रमाणें कपट हें विष खरें; तरी दुनयेंत असे कितीएक महापुरुष आहेत कीं, त्यांजपासून आपला बचाव करून घ्यावयाकरितां त्या विषाचें साह्य घेतल्यावांचून सज्जनांचें सुद्धां चालत नाहीं; असें कांहीं लोकांचें ह्मणणें पडतें; परंतु हें मत चांगलें नाहीं, असें मला वाटतें.

हैदरअल्ली.

इ० स० १७६१.

आमचे लोकांत ह्मण आहे कीं, पुरुषाचें भाग्य केव्हां कसें उघडेल, ह्याचा कांहीं नियम नाहीं. हें ह्मणणें स्त्रीजातीसही लागू आहे, असें आह्मांस वाटतें. परंतु ही एक गोष्ट विशेष लक्षांत ठेविली पाहिजे कीं, मनुष्य एकाएकीं रंकाचा राय होणें, हें कमी सुधारलेल्या अथवा रानटी अज्ञान लोकांमध्यें जसें हरहमेष घडतें, तसें चांगल्या सुधारलेल्या ज्ञानसंपन्न लोकांत घडत नाहीं. हैदरअल्ली ह्मणून जो पुरुष हिंदुस्थानाच्या इतिहासांत फार प्रसिद्ध आहे, त्याची हकीकत ह्या प्रकारची आहे. ती येथें थोडक्यांत लिहितों.

हैदरअल्लीचा मूळ पुरुष ह्मटला तर पंजाबांतला होता. त्यास दारिद्र्यानें

गांजिल्यामुळें, तो पोट भरण्याकरितां दक्षिणेंत आला. त्याचा कोणी वंशज, फत्तेमहंमद, म्हैसूरप्रांतामध्यें कोलारच्या सुभेदाराच्या आश्रयानें वीस शिपायांची नाइकी पावला. तेव्हां त्याला फत्तेनाईक म्हणूं लागले, पुढें तो वारला. तेव्हां त्याला दोन मुलगे होते. एक शाहबाज, तो नऊ वर्षांचा होता, आणि दुसरा हैदर, इ० स० १७०२ त जन्मलेला, तो सात वर्षांचा होता. फत्तेनाईक मरण पावल्यावर त्याच्या बैऱ्यांनीं त्याच्या बायकामुलांची भारी दुर्दशा केली; त्यांजपाशीं जें कांहीं होतें नव्हतें, तें सगळें बुचाडून घेतलें. तेव्हां ती विधवा बिचारी गाय होऊन तेथून निघून, बेंगळुरास तिचा भाऊ इब्राहीम, किल्लेदाराच्या हाताखालीं नौकरीस होता, त्याजपाशीं येऊन आपल्या मुलांसहवर्तमान राहिली. शाहबाज बराच वयांत आल्यावर, त्यास श्रीरंगपट्टणच्या लष्करांत इब्राहिमानें नौकरी लावून दिली. तेथें त्याच्या शौर्याविषयीं व शाहाणपणाविषयीं चांगली ख्याति झाल्यावर, त्यास १००० पायदळ, व २०० स्वार इतकें सैन्य आपले हाताखालीं ठेवण्याची परवानगी मिळाली. ह्याप्रमाणें शाहबाज हा शाबासकी मिळविण्याच्या क्रमास लागला.

पण हैदराचीं तशीं कांहींच लक्षणें प्रथम दृष्टीस पडलीं नाहींत. ह्याला शिकारीचा शोक फार असे. त्यानें शिकारीस रानांत जावें, तें आठ आठ दहा दहा दिवस घराचें नांव सुद्धां घेऊं नये; जेवणखाण, निजणें बसणें सगळें तिकडेच. तो स्वभावतःच अतिशयित व्रात्य असे; दांडगा तर मनस्वी; आणि दुर्व्यसनी अगदीं पहिल्या प्रतीचा. अशा मूर्खत्वांत त्यानें आपल्या आयुष्याचीं पहिलीं ४७ वर्षें घालविलीं. पुढें, आपण कांहीं रोजगार करावा, असें त्याच्या मनांत आलें. त्यावरून इ० स० १७४९ त, म्हैसूरचें सैन्य देवन्हल्लीच्या किल्ल्यास वेढा घालीत होतें, त्यांत त्याचा भाऊही होता, त्यास जाऊन हैदर. आपल्या खुषीनें मिळाला. आणि तेथें त्यानें असें शौर्य दाखविलें कीं, म्हैसूरच्या राजाचा मुख्य सेनापति नंदराज हा त्याजवर बहुत खूष होऊन, त्यानें त्यास ५० स्वार व २०० पायदळ, इतक्यांचा मुख्य केला; आणि त्यास त्या किल्ल्याच्या एका दरवाज्यावर बंदोबस्तास नेमिलें.

हैदराबादेच्या गादीचा मालक नासिरजंग हा पराभव पावला; त्या वेळीं फ्रेंचांस साह्य करण्याकरितां, व्यंकटराव बक्षी ह्या सेनापतीबरोबर हैदरअल्ली तेथें गेला होता. नासिरजंग हतवीर्य झाला असें पाहतांच, त्याचा खजीनदार चांगला चतुर होता, त्यानें त्याची सगळी दौलत उंटांवर भरली; त्यांतले जवा-

वाहिरानें लादलेले दोन उंट, हैदरानें त्या गर्दींत गफलत करून, आपल्या लोकांबरोबर देवन्हल्लीच्या किल्ल्यावर पाठविले. ह्या प्रसंगीं त्याजपाशीं ३०० निवडक बेदर शिपाई होते. ते शूर, आपल्या धन्याशीं प्रामाणिक, व अट्टल चोर असत. त्यांस हैदरानें हुकूम केला कीं, हा परक्या राजाचा मुलूख तुह्मी बेलाशक पाहिजे तितका लुटा; परंतु लुटींचा अर्धा ऐवज मला द्या ह्मणजे झालें. मग काय विचारावें.? आधींच चोर आणि त्यांत लुटायास यजमानाची आज्ञा.! त्या तीनशें चोरांनीं इमानें इतबारें अर्धी लूट त्यास आणून देण्याचा सपाटा चालविला. अशा प्रकारेंकरून थोडक्याच काळांत हैदर मोठा संपत्तिमान् होऊन गेला. नंतर तो इ० स० १७५५ त त्रिचनापल्लीहून निघाला; तेव्हां त्याजपाशीं १५०० स्वार, ३००० लढाऊ कवाईत शिकलेले लोक, २००० इतर शिपाई, व ४ तोफा इतकें सैन्य होतें, व त्याचा पगार त्यास म्हैसूर सरकारांतून मिळे.

म्हैसुरच्या दरबारांत हैदराच्या शौर्याची फार वाहवा झाल्यावरून, त्यास इ० स० १७५५ ह्या वर्षीं दिंदिगल* येथें फौजदार नेमिलें. त्या किल्ल्याजवळ पाळेगार लोक फार होते; ते कधीं कधीं पुंडावा करीत; त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां नंदराजानें ही योजना केली होती. हैदरही त्या लोकांस जाणून होता. तो त्यांच्या प्रांतांतून येऊं लागला, तेव्हां त्यानें त्यांस थापा देऊन असें गोंजारिलें कीं, त्यांनीं त्याच्या लोकांला अगदीं देखील इजा दिली नाहीं. परंतु तो आपल्या किल्ल्यांत येऊन पोहोंचतांच, त्यानें आपलें खरें स्वरूप प्रकट केलें. त्यानें तत्काळ आपलें लुटारू लष्कर जवळच्या मुलुखांत पाठविलें; लोकांचीं बायकामुलें व गुरें जीं त्यांच्या हातीं लागलीं, तीं त्यांनीं धरून आणिलीं; आणि तीं त्यांच्या मूळच्या धन्यांसच, पाहिजे तितकी किंमत त्यांजपासून घेऊन, विकत दिलीं. पैसा काढण्यास ही एक युक्ति तो वारंवार योजीत असे.

द्रव्य काढण्याची त्याची दुसरी एक युक्ति पहा. वास्तविक ह्मटलें असतां पाळेगारांचा वगैरे बंदोबस्त करण्यास त्याचे लोकांस फारसें लढावें लागलें नाहीं; तरी त्या कामीं मेलेले व जखमी झालेले ह्मणून शिपायांची एक लांबचलांब खोटी याद श्रीरंगपट्टणास नंदराजाकडे त्यानें पाठविली. ती पाहून त्यास हैदरच्या शौर्याचें मोठें नवल वाटलें, व त्याच्या शाबासकीबद्दल

* त्रिचनापल्लीच्या दक्षिणेस.

त्यास त्यानें कांहीं मोठें वक्षीसही पाठविलें. आणखी जे जखमी झालेले असतील, ते स्वतः नजरेनें पाहून, ते बरे होत तों पांवेतों दरमहा १४ रुपये जखमपट्टीबद्दल प्रत्येकास ठरवून द्यावे, ह्या कामाकरितां एक अमलदार तिकडे रवाना केला. तो दिंदिगलास येतांच हैदरानें त्याची मूठ दाबिली. तेव्हां सहजच तो त्यास अनुकूल झाला. मग काय पुसतां.? आधींच चोर, आणि त्यास घरचा भेद्या सामील.! खरोखर जखमी असे सगळे ६७ असामी होते. परंतु चांगल्या धडधाकट्या शिपायांच्या पायांस, जखमा झाल्याप्रमाणें हळदीच्या पट्ट्या बांधून, ७०० लोक आजारी आहेत, असें हैदरानें दाखविलें. तें त्या अमलदारानें कबूल करून, त्यांस दर एकास १४ रुपये प्रमाणें पोहोंचण्याविषयीं परवानगी दिली. हैदरानें ६७, असामी जे खरे जखमी होते, त्यांस मात्र फक्त सात सात रुपये दरमाहा प्रमाणें पैसा देऊन, त्यांचा राहिलेला पैसा, व बाकीच्या शिपायांच्या संबंध नेमणुका इतकें द्रव्य आचानक तोंडांत टाकण्याचा क्रम आरंभिला. असे कितीएक महिने गेले. त्या योगानें त्याला पुष्कळ पैसा मिळाला; आणि त्यानें आपलें सैन्य ७००० पर्यंत वाढविलें. ह्या वेळीं समुद्र किनाऱ्यावर कांहीं फ्रेंच लोकांचीं लहान लहान ठाणीं होतीं. त्यांतून कांहीं चतुर पुरुष त्यानें आपल्या चाकरीस ठेवून, आपल्या तोफखान्याची पुष्कळ सुधारणा केली.

इ० स० १७५७ त बाळाजीबाजीराव पेशवा पुष्कळ सैन्य बरोबर घेऊन श्रीरंगपट्टणावर गेला; आणि त्यानें त्यास वेढा घातला. त्याला नंदराज भ्याला, आणि त्यास ३५ लक्ष रुपये देण्यास कबूल झाला. खजीन्यांत नक्त ऐवज व जवाहीर मिळून पांच लाखांची भर झाली. बाकी राहिले तीस लक्ष, त्यांबद्दल त्यानें आपला कांहीं मुलूख त्याचे स्वाधीन केला. त्या प्रांतांत मराठ्यांचें ६००० लष्कर पैसा जमा करीत आहे, इतक्यांत हैदर कांहीं दुसऱ्या कामाकरितां श्रीरंगपट्टणास आला. आणि मराठ्यांत भिऊन नंदराजानें एवढी मोठी रकम त्यांचेसाठीं खर्ची घातली, ही मोठ्या शरमेची गोष्ट, ह्मणून त्यानें त्याचा निषेध केला. आणि त्यानें आपलें सैन्य पाठवून त्या प्रांतांतून मराठ्यांच्या लोकांस घालवून दिलें. तेव्हां हैदरासारखा शूर व कल्पक पुरुष म्हैसूरच्या सगळ्या दरबारांत दुसरा कोणी नाहीं, अशी त्याची चोहोंकडे कीर्ति झाली.

राजास बाहुल्याप्रमाणें गादीवर राखून, नंदराज सगळें राज्य हांकीत होता

खरें; तरी त्याचा कारभार फार अव्यवस्थित असे. मुलुखांत बंदोबस्त मुळींच नव्हता. शिपाई लोकांचा पुष्कळ दिवसांचा पगार द्यावयाचा तुंबला होता, यासाठीं ते नेहमीं ओरडत; तरी त्यांची कोणी दाद घेईना. शेवटीं त्यांनीं नंदराजाच्या दारीं धरणें धरिलें. ते कांहीं ऐकेनात व तेथून उठेनात. दिवाणापाशीं तर पैसा नव्हता. ही पंचाईत दिंदिगल येथें कळतांच, हैदर तेथून निघून श्रीरंगपट्टणास आला; आणि त्यानें कांहीं तोडनोडीनें सावकार लोकांपासून पैसा काढून, तो शिपायांस देऊन, व त्यांस दोन विचाराच्या गोष्टी सांगून, तें धरणें उठविलें. तेव्हां खुद नंदराजासही असें वाटलें कीं, आतां राज्यकारभार चालविण्याचें सामर्थ्य व वजन आपले ठायीं राहिलें नाहीं, ह्यास्तव हें काम हैदराकडेसच दिलें पाहिजे. हा विचार त्यानें चारचौघांत उघड बोलून दाखविला. तेव्हां हैदराला जो आल्हाद झाला, तो किती म्हणून सांगावा. ? नंदराजाच्या विचाराप्रमाणें सर्व कारभार हैदराच्या हातीं आला. त्यास प्रथमतः कितीएकांनीं हरकती आणिल्या; परंतु त्या मसलती व शूर पुरुषानें तितक्यांचेंही निवारण करून, आपला मनोरथ सिद्धीस नेला.

मराठ्यांचें लष्कर हैदराच्या फौजेनें हांकून लाविलें, असें मागें लिहिलें आहे. त्या गोष्टीची खुरखुरी मराठे लोकांस फार लागून, इ० स० १७६९ ह्या वर्षीं, गोपाळराव हरि व आनंदराव रास्ते हे सरदार पुष्कळ फौज घेऊन म्हैसुरावर आले. त्यांच्या व म्हैसूरकरांच्या बऱ्याच झटापटी झाल्या. त्यांत मराठ्यांसच अपयश येत गेलें. तरी त्यांचे प्रतिपक्षीही थकले नव्हते असें नाहीं. शेवटीं उभयपक्षांचा तह ठरला. त्यावरून असें झालें कीं, म्हैसूरवाल्यांनीं ३२ लक्ष रुपये मराठ्यांस द्यावे. परंतु, खजिन्यांत शिलक नव्हती, म्हणून हैदरानें आपल्या ताब्यांतील मुलुखांतल्या लोकांवर नजराणा ह्या नांवाचा एक कर बसविला. त्यापासून अर्धी रकम उत्पन्न झाली. बाकी राहिली अर्धी, तिची काय तजवीज लावावी, असा त्याला मोठा विचार पडला. परंतु, हैदरासारिख्या युक्तिवान् व वजनदार मनुष्यास काय कमी पडावयाचें आहे. ? मराठे हे त्याचे शत्रु, तरी त्यांच्या छावणींतील सावकारांत त्याचें एवढें वजन असे कीं, भरीची रक्कम त्यानें आपल्या खातरीवर त्यांजपाशीं मागितल्याबरोबर त्यांनीं त्यास दिली. त्यापूर्वी उभयतांच्या अनुमतानें एवढी मात्र एक अट करून घेतली होती कीं, ज्या प्रांतापासून सदरहू रक्कम वसुलांत आणून त्यांची त्यांस परत द्यावयाची ठरली होती, तो प्रांत, ती रक्कम उत्पन्न होई तों

पर्यंत, खुद हैदराचे स्वाधीन असावा. ह्या प्रकारेंकरून मराठे परत लाविले, आणि हैदरअल्ली श्रीरंगपट्टणास गेला. तेथें राजानें त्याचा बहुमान केला, व त्यास फत्तेहैदर बहादर असा किताब दिला.

राजा केवळ बाहुलें, मुख्य कारभारी नंदराज तो कमकुवत, आणि राजकुटुंबांतलीं माणसें त्यास पाण्यांत पाहात, ह्या गोष्टी हैदराच्या प्रीतींतला कारकून खंडेराव ह्यास माहीत होऊन, त्या त्यानें आपल्या यजमानास सांगितल्या. आणि त्या कारकुनानें कितीएक शिपाई लोकांचे कान फुंकून, त्यांस, आपला राहिलेला पगार मागण्याकरितां, बाह्यात्कारें प्रथमतः हैदराकडे पाठविलें. त्यांस त्यानें सांगितलें कीं, तुमच्या पगाराचा संबंध मजकडे नाहीं, हें काम नंदराजाचें आहे, त्याजकडे तुम्हीं जाऊन आपली बाकी मागावी. शिपायांनीं त्यास आग्रह केला कीं, आपण आह्मांबद्दल जरा तसदी सोसून कृपा करून त्यास दोन गोष्टी ऐकवाव्या, आणि आमचा पगार तो देईल असें करावें. हें मागणें हैदरास पोटांतून आवडलें; पण बाह्यात्कारें नानू दाखवून, हें तुमचें धरणें घेणें मला अगदीं आवडत नाहीं, असें तो ह्मणाला. तरी त्या सर्व लोकांसहवर्तमान तो नंदराजाच्या येथें गेला. तेव्हां, आतां हे आपले दारीं धरणें घेतात कीं काय असें त्यास भय पडून, मी सरकारची नौकरी सोडिली, आतां मजकडे कांहीं नाहीं; पगार देण्याचें वगैरे सर्व काम राजा खुद्द पाहाणार, असें त्यानें त्यांस सांगितलें. तेंच हैदराला पाहिजे होतें. मग तेथून ते सगळे लोक उठून राजद्वारीं गेले, तेव्हां राजाही नंदराजाप्रमाणेंच धाबरला. त्यानें हैदरास, त्याचे हातां पायां पडून, आपलेकडे वळवून घेतलें, आणि, कोणतीही एकादी तजवीज काढणें तुजकडे आहे, असें त्यास सांगितलें. तें त्याला इष्टच होतें. त्यानें इशारा केल्याबरोबर धरणें उठलें, आणि राजाचें मन स्थिर झालें.

ह्या घालमेलींत हैदरानें आणखी कांहीं जाहागीर मिळविली. ह्मणजे, म्हैसूरचें सरासरी निमे राज्य त्याचे हातीं आलें, असें ह्मटलें तरी चालेल. आणि नंदराजास दोन लक्षांची जाहागीर ठरवून देऊन, त्याचे जागेवर आपला कारकून खंडेराव, ह्यास राजाचा दिवाण नेमिलें. तो खुद राजाकडच्या मुलुखाचा कारभार पाहूं लागला. एकंदरींत, साक्षात व परंपरेनें, सर्व मुलुखावर हैदराचा अमल बसला. एक हजार घोडा व तीन हजार पायदळ इतकें सैन्य नंदराजाच्या पदरीं होतें, व श्रीरंगपट्टणापासून पांचसहा कोसां-

वर तो एका क्षेत्रीं राहात असे. त्यास हैदरानें सांगून पाठविलें कीं, तुह्मांला फौजफांड्याचें कारण नाहीं; ह्मणून तुमच्या जाहागिरीचे दोन तृतीयांश आह्मीं आपणांकडे घेतले आहेत; आणि ह्मीं तुह्मी आहां तेथें न राहतां दाहा पांच कोस पलीकडे जाऊन राहावें. ह्या निरोपाच्या योगानें क्रोधाविष्ट होऊन नंदराजानें हैदरास लिहिलें कीं, "अरे, तुला ह्या पदवीस मीं आणिलें; असें असतां तूं मला येथें स्वस्थ राहूं सुद्धां देत नाहींस; तुझ्या मनास येईल तें अथवा तुझ्यानें होईल तें तूं करून घे; मी ह्मैसुरा बाहेर जात नाहीं." शेवटीं नंदराजाच्या कोटास तीन महिनेपर्यंत वेढा घालून, त्यानें त्यास तेथून दूर घालविलें; आणि ह्या कामाबद्दल तो राजापाशीं आणखी जाहागीर मागूं लागला. त्यास खंडेरावानें कांहीं हरकती आणिल्या. तेणेंकरून हैदराचें व त्याचें वैमनस्य पडलें.

ह्मैसूरच्या पूर्वेस बारामहाल ह्मणून एक प्रांत कडप्याच्या नवाबाच्या ताब्यांत होता, तो जिंकण्याचें हैदरानें मनांत आणिलें. परंतु त्या मुलुखांत जाण्यास, मध्यें आनिकल ह्मणून एक परगणा पाळेगारांच्या अमलांत होता. त्यामधून लष्कर वगैरे नेण्यास कदाचित् त्रास होईल, ह्मणून तो आधीं जिंकावा, आणि मग बारामहालांत शिरावें, असें हैदरानें योजिलें. ह्या कामावर त्यानें आपला मेहुणा मखदूमअल्ली ह्यास नेमिलें. तो तरी शूर व पराक्रमी होता. त्यानें तें काम बहुत मेहेनत घेऊन सिद्धीस नेलें. ह्याप्रमाणें हैदराच्या अमलाचा प्रवेश कर्नाटकच्या मध्यभागीं झाला. ह्या सुमारास, ह्मणजे इ० स० १७६१ ह्या वर्षीं, इंग्लिशांच्या सरदार कूतसाहेब ह्यानें पांदिशरीस वेढा घालून आंत फ्रेंच सरदार लाली ह्यास कोंडिलें. तेव्हां लालीनें हैदराचें साह्य मागितलें. त्याप्रमाणें, बरोबर सैन्य देऊन, त्यानें मखदूमअल्ली ह्यास त्याजकडे रवाना केलें. त्यानें पांदिशेरीस जातांना, वाटेंत इंग्लिशांच्या एका टोळीचा पराभव केला. तेणेंकरून हैदरास मोठा संतोष झाला.

हैदराचें माहात्म्य इतकें वाढलें हें राजा व त्याची आई ह्यांस पाहवेना. आणि कांहीं कारणांवरून त्याचें व खंडेरावाचें वांकडें आलें आहे, हें तीं समजून होतीं. आणखी हैदराचें मुख्य लष्कर बारामहाल व कर्नाटक ह्यांत लढाईस गुंतलें होतें. ही संधी पाहून, त्यांचा नाश करण्याची मसलत त्यांनीं खंडेरावास सांगितली; व तीं स्वतः त्यास आणाशपथा वाहून अनुकूल झालीं. ह्या कामीं खंडेरावानें विसाजीपंत नामक एका सरदारापाशीं ६००

स्वारांची मदत मागितली, ती देण्याचें त्यानें कबूल केलें. हल्ल्याचा दिवस नेमिला. ह्या वेळेपर्यंत संकटाची वार्ता सुद्धां हैदराच्या ध्यानीं मनीं नव्हती. परंतु खंडेरावानें त्याजवर एकदम तोफांचा भडिमार सुरू केला; तेव्हां तो जागृत झाला, आणि आपले बचावाचे कामास लागला. त्याच्या सुदैवानें एवढें बरें झालें कीं, मराठ्यांकडची मदत वेळेस येऊन पोहोंचली नाहीं; नाहींतर खंडेराव त्यास त्या दिवशीं खचीत मारता, किंवा निदान धरता तरी. परंतु ती चुकामूक पडल्यामुळें, तो त्याच दिवशीं रात्रीं तेथून पळून गेला, आणि त्याचीं मुलेंमाणसें मागें राहिलीं. तो एका रात्रींत ३६ कोस मजल करून आनिकल येथें पोहोंचला.

नंतर तो बेंगळूर येथें गेला. त्याजपाशीं पैसा नव्हता, ह्मणून त्यानें तेथच्या सावकारांपासून ४००००० रुपये घेतले, आणि फौज जमविली. ह्याशिवाय, फैजुल्लाखान ह्या नांवाचा एक मुसलमान सरदार त्यास येऊन मिळाला. ह्याप्रमाणें त्याजपाशीं ५००० पायदळ, ६००० स्वार, आणि २० तोफा, इतकें सैन्य जमलें. तिकडे खंडेरावानेंही ७००० स्वार ६००० पायदळ, आणि २८ तोफा, इतकी फौज जमा केली. उभय पक्षांचीं अनेक युद्धें झालीं. त्यांत शेवटीं हैदर थकला. तथापि, अशा प्रसंगीं त्यानें एक चमत्कारिक युक्ति लढविली. ती अशी. तो रात्रीं हळूच उठून नंदराज राहात होता तेथें गेला, आणि त्याच्या पायांपडून, व आपला कृतघ्नपणा पदरांत घेऊन, पुनः श्रीरंगपट्टणच्या कारभारावर येण्याविषयीं त्यास त्यानें विनंती केली. त्याच्या कपटी भाषणास तो भोळा भुलला. आणि आपण पुनः कारभारावर येणार, असें त्यानें सर्वांस कळविलें. असें झाल्यावर, खंडेरावाच्या सरदारांच्या नावांचीं खोटीं पत्रें, नंदराजाच्या सहीशिक्क्यानिशीं, हैदरानें बनाविलीं. त्यांत, पत्रें पाठविणाऱ्याचा ह्मणजे नंदराजाचा आशय असा दाखविला कीं, 'तुह्मीं खंडेरावास आमचे हवालीं करण्याचें पूर्वी कबूल केलें आहे, त्याप्रमाणें करण्याचा हा उत्तम प्रसंग आहे. त्यास आमचे हातीं द्या, आणि आपलें बक्षीस घेऊन जा.' आणि हीं पत्रें अशा मनुष्याजवळीं दिलीं कीं, त्याच्या हातून तीं सहज खंडेरावाच्या हातीं जावीं. ही युक्ति त्यास चांगली साधली. तीं पत्रें खंडेरावाच्या दृष्टीस पडतांच तो दचकला, आणि ताबडतोब श्रीरंगपट्टणास निघून गेला. नंतर हैदरानें त्याच्या फौजेवर चाल करून तिचा मोड केला, आणि तिचा सर्व सरंजाम घेतला. मग तो आपलें सैन्य घेऊन श्रीरं-

गपट्टणावर गेला. आणि रात्रीं कावेरी नदी उतरून, एकदम छापा घालून, म्यालेले शत्रु यानें कापून काढिले; सर्व शहरांत आपला अमल बसविला; राजास तीन लक्षांचा व नंदराजास एक लक्षाचा मुलूख देण्याचें ठरविलें; खंडेरावास लोखंडाच्या पिंजऱ्यांत घातलें; आणि राजपद आपण बळकाविलें. ह्या प्रकारेंकरून हैदर रंकाचा राजा झाला. हें वर्तमान इ० स० १७६१ च्या जून महिन्यांत घडलें.

हैदरास राजपद कसें प्राप्त झालें, हें सांगितलें, येथें आमच्या लेखाचा हेतु संपला. ह्मणून हा आतां आटोपला पाहिजे. ह्या पुरुषास सिंहासन प्राप्त झाल्यावर ह्यानें एकवीस वर्षं राज्य केलें. तितक्या मुदतींत यानें लढाया, तह, देश जिंकणें, इत्यादि अनेक महत्वाचीं कृत्यें केलीं. तीं वर्णण्याचें आमचें कर्तव्य नव्हे. ह्मणून तें आह्मी इतिहासकारांकडे सोंपितों, आणि हा विषय पुरा करितों. त्याच्या मानेंत कांहीं रोग उत्पन्न होऊन, ती सुजली; आणि तिच्या योगानें यास फार वेदना होऊं लागल्या. तो रोग नाहींसा करण्यास हिंदु, मुसलमान आणि फ्रेंच ह्या तिन्ही जातींच्या उत्तम उत्तम वैद्यांनीं आपली पराकाष्ठा करून पाहिली. परंतु, तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं, हैदरअल्ली इ० स० १७८२ च्या डिसेंबर महिन्याच्या ७ व्या तारखेस मरण पावला. तेव्हां, त्याच्या जवळच्या प्रधान मंडळींत दोन ब्राह्मण मुख्य होते, एकाचें नांव पुरणया आणि दुसऱ्याचें नांव केशवराव. यांनीं मोठ्या युक्तीनें, ही मरणाची वार्ता, टिपू येऊन सैन्यास मिळेपर्यंत, अगदीं गुप्त ठेविली होती.

हैदरअल्लीस लिहितां वाचतां मुळींच येत नव्हतें. तरी तो स्मरणाचा मोठा घड असे. आंकडे मोडण्यांत तर मोठमोठ्या हिशेबी कारकुनांनीं त्याजपुढें हात टेंकावे. धैर्य आणि धूर्तता हे गुण त्याचेठायीं चांगले होते. कसाही प्रसंग आला तरी तो घाबरत नसे. पूर्ण विश्वास असा त्यानें कोणावरही ठेविला नाहीं. महत्वाचें सर्व काम तो जातीनें मेहेनत घेऊन करी. तो अनलस असे. त्यास जें हें राज्य मिळालें, त्यास त्याचे दोन गुण मुख्य कारणीभूत झाले. एक शौर्य आणि दुसरें कपट. ह्यांत त्याजवर शौर्यापेक्षां कपटाचे उपकार फार झाले. जीं मुलें लहानपणीं अतिशयित व्रात्य असतात, तीं पुढें कोणत्याही प्रकारें करून ह्मणा, नशिबाचीं निपजतात, असा प्रकार दुनयेंत कधीं कधीं दृष्टीस पडतो. त्याचें हें एक उदाहरण होय.

टिपूसुल्तान.

जन्म, इ० स० १७४९—मृत्यु, इ० स० १७९९.

टिपूसुल्तान हा हैदरअल्लीचा पुत्र होय. तो आपल्या बापाच्या मरणानंतर, इ० स० १७८३ च्या आरंभींच त्याचे गादीवर बसला. तो इंग्लिश लोकांचा अत्यंत द्वेष करी. बाप मेला तेव्हां इंग्लिशांशीं जी लढाई चालली होती, ती त्यानें तशीच पुढें चालविली. तो राज्य करूं लागला, तेव्हां त्याच्या ताब्यांत एकंदर ८८००० फौज होती, व खजिन्यांत ३०००००० रुपये होते. ह्यांखेरीज जवाहीर व दुसरे मौल्यवान् दागिने पुष्कळच होते.

हा सिंहासनारूढ झाला त्या वर्षीं इंग्लिशांच्या माथ्यूससाहेब नामक सरदारानें बेदनूरचा किल्ला घेतला; ह्यास हैदरगड असें ह्मणत असत. त्याविषयींची हकीकत फार चमत्कारिक आहे. ती अशी कीं, तेथील सुभेदार शेखअय्यस नामें मुसलमान होता. त्याजवर हैदराची फार मर्जी असे. एवढ्याच कारणावरून त्याजवर टिपूची इतकी इतराजी असे कीं, राज्याची मालकी हातीं येतांच, शेखअय्यस ह्याच्या दुय्यमास गुप्तपणें त्यानें पत्र पाठविलें कीं, तूं आपल्या वरिष्ठास ठार मारून त्याची जागा बेलाशक घे, मी तुला अनुकूल आहें. हें पत्र त्या किल्लेदाराच्या दृष्टीस पडलें, व आतां काय तजवीज करावी, ह्या विचारांत तो होता, इतक्यांत माथ्यूस साहेब सैन्यासहवर्तमान तेथें आला. त्यास अय्यस ह्यानें आंतून सांगून पाठविलें कीं, "आपण माझा सांभाळ हैदरअल्लीप्रमाणें करण्याचें जर वचन द्याल, तर मी किल्ला आपले स्वाधीन करितों." माथ्यूस साहेबानें हें बोलणें कबूल केलें; आणि शेखअय्यसानें बेदनूरचा किल्ला इ० स० १७८३ च्या आरंभीं त्याचे स्वाधीन केला. नाहींतर तेथें बराच रक्तपात झाला असता. तरी देखील तें स्थळ त्या साहेबाच्या हातीं लागतें किंवा न लागतें ह्याचा संशय होता.

हा किल्ला इंग्लिशांकडे फार दिवस टिकला नाहीं. ४०० गोरे व १२०० काळे, इतक्या लोकांसहवर्तमान माथ्यूस साहेब त्यांत आहे तोंच त्यास टिपूच्या फौजेनें वेढा घातला. आंतल्या लोकांनीं आपली पराकाष्ठा करून पाहिली; परंतु त्यांचे उपाय हरले, तेव्हां, जिवांस धक्का न लावण्याविषयीं टिपूपासून शपथपूर्वक वचन घेऊन, इ० स० १७८३ च्या मे महिन्यांत ते त्या-

च्या स्वाधीन झाले. परंतु, चांडाळाला कशाची शपथ आणि कशाची आण.? त्यानें त्या सर्वांस धरून म्हैसूर प्रांतांतील वेगवेगळ्या किल्ल्यांवर पाठवून तेथें प्रतिबंधांत ठेविलें. त्या ठिकाणीं त्या साहेब लोकांस अतिशयित हाल भोगावे लागले. माथ्यूस साहेब श्रीरंगपट्टणाच्या किल्ल्यांत मारेकऱ्यांचे हातून प्राणांस मुकला.!

ह्यानंतर एकदां टिपू व इंग्लिश ह्यांचा तह ठरला होता. परंतु, मदांधाला कशाचा तह आणि कशाचें काय.? तो मागें पुढें न पाहतां पुनः पूर्ववत् देशास उपद्रव देऊं लागला. तेव्हां गवरनर जनरल लार्ड कार्नवालिस ह्यानें असा विचार मनांत आणिला कीं, आतां ह्यास वाढूं देतां कामास नये. ह्मणून त्यानें आधीं निजाम व मराठे ह्यांस अनुकूल करून घेतलें. नंतर ह्या तिघांमध्यें असें ठरलें कीं, आपण आपलीं सैन्यें एकत्र करून त्यांसहवर्तमान टिपूवर जावें, त्याचा मुलूख काबीज करावा, आणि अशा प्रकारें जो लाभ होईल, तो त्रिवर्गांनीं सारखा वांटून घ्यावा.

हा आपसांतला ठराव होतांना एक चमत्कारिक गोष्ट घडली. ती अशी कीं, इतकें ऐक्य झालें तरी, आपलें सैन्य आपल्या देशांतून निघून म्हैसुराकडे गेल्यावर, मराठे येऊन त्याजवर अकस्मात घाला घालतील कीं काय कोण जाणे, असा निजामास धाक पडला. तेव्हां त्याचें ह्मणणें असें पडलें कीं, असें न करण्याविषयीं मराठ्यांची कबुलायत त्या ठरावपत्रकांत लिहिली पाहिजे; आणि तीस इंग्लिश सरकाराची जामीनकी पाहिजे. परंतु, असा लेख आपणांस लांछनास्पद आहे, असें मराठ्यांस वाटून जरासा रागही आला. शेवटीं तसें कलम त्यांत घातलें नाहीं. पण त्याविषयीं मराठ्यांनीं तोंडीं खातरीचें वचन दिलें; आणि गवरनर जनरल लार्ड कार्नवालिस ह्यानेंही हमी घेतल्यासारखें त्यास आपलें ह्मणणें कळविलें. पहा, ह्यावरून, मराठे लोकांची अब्रू प्रामाणिकपणाविषयीं राजेरजवाड्यांत किती होती ती. ! ! असो.

वर सांगितलेल्या संकेताप्रमाणें तिन्ही पक्षांकडच्या सैन्यांची तयारी चालली. इंग्लिशांच्या सैन्यामध्यें मुख्य सरदार, लार्ड कार्नवालिस, जनरल मेदोज, कर्नल माक्षवेल, इत्यादि अनेक होते. इ० स० १७९१ च्या मार्च महिन्यांत लार्ड कार्नवालिस ह्यानें बंगळूर शहर घेतलें. तें वर्तमान ऐकिल्यावर मोठ्या सावधगिरीनें त्याच्या फौजेस निजामाकडचें लष्कर येऊन मिळालें. नंतर, कांहीं दिवस लष्करास दाणाचाऱ्याचा फार तोटा पडल्यामुळें

ब्रीच अव्यवस्था झाली. तरी ती लवकरच नाहींशी होऊन तें एकत्र झालेलें सैन्य श्रीरंगपट्टणच्या किल्ल्यास वेढा घालण्यास चाललें. त्याच्या अग्रभागीं, खजीन्यानें लादलेले १०० हत्ती होते; त्यांच्या मागें मद्याच्या कुप्यांनीं भरलेल्या १०० गाड्या होत्या; त्यांच्या मागें, अन्नसामुग्रीनें लादलेले ६०००० बैल होते; त्यांच्या मागें तोफखाना होता; आणि त्यांच्या मागें पायदळ होतें. एवढ्या सैन्यानें इ० स० १७९२ च्या फेब्रुवारी महिन्यांत श्रीरंगपट्टणच्या किल्ल्यास वेढा घातला. आंत टिपू होता. त्यानें तो वेढा उठविण्याविषयीं पुष्कळ प्रयत्न केले, परंतु सर्व व्यर्थ गेले. शेवटीं, चाल्मरसाहेब म्हणून एक इंग्लिश गृहस्थ त्याच्या कैदेंत होता, त्याजबरोबर त्यानें लार्ड कार्नवालिस साहेबाला असें सांगून पाठविलें कीं, आपण कृपा करून माझें तहाचें बोलणें मान्य करावें. त्यास त्या साहेबानें रुकार दिला. नंतर टिपूकडून गुलामअल्ली ह्या नांवाचा एक मोठा हुद्देदार फेब्रुवारीच्या १४ व्या तारखेस इंग्लिशांच्या लष्करांत आला. त्याच्या व इंग्लिश सरदारांच्या अनेक दिवस मसलती चालून, शेवटीं चार कलमें टिपूच्या मान्यतेकरितां पाठवावयाचीं ठरलीं. तीं हीं. १, त्रिवर्गांस मिळून टिपूनें आपलें अर्धं राज्य द्यावें; २, टिपूनें तीन कोटि तीस लक्ष रुपये रोख द्यावे; ३, इंग्लिशांकडच्या पाडाव केलेल्या सर्व लोकांस सोडून द्यावें; आणि ४, टिपूनें आपले दोन पुत्र इंग्लिशांकडे ओलीस पाठवावे. हीं चारी कलमें मोठीं अडचणीचीं होतीं खरीं, तरी तीं त्यास मान्य करावीं लागलीं. काय करतो बिचारा. ! टिपू म्हणजे म्हैसूरचा सिंह, पण ह्या वेळीं अगदीं गाय होऊन गेला.

टिपूनें आपले दोन पुत्र ओलीस पाठविले, त्यांपैकीं अबदुलकालिक हा १० वर्षांचा व मुझाउद्दीन आठ वर्षांचा होता. हीं मुलें राजवाड्यांतून निघालीं त्या वेळीं तेथें केवळ दुःखाचे डोंगर कोसळले. जवळच्या सर्व माणसांच्या नेत्रांतून खळखळां अश्रुधारा चालल्या. बायकांमध्यें जो आकांत झाला, त्याचें तर वर्णन सुद्धां करितां येत नाहीं. ही गोष्ट कार्नवालिस साहेबास कळल्यावर त्याचेंही अंतःकरण दयेनें कळवळलें. आणि त्यानें त्या मुलांस आपणाकडे येण्यास आणखी एक दिवसाचा अवकाश दिला. नंतर तारीख २६ फेब्रुवारी रोजीं ते मुलगे इंग्लिशांकडे यावयास निघाले. मोठ्या हत्तीस उत्तम प्रकारच्या वस्त्रांनीं व दागिन्यांनीं उत्कृष्ट सजवून, त्याजवर ह्या दोघां मुलांस बसविलें, आणि इंग्लिशांच्या लष्कराच्या छावणीकडे चालविलें. त्यांचा स्वीकार कर-

प्याकरितां उत्तम प्रकारचे बहुमोल तंबू दिले होते. त्यांच्या बाहेर सामोरा येऊन, कार्नवालिस साहेबानें ह्या दोघांस हातांत धरून आंत नेलें, आणि सुस्थळीं बसविलें. त्या वेळीं टिपूकडचा मुख्य वकील त्यांजबरोबर होता. त्यानें कार्नवालिस साहेबाला सांगितलें कीं, "आजपावेतों हे दोघे टिपूसाहेबांचे पुत्र होते, ते आतां आपले झाले आहेत, असें म्हणण्यास चिंता नाहीं; ह्यांचा सांभाळ पुत्रवत् करावा, एवढीच विनंती आहे." कार्नवालिस साहेबानें त्यांस त्याप्रमाणेंच फार ममताळूपणानें वागविलें. आणि त्या मुलांस बोलण्याचालण्याची व परकीय मोठ्या मनुष्यांशीं वागण्याची पसंत रीति लागली होती, तें पाहून त्या साहेबास मोठें आश्चर्य वाटलें. त्यांस त्यानें खिशांतलें फार सुंदर एक एक घड्याळ नजर केलें.

ह्याप्रमाणें राजपुत्र ओलीस पाठवावयाचे ते पाठविले; रोख रकमेपैकीं एक कोटि रूपये दिले; आणि निमे राज्यही स्वाधीन केलें; त्याचा वसूल ११८५०२९४ रूपये होता. ह्यापैकीं, तुंगभद्रेच्या उत्तरेकडचा सर्व मुलूख मराठ्यांस मिळाला; गंजकोट व कडपा हे प्रांत निजामास दिले; आणि बारामहाल, दिंदिगल, मलबार, व कुर्ग हे इंग्लिशांनीं आपणांकडे घेतले.

इतकें झालें तरी टिपूचे डोळे उघडले काय? नाहींत. तो इंग्लिशांच्या नाशाविषयीं घडोघडी नवे नवे विचार करीत असे. त्या कामीं त्यानें मारिशस बेटांतल्या फ्रेंचांचें साह्य मागितलें. त्यावरून तेथील फ्रेंच अमलदारानें असा जाहीरनामा लाविला कीं, " टिपूसुलतान ह्याजकडून इंग्लिशांस हिंदुस्थानांतून घालविण्याच्या विचाराकरितां दोन वकील बेटांत आल्यावरून, सुलतान ह्याचे चाकरीस राहण्यास रयतलोकांस परवानगी आहे. " ह्या जाहीरनाम्याची नक्कल गवरनर जनरल लार्ड मार्निंगतन ह्याचे हातीं लागली. तेव्हां त्यानें टिपूला लिहिलें कीं, " फ्रेंच लोक आमचे शत्रु; ते हल्लीं आमच्या देशाशीं अन्यायानें लढत आहेत; आणि आमच्या नाशार्थ जे कांहीं बेत तुम्ही त्यांशीं करीत आहां, ते म्हणजे आम्हांला माहीत नाहींत, असें समजूं नका. आमच्या देशशत्रूंची आणि तुमची जी खटपट हल्लीं चालू आहे ती म्हणजे माझ्या लक्षांत नाहीं, असें तुम्ही मनांत आणूं नका. मी सर्व कांहीं जाणतों. परंतु ज्याच्या योगानें तुमचें आमचें वैमनस्य यावयाचें, तुमची प्रजा तुमचें ऐकेनाशी व्हावयाची, तुम्ही बहुमान देतां, तो धर्म नाश पावावयाचा, आणि ज्याच्या योगानें तुमचें मोठेपण नष्ट होऊन तुमची खराबी व्हावयाची, अशा

कपटकर्मांत तुह्मी शिरलां, हें पाहून मला सखेद आश्चर्य वाटतें; आणि तें आतां तुह्मांशीं चोरून ठेवावें, हें योग्य नाहीं, वं आवश्यकही नाहीं."

ह्याचें उत्तर टिपूनें पाठविलें. त्यांत त्यानें फ्रेंचांशीं राजकीय संबंधीं व्यवहार असल्याचें अगदीं नाकबूल केलें. कांहीं लोक माझ्या राज्यांत व्यापाराकरितां ह्मणा किंवा नौकरीच्या उद्देशानें ह्मणा, आले होते खरे; त्यांनीं कांहीं माल घेतला हेंही खोटें नव्हे; परंतु त्यांपैकीं कितीएक मूर्खांस रिकामें परत जावें लागलें, त्यांनीं ह्या भलभलत्या गप्पा उठवून तुमचे मनांत संशय घातला आहे, असेंही त्यानें प्रदर्शित केलें. ह्याप्रमाणें आणखी एक दोन जाबजबाब आले गेले. शेवटीं गवरनर जनरलानें त्यास स्पष्ट लिहिलें कीं, "जी मदत तुह्मीं मागितली होती, ती जर या वेळीं तुह्मांस मिळती, तर तुह्मीं आमच्या मुलखावर खचीत निष्कारण हल्ला करितां. अशा आचरणानें दुसरें तर कांहीं पैदा झालें नाहीं, पण तुह्मीं आपल्या दोस्त सरकारास वैरी करून ठेविलें." टिपूनें जेमानशाहालाही असा निरोप पाठविला कीं, "तुह्मी सिंधुनद उतरून बेलाशक या. ह्या अनेकदेवमतवादी नास्तिकांशीं आपण धर्मार्थ युद्ध करूं. आपल्या ईश्वरभक्त शूर योद्ध्यांच्या प्रखरतर खड्गांच्या भक्ष्यस्थानीं हे इंग्रज लोक पडोत."

येथें हेंही सांगणें आवश्यक आहे कीं, टिपूस फ्रेंचांचा विजयी सरदार नापोलियन बोनापार्त ह्याचेंही एक पत्र आलें होतें. त्याचें तात्पर्य येणेंप्रमाणें. "तांबड्या समुद्रांत मी मोठ्या अजिंक्य सैन्यासहवर्तमान आलों आहें, हें आपणांस समजलेंच असेल. आपणांस इंग्लिश लोकांच्या जाचांतून काढावें, असें आह्मी फार इच्छितों. ह्या संधीस आपल्या राज्याची स्थितिरीति मस्कत व मोका येथें कोणी मनुष्य पाठवून आपण मला कळवाल, अशी मीं आशा करितों. सुएझ किंवा काइरो येथें जर आपणांकडून कोणी मोठा विश्वासू गृहस्थ मला येऊन भेटेल, तर त्याजपाशीं मी आपल्या मनांतल्या चार गोष्टी सांगेन. सर्वशक्तिमान् परमेश्वर तुमच्या राज्याची वृद्धि व तुमच्या शत्रूंचें निर्दाळण करो."

ह्या एकंदर हकीकतीवरून, टिपूच्या दुष्ट वासनांविषयीं गवरनर जनरलाची बालंबाल खातरी झाली. आणि त्यानें एकदम लढाईच्या तयारीस आरंभ केला. जनरल हारिस साहेब ह्यानें, इ० स० १७९९ च्या जानेवारी महिन्यांत, वेळूर येथें ३६९७९ सैन्य जमवून, म्हैसूरचा रस्ता धरिला.

निजामाचें सैन्य साह्यास आलें, त्यावर मीरआलम नांवाचा मनुष्य नांवाचा मात्र अमलदार होता, परंतु त्याचें खरोखर आधिपत्य, आनरेबल कर्नल वेल्सली, ह्मणजे जो पुरूष पुढें ड्यूक आफ् वेलिंगतन ह्या नांवानें सगळ्या जगांत ख्याति पावला, त्यानें आपणाकडे घेतलें. हें एकत्र झालेलें सैन्य मोठ्या कडीकोट तयारीनें श्रीरंगपट्टणावर चाललें.

त्या राजधानीस पोहोंचण्याच्या पूर्वी वाटेंतच ह्या लष्कराच्या व टिपूच्या फौजेच्या कितीएक झटापटी झाल्या. त्यांत टिपूच्या पक्षाचे लोक अपजय पावले. इंग्लिशांचें सैन्य जवळ येत चाललें, असें टिपूला समजतांच तो कांहींसा घाबरला, आणि त्यानें आपल्या मोठमोठ्या सरदार लोकांस आपल्या वाड्यांत बोलावून आणिलें; आणि त्यांस विचारिलें कीं, "आतां ही गोष्ट तर शेवटचे मजलेस येऊन पोहोंचली आहे; तुमची मर्जी कशी काय आहे.?" त्यांनीं त्यास उत्तर दिलें कीं, "आपणांबरोबर आह्मी प्राण देणार." त्याप्रमाणें ते सर्व तयार झाले. इकडे, इंग्लिशांचें सैन्य श्रीरंगपट्टणाजवळ येऊन थडकलें, आणि तारीख ५ माहे एप्रिल स० १७९९ रोजीं त्यानें त्या शहरास वेढा घातला. नंतर हल्ला सुरू झाला. बाहेरून इंग्लिशांचें एक एक पाऊल पुढें पडत चाललें. तेव्हां टिपूनें सातव्या तारखेस हारिससाहेबाशीं तहाचें बोलणें लाविलें. त्या साहेबानें त्यास उत्तर लिहिलें कीं, आपलें अर्धें राज्य, एक कोटि रूपये आतां रोख, आणि एक कोटि रूपये साहा महिन्यांनीं, इतकें तुह्मी आह्मांस देण्यास कबूल असून, त्याचे खातरीसाठीं जर आपले चार पुत्र व दोन सरदार ताबडतोब इकडे ओलीस पाठवाल, तर तुमच्या ह्मणण्याचा आह्मी कांहीं विचार करूं.

हें अशा प्रकारचें इंग्लिशांचें मागणें ऐकून, महा अभिमानी जो टिपू, त्याच्या अंगाचा अगदीं तिळपापड झाला. तो ह्मणाला, इंग्लिश लोक फार मगरूर आहेत; ते मजवर नाहक्क जबरदस्ती करीत आहेत; बरें, कांहीं चिंता नाहीं; प्रारब्धीं असेल तसें घडेल; मी युद्ध करून मरून जाईन पण इतर राजेरजवाड्यांप्रमाणें मी इंग्लिशांचा अंकित होऊन राहाणार नाहीं. नंतर, आणखी एके संकटसमयीं टिपूनें इंग्लिशांशीं तहाचें बोलणें लाविलें होतें; परंतु त्याचाही कांहीं उपयोग झाला नाहीं.

इकडे किल्ल्याच्या तटबंदीस तोफा लागू होऊन वाट पडल्यावर मे महिन्याचे चवथे तारखेस दोन प्रहरांच्या सुमारें इंग्लिशांनीं हल्ल्याची तयारी

केली. तें वर्तमान, आणि त्याचा मोठा सरदार रय्यद गफूर हा तटावर गोळी लागून मेला हें वर्तमान, हीं दोन्ही टिपूस एकदांच कळलीं. दोन प्रहरानंतर दीड वाजतां, जनरल बेर्द साहेब खंदकांतून बाहेर पडला, आणि त्यानें आपली तरवार उपटून लष्करास पुढें चाल करण्याची खूण केली. आणखी आपण पुढें होऊन ह्मणाला, "या, शूर शिपायांनो, माझे मागोमाग या, आणि तुह्मी इंग्रज सरकारचे खरे शिपाई आहां असें आतां दाखवा." त्यानंतर सुमारें पाव घटकेंत तटबंदी पडली होती तेथें इंग्लिशांचे बावटे लागले. हल्ला करणाऱ्यांच्या दोन टोळ्या वर जात होत्या, त्यांजवर आंतून भडिमार चालला होता, आणि त्या मोठ्या संकटानें एक एक तसूं जागा साध्य करीत होत्या. आंतल्या तटाजवळ टिपू खुद पायीं लढत होता. त्यानें मोठ्या निकरानें युद्ध केलें, आणि आपण स्वतः हल्ला करणाऱ्यांवर मार चालविला. शेवटीं टिपूस दोन गोळ्या लागल्या. तेव्हां त्याची फौज अस्ताव्यस्त होऊन पळून गेली.

नंतर टिपूचा वाडा इंग्लिशांचे हातीं आला. त्याचीं मुलेंमाणसें अगदीं गाय होऊन त्यांस दीनांवाणी गायांवायां करूं लागलीं. त्याचा वडील पुत्र मैसुदीन ह्यास आलन साहेबानें विचारिलें कीं, टिपू साहेब कोठें आहेत. त्यानें, वाड्यांत नाहींत, असें उत्तर दिलें. तेव्हां त्याचा शोध चालविला. शेवटीं, ज्या ठिकाणीं खूब समर माजून शूरांच्या प्रेतांचा खच पडला होता, अशा एका कोंपऱ्यांत त्याचें शव सांपडलें. तें त्याच्या सेवकांनीं तत्काळ ओळखिलें. पुढें शोधांतीं असें समजलें कीं, टिपूला प्रथम दोन गोळ्या लागल्यावर, त्याच्या सेवकांनीं त्यास पालखींत बसवून तेथून नेण्याचा प्रयत्न केला. परंतु, तेथें पराकाष्ठेची गर्दी झाल्यामुळें, तो पालखीसुद्धां खालीं पडला. नंतर त्यानें एका गोऱ्या शिपायास वार करण्याचा प्रयत्न केला; तेव्हां त्या शिपायानें त्यास गोळी घातली. तेव्हां त्याचा प्राण गेला. त्या वेळीं तो ४६ वर्षांचा होता.

बेर्द साहेब टिपूच्या कैदेमध्यें एकंदर तीन वर्षें होता. त्यानें टिपूच्या कुटुंबाची भरभर व अमदानी पाहिली होती. तेव्हां जीं माणसें अनुपम ऐश्वर्य व सुख भोगीत होतीं, व ज्यांचें नख देखील कोणाच्या दृष्टीस पडत नव्हतें, तीं, अनाथ होऊन उघडीं बसून, गाईसारखीं हंबरडे फोडतांना जेंव्हां त्यानें पाहिलीं, तेव्हां त्याच्या डोळ्यांतून खळखळां अश्रुधारा वाहूं लागल्या.

त्यानें त्यांजबरोबर चांगला पहारा देऊन त्यांस बहुमानानें इंग्लिश लष्करांत पाठवून दिलें.

ह्या लढाईंत टिपूचे ८००० वर लोक पडले; आणि इंग्लिशांकडील ११६४ मरण पावले. किल्ल्यांतलें पुष्कळ लढाऊ सामान विजयी पक्षाच्या हातीं लागलें. खजीन्यांत रोकड व जवाहीर मिळून ११४३२१६० रुपयांचा ऐवज इंग्लिशांस सांपडला. टिपूच्या छत्रावर एक जडावाचा मोर असे, व सिंहासनावरून खालीं उतरतांना मध्यें पाय ठेवावयास एक सोन्याचा व्याघ्रमुखाकृति चौरंग असे, ते दोन्ही दागिने त्यांस मिळाले. ते आतां इंग्लंदांत राणी साहेबांच्या खजीन्यांत आहेत.

टिपूचा सर्व मुलूख इंग्लिशांच्या हस्तगत झाला. त्यापैकीं त्यांनीं कांहीं निजामास दिला, आणि त्यापेक्षां साडेसात लक्षांचा अधिक प्रांत त्यांनीं आपणांकडे घेतला. ह्याचें कारण असें कीं, हैदर व टिपू ह्यांचे कुटुंबांस ज्या नेमणुका ठरवून दिल्या होत्या, त्या त्यांनीं द्याव्या, असा ठराव होता. टिपूच्या मुलांमाणसांस दरसाल सोळा लक्ष रुपयांची नेमणूक ठरविली; आणि त्यांनीं नेहमीं वेळुरास रहावें, असें केलें. म्हैसूरच्या प्राचीन हिंदु राजवंशांतला कोणी पुरुष गादीवर बसवून, त्याजकडे कांहीं मुलूख दिला. आणि म्हैसुराचें सार्वभौमत्व इंग्लिशांनीं आपणांकडे घेतलें.

ह्याप्रमाणें टिपूसुलूतानाचा शेवट झाला, व त्याचें राज्य इंग्लिशांनीं घेतलें. हा पुरुष आपले बापासारखा अक्षरशत्रु नव्हता; ह्यास लिहितां वाचतां चांगलें येत असे. तरी, त्याच्या बापाच्याठायीं जितकें व्यवहारचातुर्य आणि राज्य चालविण्याचें सामर्थ्य होतें, तितकें ह्याच्याठायीं नव्हतें. आणि तो पराकाष्ठेचा क्रूर होता. तो पत्रें फार लिही. त्यानें स्वाऱ्या, लढाया, वगैरे ज्या मोठमोठ्या गोष्टी केल्या, त्यांची तपशीलवार हकीकत त्यानें स्वतः लिहून ठेविली आहे. टिपूला मुसलमानी धर्माचा अभिमान फार असे. त्यामुळें त्याचे हातून कितीएक दोष घडले. हा राजा स्वधर्माभिमानी होता खरा, परंतु प्रसंग गुदरल्यावर, तो परधर्मी लोकांच्या वेड्या वेड्या समजुतींवरही भरंवसा ठेवून, ते सांगतील तसें करीत असे. इंग्लिशांच्या सैन्यानें त्याच्या किल्ल्यावर हल्ला केला, त्या वेळीं घाबरून त्यानें ब्राह्मणांच्या सांगण्यावरून विधिपूर्वक स्नान करून, अरिष्टनिवारणार्थ कांहीं दानें दिलीं, असें एके ग्रंथांत लिहिलें आहे. टिपूस पडलेलीं स्वप्नें देखील एका वहींत लिहून ठेविलेलीं

श्रीरंगपट्टणच्या दप्तरांत सांपडलीं. त्यांपैकीं एक मासल्याकरितां येथें सांगतों. मराठ्यांवर स्वारी करण्याच्या विचारांत असतां त्यास असें स्वप्न पडलें कीं, एक गृहस्थ येऊन त्यानें आपणांस सलाम केला. पुढें त्याशीं आपण बोलतों आहों इतक्यांत तो स्त्री झाला. ह्याचें तात्पर्य टिपूनें असें बसविलें कीं, मराठे हे प्रथम मर्दासारखे पुढें येतील, परंतु आपण लढूं लागलों ह्मणजे ते बायकांसारखे दुर्बल होऊन पराभव पावतील. ह्याप्रमाणें आपल्या सर्व स्वप्नांचीं तात्पर्यें त्यानें आपणास अनुकूल अशीं बसविलीं होतीं. ठीकच आहे. माझें पुढें वाईट होईल, असें कोणालाही वाटत नसतें; आणि स्वकल्याणाचा विचार प्रत्येकाचे मनांत नेहमीं घोळत असतो. तेव्हां सर्व गोष्टींचें धोरण मनुष्यें त्याजकडे वळवितात, हें कांहीं नवल नव्हे.

हा राजा परक्यांच्या प्रांतांतल्या लोकांशीं फार क्रूरपणानें वागत असे. परंतु आपल्या स्वतःच्या प्रजेस कधींही त्यानें धक्का लाविला नाहीं. ह्मणून ती त्याजवर फार खूष असे, व त्याच्या राज्यांत नेहमी अमदानी असे. इंग्लिश लोकांस हिंदुस्थानांतून हांकून देणें, हें अत्यंत अगत्याचें कृत्य आहे, असें त्यास वाटून तो नेहमीं त्याविषयीं विचार करी. कांहीं इंग्रज लोक कितीएक दिवसपर्यंत त्याच्या प्रतिबंधांत होते. त्यांस त्यानें इतकें दुःख दिलें कीं, त्याचें वर्णन करतांना देखील अंगावर कांटा येतो. ! मनुष्याचा जीव घेणें ह्मणजे त्याला एखाद्या खेळाप्रमाणें वाटे. ! असे पुरुष मानवयोनींत जन्मून त्यांनीं केलें काय. ? तर तीस डाग लाविला; दुसरें कांहीं नाहीं.

पानपतची लढाई.

इ० स० १७६१.

आमच्या ह्मण्या लोकांस इतिहासाच्या पुस्तकांकडे पाहावयाचा सुद्धां कंटाळा; तेव्हां तीं हातांत घेऊन वाचण्याची गोष्ट कशास पाहिजे. ? तथापि, चारचौघांत बसून, ज्या गोष्टी लोकांस माहीत नाहींत, त्या सांगण्याची प्रतिष्ठा त्यांस फार प्रिय आहे. ज्यानें कधीं इतिहासाचें तोंड किंवा पुण्याची वेस देखील पाहिली नसती, तो, पेशव्यांच्या दरबारच्या गोष्टी अशा थाटानें व

डौलानें मंडळींत झोंकीत असतो कीं, जणुकाय तो नानाफडनविसाचा कोणी जिवलग मित्र व त्या वेळचा मोठा मुत्सद्दी असावा, असें एकाद्याला वाटेल. पण, त्यांत सत्य पाहूं गेलें असतां फारच थोडें असतें. कारण, त्या कथेची सगळीच इमारत ऐकिवावर; तथ्य आधार कांहींच नाहीं; आणि ती सुरेख दिसण्याकरितां हे गप्पीदास पदरच्या बाता भरीस घालितात; मग तिजमध्यें सत्यांश फार कोठून असणार? असो. अशा प्रकारच्या मनुष्यांचे तोंडांतून पानपतच्या लढाईचें नांव वारंवार निघतें. ती लढाई इतिहासांत फार प्रसिद्ध आहे. मराठी राज्यास तिजपासून जो मोठा धक्का बसला, तो लिहितां पुरवत नाहीं. असें जें भयंकर युद्ध सुमारें एकशें वीस वर्षांपूर्वी झालें, त्याची हकीकत आमच्या वाचणाऱ्यांकरितां आह्मीं येथें देतों.

पहिल्या बाजीरावाचा पुत्र बाळाजीबाजीराव, ह्मणजे ज्यास नानासाहेब असें ह्मणत, तो पेशवा असतां मराठ्यांची चांगली चलती होती. त्याचा बंधु रघुनाथराव, ह्मणजे राघोबादादा, हा बरोबर मोठें सैन्य घेऊन देशांत इकडे तिकडे फिरे, व लोकांत त्याचा मोठा दरारा असे. ह्यामुळें त्यास जो तो तुच्छ वाटूं लागला. आणि पेशव्यांस राज्य वाढविण्याविषयीं इतकी हांव सुटली कीं, हिमालयाच्या शिखरापासून तों तहत रामेश्वरापर्यंत सगळा मुलूख आमचे अमलाखालीं असावा, त्यांत कोणी वर डोकें करणारा राहूं नये, अशा तजविजी करण्यांत त्यांनीं मन घातलें. प्रथमतः त्यांचें लक्ष पंजाबाकडे गेलें. तो देश अफगाण देशाचा बादशाह अहमदशाहअबदल्ली ह्याचे राज्यांतला असून, त्याचें काम खुद बादशाहाचा पुत्र तैमूर हा पाहात असे. तो फारसा हुशार नाहीं, असें समजून, राघोबादादा बरोबर मोठी फौज घेऊन तेथें गेला. आणि फार श्रम न पडतां पंजाबची राजधानी लाहोर, ही, इ० स० १७५८ च्या मे महिन्यांत त्यानें हस्तगत करून घेतली. तेथचे दुराणी लोक त्यास इतके भ्याले कीं, त्याशीं लढण्याचा यत्न न करितां, ते पळत पळत सिंधुनद उतरून पलीकडे निघून गेले. मग राघोबादादाचा आनंद आणि गर्व किती ह्मणून सांगावा.? त्याला असें झालें कीं, मजसारखा यशस्वी वीर ह्या भूमंडलावर दुसरा कोणी नाहीं. पंजाब पटकावला, आतां आपण अयोध्या घेऊं, असें त्यानें मनांत आणिलें. त्याप्रमाणें अयोध्येकडे कांहीं फौज पाठवून राघोबादादा पुण्याकडे निघून आला. अयोध्येचा सुभेदार सुजाउद्दवला हा महा वस्ताद होता; त्यानें मराठ्यांच्या सैन्याच्या एका

टोळीचा खूब फजीता उडवून, तिला गंगेपार हुसकून लाविलें. इतक्यांत, अहमदशाह अबदल्ली हा अत्यंत क्रोधायमान होऊन बरोबर अवाढव्य सैन्य घेऊन हिंदुस्थानावर येत आहे, अशी बातमी येऊन पोहोंचली. ह्या कारणामुळें, मराठ्यांकडील सरदार दत्ताजी शिंदा ह्यानें सुजाउद्दवल्याशीं तह ठरविला.

अहमदशाहअबदल्ली खास येणार, असें नानासाहेब पेशव्यास समजलें. तेव्हां त्याशीं लढण्याकरितां त्यानेंही आपलेकडून तयारी चालविली. त्या कामावर त्यानें आपला चुलतभाऊ सदाशिवरावभाऊ, व पुत्र विश्वासराव, ह्यांची योजना केली. ते हिंदुस्थानांत जावयास निघाले. त्यांजबरोबर निवडक घोडेस्वार २०००० कवाईत शिकलेले गार्दी वगैरे लोक १०००० इतकी फौज; मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदा, दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार, आपाजीराव आठवले, अंताजी माणकेश्वर, गोविंदपंत बुंदेले, इत्यादि सरदार आपापल्या सैन्यांसहवर्तमान; आणि शिवाय बहुतेक रजपूत राजांनीं स्वारांची एक एक टोळी पाठविली; आणखी ह्यांखेरीज पुष्कळ दुसरे लोक; असा मोठा समाज त्या स्वारीबरोबर निघाला. ह्यांखेरीज, जाटांचा राजा सुरजमल्ल हा मोठें सैन्य बरोबर घेऊन येऊन त्यास मिळाला. अशा प्रकारें भाऊसाहेब दिल्लीपर्यंत गेला; आणि त्यानें तें शहर तोफांचे मोर्चे लावून घेतलें. विश्वासरावास तेथच्या तक्तावर बसवावें, आणि तो हिंदुस्थानाचा बादशाहा ह्मणून द्वाही फिरवावी, असेंही त्याच्या मनांत होतें; पण त्याच्या सरदारांचें अनुमोदन त्यास पडेना, त्यामुळें तें तसेंच राहिलें. आणखी, गर्वानें फुगून त्यानें दिल्लींतल्या उत्तम उत्तम जुन्या कामांचा विध्वंस केला. तें कितीएक रजपूत लोकांस आवडलें नाहीं; ह्मणून ते त्याचें लष्कर सोडून गेले. आणखी यमुना दोहीं थडीं भरून चालली होती, तेणेंकरून पुढें जाण्याचा उपाय खुंटला. ह्मणून त्यानें कांहीं दिवस त्या शहरींच मुकाम केला.

भाऊसाहेबानें खर्चाकरितां दक्षिणेंतून बरोबर दोन कोटि रुपये आणिले होते. व इतर सरदारांपाशीं तीन कोटि होते; मिळून पांच कोटि झाले. परंतु लष्कर अवाढव्य असल्यामुळें थोडक्याच दिवसांत त्यांचा फन्ना उडाला. आणि पैशाची चणचण पडली. तेव्हां सदाशिवरावभाऊनें, बादशाहाचा दिवाणखाना सोन्यारुप्यानें मढविलेला होता, तो मोडून, त्यापासून १७००००० रुपये उत्पन्न केले. हें कृत्य मल्हारराव होळकर व जाटांचा राजा सुरजमल्ल ह्यांस अगदीं आवडलें नाहीं. सूरजमल्ल तर आपलें सैन्य घेऊन तेथून नि-

घून गेला. इतक्यांत अहमदशाह लष्करासहवर्तमान गंगेच्या कांठीं येऊन अनुप शहरासमोर डेरे देऊन उतरला. त्यास रोहिले लोक व अयोध्येचा सुजाउद्दवला हे अनुकूल होऊन मिळाले.

यमुनेस पाणी फार आलें होतें, आणि तिच्या पलीकडे अहमदशाह होता. तेव्हां, हा एवढा पूर उतरून कशाचा येतो, अशा भ्रांतीनें मराठे इकडे गाफील राहिले. अहमदशाहाच्या लोकांनीं दिल्लीपासून दहा कोसांवर नदीस उतार शोधून काढिला, आणि तें प्रचंड सैन्य एकदम अलीकडे आलें. हें वर्तमान भाऊसाहेबास कळलें; तें प्रथमतः त्यास खरें वाटेना. परंतु मग लागलाच तो आपल्या सैन्यासहवर्तमान युद्धास निघाला.

पुढें उभय पक्षांकडील फौजा पाणिपत अथवा पानपत ह्मणून एक गांव आहे, त्याचे जवळ मोठ्या तयारीनें प्राप्त झाल्या. मराठ्यांकडे एकंदर ७०००० स्वार, १५००० पायदळ, त्यांत ९००० कवाईत शिकलेले लोक, आणि सुमारें २००००० हून अधिक बाजार बुणगें, इतकें लष्कर होतें; आणि शिवाय २०० तोफा होत्या; अहमदशाहाकडे अफगाण व इराणी लोक मिळून ४००००; हिंदुस्थानांतले लोक ५०००० व त्यांतच सुमारें १३००० स्वार; इतकें सैन्य जमलें. त्या ठिकाणीं बरेच मुकाम पडले. ह्यामुळें दोहोंकडेही दाणाचाऱ्याची चणचण पडूं लागली. व कदाचित् दुष्काळही प्राप्त होईल कीं काय, असें अहमदशाहास साह्य करणाऱ्या हिंदुस्थानच्या लोकांस भय वाटलें; ह्मणून त्यांनीं त्यास तहाची तजवीज योजण्याविषयीं विनंती केली. तेव्हां त्यानें एकच उत्तर दिलें कीं, "हें लढाईचें काम; ह्यांत तुह्मांला कांहीं एक ठाऊक नाहीं; इतर प्रकरणांत तुह्मी पाहिजे तें करा; पण हें एवढें काम मजकडे असूं द्या."

उभय पक्षांकडील लोक युद्धास उतावीळ झाले होते. एकदां चकमक झडून कायतो निकाल कळावा, असें त्यांचे मनांत फार आलें होतें. तेणेंकरून, तारीख २९ माहे नोवेंबर सन १७६० इ० पासूनच ते आपापल्या सवडीप्रमाणें एकमेकांच्या सैन्यांवर हल्ले करूं लागले. परंतु ज्या निकराच्या तुमुल युद्धानें उभयतांमधील वैराचा शेवट झाला, तें युद्ध तारीख ७ माहे जानेवारी सन १७६१ इ० रोजीं आरंभलें. त्या दिवशीं प्रथम मराठ्यांकडचें लष्कर अहमदशाहाच्या फौजेवर जाण्यास निघालें. त्याचा थाट असा. पुढें तोफा, जे जाला, उंटांवरचे जंबुरे, बाणदार, असे चालते करून सांजबरो-

चर इब्राहीमखान गार्दी व त्याचीं पलटणें दिलीं; त्यांचे मागें दमाजी गायकवाडाचे स्वार; आणि त्यांचे मागून इतर सरदारें लोक आपापल्या सैन्यांसहवर्तमान; अशी सेना चालली. सर्वांच्या पागोट्यांचे पदर सुटलेले होते; आणि त्यांनीं आपल्या हातांसं व तोंडांस हळद लाविली होती. एक इंग्लिश ग्रंथकार* ह्या लष्करांतल्या लोकांच्या स्वरूपांविषयीं असें ह्मणतो कीं, "त्यांच्या मुखचर्येवर वीरश्री मुळींच नव्हती, व ते केवळ मरणाचाच निश्चय करून जात आहेत असें दिसलें." हें त्या साहेबांनीं कशाच्या आधारानें लिहिलें कोण जाणे. ज्याची मसलत शेवटास गेली तो शाहणा, आणि ज्याची फसली तो मूर्ख, असा जनाचा अभिप्राय असतो. त्या न्यायानें पाहिलें असतां असें दिसतें कीं, ह्या युद्धांत मराठे केवळ पराभव पावले ह्मणून ह्या ग्रंथकारास त्यांजविषयीं असें लिहावेंसें वाटलें. हेच जर ते विजयी होते, तर अशी कल्पना कोणाचेही मनांत आली नसती; आणि कदाचित् कोणाचे मनांत आली असती, तरी ती त्याच्यानें बोलवली नसती; मग ती लिहिणें कोठचें? असो.

मराठ्यांचें सैन्य युद्धास उभें राहिलें तें असें. पुढें तोफा; जनकोजी शिंदा उजवे बाजूस; इब्राहीमखान गार्दी डावे बाजूस; आणि मध्यें मुख्य लष्कर. तिकडे अहमदशाह अबदल्लीचें सैन्य सज्ज झालें, तें असें. तोफा पुढें; उजवे बाजूस आमेदखानबंगष, रोहिले लोक, व आणखी कितीएक सरदार; मध्यभागीं शाहूवलीखान वजीर; आणि डावे बाजूस अफगाणलोक, अयोध्येचा नवाब सुजाउद्दवला, व नजीबउद्दवला. ह्या प्रकारेंकरून सैन्यें उभीं राहिल्यावर, व उभय पक्षांकडून तोफा सुरू झाल्यावर, मराठ्यांकडील इब्राहीमखान गार्दी वगैरे सरदार एकदम चालून जाऊन स्वशत्रूच्या सैन्यावर पडले. त्या समयीं त्यांनीं अबदल्लीच्या सैन्यांतले पुष्कळ लोक मारिले. पुढें सदाशिवरावभाऊनें आपणाकडील मुख्य सेनेसहवर्तमान मुसलमानांच्या सैन्यावर हल्ला केला. तेव्हां अबदल्लीची सेनाही मोठ्या आवेशानें पुढें सरसावली. तेव्हां उभय पक्षांचे लोक हातघाईस येऊन जी गर्दी झाली, ती अवर्णनीय आहे. धुळीनें दिशा इतक्या धुंद झाल्या कीं, अगदीं जवळजवळ असतांही कोणी कोणास ओळखेना. स्वपरपक्ष कांहीं एक न समजल्यामुळें, हातीं सांपडेल त्यास मारावें, असा सपाटा चालला. तेणेंकरून सगळा घो-

---

* मॉल्डफसाहेब.

टाळा झाला. मराठ्यांकडील योद्धे हरहर असा शब्द करीत, आणि अब-दल्लीकडचे योद्धे 'दीनदीन' अशी गर्जना करीत, तेवढ्यावरून मात्र कोण मनुष्य कोणत्या पक्षाचा, हें कळे. मराठे व मुसलमान ह्यांनीं ह्या प्रसंगीं एकमेकांचे हजारों लोक मारिले. प्रथम कांहीं वेळ दोघांची बरोबरी चालली होती. परंतु, मुसलमान कसे झाले तरी हाडाचे वळकट. त्यांनीं हिंदूंस वकऱ्यांप्रमाणें चरचरां कापण्याचा जो सपाटा चालविला, त्यापुढें त्यांच्यानें टिकाव धरवेना. तथापि होळकर खेरीज करून बाकी सर्व सरदार या दि-वशीं मोठ्या निकरानें लढले, ह्यांत संशय नाहीं.

नंतर अडीच प्रहर दिवसाचे सुमास विश्वासरावास फार मोठी जखम लागली. तिच्या योगानें तो खालीं पडून मरण पावला. तें पाहून सदा-शिवरावभाऊ आपल्या हत्तीवरून खालीं उतरून घोड्यावर बसून युद्धाच्या गर्दींत शिरला, तो पाहतां पाहतां दिसेनासा झाला. होळकर व गायकवाड हे समरांगण सोडून पळत सुटले. तेव्हां आमचें मराठी इतर लष्कर काय विचारितां.? जो तो आपला जीव घेऊन सूं निघाला. ह्या गर्दींत शत्रूनीं मराठ्यांचे लोक किती क्रूरपणानें तोडिले, ह्याचें वर्णन देखील करवत नाहीं. पानपत गांवामध्यें मराठ्यांचीं पुष्कळ माणसें जाऊन राहिलीं होतीं, त्यांजव-रही त्या चांडाळांनीं शस्त्र धरिलें. रात्रीचीरात्र त्यांस तसेंच आंत कोंडून ठेवून, दुसरे दिवशीं प्रातःकाळीं अफगाणांनीं त्यांस आपले ठिकाणीं नेऊन, त्यांतील बायका व मुलें वांटून घेतलीं, आणि पुरुषांच्या दांवणी करून, त्यांच्या मस्तकांचे ढीग आपल्या डेऱ्यांपुढें घातले. ! !

लढाई आटोपल्यानंतर समरभूमीवर विश्वासरावाचें प्रेत सांपडलें. तें अहमदशाह अबदल्लीनें बुद्धया पाहावयाकरितां आपणाकडे आणविलें. त्याचे भोंवती अफगाण लोकांची गर्दी झाली; आणि ते एकदांच ह्मणाले कीं, हें काफर लोकांच्या राजाचें प्रेत, आंत पेंढा भरून आह्मी काबुलास घेऊन जाऊं. परंतु तें प्रेत सुजाउद्दवल्याच्या मध्यस्थीनें हिंदूंस परत मिळालें.* त्यास त्यांनीं यथाविधि अग्नि दिला. इब्राहीमखान गार्दी, जनकोजी शिंदा, व नजीबउद्दवला हे सरदार अफगाणांचे हातीं लागले होते, त्यांस त्यांनीं ठार मारिलें.

ह्या लढाईमध्यें २२००० पाडाव केलेले लोक व ९०००० घोडे, आणि अतोनात लूट, हीं शत्रूस सांपडलीं. मराठ्यांचा नाश किती ह्मणून सांगावा?

गेलेल्या एकंदर लष्करापैकीं, चवथा हिस्सा देखील स्वदेशीं परत आला नाहीं. ह्या लढाईच्या परिणामाचें वर्तमान समजलें तेव्हां सगळा दक्षिण प्रांत केवळ दुःखाच्या डोहांत बुडाला. आपल्या सैन्यास अपयश आलें, अशी संदिग्ध वार्ता पेशव्यास पूर्वीं कळली होती. ह्मणून तो बरोबर १०००० फौज घेऊन तिकडे जावयास नर्मदा उतरला देखील. पण कच्चें वर्तमान त्याला तेथें लागलें, तेव्हां त्याचे हातपाय गळाले. ह्याच्याच धक्क्यानें त्याला मरण लवकर आलें, असें ह्मणतात.

ह्या पराजयाचें वर्तमान संकेतरूपानें लिहिलेलें असें एक पत्र, नर्मदेच्या तीरीं असतांच नानासाहेबाच्या हातीं लागलें. त्यांतलें हांशील येणेप्रमाणें.— "दोन मोत्यें गळून गेलीं; सत्तावीस मोहरा सांडून गेल्या; आणि रूपये व खुर्दा किती हरवला, ह्यांची संख्या लागत नाहीं." ह्या पत्रावरूनच, आपले सैन्याची दशा काय झाली, हें नानासाहेबाच्या लक्षांत आलें.

ह्याप्रमाणें पानपतच्या लढाईची हकीकत आहे. तिच्यापायीं २००००० हिंदु लोक प्राणांस मुकले. ह्या युद्धांत पराजय झाल्यापासून मराठ्यांचें पाऊल मागें पडत चाललें. तें इतकें कीं, मराठ्यांचें राज्य पूर्वी ह्या देशांत होतें किंवा नव्हतें, ह्याचा देखील कांहीं कालेंकरून सामान्य जनांस संशय पडेल, असें वाटतें. स्वशक्ति पाहून कोणत्याही कामास हात घालावा, असा जो सत्पुरुषांचा उत्तम गुण, तो पेशव्यांचे ठायीं कमी होता, किंबहुना नव्हता, असें ह्मटलें तरी चालेल. आपले दरबारांत व घरांत एकीची वाण, आणि कलहाचा सुकाळ, पर्‍याजास जिंकण्याचें सामर्थ्य कमी, इतक्या सर्व गोष्टी ज्ञात असून, अहमदशाहासारख्या बलाढ्य बादशाहाचे प्रांतावर एकदम हल्ला करणें मराठ्यांस उचित नव्हतें. परंतु आपले अल्पविचारी राजे, एका परानें मोर होणारे, त्यांस लहान सहान एक दोन संस्थानिकांवर जय मिळाला, ह्मणजे ते आपणांस लागलेच अजिंक्य ह्मणवूं लागतात, व बेलाशक पाहिजे त्या कामास एकदम हात घालतात. हें फार वाईट आहे; ह्यानें सगळें बुडतें. पेशवे, आपलें संपादिलेलें राज्य राखून जर ठाकठेकीनें राहते, व लहान तोंडांत मोठा घांस न घेते, तर ते कधींही नाश न पावते. पण त्यांस तशी बुद्धि होणार कोठून? त्यांच्या अविचारानें प्रजेस संकट यावें, व हजारों लोक प्राणांस मुकावे, असा ईश्वरी संकेत होता, तो कसा चुकेल.?

सूक्ष्म रीतीनें विचार करून पाहिला असतां, लढाई हें एक मोठें विघ्न

आहे. हें अरिष्ट एका मनुष्यावर, एका कुटुंबावर, एका गांवावर, अथवा एका प्रांतावरच गुदरतें असें नाहीं; तर, त्याचे पायीं देशांचे देश जमीनदोस्त, बेचिराख होऊन जातात. मांजरांचा होतो खेळ, पण उंदरांचा जातो जीव. राजांस राज्यें वाढविण्याची हौस फार; त्यामुळें युद्धें होतात; आणि बिचारे हजारों लोक प्राणांस मुकतात. तेव्हां, ज्यांच्या हातून इतक्या मनुष्यांचें मरणमूळ उत्पन्न होतें, ते थोर म्हणावे किंवा कसें.? हजारों माणसें मरावीं, अशीं कामें काढणें, हें थोरांचें लक्षण काय ? पण जन सांप्रत अशांचेंच आहे. एकाद्या मनुष्यानें आपले हितार्थ कोणाकडून एका माणसाचा वध करविला, तर तो महान् अपराधी, पापी, त्याचें तोंड पाहूं नये, सरकार त्याला मोठें शासन करितें. आणि हे राजे, स्वहितार्थ हजारों लोकांस ठार मारवितात, तरी त्यांस कोणी दोष देत नाहीं; व त्यांस शासन असावें, असा विचार कोणाच्या मनांतही येत नाहीं. ह्याचें कारण काय असावें बरें.? सामर्थ्य; नव्हे काय.? नाहींतर हत्या तेथून पाप; मग तें कोणाचेही हातून घडो.! पण दुनया पैशाची आहे. जिकडे चलती तिकडे भलती.! थोरांचें सगळेंच चांगलें. असो.

कोणत्याही हेतूनें राष्ट्रांचीं राष्ट्रें चिरडून टाकणें, हा पुरुषार्थ नव्हे; तर होईल तितकें जनाचें हित करणें, हेंच नरजन्माचें सार्थक्य आणि महत्पुण्य होय; हें सर्वांनीं लक्षांत ठेवावें.

वक्सारची लढाई.

इ० स० १७६४.

मागें एके ठिकाणीं आम्हीं सांगितलें आहेच कीं, प्लासीच्या लढाईंत इंग्लिशांनीं केवळ जयच मिळविला नाहीं, तर बंगाल्याच्या सुभेदाराविषयीं निखालस ब्रह्मदेवपणाही संपादिला. म्हणजे इच्छेस येईल त्यास सुभेदार बनविण्याचें सामर्थ्य त्यांस प्राप्त झालें. त्यांनीं इ० स० १७६० त मीरजाफरास पदच्युत करून, मीरकासिमास गादीवर बसविलें. तो त्यांचे उपकार स्मरून त्यांशीं मोठ्या मित्रत्वानें वागूं लागला. परंतु इंग्लिश लोकांस त्या वेळीं असें होऊन गेलें होतें कीं, बंगाल्यांत राजे कायते आम्ही, आम्ही करूं तें प्रमाण,

आणि आमच्या एकाद्या यःकाश्चित् नौकरामध्यें जें सामर्थ्य आहे, तें खुद सुभेदाराला सुद्धां नाहीं. काशिमबाजार, पाटणा, ढाका, इत्यादि जागीं त्यांच्या वखारी असत; त्यांतील मुख्य कामदार केवळ राजांप्रमाणें प्रजेवर अमल करीत. तेल, सुपारी, तांदूळ, वेळू, मत्स्य, इत्यादि मुख्य मुख्य जिनसांचा सगळा व्यापार त्यांनीं आपले हातीं घेतला होता. तेणेंकरून एतद्देशीय उदमी बुडाले. पोटासाठीं ते त्यांच्या नौकरीस राहिले. सगळ्या देवघेवीचे कायते मुख्य मालक इंग्लिश लोक झाले. त्यांजपासून इकडील वाण्यांप्रमाणें जकात व कर सरकारास भरपूर मिळेना. कारण, ते प्रबळ आणि कायदेशीर पडले; आणि त्यांजपासून त्या दोन्ही बाबी कमी घेण्याचा ठराव असे. ह्यामुळें मीरकासिमाच्या उत्पन्नास बराच धक्का आला. आणि त्याला तर पैशाची फार जरूर होती. ह्मणून त्यानें ही सगळी हकीकत इंग्लिशांच्या कानावर घातली. पण त्याची दाद घेतो कोण.? जो तो आपली पिशवी भरण्याच्या नादांत.! आणि गादीवर बसविल्याबद्दल देऊं केलेल्या पैशाकरितां कंपनी सरकाराचा सक्त तगादा त्याच्या मागें लागला. खजीन्यांत तर पैशाच्या नांवानें शून्य! तेव्हां त्या बिचाऱ्यानें काय करावें बरें.?

देशामध्यें व्यापाराविषयींची मोकळीक सर्वांस सारखी असावी, हें रास्त आहे. ही गोष्ट मीरकासिमाचे मनांत येऊन, कांहींएक जातिभेद मनांत न आणितां प्रत्येक उदम्यानें जकात व कर एक सारखा दिला पाहिजे, असा सक्त हुकूम त्यानें चोहींकडे फिरविला. तो ऐकतांच इंग्लिश लोकांचें पित्त खवळले. आणि हा आपला मोठा अपमान झाला, व ह्यापासून आपणाला अतिशयित तोटा येईल, असें त्यांस वाटलें. तेणेंकरून अर्थातच ते मीरकासिमाला पाण्यांत पाहूं लागले. तोही अत्यंत क्रोधायमान झाला. आणि, वैमनस्याग्नि जो उभयतांचे मनांत बरेच दिवस धुमसत होता, तो भडकावयाचा समय जवळ आला.

उघड वैर माजलें. उभय पक्षांकडे सैन्यांची तयारी चालली. त्यांचें मोठें युद्ध तारीख २ माहे आगस्त सन १७६३ रोजीं घेरियानामक गांवाजवळ मैदानांत झालें. तें सुमारें चार तासपर्यंत चाललें होतें. त्या समयीं मीरकासिमाकडच्या लोकांनीं मोठें शौर्य करून इंग्लिशांच्या लोकांस मागें हटविलें, त्यांचा पराजय करण्याचा बेत आणिला, आणि त्यांच्या चार तोफाही घेतल्या. परंतु, इंग्लिश लोक पक्के धैर्याचे. ह्मणून शेवटीं त्यांचाच जय झाला.

आणि मीरकासिमाचें आवडतें शहर, जें मौंगीर तें त्यांनीं कात्रीज करून घेतलें.

आपलें प्रिय शहर इंग्लिशांनीं घेतलें, हें वर्तमान मीरकासिमास पाटणा येथें समजलें. तेव्हां तो अत्यंत क्रोधायमान झाला. आणि पाटणाचा किल्ला घेण्यासाठीं मेजर आडाम्स साहेब सैन्यासहवर्तमान येत होता, त्यास त्यानें असें लिहून पाठविलें कीं, "जे थोडे जमीनदार मीं तुह्मांशीं लढण्याकरितां पाठविले होते, त्यांजवर फितुरानें व रात्रीचे हल्ले करून तुह्मीं जय मिळविले, ह्मणून गर्वानें फार फुगूं नका. ह्याचा सूड मी कोणत्या रीतीनें घेईन, तें परमेश्वराचे कृपेनें लवकरच तुमच्या दृष्टीस पडेल. कांहीं काळजी करूं नका." नंतर पाटणा येथील एकोनएक गोरें मनुष्य ठार मारण्याविषयीं त्यानें आपल्या सरदारांस हुकूम केला. त्यास त्यांनीं साफ उत्तर दिलें कीं, "नाहीं. गरीब मेंढरांप्रमाणें आह्मी त्यांस ठार मारणार नाहीं. त्यांस मोकळें सोडा, आणि मग त्यांशीं लढून काय होईल तें पाहूं." हें उत्तर त्याला आवडलें नाहीं. तेव्हां त्याचा जर्मन सरदार सुमरू व इतर लोक ह्यांनीं सुमारें २०० इंग्लिश माणसांची कत्तल उडविली. या चांडाळांस लहान अर्भकांची देखील दया आली नाहीं. ! ह्या अनर्थांत, एलिस कौन्सलदारही प्राणास मुकला. ह्या भयंकर प्रसंगांतून फुलर्तन हा इंग्लिश पुरुष मात्र बचावला. ह्याचें कारण एवढेंच कीं, तो चांगला वैद्य होता, आणि कितीएक प्रसंगीं त्यानें मीरकासिमास औषध देऊन बरें केलें होतें. त्याचें रक्षण करण्याविषयीं त्यानें बुद्धया सूचना दिली होती. पाहा. गुणांचें फळ असें आहे.

आपण इंग्लिशांचा फार नाश केला, ह्यास्तव त्यांजकडून आतां अपराधाच्या क्षमेची आशा राहिली नाहीं, असें मनांत आणून, मीरकासिम पाटणा शहराहून निघाला. तो कर्मनाशानदी उतरून पलीकडे अलाहाबादेस गेला. तेथें दिल्लीचा बादशाह शाहाआलम व त्याचा वजीर अयोध्येचा नवाब सुजाउद्दवला, हे दोघे आपल्या सैन्यांसहवर्तमान राहून बुंदेलखंडावर स्वारी करण्याची मसलत करीत होते. त्यांनीं मीरकासिमाचा चांगला आदरसत्कार केला; आणि त्याची गादी त्यास परत मिळवून देण्याचे कामीं मदत करण्याविषयीं वचन दिलें. या दोघांनीं बुंदेलखंडावर स्वारी केली तेव्हां मीरकासिम त्यांजबरोबर आपल्या सैन्यासुद्धां गेला होता. तेथें त्यानें आपलें युद्धचातुर्य इतकें दाखविलें कीं, ते त्याचे नवे मित्र त्याजवर फारच खूष झाले. तिकडची मोहीम अटोपल्यावर, शाहाआलम, सुजाउद्दवला, आणि मीरकासिम ह्यांनीं

आपलीं सैन्यें एकत्र जमवून इंग्लिशांशीं लढण्याचा निश्चय केला. ह्यांच्या सैन्यांची एकंदर संख्या कोठें ४०००० व कोठें ६०००० सांगितली आहे. इंग्लिशांकडचा मनरोसाहेब हा ह्यांशीं लढण्यास सिद्ध झाला; त्याजपाशीं ८५७ गोरे, ५२९७ काळे, आणि ९१८ घोडेस्वार, असे एकंदर ७०७२ लोक होते. ते बरोबर घेऊन, तो तारीख २२ माहे आक्तोबर सन १७६४ रोजीं बक्सारनामक किल्ल्याजवळ येऊन तळ देऊन राहिला. हा गांव गंगेच्या उजव्या तीरावर, काशी आणि पाटणा ह्यांजपासून सारख्या अंतरावर ह्यांच्यामध्यें आहे. सुजाउद्दवला व मीरकासिम ह्यांच्याही स्वाऱ्या तेथें जवळच होत्या. त्यांच्या सैन्यानें, २३ व्या तारखेस, इंग्लिश सैन्यावर एकदम चाल केली. तेव्हां उभय पक्षांकडचे वीर सुमारें एक प्रहर झगडत होते. शेवटीं, इंग्लिशांच्या शत्रूंच्या सैन्यांत गोंधळ होऊन, त्यांतील लोक एकाएकीं पळत सुटले. तेव्हां त्यांस गंगानदी उतरावी लागली. तीस पाणी फार होतें, ह्मणून तिजवर नावांचा पूल बांधिला होता. त्यावरून ते सर्व लोक निघून गेले नाहींत तोंच, त्याजवरून इंग्लिश लोक आलीकडे येऊन आपले पाठीस लागूं नयेत, अशा हेतुनें, तो सुजाउद्दवल्यानें ताबडतोब मोडून टाकविला. परंतु त्याचे २००० स्वार मागें राहिले होते, हें मग त्याच्या लक्षांत आलें. परंतु उपयोग काय.? त्यांस वांचविण्याचा कांहींएक उपाय त्याचे हातीं राहिला नाहीं. त्यांतले कांहीं बुडून मेले, व कांहीं कापले गेले. अशा प्रकारें ते नाश पावले. शिवाय २००० लोक समरांगणीं पडले ते वेगळेच. मिळून या तिघांकडचे ४००० लोक ह्या युद्धप्रसंगीं प्राणांस मुकले. इंग्लिशांकडील मेले व जखमी झाले मिळून सगळे ८४७ लोक. ह्या समरामध्यें इंग्लिशांस जय मिळाला, हें त्यांच्या ठाकाठिकीचें व कवाइतीचें फळ होय.

ह्या युद्धांतला इंग्लिश सरदार मेजर मनरोसाहेब, हा महान् कुशल योद्धा पुरुष होऊन गेला. तो स्वतः एके ठिकाणीं असें लिहितो कीं, "या प्रसंगीं सुजाउद्दवला ह्यानें पूल मोडून टाकण्याचा हुकूम केला, ही समयसूचकता त्याला अत्यंत भूषणप्रद होय. जर ही युक्ति त्याला न सुचती, तर मी खचीत सांगतों कीं, त्याचें सगळें सैन्य मीं कापून टाकिलें असतें, अथवा कर्मनाशा नदीमध्यें बुडवून तरी मारिलें असतें; आणखी त्याचा सर्व खजीना व मीरकासिमाचें सगळें जवाहीर मी हाताखालीं घातल्यावांचून कधींही सोडतों ना. पण त्याच्या हिकमतीनें अवघी मसलत फसविली. जर हा लाग साधता तर

दोन तीन कोटींचा ऐवज मला खचीत मिळाला असता." शत्रूच्या आंगच्या चांगल्या गुणांस वाखाणणें हें मनुष्याच्या थोरपणाचें लक्षण होय.

ह्या प्रकारेंकरून बक्सारच्या लढाईचा शेवट झाल्यावर, शाहाआलम व सुजाउद्दवला हे अगदीं हतवीर्य होऊन गेले. त्यांत्र शाहाआलम हा सुजाच्या कामास इतका त्रासला होता कीं, पाहिजे त्या तहावर माझी सही घ्या पण ह्या जाचांतून मला एकदा काढा, असें त्यानें मनरोसाहेबास लिहिलें. त्यास तह करण्याचा अधिकार नव्हता, ह्मणून त्यानें तें प्रकरण अभिप्रायाकरितां कलकत्त्यास पाठविलें. तिकडून अनुकूल उत्तर येऊन, तह ठरून, शाहाआलमास आश्रय मिळे तोंपर्यंत, त्यानें सुजाउद्दवल्याच्या भयानें इंग्लिशांच्या लष्कराची पाठ सोडिली नाहीं. ह्याप्रमाणें दिल्लीचा बादशाह इंग्लिशांच्या स्वाधीन झाला.

बाकी राहिला सुजाउद्दवला. तो इंग्लिश सरकारास, सैन्यास, व सरदारांस पुष्कळ पैसा देऊं करून, यांशीं स्नेहाचा तह ठरवायास पाहात होता; परंतु त्याचा प्रयत्न सिद्धीस गेला नाहीं. कारण, मीरकासिम आणि सुमरू ह्या दोघांस आधीं आमचे हवालीं केल्या खेरीज आह्मी कांहींएक ऐकत नाहीं, असें खडखडीत उत्तर इंग्लिश अमलदारांकडून त्यास मिळालें. तेव्हां त्यास मोठी अडचण पडली. कारण, ज्या कोणास आपण एकदा आपलेंसें ह्मटलें, त्यास दुसऱ्याचे हातीं देणें हें एकाद्या सामान्य मनुष्यास देखील फार अपमानास्पद वाटतें. अशा प्रसंगीं स्वतः आपल्या अब्रूपेक्षां मनुष्यास स्वाश्रिताची अब्रू अधिक रक्षणीय होते, हा मानवस्वभावाचा चमत्कार लक्षांत ठेवण्यासारखा आहे. असा विचार फक्त मीरकासिमाविषयीं मात्र कायतो सुजाउद्दवल्याच्या मनांत आला. सुमरूविषयीं त्याचें मन कांहीं वेगळ्या प्रकारचें होतें. त्याविषयीं त्यानें इंग्लिशांस असें सांगितलें कीं, त्याचें सैन्य पुष्कळ आहे, आणि तो स्वतंत्र आहे, ह्मणून त्यास तुमचे स्वाधीन करणें हें मला दुष्कर आहे. आणखी त्यानें असें सुचविलें कीं, तुमची अनुकूलता असल्यास त्यास मेजुवानीच्या मिषानें बोलावून आणून ठार मारण्याची तजवीज मी करितों. परंतु हा कपटविचार इंग्लिशांस अगदीं नापसंत वाटला, ह्मणून तो त्यांनीं नाकारिला; त्यामुळें सुजाउद्दवला व इंग्लिश ह्यांच्या तहाचा विचार तेव्हां कांहीं वेळ तसाच मागें पडला. असो.

पुढें कांहीं वेळानें सुजाउद्दवलाही हतवीर्य होऊन इंग्लिशांचा सरदार

कार्नाक साहेब ह्यास शरण गेला. ह्या प्रकारेंकरून शाहाआलम व सुजाउद्दवला हे दोघे बलिष्ठ योद्धे एके कालीं इंग्लिशांच्या लष्करांत बंदीवानांप्रमाणें होऊन राहिले. ही गोष्ट परभुलखी लोकांच्या यशास किती भूषणप्रद आहे बरें? शाबास इंग्लिश लोकांची. ! धन्य त्यांचा पराक्रम. ! ज्या दिल्लीच्या दरबारीं इंग्लिश मनुष्याची नुसती दाद लागण्यास दोन दोन तीन तीन महिने न पुरावे, तेथच्या खुद बादशाहानें लीन होऊन खालीं मान घालून, त्यांच्या लष्कराच्या एका कोंपऱ्यांत स्वसंरक्षणार्थ वसावें काय.? हर हर.!! कर्माची गति विचित्र आहे. ! काळ फिरला ह्मणजे गाजीचा पाजी होतो. ! असो.

मीरकासिमास गादीवरून काढून, इंग्लिशांनीं मीरजाफरास पुनः सुभेदार केलें. तेव्हां तो सत्तर वर्षांचा होऊन अगदीं वांकला होता, व त्याचे डोळेही गेले होते. पण एवढा कुतबा झाला कशावरून, व इतक्या खटपटींत इंग्लिश लोक पडले कशाला, असें कोणी विचारील, तर त्याचें उत्तर फार आंखूड, चार अक्षरांत आहे. तें कोणतें, तर "पैशासाठीं;" दुसरें कांहीं विशेष कारण आमच्या दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. हा सगळा प्रताप धनाजीचा, असें आह्मी विनादिक्कत ह्मणतों.

युद्धादिकांत झालेल्या नुकसानीबद्दल मी ५००००० रुपये तुह्मांला देईन, असें, मीरजाफरानें पुनः नवाब होतेवेळीं इंग्लिशांस वचन दिलें. पण गादीवर बसल्यावर खजीन्यांत पाहूं लागला तों पैसा नाहीं, आणि इंग्लिशांनीं तर त्यासाठीं अतिशयित नेट लाविला. तेव्हां त्याला कांहीं सुचेनासें झालें. तो द्रव्य देईना, व कांहीं तोड काढीना. तेव्हां त्यांनीं त्याला कलकत्ता येथें आणिलें. तेथें ते त्यास द्रव्य मागून वारंवार त्रास देत, तेणेंकरून तो आजारी देखील पडला. तें त्याचें दुखणें शेवटचें होतें असें त्यांस वाटल्यावरून, त्यांनीं त्याला लागलेंच मुर्शिदाबादेस पाठविलें. त्या राजधानींत तो कांहीं दिवस पिचत पडून, इ० स० १७६५ च्या फेब्रुवारी महिन्याचे आरंभीं मरण पावला. नंतर त्याचे जागीं कोणास बसवावें, ह्याची वाटाघाट चालली. ती ऐकण्यासारखी चमत्कारिक आहे. ती आतां एका वेगळ्या लेखांत वाचणाऱ्यांस सादर करूं.

मीरजाफराचे मागें त्याचे गादीवर कोणास बसवावें.?

इ० स० १७६५.

मीरजाफर निवर्तल्यावर त्याची गादी इंग्लिशांनीं कोणाला दिली, हें ह्याच प्रसंगीं सांगितलें पाहिजे. तसें न केलें तर कथाभाग तुटक दिसून, वर्णनाचा कालानुक्रम बिघडेल. ह्मणून या विषयींची हकीकत येथें लिहितों.

मीरजाफर मरण पावला तेव्हां त्याच्या गादीचे वारीस ह्मणण्यासारखे दोन होते. ते कोणते, तर त्याचा वडील मुलगा मीरन, जो वीज पडून वारला, त्याचा पुत्र; तो वयानें केवळ ६ वर्षांचा होता. आणि दुसरा त्याच्या जीवंत मुलांपैकीं थोरला पुत्र नूजमउद्दवला; त्याचें वय १९ किंवा २० वर्षांचें होतें. ह्मणजे, मीरजाफराचा एक नातू, आणि एक मुलगा, ह्या दोघांतून कोणाला तरी एकाला तें पद मिळावयाचें, असा कलकर्त्यास विचार चालला. मुसलमानी शास्त्राप्रमाणें ह्मटलें असतां, राजपदाची मालकी नातवाबितवाकडे न जातां, जो वडील मुलगा जीवंत असेल, त्याजकडे राहाते. तेव्हां नूजमउद्दवला सुभेदार व्हावा, हें योग्य, असें कितीएक ह्मणाले. कोणाचें मत असें पडलें कीं, यूरोप खंडामध्यें सुधारलेल्या देशांत वारसाविषयीं जी वहिवाट चालू आहे, तीस अनुसरून, मीरजाफराच्या ६ वर्षांच्या नातवास गादीवर बसवावें. ह्यांत आणखी एक मोठा फायदा असा आहे कीं, तें बिचारें पोर खाऊन खेळून उगाच पडलें राहील, कारभारांत ढवळाढवळ करणार नाहीं, आपणांला त्रास पोहोंचणार नाहीं, आणि सगळी राज्यव्यवस्था आपले हातीं येऊन, आपली यजमानीन जी कंपनी (मंडळी), तिला चांगला नफा होईल. त्यावर दुसऱ्यांचें ह्मणणें असें पडलें कीं, पोर गादीवर बसविल्यानें कंपनीस खूब नफा होत जाईल, ही गोष्ट खरी आहे. पण त्यापासून सांप्रतच्या आह्मां लोकांस कांहीं लाभ नाहीं; नूजमउद्दवला सुभेदार झाला, तर तो मागच्या सुभेदारांप्रमाणें आपणांस मोठमोठे नजराणे देईल; आणि मुसलमानी शास्त्राप्रमाणें त्याचा हक्कही गादीवर विशेष आहे; ह्यास्तव त्यालाच सुभेदारीचीं वस्त्रें द्यावीं; ह्मणजे त्यांचा शास्त्रार्थ झाला, आणि आपला लाभ साधला, असें होईल. द्रव्यलोभ फार कठीण आहे. त्यानें हें बोलणें बाकी सर्वांच्या मनांत बिंबविलें, आणि तें सर्वांकडून मान्य करविलें. नंतर, नूजमउद्दवला

सुभेदारी पावला. त्यानें मोठा उत्सव करून इंग्लिशांचे फार फार आभार मानिले. या वेळीं स्पेन्सरसाहेब हा गवरनर होता. त्याजकडे, नवीन सुभेदारानें १३९३५७० रुपये नजराणा ह्मणून पाठविले. ते त्यानें, आपण व आपले कौन्सलदार ह्यांजमध्यें वांटून घेतले. कंपनी सरकारच्या हिंदुस्थानांतल्या नौकरांनीं नजराणा घेऊं नये व खासगत व्यापार करूं नये, ह्मणून जो सक्तीचा हुकूम ह्या वेळापूर्वीच विलायतेहून आला होता, त्याजकडे, ह्या प्रसंगीं कोणीं पाहिलें सुद्धां नाहीं. आणि ह्यांत मोठें नवलही नाहीं. कारण, ह्या दुनयेंत जें सदाचरण ह्मणून कांहीं होतें, त्यास मुख्यत्वें, दोन कारणांपैकीं कोणतें तरी एक कारण असतें. तीं कारणें कोणतीं, तर भीति आणि भक्ति. वास्तविक विचार करून पाहिलें असतां, सांप्रत काळीं भक्तीपेक्षां भीतीचें कर्तृत्व विशेष आहे. भक्तीनें सदाचरण करणारे असे फारच थोडे निघतील. बाकी बहुतेक भीतीनें सदाचरण करणारे आहेत. ही जर गोष्ट प्रमाण आहे, तर गवरनर व कौन्सलदार ह्यांनीं जें ह्या प्रसंगीं केलें, त्याचें विशेष आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. असो.

नूजमउद्दवला नांवाचा मात्र सुभेदार बनला. इंग्लिशांनीं महंमद रिझाखान नामेंकरून एक मुसलमान त्याचा दिवाण ह्मणजे नायब सुभेदार नेमिला, व त्यानें सर्व कारभार पहावा, असें ठरविलें; आणि मुलुखांतील मुलकी व लष्करी सत्ता इंग्लिशांचे हातीं आली. ह्या दिवाणगिरीचे जागेचा वर्षाचा पगार सुमारें १००००० रुपये होता; व खुद नूजमउद्दवल्याची वर्षाची नेमणूक ३००००० रुपयांची होती; तिचाही सर्व खर्च त्याचेच हातून व्हावयाचा असे; आणि ह्याखेरीज इतर मिळकत. तेव्हां, एवढी महत्वाची जागा मिळविण्याविषयीं कोण प्रयत्न करणार नाहीं? सर्व करतील. महमंदरिझाखानास नेमिलें त्या वेळीं, महाराजनंदकुमार ह्या नांवाचा एक मोठा श्रीमान् ब्राह्मण व्यापारी ती मिळविण्याचा यत्न करीत होता. तो किती कपटी होता, हें दाखविण्याकरितां लार्ड मेकाले ह्या नांवाचा एक अत्युत्तम इंग्लिश ग्रंथकार त्याविषयीं असें लिहितो कीं, "इंग्लिश लोकांपेक्षां इताल्यन लोक कपटी; इताल्यन लोकांपेक्षां हिंदु लोक कपटी; इतर हिंदुंपेक्षां बंगाली लोक कपटी; आणि सर्व बंगाली लोकांमध्यें नंदकुमार हा कपटशिरोमणी." ह्यावरून त्या पुरुषाच्या कपटी स्वभावाविषयीं सहज अनुमान करितां येईल. ह्यानें नायब सुभेदारी मिळविण्याचा प्रयत्न केला असतां तो व्यर्थ गेला, त्या-

वरून, व इतर कांहीं कारणांवरून त्याचें व वारन हेस्तिंग्ज साहेब गवरनर जनरल ह्यांचें इतकें वैमनस्य आलें कीं, ते एकमेकांस पाण्यांत पाहूं लागले. शेवटीं, कांहींएक कारणावरून तो बिचारा बंगालीच फांशीं गेला. हें सगळें कृत्य वारन हेस्तिंग्ज ह्याच्या खटपटीमुळें झालें, असें कितीएक ग्रंथकारांचें अनुमान आहे. ती गोष्ट फार चमत्कारिक आहे. तिचें वर्णन एका वेगळ्याच लेखांत केलें पाहिजे; ह्मणून तिजविषयीं येथें फार लिहीत नाहीं.

नूजमउद्दवल्यास गादी दिल्यावर, इंग्लिशांनीं वरद्वान् मिदनापूर, आणि चितेगांव ह्या प्रांतांचा सर्व वसूल, व शिवाय दरमहा ९ लक्ष रुपये त्या सुभेदाराकडून घेऊन, त्याचें व त्याच्या देशाचें रक्षण करण्याचें पतकारिलें. ह्या प्रकारेंकरून इंग्लिशांनीं आपलें कल्याण करून घेतलें.

सदाशिवरावभाऊचा तोतया.

इ० स० १७६९.

पानपतच्या लढाईचें वर्णन केलें आहे, त्यांत सदाशिवरावभाऊ पेशवा ह्याचा शेवट कसा झाला, तो लिहिला आहे; तो वाचणाऱ्यांच्या ध्यानांत असेलच. त्या भयंकर युद्धा नंतर सुमारें आठ वर्षांनीं, एका ब्राह्मणानें, मी सदाशिवराव पेशवा आहें, असें सोंग केलें. त्याचें नांव सदोबा होतें. माधवरावानें त्याची चौकशी करून, तो खोटा आहे असें ठरवून, त्याला बंदींत घातलें. तो मोठा काबील दिसे; ह्मणून त्याला एके जागीं फार दिवस ठेवीत नसत. त्याचें वारंवार स्थलांतर करीत. असें होतां होतां त्यास ठेवण्याची पाळी रत्नागिरीवर आली. तेव्हां तेथें रामचंद्र नाईक परांजपे, ह्मणून कोणी कोंकणस्थ ब्राह्मण सुभेदार होता. त्याला पुणें दरबारची अंदाधुंदी ठाऊक होती. व त्याचे मनांत आलें कीं, ह्या ब्राह्मणास सोडून दिलें असतां, कदाचित् आपणाला मोठा लाभ होण्याचा संभव आहे. असा विचार करून त्यानें त्याला मुक्त केलें. आणि त्यानें लोकांस असें सांगितलें कीं, हा खरा सदाशिवराव पेशवा असतां, कारभाऱ्यांनीं जुलूम करून ह्यास कैदेंत टाकिलें आहे, हें अगदीं बरोबर नाहीं; जे कोणी खरे न्यायी पुरुष असतील, त्यांनीं

ह्याचा पक्ष उचलिला पाहिजे. हें त्याचें भाषण कितीएक सदय लोकांच्या अंत:करणांत भरलें. आणि सदाशिवरावभाऊस साह्य करणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे, असें त्यांस वाटलें. मग त्याला काय कमी.? फार श्रम न पडतां थोडक्याच दिवसांत त्याजपाशीं २०००० फौज जमली. व त्यानें कोंकणांतले वीसबावीस किल्लेही घेतले. मुंबई सरकारासही, तो खरा सदाशिवराव भाऊ आहे, असा वाटला. ह्मणून त्यांनीं त्याजकडे वकील पाठवून त्याचा मोठा सन्मान केला. नंतर, तो सदोबा वोरघांट चढून वर आला, आणि त्यानें राजमाची किल्ला घेतला. तो तेथें असतां, शिंद्याचे सरदार रामजी पाटील व भिवराव पानशे, ह्यांनीं सैन्यासहवर्तमान त्याजवर चाल केली. तेव्हां तो आपल्या लोकांसुद्धां तेथून पळाला, तो मुंबईस गेला. तेथें मुख्य साहेब नव्हता. ह्मणून तो कुलाब्याकडे वळला. तों तेथें राघोजी आंगऱ्यानें त्याला पकडलें, आणि पुण्यास पाठविलें. पेशव्यानें त्यास हत्तीच्या पायीं बांधून ठार मारिलें. ह्याप्रमाणें त्या तोतयाचा शेवट झाला.

सदोबा पक्का बिलंद, तो कदाचित् पळून जाईल, ह्मणून, जी स्थलांतराची युक्ति पेशव्यांनीं काढिली, तीच त्याच्या सुटकेस कारणीभूत झाली, असें दिसतें. विश्वासू नौकर फार थोडे असतात. रत्नागिरीस येण्यापूर्वी त्यास आपली मुक्तता करून घेतां आली नाहीं; ह्यास कारण त्याच्या कपटीपणाची उणिव नव्हे, तर त्याला सांभाळणाऱ्या अधिकाऱ्यांचें विश्वासुकपण होय. जी वस्तु सुरक्षित ठेवावयाची आहे, ती हजारांच्या हातीं जाऊं देऊं नये. तर, ती एकाच मनुष्याच्या माथीं मारावी, हा उत्तम प्रकार होय. कारण, हजारांत ९९० दगेखोर निपजावयाचा संभव आहे. आणि, हजारांत जो एकदां इमानी असा प्रतीतीस आला, त्याचे हातून लबाडी होण्याचा संभव कमी असतो, अथवा नसतो ह्मटलें तरी चालेल.

माधवराव पेशवा.

इ० स० १७७२.

बाळाजीबाजीराव ऊर्फ नानासाहेब हा पेशवा मरण पावल्यानंतर त्याचा पुत्र माधवराव ह्यास, इ० स० १७६१ च्या सप्टेंबर माहिन्यांत पेशवाईची

वस्त्रें मिळालीं. तेव्हां तो सत्रा वर्षांचा होता. हा वयानें लहान होता, ह्मणून ह्याच्या राज्याचा सर्व कारभार मुख्यत्वेंकरून, ह्याचा चुलता राघोबादादा व सखारामबापू हे पाहात असत. त्याच्या कारकीर्दीच्या आरंभींच मोंगलांनीं पुण्याकडे चाल केली. तेव्हां तेथल्या कारभारी मंडळीनें, त्यांस, दरसाल सत्तावीस लक्ष रुपये औरंगाबाद आणि बेदर ह्या प्रांतांतून येत असत, ते सोडून त्यांशीं तह केला. राघोबादादा व सखाराम बापू ह्यांच्या आज्ञेशिवाय पेशव्यांच्या राज्यांत एक पान देखील हालेना. इतकें महत्व त्यांस प्राप्त झाल्यामुळें ते गर्वानें फुगले. त्यांस असें वाटूं लागलें कीं, आम्ही आहों ह्मणूनच हें राज्य चाललें आहे. अशी स्थिति असतां पेशव्याच्या व त्यांच्या बोलण्यांत कांहीं एका प्रकरणावरून अट पडली. तेवढीवरून ते सर्व कारभारी आपापलीं कामें सोडून घरीं जाऊन बसले. ह्यांत त्यांचा हेतु असा कीं, राज्यकारभाराचें काम अडलें ह्मणजे पेशवा सहजच आपलीं आर्जवें करूं लागेल. परंतु, माधवराव हा शाहाणा, धूर्त, आणि योजक असल्यामुळें त्यांचा बेत फसला. तो असा. ते कामें सोडून गेल्याबरोबर पेशव्यानें त्रिंबकरावमामास बोलावून आणून त्यास दिवाणगिरीचें काम सांगितलें; गोपाळराव गोविंद पटवर्धन ह्यास त्याचे मदतीस दिलें; बाळाजी जनार्दन भानू, ह्मणजे पुढें जो नानाफडनवीस ह्या नांवानें प्रसिद्ध झाला तो, व हरिपंत फडके, ह्या दोघांस आपल्या हाताखालीं कारकून ठेविलें; आणि त्या चतुर पुरुषांच्या साह्यानें त्यानें राज्यकारभार चालविला. तें कृत्य राघोबादादास व सखारामबापूस आवडलें नाहीं. ते मामाचा फार हेवा करूं लागले. राघोबादादा पुणें सोडून नाशकावरून औरंगाबादेस गेला. तेथील मुख्य अधिकारी मुरादाखान ह्यानें त्याचा चांगला सन्मान केला, व त्यास त्यानें कांहीं फौज दिली. आणि कांहीं मराठे लोकही राघोबादादास जाऊन मिळाले. तेव्हां त्याजपाशीं पुष्कळ सैन्य जमलें. त्यासहवर्तमान त्यानें पेशव्याची खोड मोडण्याकरितां, पुण्याची वाट धरिली. हें माधवरावास समजलें तेव्हां त्यानेंही आपलें सैन्य तयार करून त्याजवर पाठविलें. उभयतां सैन्यांची गांठ नगर आणि पुणें ह्यांचे मध्यें पडली. त्या समयीं माधवरावाच्या दृष्टीस असें पडलें कीं, आपले लोक थोडे आहेत, आणि प्रतिपक्षाचें सैन्य मोठें असून तें दिवसेंदिवस वृद्धि पावत आहे. ह्मणून त्यानें असा विचार केला कीं, ह्या प्रसंगीं युद्ध करून अपेश घेणें हें बरोबर नाहीं; होईल ती तजवीज योजून तंटा मिटवावा हें बरें. नंतर तो मोठ्या धैर्यानें

आपल्या चुलत्याकडे जाऊन त्यापुढें उभा राहिला, आणि ह्मणाला, "काका, आपल्या राज्यांत फूट व कलह नसावा, ह्याकरितां मी तुमचे स्वाधीन झालों." तेव्हां त्यास धरून राघोबादादानें प्रतिबंधांत टाकिलें. तरी 'चमत्कार पहा कीं, अशा स्थितींत देखील जी माधवरावाची प्रतिष्ठा व योग्यता होती, ती काका मोकळे व राज्यकर्ते असतांही यांस प्राप्त झाली नाहीं. !

पुण्याच्या दरबारांत अशी दुफळी झाली, ही संधी पाहून, निजामअल्लीनें पेशव्यांचें राज्य बुडविण्याचा विचार मनांत आणिला. आणि त्या हेतूनें तो सैन्यासहवर्तमान पुण्याजवळ येऊन उतरला. तो तें शहर खचीत लुटणार, असें वर्तमान आंतल्या लोकांस कळतांच ते अगदीं घाबरून गेले. आतां आपले जीव आणि जिनगी ह्यांचें रक्षण होतें कसें, ही त्यांस मोठी पंचाईत पडली. कितीएक अब्रूदार गृहस्थ तर पुणें सोडून मुलांमाणसांसुद्धां डोंगरांत अथवा कोंकणांत जाऊन राहिले. नंतर निजामअल्लीनें पुण्यांत अनर्थ मांडिला. तो असा. श्रीमंत लोक जे हातीं लागले, त्यांस मारहाण करून त्यांजपासून द्रव्य घेतलें. प्रत्येक घरावर खंडणी बसविली, आणि ती जुलमानें वसुलांत आणिली. ज्या घरांची खंडणी आली नाहीं, तीं घरें त्यानें मोडून जाळून टाकिलीं. अशी धुमाळी त्यानें पुण्यांतच केली असें नाहीं. तर, पुरंदराकडे जाऊन, भीमानदीपावेंतो सर्व मुलूख उद्ध्वस्त करून टाकिला. पेशव्यांचें सगळें कुटुंब, मोठ्या बंदोबस्तानें सिंहगडाकडे रवाना झालें. त्याच्याबरोबरचें सामानसुमान, सिंहगडाच्या पायथ्याजवळच्या खेड्यांत निजामाच्या पक्षाच्या लोकांनीं जाळून टाकिलें. त्यांत, मराठ्यांच्या इतिहासास उपयोगीं पडण्यासारखे पुष्कळ कागदपत्र दग्ध झाले. पुढें पावसाळा नजीक आला, ह्मणून निजामअल्ली आपले मुलुखांत निघून गेला.

तिकडे राघोबादादानें हैदराबादेस वेढा घातला. परंतु, तो किल्ला मजबूत असल्यामुळें त्याचें कांहीं चालेना. शेवटीं याविषयीं तो निराश झाला. तेव्हां त्या शहरापासून त्यानें १६०००० रुपये खंडणी घेतली, आणि तो वेढा उठविला. परंतु, निजामअल्लीचा सूड उगवावा, हा जो त्याच्या मनांतला हेतु होता, तो सिद्धीस गेला नाहीं. ह्मणून, त्यानें जानोजी भोंसला ह्मणून मराठा सरदार जो निजामअल्लीस अनुकून होता, त्यास दरसाल बत्तीस लक्ष रुपये उत्पन्न होण्यासारखा मुलूख देण्याचें कबूल करून, आपले पक्षाकडे वळवून घेतलें; आणि निजामाच्या कांहीं सैन्याचा तळ राक्षसभुवनाजवळ पडला होता, त्या-

जवर हल्ला केला. हें युद्ध दोन दिवस चाललें. यांत निजामाच्या पक्षाचा पराभव होऊन मराठ्यांस यश आलें. ह्या समरांगणांत निजामअल्लीचा दिवाण राजा प्रतापवंत हा प्राणास मुकला. ह्या प्रसंगीं माधवरावानें आपलें शौर्य व चातुर्य फार दाखविलें. यावरून याची मोठी कीर्ति झाली. ह्या युद्धास मराठे लोक तेदुळजीचें युद्ध असें म्हणतात. ह्या युद्धानंतर पेशवे व निजाम ह्यांचा तह झाला.

पुढें इ० स० १७६४ च्या मे महिन्यांत माधवराव पेशव्यानें साठ-हजार सैन्यासहवर्तमान करनाटकांत हैदरअल्लीवर स्वारी केली. तेव्हां याच्या बरोबर सखारामबापू होता. हैदरअल्लीपाशीं वीस हजार स्वार व ४०००० पायदळ होतें. तरी माधवरावानें मोठ्या युक्तीनें व पराक्रमानें याचा पराभव केला. तथापि हैदर नम्र झाला असें नाहीं. परंतु, मराठ्यांस खचीत यश येणार असें माधवरावास समजलें असतांही, त्यानें राघोबादादास सांगून पाठविलें कीं, हैदरास मीं इतकें जेर केलें आहे, आतां पुढचें काम आपण पूर्ण करावें. ह्या निरोपावरून माधवरावाच्या मनाचें मोठेपण दिसून येतें. परंतु, असें आचरण राजनीतिस बरें नव्हे. आपण कष्ट सोसावे आणि यश दुसऱ्यास द्यावें, ही रीति साधुजनांस मात्र योग्य आहे. हें माधवरावाच्या लक्षांत आलें नाहीं. त्याच्या निरोपाप्रमाणें राघोबादादा नाशकाहून निघून करनाटकांत येऊन, हैदराच्या सैन्यास पिटाळून लावून आयतें यश पावला. पुढें, हैदराकडून दरसाल ३२०००० रुपये व जिंकलेला मराठ्यांचा प्रांत परत देण्याचें कबूल करून घेऊन, राघोबादादानें त्याशीं तह ठरविला. हा तह माधवरावास आवडला नाहीं, इतकेंच नव्हे; तर त्यामुळें त्याला थोडें वाईट देखील वाटलें. परंतु करतो काय.? त्यानें राघोबादादास आपल्या हातानें आपला यजमान करून घेतलें. त्यामुळें त्यास गुपचूप बसावें लागलें.

पुढें इ० स० १७६६ च्या आरंभीं माधवराव व निजामअल्ली ह्यांनीं आपलीं सैन्यें एकत्र करून, बऱ्हाडांत जानोजी भोंसल्यावर चाल केली; आणि त्याशीं युद्ध करून त्याजपासून २४ लक्षांचा मुलूख घेतला. त्यापैकीं १५ लक्षांचा मुलूख पेशव्यानें निजामास दिला, आणि बाकीचा आपणाकडे ठेविला. ह्या एवढ्या देणगीचा माधवरावाचा मुख्य मतलब असा होता कीं, पुढें आपणास कर्नाटकांत हैदरअल्लीवर स्वारी करणें आहे तेव्हां त्यानें आपणास मदत करावी.

ह्याप्रमाणें मदत करण्याचा संकेत ठरला असतां, माधवरावानें, निजामाची वाट न पाहतां, इ० स० १७६७ च्या जानेवारी महिन्यांत कृष्णेच्या पलीकडे स्वारी केली, आणि शेरा व उसकटा हे परगणे घेतले; हैदरापासून तीस लक्ष रुपये मिळविले; आणि जवळच्या इतर संस्थानिकांपासून १७ लक्ष रुपये काढिले. इतकें द्रव्य घेऊन तो दक्षिणेंत माघारा आला. त्या द्रव्याचा वांटा निजाम मागूं लागला. परंतु त्यास माधवरावानें कांहीं एक दिलें नाहीं.

राघोबादादाची बायको आनंदीबाई, ती फार कपटी व महत्वाकांक्षी असे. तिनें आपल्या नवऱ्याच्या मनांत माधवरावाविषयीं मत्सर उत्पन्न केला. त्याचेही ठायीं ती दुष्टबुद्धि वाढत चालली. शेवटीं, आपणास अर्धें राज्य पाहिजे, तें आपण भांडून लढून घ्यावें, असा त्यानें निश्चय केला. त्याच्या मर्जीखातर पेशव्यानें त्यास बारा लक्षांची जाहागीर दिली. तेवढीनें तो तृप्त झाला नाहीं. त्यानें १५००० सैन्य जमविलें. आणि त्यासहवर्तमान तो, चांदोरच्या डोंगरांत धोर ह्मणून किल्ला आहे, तेथें जाऊन राहिला. त्यास अशी आशा होती कीं, जानोजी भोंसला आपणास साह्य करील. परंतु, तें कांहीं झालें नाहीं. शेवटीं, मोठ्या सैन्यासहवर्तमान माधवरावानें त्यावर हल्ला करून, त्याचा पराभव केला, त्यास धरून पुण्यास आणिलें, आणि प्रतिबंधांत ठेविलें.

इ० स० १७६९ ह्या वर्षीं विसाजी कृष्ण बिनिवाले नामक पराक्रमी सरदार, बरोबर मोठें सैन्य देऊन माधवरावानें चंबळा नदीकडे पाठविला. त्यानें रजपूत राजांपासून मागची बाकी ह्मणून दहा लक्ष रुपये घेतले. नंतर त्याची स्वारी भरतपुराजवळ प्राप्त झाली. तेव्हां त्यानें तेथील जाटास जिंकून त्याजपासून १००००० रुपये रोख घेतले, व ५००००० रुपये हाप्त्यांनीं घेण्याचें ठरविलें.

नंतर ही मोहीम दिल्लीकडे वळली. तेथें रोहिले सरदांचें प्राबल्य होतें. तरी मराठ्यांनीं, आणि त्यांत विशेषेंकरून महादजीशिंद्यानें तेथील सर्व कारभार आपले हातीं घेतला, व बादशाहास नुसतें नामधारी ह्मणून गादीवर राखिलें. परंतु, त्यांपासून बादशाहास त्रास होऊं लागला, ह्मणून त्यानें त्यांस तेथून काढून देण्याचा विचार केला. तो विसाजी कृष्णास समजला. तेव्हां आतां काय करावें, असा त्यास विचार पडला. ह्मणून त्याविषयीं सर्व हकीकत पुण्यास लिहून पाठवून, पुढें काय करावें ह्याविषयीं आज्ञा मागितली. इतक्यांत इकडे, इ० स० १७७२ च्या नवेंबरच्या १८ व्या तार-

खेस, माधवराव, थेऊर येथें मृत्यु पावला. तेव्हां त्याचे वय २८ वर्षांचें होतें. ह्याला मूलबाळ कांहीं नव्हतें. त्याची स्त्री रमाबाई हिजवर त्याची फार प्रीति असे, ती त्याजबरोबर सती गेली. येथें माधवरावाचें चरित्र समाप्त झालें. आतां त्याच्या कारकीर्दीतल्या एक दोन चमत्कारिक गोष्टी सांगून हें प्रकरण समाप्त करितों.

माधवरावाचा एक कारभारी सखारामबापू नामें ब्राह्मण होता. तो स्वभावानें लोभी असे. परंतु, तो मोठा चतुर असे, ह्मणून लोक त्याची फार भीति बाळगीत. माधवरावही राज्यकारभारांत मोठा पटाईत होता; तरी बापूपुढें त्याचें कांहीं चालेना. रघुनाथराव हा लढायांत जय मिळवून एवढा मानपात्र झाला होता, तरी सखारामबापूपुढें त्याचें तादृश तेज पडेना. लोकांत माझा मान इतका कमी कां, ह्याचा विचार माधवराव रात्रंदिवस करीत असे. त्यानें एके दिवशीं सखारामबापूस एकांतीं बोलावून नेलें आणि त्यास स्पष्ट विचारिलें कीं, प्रजा जी मला अशी कसपटाप्रमाणें लेखिते, व माझा कांहींच बोज ठेवीत नाहीं, ह्यास कारण माझींच अयोग्यता, किंवा दुसरें कांहीं आहे.? तें ऐकून घेऊन जरासा विचार करून, सखारामबापूनें उत्तर दिलें, "असें होण्यास कारण मजखेरीज दुसरें कांहीं एक नाहीं; मला श्रीमंतांनीं रजा द्यावी, आणि मोरोबा फडनवीस ह्यांस कारभार सांगावा, ह्मणजे श्रीमंतांच्या मनोदयानुरूप सर्व गोष्टी घडतील." हें अगदीं मनचें उत्तर ऐकिल्याबरोबर माधवरावास हंसें आलें, व अंतःकरणांत समाधानही वाटलें. त्यानें बापूच्या ह्मणण्याप्राणें त्यास त्याच्या जाहागिरीवर सुखांत काल घालविण्यास रुखसत दिली, आणि त्याचे जागेवर मोरोबा फडनविसास मुख्य कारभारी नेमिलें.

सातारा शहरानजीक माहुली ह्मणून एक क्षेत्र आहे. तेथें परभुणे ह्या आडनांवाच्या कुळांत रामचंद्र ह्या नांवाचा एक मुलगा जन्मला. त्याचीं आईबापें गरीब असत. ह्मणून त्याचा लहानपणीं विद्याभ्यास मुळींच झाला नाहीं; आणि निर्वाहासाठीं त्याला एका मोठ्या श्रीमान् गृहस्थाचा शागिर्दपणा पतकरावा लागला. जो शागिर्द बनला, त्याला विद्या कशाची होणार.? यजमानाच्या घरीं धुणें, पाणी भरणें, भांडीं घांसणें, ह्या नीच कामांतच त्याचें आयुष्य सरावयाचें. पण रामाचें दैव कांहीं विचित्र होतें. त्याला एके दिवशीं एके गोष्टीवरून इतका अनुताप झाला कीं, त्यानें त्याचें नशीब उघडिलें,

असें झटलें पाहिजे. ती गोष्ट अशी. स्काळच्या प्रहरीं रामाचे यजमान, शौचाहून येऊन, पाटावर प्राय धुवायास बसले. रामा जवळ उभा राहून पाणी घालीत होता. यजमानास कांहीं दागिना करावयाच होता, त्यासाठीं त्यानें मोठमोठाले मोत्यांचे चवकडे आणवून, तेथेंच तो परीक्षक सराफांकडून त्यांची किंमत ठरवीत होता. निर्धन मनुष्याचें लक्ष द्रव्याकडे फार असतें. रामा गरीब होता, त्यानें तसलीं मोलवान मोतें पूर्वीं कधीं पाहिलीं नव्हतीं; तेणेंकरून त्याची नजर पाण्याच्या धारेवरून उडून या मोत्यांवर गेली; तेव्हां अर्थात्, धार पायांवर पडावयाची ती मोरींत पडूं लागली. तें पाहून यजमान त्यास झणाला, " तुझें मन शुद्धीवर नाहीं; कोठें गेलें आहे.?" रामानें प्रांजलपणें उत्तर दिलें, " महाराज, माझें मन या चौकड्यांकडे गेलें होतें. मला वाटतें कीं, आपण असल्या मोत्यांचा एक चौकडा आपल्या कानांत घालावा. " यावर यजमान हंसून बोलला कीं, " बाबा, ज्यानें सभा जिंकिली आहे, अशा विद्वानास, अथवा ज्यानें तरवार गाजविली आहे, अशा शिपायास चौकडा शोभतो; तुजसारख्या पाणक्यास शोभत नाहीं. " हें यजमानाचें भाषण रामाच्या अंत:करणास केवळ वज्राप्रमाणें लागलें. आणि त्याला वाटलें कीं, विद्येवांचून आपलें जिणें व्यर्थ आहे. तेव्हां तो विद्याभ्यासार्थ काशीस गेला. आणि त्यानें तेथें एकाग्र चित्तानें बहुत श्रम करून इतकी विद्या संपादिली कीं, जो पुर्वीं रामा शागिर्द होता, तोच अप्रतिम विद्वान् रामशास्त्री होऊन, बहुमान पावून दक्षिणेंत आला. त्याला माधवराव पेशव्याचे दरबारीं पुण्यांत न्यायाधीशाचें काम मिळालें. ह्यासारखे निस्पृह पुरुष ह्या पृथ्वीवर थोडेच जन्मले असतील. माधवराव पेशवा रामशास्त्र्याच्या विचारानें वागत असे.

एके समयीं असें झालें कीं, पंडितांचीं परमार्थपर अनेक भाषणें ऐकून, माधवरावास उपरती होऊन, तपश्चर्या करण्याची इच्छा उत्पन्न झाली, आणि तो तेव्हांपासून जपजाप विशेष करूं लागला. एके दिवशीं रामशास्त्री त्याच्या भेटीस जाण्यास व तो नाक धरून बसण्यास गांठ पडली. तेव्हां श्रीमंत जपास बसले आहेत, सध्या भेट व्हावयाची नाहीं, असें जवळच्या लोकांनीं रामशास्त्र्यांस सांगितलें. दुसरे दिवशीं तो निस्पृह ब्राह्मण श्रीमंतांपाशीं जाऊन झणाला कीं, मला महायात्रेस जाण्यास आज्ञा असावी. माधवराव बोलला, " मी काल जप करीत होतों तेव्हां आपलें येणें झालें, झणून गांठ

पडली नाहीं, ह्याची क्षमा असावी." रामशास्त्र्यानें उत्तर दिलें, "आपण जें निमित्त सांगतां, तें ब्राह्मणास योग्यच आहे; पुरंतु ब्राह्मणाचें कर्तव्य कर्म ह्मटलें ह्मणजे तपस्या, ती सोडून त्यांनीं राजत्व संपादिलें; ह्यास्तव त्यांनीं प्रजापालन केलें पाहिजे; तें टाकून जप करीत बसणें हें पातक आहे; ह्मणून आपल्या चित्तांत तपस्या करावयाची असल्यास, हा राज्यभार टाकून देऊन, आपण मजबरोबर काशीक्षेत्रीं चलावें, मी ती आपणांस उत्तम रीतीनें शिकवीन." ह्या बोलण्याचें तात्पर्य पेशवा समजला. आणि तेव्हांपासून तो शास्त्रीबुवांच्या अनुलक्ष्येंकरून वागूं लागला.

जी गोष्ट प्रथम लिहिली, तिजवरून, सखारामबापू हा मनाचा किती मोकळा असे, व आपल्या धन्याची मर्जी राखण्यास तो किती तत्पर असे हें उघड दिसतें. ज्या शाहण्या कारभाऱ्याच्या शाहणपणापुढें व वजनापुढें आपण निस्तेज दिसतों, त्यास कामावरून काढून, त्याचे जागीं दुसरा सरासरी कारभारी बसवून, त्याजवर आपल्या शाहणपणाची छाप बसविणें, व ह्या प्रकारें आपण आपलें वजन वाढविणें, हें माधवरावास दूषणप्रद आहे किंवा भूषणप्रद आहे, ह्याचा विचार सुज्ञ वाचकांनीं करावा. माधवराव एवढा अभिमानी असतां, तो रामशास्त्र्याच्या भाषणाचें हांशील समजून, तेव्हांच उमजला, ह्या दुसऱ्या गोष्टीवरून त्याचें शाहाणपण व चातुर्य हीं समजतात.

माधवराव विचारी होता. तो आपल्या प्रजेस फार जपत असे. तो मामलेदारांच्या कामावर फार नजर ठेवीत असे. न्यायमनसुबी बरोबर होत असे.

नारायणराव पेशव्याचा वध.

इ० स० १७७३.

राजपदप्राप्ति हीच कायती सुखाची परमावधि, असें पुष्कळ लोक समजतात. परंतु ही भ्रांति आहे. थोर पुरुषांचें मत ह्याविषयीं असें आहे कीं, कोणत्याही स्थितींत मनुष्याला सुख व दुःख हीं बहुधा सारखीं असतात. ह्या गोष्टींचा अनुभव प्रत्येक विचारी पुरुषानें आपलेठायीं पहावा. बाळाजीबाजीरावाचा पुत्र नारायणराव, हा पेशवाईचे गादीवर बसलेला, हजारों रुपये

त्याच्या शिलकेस, शेकडों विश्वासू माणसें सेवेकरितां जवळ उभीं, कोणत्याही गोष्टीची उणीव नाहीं, अशी त्याची स्थिति उत्तम असतां, खाटिकानें बकरी चरचरां कापावी, तशी त्याच्या देहाची अवस्था होऊन त्यास मरण आलें. हा केवढा चमत्कार.! वास्तविक पाहिलें असतां चमत्कार नाहीं; कारण, अशीं शेंकडों उदाहरणें इतिहासांतरीं आढळून येतात. खुषीचा सवदा असता, तर पेशवेपणाच्या सुखाच्या लोभानें, असें दुःखाचें मरण नारायणराव खचीत पतकरताना; परंतु हें सर्व सूत्र पडलें परमेश्वराधीन; तेथें माणसाच्या मर्जीचा काय उपयोग.! असो. आतां नारायणरावाच्या वधाची हकीकत लिहितों.

नारायणराव, इ० स० १७७२ च्या दिसेंबर महिन्यांत साताऱ्यास गेला; आणि त्यानें तेथील राजापासून पेशवाईचीं वस्त्रें मिळविलीं. ह्याचे मुख्य कारभारी बजाबा पुरंदरे, नाना फडनवीस, सखारामबापू व हरीपंत फडके हे होते. तथापि, ह्या सर्वांवर सखारामबापूचें प्राबल्य असे. नारायणराव व त्याचा चुलता राघोबादादा ह्यांचें वैमनस्य येऊन, पेशव्यानें राघोबादादास प्रतिबंधांत ठेविलें. ह्यास मूळ कारण पेशव्याच्या गादीची इच्छा, दुसरें कांहीं नाहीं. अशी दुफळी होऊन, इ० स० १७७३ च्या आगस्त महिन्याच्या तिसावे तारखेस, नारायणराव पेशवा मारेकऱ्यांचे हातून मारला गेला. तो प्रकार असा.

वर सांगितलेल्या दिवशीं, नारायणराव, भोजनोत्तर, नित्याप्रमाणें आपल्या रंगमहालांत जाऊन निजला. जरासा डोळा लागला इतक्यांत वाड्यामध्यें एकाएकीं गर्दी झाली. ती ऐकून तो जागा झाला. आणि इकडे तिकडे पाहातो तों, सुमेरसिंग, महमदयुसफ, खरकसिंग इत्यादि गारदी लोक वाड्यांत घुसून दांडगाई करीत आहेत, असें त्याच्या दृष्टीस पडलें. आणि ते त्याचे अंगावर एकदम धांवून आले. तेव्हा तो आपल्या चुलत्याच्या खोलीकडे पळत सुटला. त्याचे मागें सुमेरसिंग लागला. नारायणरावानें, राघोबादादाचे खोलींत जाऊन, त्याचे पाय घट्ट धरून, दीनवाणीनें ह्मटलें कीं, 'काका काका, कसेंही करा पण ह्या वेळेस माझा जीव वांचवा; नकाहो माझी बालकाची उपेक्षा करूं.' हे शब्द कानीं पडतांच, कसा झाला तरी चुलताच तो, त्यास पुतण्याची फार दया आली; आणि त्यास न मारण्याविषयीं त्यानें सुमेरसिंगास कांहीं समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. तेव्हां सु-

मेरशिंग ह्मणाला, ' महाराज, आतां हें काम ऐथपर्यंत आणून जर मीं तसेंच सोडिलें, तर मीं आपला घात करून घेतला, असें होईल; आतां आपण आपल्या पुण्ण्याची आशा सोडावी; ह्याला सोडून आपण लवकर दूर व्हा; नाहींतर मी दोघांचेही प्राण घ्यावयास चुकावयाचा नाहीं. ' हें निकराचें भाषण ऐकून, राघोबादादा आपल्या अनाथ पुतण्यास सटकर दूर करून गच्चीवर पळून गेला. त्याचे मागें 'काका, काका, काका,' करीत नारायणरावही जाऊं लागला. तेव्हां राघोबादादाचा हत्यारबंद खिजमतगार त्रह्लया पोंवार ह्मणून तेथें होता, त्यानें त्याचे पाय धरून मागें ओढून त्यास पालथें पाडिलें. तें पाहून, नारायणरावाचा परम विश्वासू खिजमतगार चांफाजी टिळेकर, हा आपल्या धन्याच्या रक्षणार्थ त्याच्या शरीरावर जाऊन आडवा पडला. या वेळीं सुमेरशिंगानें व त्रह्लया पवारानें या दोघांही जणांस तेथच्या तेथें ठार मारिलें. ह्याप्रमाणें नारायणराव पेशव्याचा शेवट झाला. नंतर त्याची गादी कांहीं दिवसपर्यंत राघोबादादास मिळाली.

ह्या कारकीर्दींत रामशास्त्री ह्मणून एक विद्वान न्यायाधीश पुण्यांत होता. तो फार स्पष्टवक्ता असे. तो नारायणरावाच्या वधाविषयीं फार बारकाईनें शोध करूं लागला. तेव्हां त्यास दीड महिन्यानंतर सर्व वर्तमान पुरतेपणीं समजलें. तो राघोबादादाकडे जाऊन त्याजपाशीं उघड ह्मणाला कीं, हें कर्म खचीत तुह्मीं करविलें, असा पक्का शोध लावून मी तुह्मांकडे आलों. राघोबादादानें पुष्कळ आढेवेढे घेतले; परंतु शेवटीं असें कबूल केलें कीं, मीं त्यास धरावें असा मात्र हुकूम लिहिला होता; मारावें असें मीं लिहिलें नाहीं; धचा मा कोणीं केला, हें मला ठाऊक नाहीं. तो हुकुमाचा कागद रामशास्त्र्याचे हातीं लागला होता, व त्यांतील धवर शाई पाडून कोणीं त्याचा मा केला होता, असें त्याचे नजरेस आलें. हें दुष्ट कृत्य राघोबादादाची बायको, आनंदीबाई, जी नारायणरावास अगदीं पाण्यांत पाहात असे, हिचें असावें, असें सर्वांच्या मनांत येऊन चुकलें. राघोबादादानें शास्त्रीबुवांस विचारिलें कीं, झाली गोष्ट परत येत नाहीं; परंतु, ह्या पातकास प्रायश्चित्त कोणतें ? त्या नीतिशूर पुरुषानें साफ उत्तर दिलें कीं, ह्यास देहान्त प्रायश्चित्त पाहिजे. कारण, तुमचें जें आयुष्य राहिलें आहे, त्यांत तुमचे हातून सद्वर्तन होईल, असें मला वाटत नाहीं. ह्यापुढें तुह्मी व तुमचें राज्य ह्यांची धडगत दिसत नाहीं. इतःपर तुह्मी राज्य करीत असाल, तोंपर्यंत

मी पुण्यास येणार नाहीं; असें बोलून तो सटकर तेथून उठला, आणि वांई-क्षेत्राजवळ एक लहानसें खेडें आहे, तेथें जाऊन कालक्षेप करीत स्वस्थ राहिला.

ह्याप्रमाणें नारायणरावपेशव्याच्या मरणाची कथा आहे. अशा राजे लोकांच्या अनेक गोष्टी इतिहासामध्यें आढळतात. इंग्लंदांतीलही कोणी राजे अशाच प्रकारें प्राणांस मुकले. आतां, अशा गोष्टींचीं कारणें एकसारखींच असतात असें नाहीं. तथापि, राजपद ह्मणजे सुखाचें केवळ घर, असा जो लोकांचा समज आहे, तो भ्रांतिमूलक आहे, एवढें आह्मी आपल्या वाचकांस कळवितों. राजाला जसें सुख पुष्कळ, तसें दुःखही पुष्कळ असतें. परंतु तो आपलें दुःख लाजेस्तव बाहेर कळूं देत नाहीं, आणि सुख तेवढें मात्र भूषणासाठीं बाहेर दाखवितो, व लोकांची नजरही त्याजवर विशेष असते. ह्या कारणामुळें राजा अत्यंत सुखी असें लोकांस वाटतें.

बाजीराव.

जन्म, इ० स० १७७४—मृत्यु, इ० स० १८५१.

चौघांत प्रसिद्धि पावणें ही गोष्ट नशीबाची आहे. नांव बहुमुखीं होण्यास दुर्गुणही कधींकधीं कारणीभूत होतात. परंतु सद्गुणावरून कीर्ति गाजणें, ह्यास मोठें सुदैव पाहिजे. ह्या विषयाच्या सदरीं लिहिलेल्या नांवाचे दोन पुरुष पेशव्यांच्या कुळांत होऊन गेले. ह्मणजे, एक, बाळाजी विश्वनाथाचा मुलगा, तो पहिला बाजीराव; आणि रघुनाथरावाचा मुलगा, तो दुसरा बाजीराव. वास्तविक पाहिलें असतां, पहिला बाजीराव हा दुसऱ्या बाजीरावापेक्षां दसपट चांगला होता. पण सांप्रतच्या पिढीस तो फारसा ठाऊक नाहीं. कारण, त्यास होऊन गेल्यास बरेच दिवस झाले, हें एक; आणि त्याचे हातून घडलेल्या कोणत्याही गोष्टीचें फळ सांप्रतच्या प्रजेपर्यंत पोहोंचलें नाहीं, हें दुसरें. आतां दुसऱ्या बाजीरावाची गोष्ट अगदीं त्याच्या उलट आहे. ती अशी. तो नुकता परवां होऊन गेला; त्याच्या हातचे पोषाक मिळविलेले सरदार, त्याच्या सहस्रभोजनांत तटकून जेवून हातभर दक्षिणा घेतलेले भट्ट, व त्याच्या विषयी मनास तृप्त केलेल्या स्त्रिया, अशीं कितीएक वृद्ध मनुष्यें जीवंत असून,

त्यांचे तोंडून आपण त्याचे गुणानुवाद ऐकितों; आणि त्यानें राज्य गमाविलें. हीं दोन कारणें त्याचें स्मरण राहाण्यास कारणीभूत झालीं आहेत. सद्गुणांपैकीं दातृत्वावरून मात्र कितीएक लोक त्याची कीर्ति गातात. परंतु, तशा प्रकारचें दातृत्व हा सद्गुण आहे किंवा दुर्गुण आहे, ह्याचा विचारी जनांस संशय पडतो. असो. एकंदरींत, ह्या काळीं सुज्ञ पुरुषसमाजांत बाजीरावाचें नांव, जितकें त्याच्या दुर्गुणांवरून निघतें, तितकें दुसरे कशावरूनही निघत नाहीं. ह्याची थोडीशी कथा वाचणाऱ्यांस सादर करितों.

दुसरा बाजीराव इ० स० १७७४ त जन्मला. त्याच्या बापाचें नांव राघोबादादा, त्यासच रघुनाथराव असें म्हणत; व त्याच्या आईचें नांव आनंदीबाई असें होतें. तो, सवाईमाधवराव निवर्तल्यावर, इ० स० १७९६ ह्या वर्षीं पेशवाईचे गादीवर बसला. लागलेंच, इ० स० १७९९ त इंग्लिश सरकारानें त्याच्याशीं असें बोलणें लाविलें कीं, आमची फौज आपल्या चाकरीस ठेवून तिच्या खर्चाचा पैसा आम्हांला द्या, म्हणजे, कोणत्याही संकटप्रसंगीं आम्ही तुमचें रक्षण करण्याचें पतकरितों. परंतु, ह्या कबुलायतीनें शेवटीं आपली हानि होणार आहे, असें पूर्णपणें समजून, नानाफडनविसानें तें त्याजकडून नाकबूल करविलें. पुढें बाजीरावाचें आणि नानाचें वैमनस्य आलें. म्हणून ह्या पेशव्यानें त्याला कांहीं दिवस प्रतिबंधांत ठेविलें. पुढें तो शाहाणा व चतुर पुरुष, नाना, इ० स० १८०० च्या मार्च महिन्यांत वारला. ह्या विषयीं कर्नेल पामर ह्यानें सरकारास लिहिलें कीं, "नानाबरोबर मराठ्यांच्या राज्यांतलें शाहाणपण आणि नेमस्तपण हीं नाहींतशीं झालीं." त्याच्या संपत्तीवरून त्यास लोकांमध्यें "नवकोटि नारायण" म्हणत. नानाच्या दौलतीविषयीं, बाजीराव व त्याच्या मर्जीतला दिवाण दौलतराव शिंदा, ह्यांस लोभ उत्पन्न झाला. आणखी, पेशव्याच्या गादीवर बसविण्याबद्दल जे दोन कोटि रुपये त्यानें शिंद्यास देऊं केले होते, ते तो मागूं लागला. तेव्हां उभयतांमध्यें अर्थात् वाद उद्भवला. आणि मग आणखी कांहीं उखाळ्यापाखाळ्या त्यांत शिरल्या. एतावता उभयतांची चांगलीच लागून राहिली. त्यांत शिंद्याचें पारडें जड होतें. त्यानें पुण्याचा सगळा कारभार आपण संभाळून, बाजीरावाला त्याचेच वाड्यांत अडकवून टाकिलें.

यशवंतराव होळकराचा भाऊ विठोजी, हा नानाफडनविसाचे वेळीं पुण्यांत होता. त्याचा नानाशीं स्नेह असे. एवढेंच पाप मनांत आणून

शिंद्याच्या मर्जीखातर, त्यास बाजीरावानें विनाकारण हत्तीच्या पायीं देऊन मारिलें. हा दुःखाचा व अपमानाचा प्रकार यशवंतरावास फार दुःसह झाला. तो तत्काळ सैन्यासहवर्तमान निघाला, तो प्रथमतः शिंद्याच्या मुलुखांत आला. तेथें त्याच्या सैन्याची व प्रजेची वाताहात करून, त्यानें नीट पुण्याचा मार्ग धरिला. बाजीराव आरंभशूर होता. तो जय मिळविण्याच्या मोठ्या ईर्षेनें प्रथमारंभीं आपल्या शहराबाहेर पडला. परंतु, जेव्हां होळकराच्या तोफांची व सैन्याची भयंकर गर्जना त्यानें ऐकिली, तेव्हां त्याची पांचांवर धारण बसली. त्याला असें झालें कीं, आतां मी काय करूं.? तेव्हां तो तेथून निघून सिंहगडास गेला. आणि तेथून त्यानें कर्नल क्लोस्साहेब, इंग्लिश रेसिदेंत, ह्यास असें सांगून पाठविलें कीं, आपलीं ६ पलटणें आपण माझे साह्यास द्यावीं, आणि त्यांच्या खर्चाबद्दल २५००००० रुपयांचा मुलूख मी आपले स्वाधीन करितों. सिंहगडीं तीन दिवस राहून, तो रायगड माहाड, इकडे पळत सुटला. आणि तेथून त्यानें मुंबई सरकारास पत्र लिहिलें कीं, मला तिकडे नेण्याकरितां लवकर जाहाजें पाठवावीं. त्याचें उत्तर येईपर्यंतही तो भितरा तेथें थांबला नाहीं; आणि तो तेथून निघून सुवर्णदुर्गास गेला. शेवटीं, रेवदंडा येथें तो इंग्लिशांकडील गलबतांत बसला; आणि तारीख ६ दिसेंबर सन १८०२ इ० रोजीं तो वसईस दाखल झाला.

इकडे होळकर पुण्यांत होता. त्यानें कर्नल क्लोस साहेबास कांहीं तहाच्या तजविजीचें बोलणें लावून बरेच दिवस राहवून घेतलें. परंतु त्यांत कांहीं हांशील नाहीं असें पाहून, साहेब मुंबईस निघून गेला; आणि तेथून वसईस जाऊन दिसेंबरच्या ६ व्या तारखेस तो पेशव्यास भेटला. तहाचें बोलणें सुरू झालें. त्याची वाटाघाट बरेच दिवस चालली. शेवटीं ३१ व्या तारखेस तें काम आटपलें. ह्या वसईच्या प्रसिद्ध तहनाम्यांत लांबचलांब अशीं १९ कलमें होतीं. त्यांतील सारांश येणेंप्रमाणें. "काळ्या ६ पलटणी, त्यांजवरील इंग्लिश अमलदार, आणि कांहीं नियमित तोफा, इतकें सैन्य इंग्लिशांनीं पेशव्याकडे ठेवावें, व त्याच्या खर्चाबद्दल पेशव्यानें त्यांस २६ लक्षांचा मुलूख निरंतर द्यावा; उभय पक्षांनीं एकमेकांच्या व एकमेकांच्या दोस्त संस्थानांच्या संरक्षणार्थ तत्पर राहावें; प्रसंग पडेल तेव्हां कंपनीनें पेशव्यास यथाशक्ति, होईल तितक्या सैन्यानिशीं साह्य करावें; इंग्लिशांस कारण लागेल त्या वेळीं, सदरहू ६ पलटणींपैकीं ४ पलटणी, आणि नि-

दान ६००० पायदळ० व १०००० स्वार, इतकी फौज पेशव्यानें द्यावी; इंग्लिशांचा विचार घेतल्याखेरीज पेशव्यानें इतर संस्थानादिकांवर स्वारी अथवा त्यांशीं तह ठरवूं नये; आणि मागच्या अगर पुढच्या कोणत्याही एकाद्या गोष्टीचा वाद पडल्यास, इंग्लिश कंपनी करील तो न्याय पेशव्यानें हूं चूं न करितां शिरसावंद्य मानावा." त्यांत आणखी असें ठरविलें, होतें कीं, इंग्लिशांच्या बऱ्यावर जीं युरोपांतील राष्ट्रें नसतील, ह्मणजे त्यांस बुडविण्यास जीं पाहात असतील, त्यांतलें एकही मनुष्य पेशव्यानें आपल्या राज्यांत राहूं देऊं नये. ह्या प्रकारेंकरून तहनामा कबूल झाल्यावर, इंग्लिशांनीं आपली फौज एकत्र करून, ती बाजीरावासमागमें पुण्यास आणून, त्यास तेथें, मे महिन्याच्या २३ व्या तारखेस मोठ्या समारंभानें पेशवाईचे गादीवर बसविलें. हें काम मेजर जनरल वेल्स्ली ह्यानें बजाविलें.

गायकवाडाकडे आमचे ३००००० रुपये यावयाचे आहेत, व त्याजपासून आह्मांस अमदाबाद प्रांताचा हिस्सा घ्यावयाचा आहे, असें बोलणें बाजीरावानें काढिलें. त्याची तोड पाडण्याकरितां, स्वप्राण संरक्षणाविषयीं इंग्लिश रेसिदेंताची खातरी घेऊन, गायकवाडाचा एक वकील पुण्यास आला. त्याचें नांव गंगाधरशास्त्री पटवर्धन. तो मोठा सुज्ञ व चतुर होता. परंतु पेशव्यांचे दरबारांत त्रिंबकजी डेंगळा ह्मणून कोणी लुच्चा मनुष्य, कपटानें योग्यतेस चढून, बाजीरावाच्या अगदीं नाकाचा बाल बनला होता; तो तेथें दुसऱ्या कोणाचीही मात्रा चालूं देईना. जेथें तेथें, मी शाहणा, ह्मणून, तो आपलें घोडें पुढें ढकली. त्यामुळें गंगाधर शास्त्र्याचें बोलणें फिकें पडे; तरी ७००००० रुपये उत्पन्नाचा प्रांत पेशव्यांनीं गायकवाडाकडून घेऊन, कर्ज वगैरे सर्व प्रकरण मिटवावें, असें त्यानें ठरवून घेतलें. ह्यांत फत्तेसिंग गायकवाडाचें हित होतें; परंतु तें त्यास रुचलें नाहीं. त्यानें, शास्त्र्यानें मिळविलेला ठराव नापसंत केला. ही त्याची नापसंती कोणास न कळवितां तो वकील तसाच पेशव्यांचे दरबारीं दिवस काढीत राहिला.

गंगाधरशास्त्र्याविषयीं त्रिंबकजी डेंगळ्याचें मन शुद्ध नव्हतें; तथापि त्यानें बाह्यात्कारें त्या शास्त्र्यास इतकें वश करून घेतलें कीं, माझा खरा इमानी मित्र कायतो त्रिंबकजी, असें त्यास वाटूं लागलें. आणि हा विश्वास पूर्ण बसण्याकरितां, त्रिंबकजीनें शास्त्र्यास बोलतां बोलतां एके वेळीं असें सांगितलें कीं, पूर्वी जेव्हां तुमचें व आमचें वैमनस्य होतें, तेव्हां तुह्मांस मारेकऱ्यां-

कडून ठार मारविण्याचा देखील विचार आह्मीं केला होता. ह्या गोष्टीवरून, वास्तविक पाहिलें असतां, गंगाधरशास्त्र्याचे डोळे उघडावे, व त्यानें जपून वागावयास लागावें. पण तसें न होतां, त्याच्या विपरीतच सर्व घडलें. गंगाधरशास्त्री त्रिंबकजी डेंगळ्यास पूर्वी पेक्षांही अधिक प्रिय मित्र मानूं लागला. आणि ह्या बिचाऱ्या भोळ्या शास्त्र्यास पक्की भुरळ घालण्याकरितां पेशव्यानें त्यास असें सांगितलें कीं, मी आपली मेहुणी तुमच्या मुलास देतों.

नंतर, हें लग्नकार्य सिद्धीस नेण्याच्या हेतूनें ह्मणून बाजीराव नाशिकास गेला. त्याच्या बरोबर शास्त्रीबावा होते. त्यांच्या बोलण्याचालण्यावरून पेशव्यास स्पष्ट दिसून आलें कीं, कर्जाविषयीं झालेला ठराव अमलांत आल्या खेरीज हें लग्न व्हावयाचें नाहीं, असा वकिलाचा हेतु आहे. तेणेंकरून बाजीरावास फार राग आला. आणि गंगाधरशास्त्र्यानें एकदां त्यास असें उघड सांगितलें कीं, आमचें कुटुंब पुण्यास सरकारच्या वाड्यामध्यें कांहीं झालें तरी यावयाचें नाहीं. हें ऐकून तर पेशवा अत्यंत क्रोधायमान झाला. ह्याचें कारण असें कीं, शास्त्रीबावाची बायको अनुपम सुरूप आहे, ती एक वेळ नजरेखालीं तरी घालावी, अशा दुष्ट हेतूनें त्यानें सदरीं सांगितलेल्या लग्नाविषयींचें वचन दिलें होतें.

नंतर बाजीरावाची स्वारी नाशिकाहून निघून यात्रेकरितां पंढरपुरास गेली. शास्त्री, त्रिंबकजी, वगैरे सर्व मंडळी बरोबर होती. एके दिवशीं डेंगळ्यानें शास्त्रीबावांस आपले येथें मेजवानीस आणिलें. तेव्हां तरी तो फार भीतभीतच आला; आणि भोजन आटपतांच परत निघून गेला. कांहीं वेळ गेल्यावर देवदर्शनास जाण्याकरितां त्यास त्रिंबकजीचीं एकामागून एक तीन बोलावणीं आलीं. मी आजारी आहें, वगैरे अनेक आढेवेढे त्यानें घेतले. परंतु त्रिंबकजीच्या अत्याग्रहामुळें त्यास तिकडे जावें लागलें. त्यानें आपणाबरोबर ७ असामी हुजऱ्ये नेले होते. तो देवदर्शन करून परतला, आणि मार्गानें चालला तों, मागून तीन दांडगे, 'पैसपैस' करीत त्याचे जवळ येऊन ठेपले. एकानें त्यास प्रथम तोबा मारिला. त्यांत तरवार होती. तिचा वार शास्त्री ह्याचे आंगावर लागला. त्याचे मागून बाकीच्या दोघांनीं आपलीं शस्त्रें मोठ्या आवेशानें त्याजवर चालविलीं. त्यांच्या योगानें गायकवाडाचा वकील, बिचारा गंगाधरशास्त्री, हा गतप्राण होऊन जमीनीवर पडला. ही गोष्ट इ० स० १८१५ च्या जुलै महिन्याच्या १४ व्या तारखेस घडली.

पुण्याच्या दरबारीं या वेळीं मौंत स्तुअर्त एलफिन्स्तन साहेब हा इंग्लिश रेसिदेंत असे. त्यास हें वर्तमान कळल्यावर, त्यास त्रिंबकजीचा वहीम आला. आणि त्यास धरून आमचेकडे पाठवा, असा निरोप त्यानें बाजीराव पेशव्यास पाठविला. याविषयीं त्यानें पुष्कळ टाळाटाळ केली, व सबबी सांगितल्या. परंतु या सगळ्या व्यर्थ गेल्या. डेंगळ्यास इंग्लिश रेसिदेंताच्या स्वाधीन करणें बाजीरावास भाग पडलें. तेव्हां त्यास किती लज्जा व दुःख वाटलें असेल, हें त्याचें त्यालाच पुसलें पाहिजे. त्रिंबकजी डेंगळा हातीं लागल्यावर त्यास इंग्लिशांनीं ठाण्याचे किल्ल्यांत नेऊन मोठ्या बंदोबस्तानें ठेविलें. तो तेथून तारीख १३ माहे सप्तंबर सन १८१६ रोजीं आवशीस चार घटिका रात्रीं वेष बदलून पळून गेला, आणि नासिक व संगमनेर इकडे बाजिरावाच्या मुलुखांत येऊन भील कोळी जमवूं लागला. असें करतां करतां त्यानें थोडक्याच दिवसांत २०००० स्वार जमविले. बाजीराव त्यास आंतून आश्रय देऊं लागला. वसईच्या तहांत ठरलें होतें कीं, इंग्लिशांच्या संमतावांचून पेशव्यानें अधिक फौज ठेवूं नये. तो करार मोडून, त्यानें गुप्तपणें सैन्य जमविण्याचें काम चालविलें. हें इंग्लिशांस समजलें. तेव्हां अर्थात् उभय पक्षीं युद्धाची तयारी झाली. पेशव्यानें आपला खजीना रायगडावर नेऊन ठेविला.

एलफिन्स्तन साहेब, पुण्याचा रेसिदेंत, ह्यानें लागलीच आपली फौज स्मिथ नामक सरदाराचे हाताखालीं देऊन पेशव्यांच्या जमलेल्या सैन्यावर पाठविली. तिनें त्याची दाणादाण करून सोडिली. बाजीरावाचे कांहीं लोक खानदेशांत जमून राहिले होते. त्यांवर देविससाहेबानें हल्ला करून, त्यांतले ४०० तर समरांगणीं मारिले, आणि बाकीच्यांस पळावयास लाविलें. तेव्हां बाजीराव भ्याला; आणि इंग्लिशांशीं नवीन तह ठरविण्यास कबूल झाला. या तहनाम्यावर त्यानें, तारीख १३ जून सन १८१७ रोजीं सही केली. त्यांत मुख्य कलमें हीं होतीं. पेशव्यांचा ३४ लक्षांचा मुलूख इंग्लिशांस मिळावा; मी सर्व मराठी राजेरजवाड्यांचा मुख्य आहें, असें पेशव्यानें आपणास म्हणवूं नये, व एतद्देशीय किंवा परदेशीय राजेरजवाड्यांशीं पत्रव्यवहार करणे तो इंग्लिश रेसिदेंताच्या मार्फतीखेरीज करूं नये; दरसाल चार लक्ष रुपये घेऊन, गायकवाडाकडील मागची सर्व बाकी पूज करावी; इत्यादि. हे करार पेशव्यास फार जड वाटले; परंतु निरुपायास्तव त्यास ते कबूल करावे लागले.

जुलुमाचा तह कोठपर्यंत चालणार. बाजीरावाच्या मनांत इंग्लिशांविष-

यींचें वैमनस्य उत्तरोत्तर वाढत चाललें. तो गुप्तपणें सैन्याची जमाजम करीत होता. त्याचें कारण रेसिदेंतानें त्यास विचारिलें. त्यावर त्यानें असें उत्तर दिलें कीं, आह्मांस पेंढाऱ्यांचें बंड मोडावयाचें आहे, ह्मणून आह्मी हा उद्योग करीत आहों. हें उत्तर रेसिदेंत साहेबास धडधडीत खोटें वाटलें. पेशव्यांच्या लष्करांत असा बिघाड पाहून एलफिन्स्तनसाहेबानें आपले लोक सामानसुमानासुद्धां खडकीस पाठविले. पेशव्याचा सरदार बापू गोखला हा, रेसिदेंताचा बंगला व खडकी ह्यांच्यामध्यें कांहीं लोकांसुद्धां येऊन छावणी देऊन राहिला, अशासाठीं कीं, या दोन स्थळांतल्या लोकांस एकमेकांचा समाचार कळूं नये. हें कृत्रिम तो साहेब तेव्हांच समजला. आणि अगदीं उशीर न लावितां तो मुळानदी उतरून आपल्या माणसांसहित खडकीस गेला. मागें लागलीच त्याच्या बंगल्यास पेशव्याच्या लोकांनीं आग लाविली. तेव्हां त्यांत पुष्कळ कामाचे कागदपत्र व पुस्तकें जळालीं. हें वर्तमान इ० स० १८१७ च्या नोवेंबर महिन्याच्या ६ व्या तारखेस घडलें.

असें उघड वैर चालल्यावर उभय पक्षांहीं आपापलीं सैन्यें मोठ्या कडीकोट तयारीनें ठेविलीं. पेशव्याकडे ८००० पायदळ, १८००० स्वार आणि १४ तोफा असून इंग्लिशांकडचे सगळे एकंदर २८०० लोक होते; त्यांत गोरे लोक ८०० होते. बाजीराव भितरा खरा, तरी ह्या प्रसंगीं त्यानें प्रथमतः बरेंच धैर्य धरिलें होतें; परंतु कर्नल स्मिथ सैन्यासहवर्तमान येऊन इंग्लिश लष्करास मिळाल्यावर, तारीख १७ रोजीं जी लढाई झाली, तींत बाजीरावाची फौज पराभव पावली. बाजीराव तर रात्रीस पळून गेला होता; त्याच्या १८ तोफा व पुष्कळ सामान इंग्लिशांच्या हातीं लागलें; आणि पुणें शहरही त्यांस फार आयास न करितां मिळालें.

बाजीराव पळाला तो हिंडतां हिंडतां नाशिकाकडे आला. त्याचे मागें स्मिथ साहेब लागला होता. पुढें त्रिंबकजी डेंगळा, बापू गोखला, आणि बाजीराव हे इ० स० १८१८ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस ८००० पायदळ, २०००० स्वार आणि पुष्कळ अरब, इतक्या सेनेसहवर्तमान कोरेगांवाजवळ कृष्णा स्तांतन साहेबाच्या दृष्टीस पडले. तेव्हां या साहेबाजवळ मुंबईच्या पहिल्या पलटणीची दुसरी टोळी, सुमारें ६०० लोक, २६ गोरे गोलंदाज आणि ३०० स्वार इतकी फौज होती. कोरेगांव आपल्या ताब्यांत द्यावें, ह्मणून हीं दोन्ही सैन्यें एकदम त्याजवर आलीं, आणि जित-

का हातीं लागला तिजकाच भाग बळकावून बसलीं. मराठ्यांस हुसकून लावून देण्यासाठीं इंग्लिशांनीं त्यांजवर प्रथम हल्ला केला. परंतु तो व्यर्थ गेला. तेव्हां ते स्वसंरक्षणाच्या उद्योगास लागले. नंतर अरब लोकांचा मार त्यांजवर सुरू झाला. त्याच्या योगानें त्यांचा पुष्कळ नाश झाला, व ते अगदीं टेंकीस आले. त्यांच्यामध्यें एकंदर आठ अमलदार होते. त्यांपैकीं एक तर तत्काळ मरण पावला, आणि पांच असामी जखमी होऊन पडले. बाकी राहिलेले दोघे मात्र लढाईचें काम चालवीत होते. तोफखान्यावरचेही बरेच लोक जायां होऊन बाकी राहिलेले अगदीं निराश होऊन थकून बसले होते. इतक्यांत मराठ्यांनीं हल्ला करून एक तोफ घेतली, आणि एका चावडींत प्रवेश करून तेथें आपला अमल बसविला. त्या जागीं आजारी व जखमी झालेले इंग्लिश लोक ठेविले होते, ते, त्यांच्या हातीं लागले. मग काय विचारावें.? अरबच ते.! त्यांनीं त्या बिचाऱ्या अनाथांवर एकसारखी तरवार चालविली. त्यांमध्यें एक डाक्तर होता. त्याचे तर त्यांनीं तुकडे तुकडे करून टाकिले. ही तोफ इंग्लिशांनीं लागलीच मराठ्यांपासून परत घेतली. तेव्हांची एक चमत्कारिक गोष्ट अशी लिहिली आहे कीं, इंग्लिशांचा एक सरदार लेफ्तेनेंत थामस पतिन्सन ह्या नांवाचा होता; त्यास एक गोळी लागून तिच्या वेदनांत तो निश्चेष्ट पडला असतां, मराठ्यांनीं तोफ घेतल्याचें वर्तमान त्याच्या कानीं पडलें. तें ऐकतांच त्यास मोठा आवेश येऊन तो उठला, बंदूक हातांत धरवेना म्हणून त्यानें ती तोंडांत धरिली, आणि शिपायांस चांगला भरपूर चेव आणून, त्यानें त्यांच्यासहवर्तमान मराठ्यांवर हल्ला केला, आणि त्यांचा पराभव करून त्यांजपासून ती तोफ माघारी घेतली. तोच मराठ्यांचा मोड होण्यास आरंभ. समरांगणीं मराठ्यांकडील ६०० माणूस मेलें. आणि इंग्लिशांकडील सुमारें १७५ जायां झालें. मराठे पराभव पावले; इंग्लिशांस जय मिळाला.

ही लढाईची मौज बाजीराव एका टेंकडीवर बसून पाहत होता. त्याचे शेजारीं साताऱ्याचा राजा असून, ऊन न लागावें म्हणून त्याच्या डोक्यावर अबदागीर धरिला होता. तो पाहून बाजीराव त्यास म्हणाला, "महाराज, आतां हा अबदागीर खालीं करवा; नाहींतर हे इंग्रज एकादा गोळा ह्याच्या धोरणानें मारून आपला घात करतील एकादे." केवढें शौर्य.!

कोरेगांवचा पराभव पाहून बाजीरावानें पुनः पलायन आरंभिलें. तो चक्रें

घेतघेत आष्टीस आला. तों तेथेंही स्मिथसाहेबानें त्यास गांठिलें. मराठ्यांचा सरदार बापूगोखला तेथें होता. इंग्रज आले, असें कळतांच रावबाजी तर जीव घेऊन पळाले. परंतु गोखला धीर धरून युद्धास उभा राहिला. त्याजपाशीं ४००० स्वार होते. एवढ्याशा सैन्यास बरोबर घेऊन प्रबल इंग्लिशांशीं तोंड देणें बरोबर नाहीं, असें त्याच्या मित्रांनीं त्यास पुष्कळ सांगितलें. परंतु कोरेगांवच्या पराभवावरून बाजीराव त्यास कांहीं लावून बोलला होता, त्या गोष्टीचा राग मनांत धरून ह्या प्रसंगीं त्यानें उत्तर दिलें कीं, "जें काय व्हावयाचें तें येथेंच झालें पाहिजे." मराठ्यांच्या फौजेनें एकदम चाल करून, प्रथमतः इंग्लिशांच्या सैन्याचा अगदीं घोंटाळा करून टाकिला. परंतु, मेजर दावे साहेबानें त्याचा तत्काळ बंदोबस्त केला; आणि लागलेंच आपलें सैन्य शत्रूवर नेलें. तें अशा चातुर्यानें कीं, मराठ्यांचा सगळा बेत ढांसळून ते पराभव पावले. ह्या समरांगणीं मराठ्यांकडील १०० च लोक मेले. परंतु, त्यांत बापू गोखला, जो धैर्याचा केवळ पर्वत, तो पतन पावला; असें जेव्हां लोकांनीं पाहिलें, तेव्हां त्यांचे हातपाय गळून जाऊन, त्यांनीं पळ काढिला. इंग्लिशांनीं अडीच कोस पर्यंत त्यांचा पाठलाग केला. बाजीराव कोपरगांवाकडे निघून गेला. हें वर्तमान २० व्या तारखेस घडलें.

पेशवा पुढें आणि इंग्लिश मागें, हा क्रम बरेच दिवस चालू होता. शेवटीं, बाजीराव अशीरगडाजवळ साहा कोसांवर धोळकोट ह्मणून गांव आहे, तेथें आला. त्याच्या मनांत तेथून माळव्यांत शिरावयाचें होतें. पण ती वाट इंग्लिशांनीं अडविली होती, यामुळें त्याचा उपाय हरला. आतां कांहींएक उपाय राहिला नाहीं, असें त्याला वाटलें. ह्मणून त्यानें आनंदराव यशवंत व दुसरे दोघेजण असे तीन वकील, मालकमसाहेब महू येथें होते, त्यांजकडे तहाचें बोलणें करावयास पाठविले. त्यांजपाशीं त्या साहेबानें एकदम असें भाषण केलें कीं, "तुमचा धनी बाजीराव, हा आपलें राज्य सोडण्यास कबूल असल्यास बरें; नाहींतर इतर बोलणीं आमच्या कांहींएक कामाचीं नाहींत." हा जबाब ऐकून तारीख १८ मे रोजीं ते वकील तेथून निघून गेले. नंतर खुद बाजीराव व मालकमसाहेब ह्यांची भेट, तारीख १ माहे जून रोजीं खेरी येथें व्हावी, असें ठरलें.

त्याप्रमाणें भेट झाली. माझें पेशवा हें पद मजकडे राहूं देऊन, इंग्रज लोक मला पुण्यांत ठेवितील, अशी बाजीरावास मोठी आशा होती, ती सर्व

व्यर्थ गेली. इंग्लिशांनीं जें ठरावपत्रक ह्याजपुढें टाकिलें, तें हूं चूं न करितां ह्यास शिरसावंद्य करणें भाग पडलें. ह्यांतलीं मुख्य कलमें येणेप्रमाणें. " १. मोझा व माइया वंशजांचा हक्क पुण्याच्या अथवा दुसऱ्या कोणत्याही राजपदावर नाहीं, असें बाजीरावानें खुषीनें कबूल करावें. २. बाजीरावानें आपलें कुटुंब व थोडेसे लोक बरोबर घेऊन मालकमसाहेबाच्या छावणींत यावें; तेथें त्याचा चांगला आदरसत्कार ठेविला जाईल; व काशी किंवा जें पवित्र स्थान गवरनर जनरल साहेब नेमतील, तेथें जाऊन त्यानें स्वस्थ राहावें. ३. देशांत स्वस्थता झाली पाहिजे, ह्यास्तव बाजीरावानें एका दिवसाचाही विलंब न लावितां सडें हिंदुस्थानाकडे निघून जावें; आणि जेथें त्याचें राहाण्याचें ठरेल, त्या जागीं त्याचें खटलें व माणसें मालकमसाहेबानें ताबडतोब व सुरक्षितपणें पोहोंचतीं करावीं. ४. इतक्या गोष्टींस बाजीराव मान्य झाला तर ह्यास कंपनी सरकार चांगली नेमणूक ठरवून देईल; तिची इयत्ता ठरविणें गवरनर जनरल साहेबांच्या हातीं आहे; तरी दरसाल निदान आठ लक्ष रुपये तरी बाजीरावास मिळतील, ह्याविषयीं मालकमसाहेब खातरी सांगतात. ५. इंग्लिश सरकारावर पूर्ण भरंवसा ठेवून, इतके करार जर बाजीराव तत्काळ पूर्ण करील, तर त्याचा पक्ष धरिल्या कारणानें ज्या कितीएक मोठ्या लोकांचें नुकसान झालें आहे, त्यांच्या जाहागिरींविषयीं व नेमणुकांविषयीं कंपनी सरकार मेहेर नजरेनें विचार करील; आणि त्याच्या धर्मसंबंधीं ज्या कांहीं नेमणुका वगैरे चालू आहेत, त्या योग्यायोग्य पाहून चालवील. ६. हीं कलमें बाजीरावानें नुसतीं तोंडीं मान्य करून उपयोगीं नाहींत; तर ह्या वेळेपासून २४ तासांचे आंत तो मालकम साहेबाचे छावणींत निघून आला पाहिजे; नाहींतर पुनः लढाई चालू होईल; आणि मग त्याशीं तह असा कधींच व्हावयाचा नाहीं."

हे ठराव बाजीरावास अगदीं देखील मानवले नाहींत. पण करतो काय.? विचारा ३००० पायदळ, आणि ५००० स्वार इतक्या लोकांसहवर्तमान तारीख ३ जून रोजीं मालकमसाहेबाचे छावणीजवळ आला. ह्या त्याच्या सैन्यांत सुमारें २००० आरब होते. त्यांनीं आपल्या पगाराच्या मागील बाकीकरितां पेशव्यास अडविलें. तें इतकें कीं, त्याचा तंबू त्यांनीं वेढिला. या वेळीं मालकमसाहेबानें मध्यें पडून तंटा मिटविला ह्मणून बरें झालें; नाहींतर बाजीराव तेथें स्वकुटुंबासहवर्तमान प्राणांस मुकता.

मालकमसाहेबाच्या व बाजीरावाच्या चार आगतस्वागताच्या गोष्टी झाल्या-

वर नवीन ठरावाचें बोलणें निघालें; त्या ठरावांतील सर्व कलमें बाजीरावानें कबूल केलीं. दरसाल ८०००० रुपये नेमणूक घेऊन बाजीरावानें ब्रह्मवर्तास राहावें असें गवरनर जनरल साहेबानें ठरविलें. त्याप्रमाणें तो तिकडे जाऊन राहिला. त्याचें सर्व राज्य इंग्लिशांनीं घेतलें. ह्या प्रकारेंकरून, इ० स० १८१८ ह्या वर्षीं पेशवाई बुडाली.

आपले नशीबीं आलें तें भोगिलें पाहिजे, असें मनांत समजून, बाजीराव ब्रह्मवर्तास स्नानसंध्या करीत राहिला. इंग्लिशांविषयींचा वैरभाव त्यानें अगदीं सोडिला. तो इतका कीं, ते अफगाण लोकांशीं लढत असतां त्यांस पैशाची गरज लागली, तेव्हां पांच लक्ष रुपये त्यानें त्यांस आपण होऊन उसने दिले. आणखी एकदां, पंजाबच्या लढाईच्या वेळींही हजार पायदळ व हजार स्वार चाकरीस ठेवण्यास पुरण्यासारखा आपले पदरचा ऐवज त्यानें त्यांस पुरविला.

बाजीरावानें अकरा बायका केल्या. पहिली भागीरथीबाई, भागवत ह्यांची कन्या; दुसरी सत्यभामाबाई, मंडलिक ह्यांची कन्या; तिसरी राधाबाई, फडके ह्यांची कन्या; चवथी वाराणशीबाई, रास्ते ह्यांची कन्या; पांचवी वेणुबाई, हरिभाऊ देवधर ह्यांची कन्या; साहावी सरस्वतीबाई, पेंडसे ह्यांची कन्या; सातवी सत्यभामाबाई, अभ्यंकर ह्यांची कन्या; आठवी लक्ष्मीबाई, आठवले ह्यांची कन्या; नववी चितळे ह्यांची कन्या; दाहावी गोखल्यांची कन्या; आणि अकरावी रिसबुडांची कन्या. त्याला कांहीं मुलें झालीं होतीं. परंतु, तीं सगळीं अल्प वयांत मरण पावलीं. ह्मणून त्यानें तीन मुलगे दत्तक घेतले. पहिला धोंडोपंत, ह्मणजे प्रसिद्ध बंडवाला नानासाहेब; दुसरा गंगाधरराव, आणि तिसरा सदाशिवपंत. गंगाधरराव्याला एक मुलगा होता; त्याचें नांव पांडुरंगराव. असें बाजीरावाचें कुटुंब होतें.

आपलें पेनशन आपल्या वंशजांस मिळत जावें, ह्मणून त्यानें सरकारांत पुष्कळ खटपट केली; पण ती सर्व व्यर्थ गेली. ह्यांत काय मोठें नवल आहे. ? बाजीरावाचें राज्य इंग्लिशांनीं घेतलें, ह्मणून त्यांनीं त्याला मोठी नेमणूक ठरवून ती त्याजकडे चालविली. तसा कांहीं एक लाभ बाजीरावाचे मुलांपासून इंग्लिशांस झाला नाहीं. तेव्हां त्यांनीं त्यांस काय ह्मणून पैसा द्यावा. ? असो. बाजीरावाला ह्मातारपणीं अर्धांगवायु झाला; त्याचे डोळे गेले; आणि त्यास भ्रमही पडूं लागला. शेवटीं तो बरेच दिवस आजारी प-

डून, इ० स० १८५१ च्या जानेवारी महिन्याच्या २८ व्या तारखेस मरण पावला. तेव्हां त्याचें वय ७५ वर्षांचें होतें.

बाजीरावानें निवर्तला तेव्हां त्याजपाशीं ३००००० रुपयांचा नक्त ऐवज होता, असें एका पुस्तकांत लिहिलें आहे.

ही बाजीरावाची बखर आह्मीं लिहिली, तिजवरून त्याचा स्वभाव कसा होता, व त्यानें राज्य कसें घालविलें, हें वाचणाऱ्यांच्या लक्षांत येईल. तो अतिशयित भितरा होता; तो बंदुकीच्या बारास भिई; आहार पक्कया सव्वा शेराचा; हुरडा खावयास बसला तर मोठालीं २५ कणसें सहज खावीं; शरीरानें बळकट, असा कीं, त्यानें उंसाचीं पेरें हातचे हातीं भराभर सोडवावीं; दातृत्वाविषयीं तर केवळ कर्णाचा अवतार; अशा कितीएक गोष्टी जुन्या लोकांचे तोंडून आपण ऐकतों. एकंदरींत, राज्य चालविण्यास जे गुण अगदीं आवश्यक होते, त्यांपैकीं एकही त्याचे ठायीं नव्हता, असें दिसतें. शौर्य नाहीं; शहाणपण नाहीं; स्वतः अक्कल नाहीं, आणि सांगितलें ऐकावयाचें नाहीं; असा त्याचा स्वभाव असे. विश्वास असा त्यानें कोणावरही ठेवूं नये. ब्राह्मणसंतर्पण हेंच काय तें पुण्य व प्रजापालन, असें त्यास वाटे. प्रजेला सुख कोणत्या प्रकारें होईल, ह्या गोष्टीचा विचार त्या बापड्याच्या मनांत कधीं आलाच नाहीं. लोक त्याजविषयीं जें कांहीं सांगतात, त्यावरून, व गंगाधर शास्त्र्याचे उत्तरारून आह्मांस तर खचीत असें वाटतें कीं, तो अत्यंत कामांध असून, त्याचें त्याविषयीं आचरण केवळ पशुवत असे. त्याचे कारकीर्दींत लोकांस दुर्गुण फार लागले. त्यांचीं फळें प्रजा अद्यापपर्यंत भोगीत आहे. विद्या, ज्ञान, कला, नीति, ह्यांचें नांव देखील त्याचे वेळीं निघेना. सहस्रभोजनें, नाच, तमाशे, बैठकी, रंग, ह्यांत वरच्या प्रतीचे लोक मग्न असत. ते गरीब लोकांवर जुलूम करीत, आणि आपण चैन उडवीत. प्रभु आणि श्रेष्ठ लोक ह्यांची ही स्थिति, तेव्हां गरीबांस सुख व न्याय हीं कोठून मिळणार.? आमच्या ह्या महाराष्ट्र देशाचें दुर्दैव, ह्मणून असा मूर्ख प्रभु त्यावर येऊन, त्याचें राज्य परकीय लोकांचे हातीं गेलें.! तथापि परमेश्वराचे आह्मी फार फार आभार मानितों कीं, जो राजा पेशव्यांचे पश्चात् आह्मांस प्राप्त झाला आहे, तो, जात, रीतभात, भाषा, धर्म, देश, इत्यादि गोष्टींनीं जरी परका आहे, तरी सदयांतःकरणानें स्वकीयापेक्षांही पुष्कळ चांगल्या रीतीनें आमचें पालनपोषण करितो. ह्मणून त्याजवर

नेहमीं प्रीति करणें, त्याचा मान राखणें व त्याशीं प्रजाधर्मानें वागणें, हें आपलें कर्तव्यकर्म होय. ◦तें करण्यास जगदीश्वर आह्मांस बुद्धि आणि सामर्थ्य देवो.

महाराज रणजितसिंग.

जन्म, इ० स० १७८०—मृत्यु, इ० स० १८३९.

हिंदुस्थानाच्या वायव्येस पंजाब ह्मणून एक प्रांत आहे. त्याची राजधानी लाहोर शहर आहे. तेथील लोकांस शीक लोक असें ह्मणतात. ह्या लोकांविषयीं तपशीलवार माहिती ह्या ग्रंथांत एका वेगळ्याच लेखांत दिली आहे. त्यांच्यामध्यें अनेक राजे होऊन गेले. त्यांमध्यें रणजितसिंग हा मोठा पराक्रमी होता. त्याचें व त्याच्या वंशजांचें थोडेंसें वर्णन ह्या लेखांत करावें, असा आमचा हेतु आहे.

रणजितसिंग हा महासिंग नामक बलिष्ठ शीक सरदाराचा पुत्र होय. तो इ० स० १७८० ह्या वर्षीं जन्मला. त्याला लहानपणीं अतिशयित देवी येऊन, त्यांच्या योगानें त्याचा एक डोळा गेला. आणि त्यांच्या व्रणांमुळें त्याचें तोंडही अगदीं बेढब दिसूं लागलें. बालपणांत त्याचा विद्याभ्यास कांहीं एक झाला नाहीं. राजांच्या लाडक्या मूर्ख मुलांप्रमाणें त्यानें आपलें वय उनाडक्यांत घालविलें. पुढें, इ० स० १७९२ त, ह्मणजे तो केवळ बारा वर्षांचा असतां, त्याचा बाप महासिंग हा निवर्तला, आणि रणजितसिंग त्याचे गादीवर बसला. तो वयानें लहान होता, ह्मणून त्याच्या राज्याचा कारभार, त्याची विधवा मातुश्री पाहूं लागली. ती अत्यंत दुराचारी, प्रधानाशींच दुष्ट कर्म करणारी होती. तिनें रणजितसिंगास चांगले गुण शिकविले नाहींत, एवढेंच नव्हे; तर; राज्यकारभार आपले हातीं राहण्यासाठीं, तो राज्य करण्यास अयोग्य व्हावा, अशा कांहीं विलक्षण खोड्या त्यास लागाव्या, असे उपाय योजिले.! दरबारामध्यें फळ्या झाल्या, देशांतला बंदोबस्त नाहींसा झाला, आणि जिकडे तिकडे जुलूम चालला. महासिंग मरण पावला त्या वर्षींच रणजितसिंगाचें पहिलें लग्न झालें. त्याच्या ह्या बायकोचें नांव महिताबकुंवर असें होतें.

महासिंगानें मुलूख बराच मिळवून ठेविला होता; परंतु त्यांत राज्यव्यवस्था नव्हती. आपल्या वयाच्या सत्राव्या वर्षीं रणजितसिंग स्वतः राज्यकारभार पाहूं लागला, तेव्हां त्याची आई आणि तिचा प्रधान हीं मध्यें हात घालून घोंटाळा करूं लागलीं; ह्मणून त्यांस नाहींतशीं करून टाकून, आपल्या इच्छेप्रमाणें त्यानें राज्याची व्यवस्था चालविली. तें शिकांचें राज्य रणजितसिंगानें नांवारूपास आणिलें. त्यानें, काबूलवाले, नेपाळवाले, व मराठे ह्यांशीं तह ठरवून पुष्कळ मुलूख घेतला, व राज्याचें काम सुयंत्र चालविलें. ह्याजपाशीं एक लक्ष दाहा हजार फौज होती. तींत सत्तर हजार कवाईत शिकलेले लोक व चाळीस हजार इतर लोक होते. त्याजपाशीं ३७० तोफा व ३७० गर्नळा होत्या. इ० स० १८०५ ह्या वर्षीं लार्ड लेकसाहेब यशवंतराव होळकराच्या मागें लागले, तेव्हां तो अमृतसर येथें पळून जाऊन, रणजितसिंगापाशीं मदत मागूं लागला. तेव्हां, इंग्लिशांच्या शत्रूस साह्य देणें हें बरोबर नाहीं, असें मनांत आणून, त्यानें दोघांचींही मनें राखून, मध्यस्थी करून, उभयतांकडून तह करविला. हीच इंग्लिशांची व शिकांची पहिली भेट होय.

पट्याळचा राजा व नाभाचा राजा ह्यांचा कलह लागला. तेव्हां नाभाच्या राजानें रणजितसिंगाची मदत मागितली. तेव्हां तें भांडण तोडण्याकरितां तो सतलज नदी उतरून, इ० स० १८०६ ह्या वर्षीं आलीकडे आला; आणि त्यानें या उभयतांस आपल्या ह्मणण्याप्रमाणें वागावयास लाविलें. ह्यांत त्याला बहुमोल जडावाची एक कंठी व पितळेची एक तोफ ह्या दोन वस्तु मिळाल्या.

पुढें फ्रान्स देशाचा बादशाहा हिंदुस्थानावर स्वारी करणार, अशी बातमी आल्यावरून, वक्त पडल्यास साह्य करावें, असा तह ठरविण्यासाठीं, व रजपूत राजांस तुह्मांपासून त्रास होतो, तो न होण्याची तजवीज ठेवावी, असें कळविण्यासाठीं, गवरनर जनरल लार्ड मिंतो साहेब ह्यांनीं मेतकाफ नामक एका साहेबास महाराज रणजितसिंग ह्याजकडे पाठविलें. तो सतलज नदी उतरून पलीकडे गेल्यावर, कसूर मुक्कामीं त्याची व रणजितसिंगाची मुलाखत झाली. लाहोरच्या महाराजानें मेतकाफ साहेबाचा मोठा आदरसत्कार केला. परंतु, यमुना नदी ही शिकांच्या व इंग्लिशांच्या राज्यांची सरहद्द आहे, असें गवरनर जनरल कबूल करीत नाहींत, अमें जेव्हां त्यास कळलें, तेव्हां

तो अयंत क्रोधायमान झाला; आणि, सत्लज नदी उतरून पलीकडचे मुलुखावर आपला पक्का अमल बसवावयाचा, असा त्यानें आपला निश्चय प्रकट केला. आणि त्याप्रमाणें तो सैन्यासहवर्तमान इकडे यावयास निघाला. इकडून गवरनर जनरल साहेबांनीं कर्नल आक्तरलोनी ह्यास पुष्कळ सैन्य बरोबर देऊन, लुधियाना शहराकडे पाठविलें. नंतर, आतां लढाई झाल्याशिवाय राहात नाहीं, आणि आपणास खचीत यश येईल अशी खातरी नाहीं, असें रणजितसिंगास वाटल्यावरून, त्यानें इंग्लिशांशीं तहाचें बोलणें लाविलें. तें त्यांनीं मान्य केलें. त्याप्रमाणें, तारीख २५ माहे एप्रिल सन १८०९ इसवी रोजीं तह ठरला. त्यांत एक मुख्य कलम असें होतें कीं, रणजितसिंगानें, सतलज नदीच्या डाव्या किनाऱ्यावरच्या मुलुखांत तेथच्या बंदोबस्तापुरती मात्र फौज ठेवावी, अधिक ठेवूं नये. हा तहनामा, अगदीं लहान, ह्मणजे केवळ पंधरा ओळींचा आहे.

अफगाणिस्थानचा बादशाह शाहासुजा, पदभ्रष्ट झाल्यावर, आश्रय मागण्याकरितां रणजितसिंगाकडे आला. त्यांचा त्यानें प्रथम बहुमान करून, तुला मी खचीत साह्य करितों, असें सांगितलें. परंतु, पुढें कपट करून त्याजपासून त्यानें कोहिनूरनामक प्रख्यात हिरा घेतला, ही गोष्ट ह्या पुस्तकांत दुसरे जागीं लिहिली आहे. हा हिरा मोठ्या लिंबाएवढा अतितेजःपुंज होता. तो कोंदणांत बसवून, रणजितसिंग आपल्या उजव्या दंडास बांधीत असे.

रणजितसिंगानें प्रथम काश्मिरावर स्वारी केली, तींत त्याला यश आलें नाहीं. मग, इ० स० १८१६ त तो मुलतानावर गेला, तेथेंही तसेंच झालें. परंतु, पुढें दोन वर्षांनीं, ह्मणजे, इ० स० १८१८ ह्या वर्षीं, त्यानें पुनः मुलतानावर स्वारी केली. तेव्हां त्याच्या सैन्याची तयारी उत्तम प्रकारची होती, तेणेंकरून तो प्रांत त्याला सहज घेतां आला. त्यांत त्याला पुष्कळ लूट मिळाली. इ० स० १८१९ त त्यानें काश्मीरही मोठ्या पराक्रमानें काबीज केलें. पुढें त्याची नजर पेशावरावर गेली. परंतु, तेथले अफगाण लोक फार शूर आहेत, त्यांजवर चांगल्या तयारीनें गेलें पाहिजे, असा विचार तो करीत होता, इतक्यांत त्याला चांगले युद्धकला जाणणारे, व बोनापार्ताच्या हाताखालीं वातर्लूच्या प्रख्यात समरांगणावर लढलेले, असे दोन फ्रेंच अमलदार मिळाले. त्यांचीं नांवें वेंतुरा आणि आलार्द अशीं होतीं. ह्या युद्धकुशल पुरुषांनीं रणजितसिंगाचे सैन्यास उत्तम प्रकारची कवाईत

शिकविली. ती २४००० फौज बरोबर घेऊन रणजितसिंगानें, इ० स० १८२३ त पेशावरावर स्वारी केली. तेव्हां तो प्रांत त्यानें पादाक्रांत करून टाकिला खरा; परंतु, त्या मोहिमींत त्याच्या लोकांचे इतके हाल झाले कीं, तो मुलूख त्यानें तेथच्याच एका सरदाराकडे दिला, आणि तो आपला हस्तक, असें त्याजकडून कबूल करवून, आपण स्वदेशीं निघून आला.

इ० स० १८३१ त लेफ्तेनेंत बर्न हा लाहोरच्या दरबारीं गेला; आणि त्यानें रणजितसिंगाशीं तह ठरविला. नंतर आक्तोबर महिन्यांत गवरनर जनरल लार्द विलियम बेंतिक आणि रणजितसिंग ह्यांची भेट रूपुर येथें मोठ्या समारंभानें झाली. तेव्हां रणजितसिंगाबरोबर १०००० निवडक घोडे होते. गवरनर जनरल महाराजांस भेटायास गेला, तेव्हां, त्यास जी मंडळी सामोरी आली, तिजबरोबर, उत्तम वस्त्राभरणांनीं शृंगारलेले असे ७० हत्ती होते. तो मंडळीचा थाट आणि शीक राजाचा दरबाराचें वैभव पाहून लार्द विलियम बेंतिक अगदीं दिपून गेला.

काबूलचा पदभ्रष्ट बादशाह शाहासुजा, ह्यास त्याचे गादीवर पुनः बसवायाचें, असा निश्चय, रणजितसिंग आणि इंग्लिश सरकार ह्यांनीं केला. त्याविषयीं त्या तिघांचा तह, इ० स० १८३८ च्या जून महिन्यांत ठरला. त्यांत असें होतें कीं, अफगाण लोकांपासून रणजितसिंगानें पेशावर घेतलें आहे, त्याच्या सुरक्षितपणाचा बंदोबस्त झाला पाहिजे; ह्या स्वारींत जी लूट मिळेल, तिचा अर्धा वांटा त्याला एकड्याला मिळाला पाहिजे; आणि ह्याखेरीज, दरसाल दोन लक्ष रुपये काबूलवाल्यानें त्यास दिले पाहिजेत. ह्या तहावरून, शाहासुजाला जरी राज्य मिळावयाचें होतें, तरी रणजितसिंगाची ही मोठ्या भागाची मागणी पाहून, त्याला चमत्कार वाटला, व किंचित् दुःखही झालें.

पुढें कांहीं दिवसांनीं, लाहोरापासून १५ कोसांवर गारामदीच्या कांठीं फिरोजपूर येथें लार्द आक्लंद गव्हरनर जनरल, व महाराज रणजितसिंग, हे एकमेकांच्या मुलाखतीकरितां प्राप्त झाले. तारीख २८ माहे नोवेंबर सन १८३८ रोजीं महाराज हे गव्हरनर जनरल साहेबांस भेटण्याकरितां त्यांच्या छावणींतील तंबूमध्यें आले. त्यांचा गव्हरनर जनरल साहेबांनीं मोठा आदरसत्कार केला. पण तेथें एक चमत्कारिक गोष्ट घडली. ती अशी कीं, इंग्लिशांच्या तोफा वगैरे पाहाण्यास महाराज जात असतां, वाटेंत कांहीं

सामान होतें, त्यास त्यांचा पाय अडखळला, आणि ते जमिनीवर सपशेल पडले. तों लागलेच गव्हरनर जनरल साहेब पुढें धांवून, त्यांनीं त्यांसी सांवरून धरिलें, आणि हात देऊन उठविलें. हें पतन आपणांस अत्यंत अनिष्टसूचक आहे, असें महाराजांस व सगळ्या शीक लोकांस वाटलें. परंतु उपयोग काय? पुढें कांहीं वेळानें गव्हरनर जनरल साहेब रणजितसिंगाच्या छावणींत त्यास भेटण्याकरितां गेले. तेथें महाराजांनींही त्यांचा उत्तम प्रकारें आदरसत्कार केला.

रणजितसिंग मोठा विषयी असे. त्याच्या भोंवतीं वेश्यांचा थवा नाहीं, अशी एक घटका सुद्धां जात नसे. स्त्रियाच काय, पण जो सुंदर पुरुष असे, यावरही तो अतिशयित प्रीति करी. याविषयीं मोहनलालनामक एक प्रवासी असें वर्णन करितो; " रणजितसिंग अंगानें सडपातळ, व एका डोळ्यानें आंधळा होता. त्याची पांढरी शुभ्र दाढी त्याच्या बेंबीवर पडत असे. तरी त्याच्या प्रधानानें त्याची एक गोष्ट मला अशी सांगितली कीं, हिराशिंग ह्मणून एक तेरा वर्षांचा मुलगा अति सुस्वरूप आहे, त्याजवर रणजितसिंग फार संतुष्ट असतो. तो इतका कीं, महाराज शेजेस गेले ह्मणजे, तिकडे जाण्यास इतर कोणासही परवानगी नसते; परंतु, हिराशिंगास कोणीं आडकाठी करूं नये, असा हुकूम आहे. ह्या मुलास आपणांबरोबर सोन्याच्या सिंहासनावर घेऊन महाराज बसत असतात." तें सिंहासन आंतून लांकडाचें, व वरून सोन्याच्या पत्र्यांनीं मढविलेलें होतें. तें सांप्रत विलायतेस आहे, असें सांगतात.

रणजितसिंग हा फार लोभी असे. दररोज आपल्या खजीन्यास भर घातल्यावांचून त्याला चैन पडत नसे. त्याच्या राज्याचें उत्पन्न सुमारें दोन कोटि रूपयांचें होतें. त्यानें पुष्कळ पैसा जमविला होता. तो इतका कीं, त्याचे इतकें जवाहीर सांप्रत युरोपांतल्या एकाही राजापाशीं नाहीं, असें एक सुज्ञ इंग्लिश ग्रंथकार लिहितो. त्या संपत्तीची सामान्य कल्पना मनांत येण्यास आह्मी अशी एक गोष्ट सांगतों कीं, रणजितसिंगाच्या जामदारखान्यांत सोन्या रूप्याचे व जडावाचे नुसते लगाम तेराशें होते. शिवाय त्याजवळ बारा कोटि रूपये रोख होते.

हा राजा मरण पावल्यापूर्वीं बरेच दिवस आजारी होता. कांहीं दिवसपर्यंत, त्याला शुद्धि चांगली होती, पण बोलवत नव्हतें. तेव्हां राज्यकारभा-

राचें सर्व काम खुणांनीं आपला हेतु प्रदर्शित करून तो चालवीत असे. औषधोपचारांनीं आपणास गुण येत नाहीं, व आतां लवकर मरण आल्याखेरीज राहात नाहीं असें त्यास वाटलें. तेव्हां त्यानें आपले युरोपियन व एतद्देशीय सर्व कामदार आपले भोंवतीं बोलाविले, आणि, आपला प्रिय पुत्र खरकसिंग ह्यास आपले पश्चात् गादीवर बसविण्याविषयीं त्यांजपासून शपथपूर्वक वचनें घेतलीं. त्यानें आपल्या धर्माच्या भिक्षुकांस पुष्कळ धर्म केला, आणि कोहिनूर हिरा जगन्नाथ देवास द्यावा असें सांगितलें. परंतु, त्याप्रमाणें कोणीं केलें नाहीं. तो हिरा पुढें पुष्कळ दिवस लाहोरच्या खजिन्यांतच होता.

हा पराक्रमी शीक राजा तारीख २७ माहे जून सन १८३९ इसवी रोजीं मरण पावला; तेव्हांच शीक लोकांच्या राज्यास उतरती कळा आली, असें झटलें तरी चिंता नाहीं. समयसूचकता, धैर्य, शौर्य, साहस, इत्यादि गुणांत तो, पुष्कळ अंशीं, शिवाजी व हैदर ह्यांसारखा होता. रणजितसिंग मेला तेव्हां सगळ्या पंजाबांत. आणि त्यांत विशेषेंकरून लाहोर शहरांत मोठा हाहाकार झाला. त्याचें प्रेत मोठ्या समारंभानें स्मशानांत नेलें. त्याजबरोबर त्याच्या चार प्रिय राण्या व सात आवडत्या वेश्या सती गेल्या. त्या, ह्या कृत्यास इतक्या उत्सुक होत्या कीं, अगदीं अखेरीपर्यंत, त्यांपैकीं एकीच्या देखील तोंडावर दुःखाचें किंवा निराशेचें चिन्ह दिसलें नाहीं.! ह्याचें नांव खरी प्रिती.!

रणजितसिंग निवर्तल्यावर त्याचा पुत्र खरकसिंग हा त्याचे गादीवर बसला. तो अगदीं अजागळ होता. ह्मणून, त्याच्या राज्याचा कारभार त्याचा पुत्र नवन्याहाळसिंग हा पाहूं लागला. त्यास ध्यानसिंग ह्या शाहाण्या प्रधानाचें साह्य होतें. हा रणजितसिंगाचा मोठा इमानी दिवाण असे. परंतु, खरकसिंग ह्याची मर्जी चैतसिंग नांवाच्या दुसऱ्या एका कारभाऱ्यावर विशेष बसल्यामुळें, ध्यानसिंगाचें तेज दरबारामध्यें अगदीं कमी झालें. आणि तेणेंकरून त्या पुरातन कारभाऱ्यास फार दुःख वाटूं लागलें. पुढें नवन्याहाळसिंगाला गादीची इच्छा उत्पन्न झाली. त्याचे मसलतींत ध्यानसिंग मिळाला. त्या दोघांनीं कपट युक्ति करून चैतसिंगास मारेकऱ्यांकडून ठार मारविलें. तेव्हां नवन्याहाळसिंगाचें प्राबल्य वाढलें. इतकी खटपट करूनसवरून ध्यानसिंग पुनः एके बाजूस राहिला; त्याला कोणी विचारीना. ह्मणून तो शीरसिंग नामक एका मुलाचा पक्ष धरून बसला. पुढें कांहीं दि-

वसांनीं नवन्याहाळशिंग व खरकशिंग हें उभयतांही मरण पावल्यावर, ध्यानशिंगाच्या साह्यानें इ० स० १८४१ ह्या वर्षीं तो शीराशिंग गादीवर बसला. हा मुलगा रणजितशिंगाच्याच एका बायकोच्या पोटीं झालेला होता; परंतु, तिच्या पातिव्रत्याविषयीं खुद तिच्या नवऱ्यास संशय असल्यामुळें, हा माझ्या पोटचा नव्हे, असें तो म्हणे. ह्या मुलास गादी मिळतांच, खरकशिंगाची बायको चंदकुवर हिनें बंड केलें, शीराशिंगास किल्ल्यांतून हांकून दिलें, आणि आपण गादीवर बसली. तिची दिवाणगिरी, ध्यानशिंगाचा वडील भाऊ राजा गुलाबशिंग ह्यास मिळाली. पुढें थोडक्याच महिन्यांनीं, शीराशिंग व ध्यानशिंग ह्यांनीं सैन्यासहवर्तमान येऊन, लाहोरच्या किल्ल्यास वेढा घालून, चंदकुवर हीस अगदीं जर्जर करून सोडिलें. तेव्हां, यशाविषयीं निराश होऊन तिनें किल्ला सोडिला, आणि लाहोरची गादी पुनः शीराशिंगास मिळाली.

अशा प्रकारें शीराशिंग ह्यास पुनः गादी प्राप्त झाली; परंतु तिचा उपभोग फार दिवस घेण्याचें त्याच्या नशीबीं नव्हतें. कारण, तो पुढें अमली व दुर्व्यसनी निघाला. त्याजपासून लोकांस अतिशयित त्रास होऊं लागला; तेव्हां त्याचा मेहुणा अजितशिंग वगैरे मंडळीनें त्याचा प्राण घेण्याचा निश्चय केला. त्याप्रमाणें त्यास इ० स० १८४४ च्या सप्टेंबर महिन्याच्या १५ व्या तारखेस त्यास, शिपायांची कवाईत दाखविण्याच्या मिषानें कवाइतीच्या मैदानांत बोलावून आणिलें, आणि तेथें गोळी घालून त्याचा प्राण घेतला. त्यानंतर लवकरच ध्यानशिंगही प्राणांस मुकला.

नंतर कांहीं दिवस बरीच गडबड होऊन, रणजितशिंगाचा पुत्र दिलीपशिंग हा गादीवर बसला; आणि तो वयानें अगदीं लहान, म्हणून राज्याचा कारभार, त्याची आई झिंदनराणी ही पाहूं लागली. तिचें सैन्य फार बेफाम होतें. तिच्या हाताखालीं एक दोन चांगले कारभारी होते, त्यांस त्या लष्करच्या लोकांनीं ठार मारिलें. तेव्हां राज्यांत कोणी शाहाणा नाहींसा झाला. आणि सैन्यापाशीं लढाऊ सामान पुष्कळ असून, व त्यांचे बाहु फुरफुरत असून, त्यांस कांहीं उद्योग मिळेना. तेव्हां शीक सरदार इंग्लिशांच्या मुलुखाकडें निघाले. ह्या कृत्यास झिंद कबूल नव्हती; परंतु, तिचें ऐकतो कोण.? त्या शीक सरदारांमध्यें गुलाबशिंग, म्हणजे ध्यानशिंगाचा भाऊ, हा कोणत्याही पक्षास उघडपणें न मिळतां उदासीन राहिला. इतकेंच केवळ नव्हे; तर त्यानें इंग्लिश सरकारापाशीं गुप्तपणें स्नेह ठेविला होता.

अशी बिघडाबिघड झाल्यावर, शीक लोक व इंग्लिश सरकार ह्यांच्या किर्तीरूप मोठमोठ्या लढाया मुडकी, फिरोजशहर,० अलिवाल सोब्रन इत्यादि ठिकाणीं झाल्या. शेवटीं शीक सरदार पराभव पावले; ही गोष्ट इ० स० १८४६ त घडली. पुढें, गुलाबसिंगाच्या द्वारें शीक सरदार व इंग्लिश ह्यांचा तह ठरला. त्यांत असें ठरलें कीं, शीक सैन्यांतील शिपायांच्या पगाराची बाकी एकदम देऊन टाकावी; त्यांतले पुष्कळ लोक कमी करावे; ज्या छत्तीस तोफांच्या योगानें इंग्लिश फौजेचा फार नाश झाला होता, त्या तोफा इंग्लिशांस द्याव्या; आणि, वीस हजार पायदळ आणि बारा हजार स्वार ह्यापेक्षां अधिक सैन्य लाहोरच्या राजानें ठेवूं नये. ह्या खटपटींत गुलाबसिंगानें आपणास वेगळा मुलूख तोडून घेतला; आणि ह्याच वेळीं शीक राज्यांत इंग्लिशांचा चांगला हात शिरला. तो इतका कीं, त्या दरबारांत सर हेनरी लारेन्स नामक साहेब रेसिदेंत नेमिले; त्यांच्या मदतीस लालसिंग प्रधान दिले; आणि त्या दोघांच्या मतानें सर्व राज्यकारभार चालावा, असें ठरलें. पुढें राणीनें फितूर करण्याचा विचार मांडिला. तो इंग्रज सरकारास समजला. त्यांनीं लागलीच तिला प्रतिबंधांत ठेविलें, व तिचे मसलतदार गंगाराम व जनरालखान ह्यांस फांशीं दिलें. नंतर कांहीं दिवसांनीं कप्तान आग्न्यु व आंदरसनसाहेब हे कांहीं सरकारी कामाकरितां मुलतानास गेले होते. त्यांस, तेथें मूळराज ह्यानें ठार मारविलें. त्यांत राणीचें अंग होतें; असें पक्कें शाबीत झाल्यावरून, इंग्रज सरकारानें तिला आपल्या मुलुखांत आणून ठेविलें. तेथून ती पळून नेपाळांत गेली. इकडे मूळराजाच्या व इंग्लिशांच्या चार लढाया झाल्या. त्यांपैकीं शेवटची लढाई इ० स० १८४९ च्या फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या तारखेस गुजराथ येथें झाली. तींत मूळराजास कैद केलें. नंतर त्याची चौकशी होऊन त्यास काळ्यापाण्याची शिक्षा झाली. ह्या लढायांत शीक सरकारानें विनाकारण पडून आपलें नुकसान मात्र करून घेतलें. मूळराजाची अशी दशा झाल्यावर, दिलीपसिंगास इंग्लिशांनीं कैद करून कलकत्त्यास आणिलें; आणि त्यास व त्याचे आईस दरसाल पांच लक्ष रुपयांची नेमणूक ठरवून देऊन, त्याचें सर्व राज्य आपणांकडे घेतलें. ही गोष्ट इ० स० १८४९ त घडली. त्या वेळींच कोहिनूर हिरा त्यानें महाराणी सरकारास दिला. तो हल्लीं इंग्लंदांत आहे.

---

१ इ० स० १८८१.

दिलीपसिंग, सांप्रतकाळीं, दरसाल, पांच लाख रुपये पेनशन घेऊन, ख्रिस्ती धर्म स्वीकारून खुशाल विलायतेंत जाऊन राहिला आहे. त्याची आई ही थोडक्या महिन्यांपूर्वी तिकडेच मरण पावली. गुलाबसिंग हा वरचेवर दिवसांमागें निवर्तला. त्याचें राज्य, त्याचा पुत्र रणभरसिंग हा हल्लीं उपभोगीत आहे.

पेंढारी लोक.

इ० स० १७९४.

पेंढारी ह्या शब्दाची व्युत्पत्ति काय असेल ती असो; आह्मांला ठाऊक नाहीं. परंतु त्याचा सामान्य अर्थ लुटारू, दंगा करणारे, असा ऐकण्यांत आहे. पूर्वी ह्या देशामध्यें शिंदे, होळकर, पेशवे, ह्यांचीं मोठमोठीं राज्यें होतीं, त्यांत बंदोबस्त अगदीं कमी असे. कोण कोठें मारलूट करितो, ह्याची सरकाराला खबर देखील लवकर कळेना. आणि एकादे वेळेस कळली तरी त्याविषयीं पक्का छडा लागून त्याचें निवारण होईना. प्रजेमध्यें 'वळी तो कान पिळी' असा प्रकार असे. अशा वेळीं पेंढारी ह्मणून दंगेखोर लोकांनीं बंड माजविलें, आणि देशाच्या कितीएक भागीं प्रजेस 'देमाय धरणीठाय' करून सोडिलें. त्यांच्या कांहीं गोष्टी आपण कधीं कधीं जुन्या लोकांचे तोंडून ऐकितों. त्यांविषयीं थोडीशी माहिती येथें देतों.

पेंढारी ह्मणून एक कांहीं वेगळी जात नव्हती. ज्याला शरीर संपत्ति चांगली, उद्योग नाहीं, दरिद्र अठरा विश्वे, आणि दयेविषयीं पाहूं गेलें तर ज्याचें हृदय केवळ काळा फत्तर, अशा स्थितीच्या अनेक जातींच्या लोकांचा तो मेळा असे. औरंगजेब आणि मराठे ह्यांचा झगडा चालला होता, तेव्हांपासून हे असल्याचें इतिहासांत आढळतें. इ० स० १७६१ त पाणिपत येथें अहमदशाह अबदल्ली आणि मराठे ह्यांचें जें तुमुल युद्ध झालें, त्यांत पुष्कळ पेंढारी लोक मराठ्यांकडे होते. ते देशास इतके उपद्रवकारक झाले नसते; परंतु त्यांस शिंदे होळकर ह्यांची मदत असे, तेणेंकरून ते लोक अनावर होऊन गेले. ह्या दोघां संस्थानिकांच्या आश्रयावरून त्यांच्या दोन

---

१ इ० स० १८८१

टोळ्यांस दोन वेगळालीं नांवें पडलीं. ह्मणजे एकीस शिंदेशाही पेंढार, व दुसरींस होळकरशाही पेंढार असें ह्मणत.

शिंदेशाही पेंढाऱ्यांस महादजी शिंदा ह्यानें इ० स० १७९४ त कांहीं जमीन इनामादाखल दिली. या वेळीं यांचे पुढारी दोन असामी होते. एकाचें नांव हिरू आणि दुसऱ्याचें नांव वुऱ्हण. ते दसऱ्याच्या मुहूर्तानें आपले सर्व लोकांसहवर्तमान लकबारास ह्मणजे लुटीच्या कामास निघत असत. ते सगळे घोड्यांवर बसलेले असून, त्यांचे हातांत भाले व बर्च्या वगैरे हत्यारें असत. ते आपणांबरोबर सामानसुमान कांहीं एक घेत नसत. कां कीं, जें कांहीं देशांत आहे तें आपलेंच आहे असे ते समजत. ते आपल्या ठिकाणाहून टोळ्या टोळ्यांनीं फुटून वेगवेगळ्या मार्गांनीं जात. परंतु ज्या दुर्दैवी गांवाचे पाप्याचे घडे भरले असत, त्यावर ते, पूर्वसंकेतानुरूप, सर्व एकदम येऊन मिळत. तेथें जें कांहीं मोलवान ह्मणून त्यांस सांपडे, तें ते तावडतोब घेऊन जात, आणि मग लोकांस छळून त्यांजपासून पैसा काढण्याच्या कामाला ते लागत. त्यांचा तो छळण्याचा प्रकार किती भयंकर ह्मणून वर्णावा.? धनवान् लोकांस धरून त्यांस ऊन राखेचे तोबरे द्यावे; त्यांस झाडांस उलटें टांगून खालीं मिरच्यांची धुरी घालावी; सर्वांगाला चिंध्या गुंडाळून त्यांवर तेल ओतून त्या पेटवाव्या; मनुष्यास उताणें पाडून, त्याच्या उरावर एक लांकडी तक्ता ठेवावा, त्याच्या दोहों टोंकांवर एका एका पेंढाऱ्यानें खूब जोरानें बसावें, व ह्याखेरीज त्यावर त्यांनीं मुष्टिप्रहारही करावा; आईच्या थानापासून मूल तटकर तोडून घ्यावें, आणि विहिरींत टाकावें, अथवा हवेंत उंच उडवून शेंदाडाप्रमाणें भाल्याच्या टोंकावर धरावें; नाना प्रकारें स्त्रियांच्या विटंबना कराव्या; असे हालहाल करून ते लोकांपासून द्रव्य काढीत, आणि घेऊन जात. ज्यांवर हे भयंकर प्रसंग गुदरत, त्यांस खरोखर असें होई कीं, साक्षात् मृत्यु येऊन घेऊन जाईल तर एका पक्षीं बरें. !

हिरू आणि वुऱ्हण हे इ० स० १८०० ह्या वर्षीं वारले. त्या दोघांसही पुत्र होते. परंतु अशा बेबंद चोरमंडळांत श्रेष्ठत्वाचा अधिकार वंशपरंपरेनें कशाचा चालतो.? त्या मुलांच्या ठायीं बापांचा पटाईतपणा नव्हता. तेव्हां अर्थात् ते मागें पडले. आणि छट्टू व करीमखान हे दोघे खटपटी पुरुष ते अधिकार पावले. छट्टू हा जातीचा जाट होता. तो अगदीं लहान असतां दुष्काळ पडला होता, तेव्हांच त्याच्या आईबापांनीं त्यास पेंढाऱ्यांस विकलें.

तो पेंढारीपणांत कांहीं दिवसांनीं इतका निष्णात झाला कीं, त्याजवर दौलतराव शिंदा बहुत खूष होऊन, त्यानें त्याला जाहागीर दिली, व नवाबअशी पदवीही दिली. हें वर्तमान इ० स० १८०९ त घडलें. पुढें ह्रोन वर्षांनीं, कांहीं कारणावरून त्याजवर शिंद्याची मर्जी इतकी खफा झाली कीं, त्यानें त्यास एकदम कैदेंत टाकिलें. ह्या कारागृहांत चार वर्षें घालविल्यावर छुट्टूनें पुष्कळ खंडणी भरून आपली सुटका करून घेतली. आणि तो आपले जाहागिरींत जाऊन राहिला. पुनः अनेक खटपटी करून त्यानें शिंद्याची मर्जी संपादिली. ती इतकी कीं, त्यानें भोपाळाच्या पूर्वेस आणखी कांहीं मुलूख त्यास जाहागीर दिला. त्याच्या लष्कराची छावणी नर्मदेच्या कांठीं निमाड येथें असे. असें सांगतात कीं, त्यानें जरा इशारा केल्या बरोबर त्याच्या बरोबर निघण्यास १२००० घोडा सिद्ध होत असे.

करीमखान हा जातीचा रोहिला होता. तो पुढें पेंढारांत शिरला. दौलतरावशिंदा निजामाशीं लढत होता, तेव्हां ह्यानें त्याला चांगली मदत दिली; व लूट करून खूब संपत्ति मिळविली. त्यानें भोपाळच्या एका सरदाराच्या मुलीशीं लग्न लाविलें, त्याच्या योगानें त्यास त्या देशांत कांहीं मुलूख मिळाला. आणि शिंद्यानें त्याच्या भरतीस आणखी कांहीं जाहागीर दिली. तेव्हांपासून करीमखान नवाब हें पद पावला. पुढें त्याला अशी इच्छा झाली कीं, आपण राजा व्हावें; ह्मणून त्यानें कांहीं पायदळ ठेविलें. हें शिंद्यास आवडलें नाहीं. तेव्हां त्यानें निश्चय केला कीं, करीमखानाची ही महत्त्वाकांक्षा आधीं नाहींशी केली पाहिजे. परंतु हें काम उघड सक्तीनें करण्यास कदाचित् फार श्रम पडतील, या पक्षीं युक्तीनें तें साधावें, असा विचार त्याचे मनांत आला. हा हेतु मनांत धरून शिंदा ग्वाल्हेरीहून निघाला; आणि करीमखानाला त्यानें पुढें सांगून पाठविलें कीं, तुह्मांपाशीं कांहीं महत्वाच्या गोष्टीचा विचार करण्यास आह्मी येत आहों. हा निरोप ऐकून करीमखान बहुत संतोष पावला, आणि आपल्या यजमानास भेटण्यासाठीं मोठ्या डौलानें सामोरा चालला. या उभयतांची गांठ बरसाई मुक्कामीं पडली. तेथच्या चालचर्येवरून करीमखानास असें वाटलें कीं, सतनबरीचा जो किल्ला घेण्यासाठीं आपण इतके वेळ व्यर्थ श्रमलों, तो, शिंदा हल्ला करून घेऊन आपणास बक्षीस देईल. हे मनांत मांडे, आणि शिंदा स्वतः करीमखान ह्याचे लष्करांत त्यास भेटावयास गेला, तेव्हां त्या पेंढाऱ्याला जो हर्ष झाला तो

किती ह्मणून सांगावा ? त्यानें ११२५०० रुपयांचें आसन करून त्यावर दौलतरावास बसविलें. तेव्हां शिंदा बहुत संतोष पावला; आणि करीमखानास तो बोल्यात्कारें ह्मणाला, तुह्मांसारखा शूर आणि राजव्यवस्था करण्यांत कुशल असा दुसरा एकही पुरुष माझे पाहण्यांत आला नाहीं; आतां मागा जें तुह्मांस पाहिजे तें; मी देण्यास सिद्ध आहें. हें शिंद्याचें बोलणें कानीं पडतांच, त्या पेंढाऱ्यानें पुष्कळ जाहागीर मागितली. तेव्हां, ठीक आहे, असें उत्तर देऊन शिंद्यानें त्याजविषयींच्या सनदा व एक उंचा पोषाख तयार करण्याविषयीं हुकूम केला. समारंभ व्हावयाच्या ठरलेल्या दिवशीं, करीमखान, बरोबर थोडेसे लोक घेऊन, आपले सर्व मनोरथ आतां पूर्ण होतील अशा आशेनें, शिंद्याच्या लष्करांत गेला. तेथें त्याचा मान सन्मान प्रथमत: उत्तम प्रकारें झाला. शिंद्यानें त्याला खुद आपले तंबूंत बोलावून आणून जवळ बसविलें, आणि आपण कांहीं बाहाणा करून बाहेर उठून गेला. त्यावरोबर, पूर्वसंकेतानुरूप, शिंद्याचे लष्करी लोक आंत शिरून, त्यांनीं करीमखानाला कैद केलें आणि ग्वाल्हेरीस नेलें. सुजाहलपूर येथें त्याचीं मुलेंमाणसें व खजीना होता, तीं आपले ताब्यांत आणण्याचा यत्न शिंद्यानें केला; परंतु करीमखानाची आई फार हुशार होती; तिनें कोट येथील राजा जालीमसिंग ह्याचा आश्रय धरिला. तेणेंकरून शिंद्याचा बेत फसला. करीमखान धरला गेल्याबरोबर त्याच्या लोकांच्या अनेक टोळ्या झाल्या. आणि त्या शिंद्याच्या मुलुखांत लूट करून फार उपद्रव देऊं लागल्या. अशीं चार वर्षें लोटलीं. शिंद्याला असें वाटलें कीं, करीमखानास आपण व्यर्थ धरिलें. त्यापासून कांहीं फायदा झाला नाहीं. तेव्हां सहा लाख रुपये खंडणी घेऊन त्यानें त्यास सोडून दिलें. पुढें छट्टू आणि हा, असे एक झाले. तेव्हां त्यांचें एकंदर सैन्य ६०००० जमलें. आणि त्यांनीं पुन: लुटालूट चालविली.

अमीरखान पठाण ह्मणून एक होळकरशाही पेंढारी होता. त्यास कोणी मीरखान असेंही ह्मणत. त्यानें एके वेळीं, नगर जिल्ह्यांत टोंकें ह्मणून जें क्षेत्राचें गांव आहे, त्यावर स्वारी केली. तेव्हांची हकीकत फार चमत्कारिक आहे. टोंकयास आल्याबरोबर त्यानें आपल्या नित्याच्या पाठाप्रमाणें लुटीस आरंभ केला नाहीं. पहिले दिवशीं तर तो उगाच तंबू देऊन स्वस्थ राहिला. आणि दुसरे दिवशीं गावांत ब्राह्मण लोकांस असें कळविलें कीं, मी होळकराचा सरदार, येथील ब्राह्मणांचा रमणा करून, त्यांस त्यांच्या योग्यतेप्रमाणें

दक्षिणा वांटण्यास आलों आहें; तर तुह्मीं सर्वांनीं उद्यां प्रातःकाळीं सिद्धेश्वराच्या मंदिरांत कृपा करून यावें. त्याप्रमाणें ते भावार्थी लोक द्रव्य लोभास्तव तेथें जमले. जे श्रीमान् व विद्वान होते, ते मोठ्या मोठ्या शालजोड्या पांघरून व हातांत आंगठ्या जोडवीं घालून आले. त्याप्रमाणें इतरांनींही, आपल्या मगदुराप्रमाणें आपला डौल ठेविला होता. सगळे जमले असें समजतांच, अमीरखानानें आपले जुलमी व दांडगे शिपाई देवळांत घातले. त्यांनीं शिष्टशिष्ट पाहून त्यांस लुटिलें, आणि त्यांच्या शेंड्यांस दोर बांधून, त्यांस गंगेमध्यें शेंदून त्यांजपासून पुष्कळ द्रव्य घेतलें. ही श्रीमंत शिष्ट ब्राह्मणांची दशा झाली. त्यांबरोबर कितीएक गरीब लोक पराकाष्ठेचें दुःख पावले. असो. ही गोष्ट मला कोठें ग्रंथांत आढळली नाहीं. तर ही मला एका वृद्ध मनुष्यानें खुद पाहिलेली सांगितली, ह्मणून मीं ही येथें घातली आहे.

हे पेंढारी एतद्देशीय संस्थानिकांच्या मुलखांत मात्र जावत्काल पावेतों दंगा करीत असत, तावत्कालपर्यंत इंग्लिश सरकारानें त्यांजकडे लक्ष पुरविलें नाहीं. परंतु इ० स० १८१२ ह्या वर्षीं बुंदेलखंड व रेवा ह्या इंग्लिश प्रांतांत त्यांनीं बंडाळी करण्यास आरंभ केला. तेव्हां त्याविषयीं विचार होऊन, शेवटीं इंग्लिशांचें ११६००० सैन्य त्यांजवर रवाना होऊन त्यानें त्यांचा समूळ नाश केला. त्याविषयींची तपशीलवार हकीकत हिंदुस्थानाच्या इतिहासांत पहावी.

जुलुमापासून प्रजेचें रक्षण करणें हें राजांचें कर्तव्य कर्म आहे. असें असतां, जिकडून धांवणें यावयाचें तिकडून दरोडा यावा, ह्या ह्मणीप्रमाणें, पेंढाऱ्यांच्या संबंधानें शिंदे व होळकर ह्या राजांचें आचरण असे, ही मोठी दुःखाची गोष्ट होय. जें खरोखर वाईट, तें केव्हांना केव्हां तरी बाधक व्हावयाचें, असा सिद्धांत आहे. लुटीचा हिस्सा देत असत, तेव्हां संस्थानिकांस पेंढारी चांगले वाटत असत. परंतु नाकापेक्षां मोतीं जड होऊं लागलें, तेव्हां त्यांचे डोळे उघडले. न्यायान्याय न पाहतां केवळ द्रव्यावर दृष्टि देणें, हें राजास किंवा दुसऱ्या कोणत्याही मनुष्यास उचित नाहीं.

खरड्याची लढाई.

इ० स० १७९५.

ही लढाई आमचे लोकांत फार प्रसिद्ध आहे; व तिजविषयीं म्हातारे जुने पुरुष पुष्कळ बढाईच्या गोष्टी सांगतात. कारण, मराठ्यांनीं निजामावर हा मोठा जय मिळविला, असें ते मानितात. ह्या लढाईचे वेळीं पेशव्यांचे गादीवर सवाईमाधवराव होते. दरबारांत नानाफडनवीस मुख्य असून, सगळें व्यवस्थासूत्र त्यांचे हातीं असे. तें इतर सरदार लोकांच्यानें पहावेना. तेव्हां अर्थात् आपसांत वैमनस्यें पडलीं होतीं. ते एकमेकांस बुडवूं पाहात. अशी स्थिति असतां, निजामाकडे चौथाई व सरदेशमुखी ह्यांबद्दल जी बहुत दिवसांची बाकी राहिली आहे, ती हरप्रयत्नानें वसुलांत आणावी, असा विचार पेशव्यांनीं मनांत आणिला. आणि हें काम, समरांगणीं एकदा रंजक झडल्याखेरीज होत नाहीं, असें सर्व सरदार जाणून होते. आणखी एक प्राचीन वहिवाट त्यांस अशी ठाऊक होती कीं, निजामाकडील कांहीं प्राप्त झालें असतां तें साऱ्यांनीं वांटून घ्यावें. त्या आशेनें सरदार लोक, आपलीं वैमनस्यें विसरून, ह्या प्रसंगीं पेशव्यांस पाहिजे तें साध्य करण्यास सिद्ध झाले.

कोणतेही कामाची तोड पाडते वेळीं, सुज्ञ जे आहेत ते साम, दाम, दंड, आणि भेद, ह्या उपायांची योजना, एक चालेनासा झाला ह्मणजे दुसरा, अशा पद्धतीनें यथानुक्रमें करितात; त्याप्रमाणें नानांनीं, चौथाई व सरदेशमुखी ह्यांबद्दलची बाकी निजामअल्लीपाशीं मागण्याकरितां, गोविंदराव काळे व गोविंदराव पिंगळे हे दोघे वकील हैदराबादेस पाठविले. निजामअल्लीनें अनेक प्रकारच्या भलभलत्या सबबी काढून, बीस कलमांची एक याद त्या वकिलांचे अंगावर टाकिली. ती घेऊन ते पुण्यास आले. नानांनीं त्या कलमांचीं उत्तरें मोठ्या चातुर्यानें तत्काळ लिहिलीं; आणि अठ्ठावीस कलमांची एक दुसरी याद पुनः हैदराबादेस रवाना केली. तींत लिहिलें होतें कीं दोन कोटि तीन लक्ष रुपये पेशव्यांचे तुह्मांकडे येणें आहेत, त्यांची तजवीज व्हावी. ह्या यादीविषयीं पेशव्यांकडचे दोघे वकील व निजामअल्लीचा दिवाण मशीरउल्मुलुख ह्यांचा पुष्कळ वादविवाद झाला. तेव्हां तो दिवाण वकिलांस लावून बोलला कीं, "हिशेबांत पुरा, व अति कुटिल जो तुमचा धनी त्यानें

स्वत: येऊन येथें आपल्या लिहिण्याचा अर्थ सांगावा, एरव्हीं तो कोणास कळावयाचा नाहीं." वकिलांनीं त्यावर उत्तर केलें, " आमच्या नानांस कामें बहुत आहेत; त्यांमुळें त्यांचें येणें येथें व्हावयाचें नाहीं." त्यावर मशीरउल्मुलुखानें धमकीचा जबाब केला कीं, " त्यांचें येणें येथें कसें होईल हें तुह्मांस दाखविण्यास फार उशीर नको." हीच युद्धाची सूचना. ह्या वेळेपासून पेशवे व निजामअल्ली हे आपापल्या सैन्यांची जमवाजमव व तयारी करूं लागले.

निजामअल्लीच्या लोकांस युद्धाविषयीं फारच स्फुरण चढलें. त्यांनीं आपलेकडून कडीकोट तयारी चालविली. बेदर येथें मोठें लष्कर जमा झालें. युद्धाचें साहित्यही त्यांजपाशीं बरेंच होतें; पण त्यांत एक मोठी न्यूनता दिसे. ती ही कीं, शिपाई लोक आपल्या अमलदारांचें बिलकूल ऐकेनात. पुण्याची बिशात काय.? तें एका पळांत घेऊन जाळून टाकूं, अशा पोकळ गप्पा ते आपआपल्यांत झोंकीत. कळवंतिणीही तशाच अर्थाचीं गायनें ह्मणून नाचत; खुद मशीरउल्मुलुख भर दरबारामध्यें एकदा असें ह्मणाला कीं, " इतःपर निजाम मराठ्यांच्या तगाद्यापासून मुक्त झाले; ते आतां खानदेश व विजापूर हीं त्यांजपासून परत घेतील; तें कार्य न साधलें, तर पेशव्यांचें सर्वस्व घेऊन, त्यांस लंगोटी लावून, एक भोंपळा पाणी पिण्यास त्यांचे हातीं देऊन, त्यांस स्नानसंध्या करावयाकरितां काशीस लावून दिल्यावांचून सल्ला व्हावयाचा नाहीं." परंतु, बोलेल तो करील काय आणि गाजेल तो पडेल काय, ह्या ह्मणीप्रमाणें ह्या बडबडीचा परिणाम झाला.

हें निजामअल्लीकडील वर्तमान नानांस कळतांच, त्यांनीं आपल्या लष्कराची तयारी चालविली. दौलतराव शिंदा व तुकोजी होळकर हे तर आपल्या फौजांसुद्धां पुण्यांत होतेच. त्यांखेरीज गोविंदराव गायकवाड, नागपुरकर रघोजी भोसला, पटवर्धन, रास्ते, विंचूरकर, मालेगांवकर, पंतप्रतिनिधि, पंतसचीव, निंबाळकर, घाटगे, चव्हाण, डफळे, पवार, थोरात, फळटणकर, इत्यादिकांस पेशव्यांचें बोलावणें गेलें. ते सर्व आपआपलीं सैन्यें बरोबर घेऊन पुण्यांत प्राप्त झाले. अशी मराठ्यांकडील तयारी होत आहे तों, त्याच्या पूर्वीच निजामअल्लीचें सैन्य छावणी सोडून बाहेर निघालें.

निजाम आपल्या सैन्यासहवर्तमान बेदराहून निघाला, आणि त्यानें आपले स्वारीचा रोख मांजरा नदीच्या तीरानें हळू हळू मराठ्यांच्या मुलुखाकडे धरिला. त्याच्या धोरणानें इ० स० १७९५ च्या जानेवारी महिन्यांत

पेशव्यांचें लष्कर पुणें सोडून निजामाशीं लढण्यास चाललें. तें, १०००० पेंढाऱ्यांसुद्धां झटलें झणजे, १४०००० होतें. ह्या सैन्याची सर्व मुखत्यारी, सर्वानुमतें, परशरामपंतभाऊ पटवर्धन ह्यांस मिळाली. त्यांनीं मुलुखाची दाणादाण करण्याकरितां पेंढाऱ्यांस ताबडतोब पुढें पाठविलें; आणि आपण १५० तोफा बरोबर घेऊन बाकीच्या लष्करासहवर्तमान निजामाच्या फौजेवर चालले. ती फौज सुमारें ११०००० होती.

निजामाची फौज मोरघाटांत असतां, हरिपंत फडक्याचा पुत्र, बापूराव, ह्यानें तिजवर चाल केली. परंतु तींत त्याचाच थोडासा नाश होऊन त्याला मागें हटावें लागलें. ही गोष्ट मार्च महिन्याच्या ११ व्या तारखेस घडली; तेव्हां निजामास अत्यानंद होऊन, त्यानें दरबार भरून विजयाचे नजराणे घेतले. स्वारी दुसरे दिवशीं खरड्यास आली; आणि पुढें पारेंड्याकडे जावयास निघणार, इतक्यांत तेथें मराठ्यांची फौज जमून राहिलेली त्यांच्या दृष्टीस पडली. तेव्हां निजामअल्लीनें आपला हत्ती तेथेंच उभा करून, आधीं आपल्या लष्कराचें बुणगें एका बाजूस केलें, आणि सादतखाननामक सरदारास १७००० पलटणी लोक बरोबर देऊन, मराठ्यांवर हल्ला करण्यास नेमिलें; या वेळीं परशुरामपंतभाऊंनीं आपल्या सैन्याचा बंदोबस्त केला. तो असा. पेशवे व होळकर यांचीं सैन्यें एकत्र करून, त्यांच्या मध्यें आपण उभे राहिले; उजवीकडे रघूजी भोंसल्याचें लष्कर ठेविलें; आणि डावे बाजूस दौलतराव शिंदा लढाऊ लोकांसहवर्तमान उभा केला. नंतर बापूराव फडका, व तुकोजीचा पुत्र काशीराव होळकर हे दोघे, बरोबर कांहीं लोक घेऊन, शत्रूचा पुढें येण्याचा झोंक कोणीकडे आहे, तो पहावयास निघाले. इकडे, निजामाकडच्या लालखाननामक सरदारानें परशुरामपंतभाऊवर हल्ला करून, मोठ्या शौर्यानें त्याचे पुष्कळ लोक मारिले. व खुद त्यालाही जखमी करून, घोड्यावरून खालीं पाडिलें. हें कृत्य परशुरामपंताचा ज्येष्ठ पुत्र हरिपंत पटवर्धन ह्यानें पाहिलें; त्याच क्षणीं तो आपल्या पित्याच्या रक्षणार्थ वाघासारखा धांवून आला, आणि त्यानें चपाट्यासरसा लालखानाचा प्राण घेतला. ह्याचें नांव पुत्रधर्म.! लालखान मेला तरी त्याचे लोक मराठ्यांस कापून काढण्याचें क्रूर कर्म सोडीनात. तेव्हां ते बिचारे पळत सुटले. त्यांजबरोबर बापूराव फडकाही जरीपटका घेऊन पळाला. दौलतराव शिंद्याचा मोठा सरदार जिऊबा बक्षी हा घोड्यावर

बसून त्याजपाशीं गेला, आणि त्याला शिव्या देऊन ह्मणाला, "अरे भित्र्या, जर तुला निर्भय जागा पाहिजे, तर शिंद्याच्या लष्कराच्या पाठींमागें जाऊन स्वस्थ रहा." तेव्हां बापूराव धैर्य धरून तेथेंच उभा राहिला.

इतक्यांत दोन्ही लष्करें गोळीच्या टप्प्यांत आलीं, आणि त्यांची चकमक झडूं लागली. शिंद्याच्या लष्करांत पेरोन नामा कोणी फ्रेंच सरदार होता, त्यानें ३६ तोफा जवळच्या टेंकडीवर चढवून, तेथून निजामाच्या सैन्यावर गोळ्यांचा भडिमार चालविला. तो निजामाच्या लोकांस सोसेना, ह्मणून ते आपला जीव घेऊन पळूं लागले. आणखी निजामाची आवडती बायको ह्या प्रसंगीं बरोबर होती; ती इतकी भयभीत झाली कीं, "ही तोफांची गर्जना कानीं न पडे इतके दूर मला घेऊन लवकर चला, नाहींतर, मी सगळा गोषा टाकून, सर्व लोकांच्या दृष्टीस पडून येथून निघून जाईन," असें तिनें त्यास सांगितलें. तेव्हां निजामानें बाकीच्या सर्व फौजेस मागें परतण्याचा हुकूम केला. तेणेंकरून तर फारच पळापळ सुटली. इतक्यांत सूर्य मावळला; अंधार पडला; तरी उभय पक्षांकडील लोक जागचे जागीं राहून एकमेकांवर बार काढीतच होते. असें होतां होतां ते दमले, तेव्हां तेथेंच स्तब्ध राहिले. नंतर मराठ्यांचे दहा बारा स्वार आपल्या घोड्यांस पाणी पाजण्याकरितां दैववशात् एका झऱ्यावर गेले. तेथें जवळच कोठें निजामाचे फौजेची टोळी पडली होती, तिजमधील लोकांनीं घोड्यांच्या टापा ऐकिल्या. तेव्हां त्यांस वाटलें कीं, शत्रु आले. ह्मणून त्यांनीं बार काढिले. ते ऐकून निजामाच्या सगळ्या लष्करांत एकच धांदल होऊन, जिकडे तिकडे आवाज सुटूं लागले. झालें आहे काय, हें कोणाला कांहीं कळेना. सगळे घाबरले. आणि जो तो आपला जीव घेऊन पळत सुटला. तेव्हां जी गर्दी झाली, ती पूर्वीच्या गर्दीपेक्षां अधिक झाली. इतक्यांत चंद्र प्रकाशला. तेव्हां निजामअल्लीस असें दिसून आलें कीं, आपल्या सगळ्या सैन्याची दुर्दशा झाली आहे; ह्मणून तो स्वतः खरड्याच्या लहानशा किल्ल्यांत जाऊन राहिला.

निजाम किल्ल्यांत आहे, असें समजतांच, मराठ्यांनीं त्यास वेढा घातला. आंतल्या लोकांनीं दोन दिवस पर्यंत टिकाव धरिला. परंतु पुढें त्यांचे उपाय थकले. तेव्हां निजामअल्लीनें बाहेरच्या लोकांशीं तहाचें बोलणें तारीख १५ मार्च रोजीं लाविलें. तेव्हां मराठ्यांनीं प्रथम सांगून पाठविलें कीं, तुमचे

वल्गना करणारे शहाणे दिवाण, मश्शीरउल्मुलुख ह्यांस आधीं आमचे स्वाधीन करा, आणि मग कायती तहाची बात बोला. ह्यें मागणें तहांतील सगळ्या कलमांपेक्षां निजामअल्लीस भारी जड गेलें; व तें टाळण्यासाठीं त्यानें आढेवेढेही पुष्कळ घेतले; परंतु मराठे कांहीं ऐकेनात. तेव्हां तो वाचाळ दिवाण त्यास त्यांचे हवालीं करणें भाग पडलें.

मश्शीरउल्मुलुख इकडे आला, तेव्हां श्रीमंत त्यास मोठ्या आदरसत्कारानें भेटले. परंतु त्या प्रसंगीं त्यांचें मुख कांहींसें म्लान झालें. तें पाहून नानाफडनविसानें पेशव्यांस विचारिलें कीं, हा उत्साहसमय असून, आपणांस त्याचे भेटीविषयीं श्रम कां झाले.? त्यावर त्यांनीं उत्तर दिलें कीं, "मोंगलांनीं भितरेपणानें आपली एवढी अमर्यादा करून घेतली; आणि आमचे लोक यत्न न करितां जय पावले, असें असतां, ते आपणांस विजयी असें मानितात, त्यापक्षीं दोहोंकडचेही पुरुष अप्रयोजक आहेत असें पाहून माझें मन फार खिन्न झालें." हें माधवरावसाहेबांचें उत्तर अगदीं बरोबर आहे. कारण, दोहोंकडे सुमारें सवसव्वा लाख फौज होती. तरी लढाई म्हणण्यासारिखी एक देखील झाली नाहीं, व दोहोंकडचे मिळून दोनशांहून अधिक लोक पडले नाहींत; असें असून, आपले विजयाचा झेंडा मराठे लोक उगाच मिरवितात, तो बरोबर नाहीं. त्यांस जय प्राप्त झाला, हें त्यांच्या युद्धचातुर्याचें किंवा कुशलतेचें फळ नव्हे; तर शत्रूच्या मूर्खपणाचें, अव्यवस्थेचें, व घाबरेपणाचें फळ होय. एकाचें मूर्खपण दुसऱ्याच्या फायद्यास कारणीभूत कसें होतें तें पहा.!

अहल्याबाई होळकरीण.

इ० स० १८००.

ह्या हिंदुस्थानामध्यें जीं थोर मनुष्यें पूर्वी होऊन गेलीं, त्यांमध्यें ह्या बाईची गणना आहे. मल्हारराव होळकराचा मुलगा खंडेराव, ह्याची अहल्याबाई ही बायको होय. ती सुमारें एकवीस वर्षांची असतां तिचा नवरा निवर्तला. तिला मालीराव म्हणून एक व्राय मुलगा होता. तो एका भां-

ज्यांत कांहीं द्रव्य व विंचू घालून, लोभी गरीब ब्राह्मणांस आंतील द्रव्य घ्यावयास सांगे. त्यांनीं आंत हात घातला ह्मणजे त्यांस विंचू नांगी मारी. आणि त्यामुळें त्यांस वेदना होऊं लागल्या ह्मणजे, तो दुष्ट पोर-त्यांची मौज पाही. अहल्याबाई तर ब्राह्मणांस अतिशयित पूज्य मानीत असे. ती आपल्या मुलास त्याच्या कर्मावरून राक्षस ह्मणे. हा मुलगा फार दिवस वांचला नाहीं.

एके वेळीं असें झालें कीं, मालीरावाच्या बायकोस दत्तक पुत्र देण्याच्या कामीं अभिमानीं पडून, राघोबादादा पेशव्यानें अहल्याबाईवर स्वारी करण्याचा निश्चय केला. हें तिला समजलें. परंतु, ती मोठी धिराची व निश्चयाची बायको पडली; तिनें न घाबरतां राघोबादादास असें सांगून पाठविलें कीं, "आपण मजवर चालून येण्यापूर्वीं पुरता विचार करावा; स्वारी करून आपण माझा पराभव केला, तर त्याविषयीं मला कांहीं वाईट वाटावयाचें नाहीं; कारण, मी बोलून चालून बायको आहें; आणि स्त्रीचा पराभव करण्यांत आपणांसारिख्या शूर सरदारांस मोठें भूषण आहे, असें नाहीं; परंतु, दैववशात् जर माझे सैनेनें आपला मोड केला, तर मात्र जनांत काय ह्मणतील, ह्याचा विचार करा." हें उत्तर ऐकून राघोबानें स्वारीचा बेत रहित केला.

अहल्याबाई आपल्या रयतेपासून वसूल नेमस्त घेई, व वतनदारांच्या हक्कांस फार जपत असे. लोकांच्या फिर्यादी स्वत: ऐके. निवाडा करण्याचें काम तिनें पंचांकडे सोंपविलें होतें. तिची गांठ घेण्यास कोणालाही आडकाठी नसे. न्याय करणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे, अन्याय केला तर आपणास पाप लागेल, असें ती पक्कें समजत असे, आणि त्याप्रमाणें नित्य वागत असे.

राज्यकारभाराचें काम आटपून जो वेळ सांपडे, तो ती साध्वी ईश्वरभजनांत व पुण्यकर्मांत घालवी. ती वारंवार ह्मणे कीं, मी अधिकाराच्या बळानें जें कृत्य करितें, त्याचा हिशेब मला देवापुढें दिला पाहिजे. कोणा अपराध्यास देहान्त शासन करण्याविषयीं तिच्या मंत्र्यांनीं तिला सांगितलें, तर ती त्यांस उत्तर देई कीं, "बाबांनो, आपण स्वत: मनुष्यें आहों; आपणांस मरावयाचें आहे; तेव्हां ईश्वरानें घडलेल्या प्राणांचा जीव आपण एकाएकीं कसा घ्यावा बरें?"

अहल्याबाई पहांटेच्या दोन घटिका रात्रीं उठून नामस्मरण करी. नंतर स्नान करून देवधर्म करी. मग पुराण ऐकावयास बसे. त्यानंतर ती ब्राह्मणांस नित्यदानें व शिधे देई. इतकें आटोपल्यावर तिनें भोजन करावें.

ती जातीची शूद्र होती, तरी ती मद्यमांसाचें सेवन करीत नसे. जेवण झाल्यावर कांहीं स्तोत्रें म्हणून, ती थोडा वेळ निजे. नंतर उठून पोषाक करून ती कचेरीस जाई. तेथें ती सूर्यास्तापर्यंत कामकाज पाहात बसत असे. नंतर प्रहर रात्र होई तोंपर्यंत ती आपला संध्याकाळचा देवदेव व फराळ हीं कामें आटोपी; आणि पुनः कारभार पाहावयास लागे; ती सुमारें मध्यरात्रीपर्यंत तिकडे गुंतलेली असे. नंतर निजावयास जाई. ह्याप्रमाणें तिनें तीस वर्षें घालविलीं. ती उपास, व्रतें, देवाचे उत्साह, इत्यादि अनेक पुण्यकर्में करी. तिच्या दरबारांत गोविंदपंत गानू म्हणून एक चांगला शाहाणा व प्रामाणिक कारभारी होता.

इंदूर हें मूळचें लहान खेडें होतें, त्याचें अहल्याबाईनें मोठें शहर केलें. ह्या शहरावर तिची फार कृपा असे. त्यांतील लोकांवर ती पोटच्या मुलाप्रमाणें माया करी. त्या शहरांतला कोणी देवीचंद म्हणून श्रीमान् सावकार मरण पावला. तेव्हां त्याच्या संपत्तीचा कांहीं अंश, अहल्याबाईचा मानिलेला पुत्र तुकोजी, ह्यानें आपणांकडे घेण्याचा यत्न चालविला. हें वर्तमान त्या सावकाराच्या बायकोनें महेश्वरीं जाऊन अहल्याबाईस कळविलें. तेव्हां तीस दया येऊन तिनें तुकोजीस सांगून पाठविलें कीं, "आमच्या शहरच्या लोकांच्या दौलतीवर तुह्मीं कधींही डोळा ठेवूं नये."

अहल्याबाईवर एकामागून एक असे दुःखाचे पर्वत कोसळले. तिचा भ्रतार लहानपणींच वारला. पुढें दोन वर्षांनीं तिला पुत्रशोक झाला, हें मागें सांगितलेंच आहे. तिला मंचाबाई म्हणून एक मुलगी होती. तिला एक पुत्र झाल्यावर तिचा नवरा कैलासवासी झाला. तेव्हां मंचाबाई सती जाण्यास निघाली. तिला, तूं सती जाऊं नको, असा अहल्याबाईनें पुष्कळ आग्रह केला. परंतु, ती कांहीं एक ऐकेना. शेवटीं तिनें पतिसहगमन केलें. तेणेंकरून अहल्याबाईस अतिशयित दुःख झालें.

अहल्याबाई साठ वर्षांची होऊन मरण पावली. ती फार उंच नव्हती व फार ठेंगणीही नव्हती. शरीरानें ती सडपातळ असे. ती म्हणण्यासारखी सुंदर नव्हती. तरी तिची मुखचर्या फार तेजःपुंज दिसे. ती पोषाक अगदीं साधा करी. एकदां रागावली, म्हणजे तिजपुढें कोणाच्यानें एक शब्द सुद्धां बोलवत नसे. नवरा मेल्यापासून ती पांढरीं वस्त्रें नेसे. रंगाचें पांघरूण तिनें तेव्हांपासून अगदीं वर्जिलें होतें. ती संस्कृत पुराणें वाची, व त्यांचा तिला

अर्थ चांगला कळत असे. तिची कोणी स्तुति केली, तर ती तिला अगदीं आवडत नसे. तारुण्याची भरज्वानी, अमर्याद ऐश्वर्य व सत्ता.ह्या गोष्टी अनुकूल असून, नवरा गत झाला असतांही तिचें पातिव्रत्य तिळभर चळलें नाहीं; अशी जी पुण्यवान् सती अहल्याबाई होळकरीण, तिची जितकी स्तुति करावी, तितकी थोडीच वाटते.

काशीहून परत येतांना कवि मोरोपंत पंडित हे चोळीमहेश्वरास गेले, आणि त्यांनीं तेथें अहल्याबाईची भेट घेऊन, तिजविषयीं पांच साहा आर्या केल्या. त्या ह्या:—

आर्या.

श्री हरिहरभक्ता तूं, देवि[1] अहल्ये वरा[2] धराभूषा[3],
पूषा[4] तुज साधु म्हणे, ख्याता तुजसम न बाणतनुभूषा[5]. १.
देवि अहल्याबाई, झालीस जगत्त्रयांत तूं धन्या,
न न्याय-धर्म निरता, अन्या कलिमाजि ऐकिली कन्या. २.
जाणे धर्म करीना, त्या स्तविती कोण पंडितंमन्य[6],
न न्याय-धर्म-निरता, अन्या कलिमाजि ऐकिली कन्या. ३.
धर्मार्थ गोत्रैंजन्या, किंवा झालीस तूं धराजन्यी[7],
तुज देवि भेटली जी, सत्कीर्ति कधींच हेत राजन्यी[8]. ४.
न त्यजिसि नर्मदेतें, देवि तुझी ती बहु प्रियी[9] आली,
गंगेचीहि सखी हे, कीं उभय मनांत सक्रिया आली. ५.
श्री विष्णुपदा स्तविली, त्वद्भक्ता हें तुलाहि मानावें,
विश्व जिला वानितसे, कां न मयूरेंहि तीस वानावें. ६.

आधीं दुनयेमध्यें चांगलीं माणसें थोडीं निपजतात; त्यांत राजेरजवाड्यांच्या कुळांत तर फारच कमी. इतिहासाकडे पाहावें तों, क्रूर, दुष्ट, दुराचारी, मत्सरी, लोभी, अशा पुरुषांच्या झुंडींच्या झुंडी दृष्टीस पडतात. समुद्राच्या काळ्या रेतीच्या अफाट मैदानामध्यें जशीं पांच चार मोतें मध्यें चमकावीं, तशीं चांगलीं व थोर माणसें ह्या पृथ्वीमध्यें क्वचित आढळतात. त्यांपैकीं हें

---

१ राणी. २ श्रेष्ठ. ३ भूषण. ४ सूर्य. ५ बाण—तनु—भू—उषा—बाणासुराची कन्या उषा. ६ जो आपणास महा विद्वान समजतो तो. ७ पर्वत कन्या—पार्वती. ८ भू कन्या—सीता. ९ राजाला. १० सखी.

एक मोतीं परमेश्वराच्या कृपेनें आमच्या हिंदुस्थान देशांत पैदा झालें होतें, व त्याच्या नांवानें आमच्या देशाच्या इतिहासास शोभा आली आहे, हें पाहून, कोणाही स्वदेशाभिमानी पुरुषास अत्यानंद झाल्यावांचून राहाणार नाहीं.

आसईची लढाई.

इ० स० १८०३.

बाजीराव पेशव्याच्या गोष्टींत आह्मीं वसईचा तह सांगितला आहे. तो वाचणाऱ्यांच्या लक्षांत असेलच. आणि तो त्यानें निरूपायास्तव केला होता, हेंही सर्वांस ठाऊक आहे. शिंदा ह्यास तर तो तह अगदीं आवडला नाहीं. असें असतांही, पेशव्यांप्रमाणें तुमचा आमचा तह असावा, अशा मजकुराचें पत्र गवरनर जनरलानें त्यास पाठविलें. याचें उत्तर त्यानें नीटसें दिलें नाहीं. आणि कालिन्ससाहेबापाशीं त्यानें असें सांगितलें कीं, सालप्याच्या तहाच्या वेळीं जसें आमचें मत घेतलें होतें, तसें ह्या वसईच्या तहाचे वेळीं आह्मांस नुसतें कोणीं विचारिलें सुद्धां नाहीं, त्यापक्षीं आह्मी तूर्त कांहींच कबूल करीत नाहीं; पुढचें पुढें पाहून घेऊं. ह्या टाळाटाळीचें वास्तविक गुप्त कारण असें होतें कीं, इंग्लिशांशीं युद्ध करण्याचे कामीं तुह्मी आह्मांस मदत देतां किंवा नाहीं, असें विचारण्याकरितां त्यानें एक वकील वऱ्हाडचा राजा, रघोजी भोंसला, ह्याजकडे पाठविला होता; तिकडचें कांहींच वर्तमान त्यास कळलें नव्हतें; त्याचा निकाल समजे तोंपर्यंत, कशाही रीतीनें, उघड वैर उत्पन्न न करितां, दिवस घालवावे.

पुढें लवकरच दौलतराव शिंदा ह्यास रघोजी भोंसल्याकडून रुकाराचा जबाब आला. ते दोघे एक झाले. होळकरालाही त्यांनीं आपले कटांत येण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला. त्यानें त्यांस प्रथम कांहींच साफ न सांगतां, थोडीशी लाडीगोडी लावून, त्यांजकडून माळवा प्रांतांतली जप्त झालेली आपली जाहागीर सोडवून घेतली. व पेशव्यांचे दरबारीं खंडेराव होळकर ह्मणून त्याचा एक पुतण्या कैदेंत होता, त्यास मुक्त करविलें. आणि शेवटीं त्यांच्या कटांत न मिळण्याची भलतीच सबब सांगून, तो माळव्यांत निघून गेला.

तेव्हां त्याविषयीं निराश होऊन, शिंदा व भोंसला ह्या दोघांनींच इंग्लिशांशीं लढण्याची तयारी केली. तथापि हें सर्व गुप्तपणें चाललें होतें.

शिंद्याचा इरादा खरोखर कांय आहे, तो समजून घ्यावा, ह्मणून, त्याचे दरबारचा इंग्लिश रेसिदेंत कोलिन्ससाहेब हा, मे महिन्याच्या २७ व्या तारखेस दौलतरावशिंद्याच्या मुलाखतीस गेला. त्यानें त्याचें चांगलें आगतस्वागत केलें. इकडच्या तिकडच्या गोष्टी चालल्या असतां वसईच्या तहाचे संबंधानें कांहीं बोलणें निघालें. तो तह त्या साहेबापाशीं होताच; तो त्यानें शिंद्यास कलमवार वाचून दाखविला, आणि त्याला असें जाणविलें कीं, ह्यांत तुमचें कांहीं अहित आहे असें मला वाटत नाहीं. पण, आपला हेतु काय आहे, असें जेव्हां ह्यानें शिंद्यास स्पष्ट विचारिलें, तेव्हां त्यानें ती गोष्ट भलत्याच कलावर नेऊन कोलिन्ससाहेबास शेवटीं असें सांगितलें कीं, "वऱ्हाडचा राजा रघोजी भोंसला ह्याची व आमची भेट झाल्यावर, तुह्मांला लढाई किंवा तह, ह्यांतलें कोणतें तें एक सांगू; तेथपर्यंत आह्मी कांहींएक खुलासा करीत नाहीं." हें उत्तर उघड वैरसूचक आहे, असें इंग्लिश सरकारानें मानिलें. आणि उभयपक्षांची लढाईची तयारी चालली.

शिंदा व भोंसला ह्या दोघांचीं सैन्यें निजामाच्या राज्याच्या मर्यादेसमीप एकमेकांजवळ येऊन राहिलीं. हें वर्तमान इंग्लिशांच्या गवरनर जनरल साहेबास समजलें. तेव्हां त्यानें उभयतांस विचारिलें कीं, तुमच्या मनांत काय आहे, तें स्पष्ट सांगा. त्यांनीं कालहरणार्थ असें उत्तर दिलें कीं, आमचे मनांत तुमचेविषयीं कांहीं वाईट नाहीं; आह्मी उगाच स्वस्थ राहिलों आहों. तेव्हां, इंग्लिश सैन्याचा मुख्य सरदार जनरल वेल्सली, ह्यानें त्यांस आणखी उलट असें विचारिलें कीं, तुह्मी ह्मणतां हें सत्य असेल, तर तुह्मीं आपआपलीं सैन्यें घेऊन येथून निघून आपआपल्या मुलुखांत जा, ह्मणजे आह्मी आपली फौजही माघारी नेतों. ह्या गोष्टीचा विचार बरेच दिवस केल्यावर, त्यांनीं साफ उत्तर दिलें कीं, " आह्मी आपल्या राज्याच्या हद्दींत आहों, तेथें पाहिजे तितके दिवस राहूं. आह्मी अजिंटा घाट ओलांडून येणार नाहीं." असें वर्तमान, तारिख २५ जुलै, इ० स० १८०३ रोजीं घडलें. आणि मग उघड वैर दृष्टोत्पत्तीस आल्याबरोबर, आगस्ताच्या तिसऱ्या तारखेस रेसिदेंत कोलिन्स साहेब हा शिंद्याच्या दरबारांतून निघून गेला.

इंग्लिशांनीं युद्धाची तयारी केली, ती अशी. सांजपाशीं एकंदर सुमारें ५०००० फौज तयार होती. तिजपैकीं साडेसाहाहजार लोक हिंदुस्थानांत होते, त्यांचें आधिपत्य जनरल लेकसाहेब ह्यास दिलें. बाकीची फौज दक्षिणेंत व गुजराथेंत होती, तिजवर मुख्य अधिकारी जनरल वेल्सली साहेब ह्यास नेमिलें. त्यानें ७५०० लोक गुजराथेंत ठेविले; कांहीं पुण्याच्या व हैदराबादेच्या बंदोबस्तास पाठविले; एका टोळीस कृष्णा व तुंगभद्रा ह्यांच्या मध्यप्रदेशीं राहाण्यास हुकूम दिला; आणि १७००० लोक आपणाबरोबर फिरते घेतले.

तारीख ९ माहे आगस्त रोजीं वेल्सली साहेबानें मोठ्या पराक्रमेंकरून अहमदनगर आणि त्याच्या भोंवतालचा कांहीं प्रांत घेतला. नंतर तो औरंगाबादेस गेला. इतक्यांत मराठ्यांचें लष्कर अजिंठ्याच्या घाटानें जाऊन जालन्यास उतरलें. वेल्सली साहेब गोदावरी नदीकडे चालला. तें ऐकून मराठ्यांनीं उत्तरेचा मार्ग धरिला. त्यांचें ३०००० पायदळ, ५०००० स्वार, आणि १०० तोफा इतकें सैन्य खेळणानदीच्या पलीकडच्या कांठीं जुवानदीचे संगमाजवळ उतरलें होतें, तें त्या साहेबाच्या समजण्यांत आलें, व दृष्टीसही पडलें. तेथें त्या लष्कराचे बाजूस आसई नामें भुयकोटाचा गांव त्यानें पाहिला. त्या स्थळीं युद्ध जुंपलें. प्रथमतः, शिंदे भोंसल्यांचा तोफखाना हस्तगत करून घ्यावा, ह्मणून त्याजवर वेल्सली साहेबानें हल्ला केला. परंतु हा यत्न सफल झाला नाहीं. मराठ्यांच्या सैन्यानें तोफांचा भडिमार करून त्यास मागें हटविलें. नंतर इंग्लिशांकडच्या गोरे घोडेस्वारांनीं आपल्या शत्रूंवर चाल केली. तेव्हां मात्र ते मराठे निरुपाय होऊन दोन पावलें मागें सरले. इंग्लिशांचे स्वार आणखी पुढें सरले, तेव्हां शिंदे व भोंसले ह्यांच्या सैन्यांत सगळा घोंटाळा होऊन गेला. आणि ते लोक भयभीत होऊन, पळत पळत जुवानदी उतरून पार निघून गेले. ही गोष्ट तारीख २३ सप्तंबर रोजीं घडली. ही लढाई तीन तासपर्यंत चालली होती.

रघोजी भोंसला तर युद्धारंभींच पळून गेला होता. आणि पुढें थोड्या वेळानें शिंद्यानेंही त्याचाच कित्ता वळविला. त्यांजकडील एकंदर १२०० लोक मेले, व पुष्कळ जखमी झाले. शिवाय, शिंद्याचा प्रधान यादवराव भास्कर हाही मारला गेला. त्यांच्या ९८ तोफा इंग्लिशांचे हातीं लागल्या. इंग्लिशांकडचे मेले आणि जखमी झाले ह्यांची एकंदर गणती

१५६६ झाली. कर्नल माक्सवेल हा त्यांचा सरदार पतन पावला. ह्या युद्धांत एक विशेष प्रकार घडून आला. तो असा कीं, आपणांजवळ इंग्रिलश लोक येऊन भिडले, असें पाहातांच, मराठ्यांनीं आपलीं अंगें भूमीवर वेडीं वांकडीं टाकून, अगदीं मेल्याचें सोंग घेऊन, त्यांस आपल्यावरून पुढें जाऊं दिलें; आणि मग एकाएकीं उठून, त्यांजवर तोफांचा भडिमार सुरू केला.

असा प्रकार आसई मुकामीं घडून आला. तिकडे, ह्मणजे हिंदुस्थानांत, लेकसाहेबानें आक्तोबर महिन्यांत आग्रा शहर घेतलें. तेथें किल्ल्यामध्यें २२२०० रुपये किमतीचा खजीना त्यास सांपडला. शिवाय १६४ तोफा त्याचे हातीं लागल्या. त्यांत ७६ तोफा पितळेच्या होत्या. त्यांपैकीं एक तर एवढी सुरेख व विशाळ होती कीं, तिचे सारखी तोफ कोठें दुनयेंतही नसेल. तिची लांबी १४ फूट २ इंच; तोंडाची रुंदी २३ इंच; आणि तींत घालावयाचा लोंखडाचा गोळा १५०० पौंड वजनाचा असे. तिचें वजन ९६६०० पौंड होतें. ती पितळेची होती असें ह्मणत, तरी तिजमध्यें सोन्या रुप्याचें मिश्रण आहे, असें लोक समजत. सराफ लोक, ती १२०००० रुपयांस घेण्यास सिद्ध झाले होते. त्यांचा आशय असा कीं, ती गाळिली तर आपणांस दोन पैसे राहतील. लेकसाहेबाच्या मनांत ती कलकत्त्यास नेऊन, तेथून विलायतेस पाठवावी, असें होतें. व त्याप्रमाणें ती ताफ्यावर घालून, तिकडे चालविली देखील; पण ती अतिशयित जड असल्या कारणानें ताफा मोडून नदींत पडली, आणि बुडाली.

आसईची लढाई होण्यापूर्वी शिंदे व भोंसले ह्यांनीं इंग्रिलशांस जें उत्तर दिलें ह्मणून वर लिहिलें, त्यावरून त्या वेळीं त्या दोन्ही पक्षांचें सामर्थ्य किती होतें, व त्यांचीं मनें एकमेकांविषयीं कशीं होतीं, तें स्पष्ट दिसून येतें. दुसरी गोष्ट आह्मीं आग्र्याच्या तोफे विषयीं लिहिली आहे. ती तोफ, हिंदुस्थानांतल्या प्राचीन कारागिरीचा मासला होय. आणि ह्मणूनच आह्मीं तिच्या वर्णनास येथें जागा दिली. आतां, तोफ नाहींशी झाली, ही मोठी दुःखाची गोष्ट होय. आलीकडे पुष्कळ देश कलाकौशल्यांत व शिल्पविद्येंत निष्णात झाले आहेत, ही गोष्ट आह्मांस संमत नाहीं, असें नाहीं; परंतु ह्या तोफेसारख्या पदार्थांवरून, हिंदुस्थानही त्या विषयांत पूर्वीं चांगलें प्रवीण होतें, असें सिद्ध होतें; तें येथें उघड सांगितल्यावांचून आमच्यानें राहावत नाहीं.

लक्ष्मणदेव ह्याची गोष्ट.

इ० स० १८०७.

लार्ड मिंतो साहेब, इ० स० १८०७ च्या जुलै महिन्यांत कलकत्ता येथें गवरनर जनरल होऊन आला. त्या वेळापूर्वी परराज्याच्या व्यवस्थेंत हात घालावयाचा नाहीं, अशा निश्चयानें हिंदुस्थानांतील इंग्लिश सरकार चाललें होतें. परंतु मिंतो साहेब काम पाहूं लागला तेव्हां, बुंदेलखंडांतील अशी झोटिंगबादशाही त्याचे समजण्यांत आली कीं, ती त्याच्यानें ऐकवेना सुद्धां. बळी तो कानपिळी, असा न्याय तेथें चालला होता. त्या वेळीं गवरनर जनरलानें असा विचार मनांत आणिला कीं, ज्या गोष्टीचें निवारण सामदामानें होऊं शकत नाहीं, तिचा बंदोबस्त दंडभेदानें करणें भाग आहे. बुंदेलखंडाच्या राज्यव्यवस्थेंत इतके दिवस इंग्लिश सरकारानें हात घातला नाहीं, ह्याचा हेतु एवढाच कीं, त्यांतील सर्व संस्थानिकांनीं एकमतानें राहून, एकमेकांचें हित पाहावें, आणि तेणेंकरून रयतेचें कल्याण व्हावें. परंतु हा विचार सिद्धीस जाण्याचें एकीकडेसच राहिलें, आणि त्यांतील राजे एकमेकांशीं भांडूं लागले; तेणेंकरून त्यांच्या प्रजांना इतकें दुःख होऊं लागलें कीं, त्यापेक्षां मरण बरें. तें मिंतोसाहेबास पाहवेना. ती बेबंदी त्यानें मोडून टाकण्याचा निश्चय केला; आणि तो कोणत्या प्रकारें सिद्धीस जाईल, ह्याचा विचार तो करूं लागला.

त्या प्रांतांतले मुख्य मुख्य किल्ले, जे तेथील पुंड जबरदस्तांच्या हातीं आहेत, ते आपले स्वाधीन झाल्याखेरीज, ही अव्यवस्था मोडणार नाहीं, असें मिंतो साहेबास वाटलें. आणि त्याप्रमाणें करण्याविषयीं त्यानें आपले सेनापतीस हुकूम केला. अजगड ह्मणून एक मोठा बळकट किल्ला त्या देशांत आहे, तो तेव्हां लक्ष्मणदेव नामक लुटारू दंगेखोराच्या ताब्यांत होता. वास्तविक ह्मटलें असतां कोणत्याही संबंधानें त्याची त्याजवर मालकी नव्हती. तथापि तो देश जिंकून इंग्लिशांनीं आपणाकडे घेतला, तेव्हां लक्ष्मणदेव ह्यानें दरसाल थोडीशी खंडणी देऊन आपले ताब्यांतल्या मुलुखाचा उपभोग निरंतर घ्यावा, व तेवढा किल्ला मात्र, इ० स० १८०८ च्या अखेरीस इंग्लिशांचे हवालीं करावा, असें ठरलें. ह्या गोष्टीस बरेच दिवस लोटले. तरी लक्ष्मणदेव ह्यानें खंडणी-

चा पैसा दिला नाहीं, व किल्लाही सोडिला नाहीं. तेव्हां त्यावर, बरोबर सैन्य देऊन कर्नल मार्तिंदेल ह्यास पाठविलें. लक्ष्मणदेवानेंही आपला बचाव करण्याचे कामीं सगळें बंळ खर्चिलें. पण उपयोग काय? त्याला शेवटीं किल्ल्यासहवर्तमान इंग्लिशांचे स्वाधीन व्हावें लागलें. मग, इमानाविषयीं आणाशपथा वाहून त्यास मोकळें सोडिलें, व त्याच्या कुटुंबांच्या मार्णसांस नवाशहर येथें नेऊन ठेविलें. इंग्लिश लोक मला पुनः गादीवर बसवितील, अशी कांहीं आशा लक्ष्मणदेवास होती; ह्मणून त्यानें त्याविषयीं, इंग्लिश एजंत रिचर्डसन साहेब, ह्याजकडे अर्ज केला. त्यांत त्यानें असें स्पष्ट लिहिलें होतें कीं, "माझें संस्थान मला परत द्या, किंवा मला तोफेच्या तोंडीं देऊन माझा प्राण घ्या. कारण कीं, प्रतिष्ठेवांचून जिणें व्यर्थ आहे." त्याजवर नन्नाच्या पाढ्याचा जबाब मिळाला. तेव्हां लक्ष्मणदेव तेथून जो नाहींसा झाला, त्याचा कितीएक दिवसपर्यंत बिलकूल पत्ता लागला नाहीं. पण पुढें तो लवकरच जातीनें कलकत्ता येथें गवरनर जनरल साहेबांचे भेटीकरितां आला. आणि त्यानें आपला सगळा मजकूर गवरनर जनरलाचे कानावर घातला. तरी तेथेंही ननाची बाराखडी ऐकून त्याला चूप बसावें लागलें. नंतर त्यानें स्वदेशाची वाट धरिली: तेव्हां, हा बुंदेलखंडांत गेला असतां दंगा करील, असा गवरनर जनरलास संशय प्राप्त होऊन, त्यानें त्यास अर्ध्या मार्गावरून धरून परत कलकत्ता येथें आणिलें, आणि तो मरेपर्यंत त्यास तेथें प्रतिबंधांत ठेविलें.

लक्ष्मणदेवाचा थांग लागेनासा झाला होता, तेव्हां त्याच्या कुटुंबावर जें भयंकर मरणसंकट गुदरलें, तें ऐकून आंगावर रोमांच उभे राहातात. त्याची हकीकत अशी. लक्ष्मणदेव फरारी झाला, असें सरकारास समजतांच, त्याचें कुटुंब नवाशहरास होतें, तें ओलीच्या माणसांप्रमाणें पकडून, अजगड येथें नेऊन अडकवून ठेवावें, असें ठरलें. तुमच्या जीवांस कांहीं धक्का नाहीं, असें त्यांस अभयवचन देऊन, त्यांस नव्या जागीं नेण्याचें काम, लक्ष्मणदेवाचा सासरा बाजीराव ह्याजवर सोंपिलें. तें त्यानें बाह्यात्कारें मोठ्या आनंदानें पतकरिलें; पण अंतर्यामीं त्याचें चित्त अपमानदुःखानें अगदीं होरपळत होतें. नवाशहर येथून निघण्याची सगळी तयारी झाली. शिपाईप्यादे वाड्याबाहेर येऊन बसले, आणि बाजीराव आंत गेला, तो लवकर बाहेर येईना. तेव्हां कोणी एक काळा लष्करी अमलदार, उशीर लागण्याचें कारण काय

तें पाहण्याकरितां आंत शिरला. ऱ्तों, बाजीराव, हातांत नागवी तरवार घेऊन, एका खोलीच्या दरवाज्यांत बसलेला त्याच्या दृष्टीस पडला. तो अमलदार आपणाकडे येत आहे असें पाहून, बाजीरावानें झटकर खोलींत जाऊन दरवाजा गच्च लावून घेतला. नंतर बाहेरून लोकांनीं पुष्कळ हाका मारिल्या. परंतु कोणी हाक देईना, ह्मणून त्यांनीं दरवाजा फोडिला. आणि मग आंत पाहतात तों अनर्थ ह्मणून किती सांगावा. ? लक्ष्मणदेवाची वृद्ध मातोश्री, त्याची बायको, त्याचा अज्ञान लहान पुत्र, आणि चौघी दासी, इतक्यांचीं प्रेतें खोलींत अस्ताव्यस्त पडून रक्ताचे पाट वाहात आहेत, असें त्यांनीं पाहिलें. ! ते आंत जातात, इतक्यांत बाजीरावानेंही आपली मान कापून घेऊन, प्राणत्याग केला. काय अपमानाचें दुःख हें. ! वर सांगितलेल्या सातांही माणसांच्या माना बाजीरावानें आपले हातानें कापिल्या. ! परंतु त्या गोष्टीस त्या माणसांचें आनुकूल्य असावें, असें खचीत वाटतें. कारण, बाहेरच्या आंगास माणसें जवळच बसलेलीं असतां, त्यांस आंतून अगदीं हूं चूं सुद्धां ऐकूं आलें नाहीं. ह्या दुनयेमध्यें सर्वांपेक्षां मृत्यु ही मोठी हानि आहे, इचे एवढी दुसरी हानि नाहीं, असें लोकांमध्यें हमेषा बोलतात; परंतु ह्या बाजीरावाच्या उदाहरणावरूनच स्पष्ट दिसून येईल कीं, अब्रूच्या माणसास, अपमानदुःख हें मरणदुःखाच्या शतपट वाटतें. आणि अशीं उदाहरणें इतिहासामध्येंही पुष्कळ सांपडतील.

बाजीरावाचें हें कृत्य इतर बुंदेली थोर लोकांनीं फार वाखाणिलें. आणि त्यांनीं उघड बोलून दाखविलें कीं, असा प्रसंग आह्मां कोणांवरही गुदरला असता, तर आह्मी असें केल्या वांचून कधींही राहतोंना. अपमानापेक्षां मरण बरें, हा भाव प्राचीन काळीं फार असे, तो आतां दिवसेंदिवस कमतावत चालला आहे असा दिसतो. हा सुधारणेच्या वृद्धीचा परिणाम आहे काय. ?

कोहिनूर हिरा.

इ० स० १८०९.

ह्या पृथ्वीवर कोठें काय आहे, ह्याचा अंत नाहीं. त्यांत कितीएक वस्तु अशा अमोलिक आहेत कीं, त्यांचा क्रयविक्रय कधीं कोणीं केलाच नाहीं.

ह्याच्या मणगटांत जोर अधिक असेल, यानें त्या दुःस-यापासून जबरदस्तीनें घ्याव्या; अशांपैकींच कोहिनूर नामक हिरा आहे, असें सांगतात. कोहिनूर ह्या शब्दाचा अर्थ प्रकाशाचा पर्वत असा आहे. एवढी मोठी वस्तु सामान्य मनुष्यांच्या दृष्टीस कोठून पडणार.? परंतु ज्या दैववान पुरुषांनीं तो हिरा पाहिला आहे, त्यांच्या लेखांवरून व त्यांनीं जें त्याचें चित्र काढून दाखविलें आहे, त्यावरून, तो मोठ्या बदामापेक्षां देखील किंचित् मोठा असावा, असें वाटतें. आतां, ह्याविषयीं थोडीशी हकीकत आधीं देऊन, मग त्याची जी गोष्ट इतिहासामध्यें मला आढळली आहे, ती मी येथें वाचणाऱ्यांकरितां लिहीन.

हा हिरा, इ० स० १५५० ह्या वर्षीं गोंवळकोंड्याच्या खाणींत सांपडला. त्याची किंमत २०००००० रुपये असावी असें चतुर लोक अनुमान करितात. हा पांडवांजवळ होता, अशी दंतकथा आहे. आणखी असें सांगतात कीं, तो दिल्लीच्या बादशाहाच्या नामांकित मयूरासनावर जडला होता; तें मयुरासन नादिरशाहानें इ० स० १७३९ त अफगाणिस्थानांत नेलें. त्याच्या पश्चात त्याच्या संपत्तीची लूट झाली, त्या वेळीं तो हिरा अहमदशाहा अबदल्ली ह्याचे हातीं लागला; आणि मग, राज्याधिकारपरत्वें तो शाहासुजा ह्यास मिळाला.

ह्या शाहासुजास त्याच्या शत्रूंनीं इ० स० १८०९ त पदच्युत केलें. तेव्हां तो आपली गादी मिळविण्याच्या हेतूनें, ज्या त्या बलवान् राजापाशीं मदत मागूं लागला. शीक लोकांचा महापराक्रमी राजा महाराज रणजितसिंग, आपली राजधानी लाहोर येथें राज्य करीत होता; त्याजकडेही त्याचें मागणें गेलें. तें त्यानें तत्काळ मान्य करून, शाहासुजा ह्यास ताबडतोब आपले दरबारीं बोलावून आणिलें. त्या विचाऱ्यास असें वाटलें कीं, हा योद्धा शीक राजा माझी गादी मला खचीत मिळवून देईल. पण रणजितसिंगाचा कावा वेगळाच होता. तो असा कीं, शाहासुजा आतां दीन झाला आहे, तर त्यास मदतीचे लालुचीनें कसा तरी एकदा आपले सपाट्यांत आणून, त्याजपाशीं कोहिनूर आहे, तेवढा आपले हस्तगत करून घ्यावा. पुढें कांहीं दिवसांनीं, ह्याच्या निरोपावर विश्वास ठेवून, शाहासुजा लाहोरास आला. लगेच दुसरे दिवशीं, तो हिरा मागून आणण्याकरितां रणजितसिंगानें त्याजकडे मनुष्य पाठविला. त्यापाशीं शाहासुजा ह्यानें पुष्कळ आढेवेढे घेऊन, शेवटीं टाळाटाळीचें उत्तर सांगितलें. तें ऐकतांच, रणजितसिंगानें काबूलच्या बादशा-

हाच्या घरावर शिपायांचा सक्त पाहरा बसविला. त्याच्या कुटुंबाचें एक एक माणूस एका एका वेगळ्या जागीं नेऊन कोंडून ठेविलें, तें असें कीं, यांची दृष्टादृष्ट सुद्धां होऊं नये. इतकें करून तरी तो शीक लोकांचा राजा स्वस्थ राहिला काय.? नाहीं. तर त्यानें त्या माणसांचें अन्नपाणी तोडिलें; तें इतकें कीं, तीं सगळीं मरावयास टेंकलीं. मग त्या बिचाऱ्यांनीं काय करावें बरें.? शाहासुजा अगदीं गाय होऊन गेला; आणि त्याला असें झालें कीं, आतां कसे तरी माणसांचे प्राण वांचोत. ह्या प्रसंगाचें वर्णन खुद शाहासुजा ह्यानें एके जागीं लिहिलें आहे. त्याचें तात्पर्य असें; " आमची दोन महिने उपासमार झाल्यावर, एके दिवशीं रणजितसिंग स्वतः माझें वाड्यांत आला. तो प्रथमतः मित्राप्रमाणें गोड बोलला. मग एक कागद काढून, त्यांत लिहिल्याप्रमाणें मी मनःपूर्वक चालेन, अशी बाबानानकाच्या ग्रंथाची व आपल्या तरवारीची त्यानें शपथ वाहिली. त्या कागदावर त्यानें असें लिहिलें होतें कीं, कोठाकमलक, जंगस्वाल, आणि खलनूर हे प्रांत मी तुह्मांस अगदीं वंशपरंपरेनें दिले आहेत, व ते तुमच्या वंशजांकडे निरंतर चालावे; तुह्मांस गादी मिळविण्याचे कामीं जी फौज व जी द्रव्याची मदत लागेल, ती मी करीन. नंतर आह्मींही असें कबूल केलें कीं, आह्मांस पुनः गादी प्राप्त झाली ह्मणजे, रणजितसिंगास आह्मीं आपला दोस्त राजा समजूं. इतकें झाल्यावर, उभयपक्षीं निरंतर स्नेहभाव राखण्याविषयीं दृढ निश्चय प्रदर्शित करण्याकरितां, शीक लोकांच्या चालीप्रमाणें, आह्मीं उभयतांनीं आपल्या पागोट्यांची अदलाबदल केली. आणि मग कोहिनूर आह्मीं त्याचे हातीं दिला."

कोहिनूर हातीं येतांच, रणजितसिंग आपली शपथ व सगळीं वचनें विसरला. त्यानें शाहासुजा ह्यास कांहीं एक न देतां, तसेंच प्रतिबंधांत ठेविलें. शेवटीं, तो काबूलचा माजी बादशाह इ० स० १८१६ ह्या वर्षीं, आपला वेष बदलून, मोठ्या तजविजीनें तेथून निसटून पळून गेला; तो लुधियाना येथें इंग्लिशांच्या आश्रयाखालीं जाऊन राहिला. ह्या प्रकारेंकरून कोहिनूर लाहोरच्या राजाच्या हातीं आला. तें राज्य, इ० स० १८४९ त इंग्लिश सरकारानें घेतलें. तेव्हां अर्थात् तो हिरा इंग्लिश लोकांस प्राप्त झाला. तो हल्लीं आपली महाराणी साहेब विक्तोरिया ह्यांचे मुकुटावर आहे.

एका हिऱ्यासाठीं रणजितसिंगानें शाहासुजा ह्याचा विश्वासघात केला, तेणेंकरून त्याच्या कीर्तीस मोठा डाग लागला. निरपराधी मनुष्यास दुःख

देणें ह्यासारखें दुसरें पातक नाहीं, हें खचीत. तथापि, परदुःखाच्या कितीएक प्रकारांस कीर्तीनें आश्रय दिला आहे; तेणेंकरून ते प्रकार पापमूलक अहेत, असें जनाच्या मनांत येत नाहीं. कांहीं कारण अथवा संबंध नसतां एखाद्यावर हल्ला करून त्याचें राजपद घेणें, हें केवळ न्यायदृष्टीनें पाहिलें असतां, खरोखर पापकर्म आहे. परंतु जे पराक्रमी राजे तो प्रताप करितात, ते मोठे शूर, योद्धे, दैवशाली, देवाच्या कृपेंतले, पुण्यवान् असें सुज्ञ जनही मानितात. मग इतर लोक मानितील तर नवल काय. ? ह्या न्यायानें विचार केला तरी, रणजितसिंगानें महत्पाप केलें असें होतें. तो शाहासुजा ह्याशीं लढून कोहिनूर मिळविता, तर त्याला कोणी दोष देताना. कांकीं शूरांचीं कामेंच तशीं असतात, अशी सगळ्या दुनयेची समजूत आहे. परंतु ह्या विचाऱ्या पदच्युत झालेल्या घाबरलेल्या बादशाहास साह्याची आशा दाखवून आपले येथें आणून, त्याचे व त्याच्या कुटुंबाच्या माणसांचे हालहाल करून त्यानें कोहिनूर घेतला, ही कांहीं राजनीति नव्हे; हा केवळ अधमपणा होय. द्रव्यलोभ फार वाईट आहे. त्यानें ज्यास आपलेंसें करून टाकिलें, तो पापांत बुडाला, असें समजावें. तो काय करील ह्याचा नेम नाहीं. द्रव्य मिळविण्यासाठीं तो प्रत्यक्ष आपल्या मित्रांचे अथवा आप्तांचे देखील गळे कापायास चुकावयाचा नाहीं. मग इतरांची गोष्ट कशास पाहिजे ? द्रव्याचा अतिशयित लोभ धरूं नये; तो ज्याचे ठायीं बलवत्तर वसत असेल, त्याशीं संबंध अथवा व्यवहार सहसा ठेवूं नये. कितीही मिळालें तरी शेवटीं एकटें जावयाचें आहे, बरोबर कांहीं यावयाचें नाहीं; असा विचार मनांत दृढ धरून वर्त्तावें; हा मनुष्याचा मुख्य धर्म होय.

हिंदुस्थानांतील शिपायांच्या बंडाचीं कारणें.

इ० स० १८५७.

हें बंड सर्वत्र प्रसिद्ध आहे. ह्याच्यापायीं आमच्या ह्या हिंदुस्थान देशावर कोणकोणते अनर्थ ओढवले, ते पुष्कळांस ऐकून माहीत आहेत. तरी त्यांविषयीं लोकांच्या मनांत कांहीं भ्रांतिमूलक मतें शिरलीं आहेत, तीं नाहीं-

तशीं झालीं पाहिजेत. म्हणून ह्या लेखांत आधीं तें बंड उद्भवण्याचीं कारणें सांगतों, आणि मग सवडीप्रमाणें त्याच्या विस्ताराविषयीं आणि नाशाविषयीं लिहूं.

पूर्वीं कोठें कांहीं हालचाल नसतां, एकाएकीं एवढें प्रचंड बंड उठलें कसें, हा प्रश्न प्रत्येक माणसाच्या मनांत येतो. परंतु त्याला समर्पक उत्तर बहुधा मिळत नाहीं; कारण, तें कठीणच आहे. तोंडच्या गप्पांनीं अशा प्रश्नांचें समाधान व्हावयाचें नाहीं. ह्या कामीं इतिहासाचें आणि खोल विचाराचेंच साह्य घेतलें पाहिजे. बेवरिज्जसाहेब नामक एका विद्वान् पुरुषानें इंग्रजी भाषेंत हिंदुस्थानाचा इतिहास फार मोठा लिहिला आहे. त्यांत एके जागीं तो स्पष्ट असें म्हणतो कीं, इंग्लिश सरकारचा अमल हिंदुस्थानांतील लोकांस ह्यापूर्वीं कधीं मनापासून गोड वाटला नाहीं, व तो कधीं गोड वाटेल, अशी आशा धरणेंही व्यर्थ आहे. ह्याचीं कारणें आम्ही येथें लिहूं लागत नाहीं; परंतु बंड होण्यास जीं अनेक कारणें उत्पन्न झालीं, त्यांपैकीं हें एक मुख्य आहे, असें वाटलें, म्हणून त्यास येथें जागा दिली आहे.

वास्तविक पाहिलें असतां इंग्लिशांच्या राज्याप्रमाणें सुखावह राज्य दुसरें होणें नाहीं. ही गोष्ट समंजसच काय, पण असमंजस आहेत तेही प्रांजल बुद्धीनें कबूल करितात. राजाविषयीं प्रजेचा अभिप्राय असा उत्कृष्ट असून, जर त्यांचें मनापासून सख्य असलें तर मग त्या राज्याविषयीं काय पुसावयाचें आहे.? जावत्कालपर्यंत चंद्रसूर्य आहेत, तावत्कालपर्यंत त्याला बिलकूल धक्का लागावयाचा नाहीं. पण ह्या देशांत तसें कोठें आहे.? आधीं मुळीं राजा परके देशचा; तो इकडे पैसा मिळविण्यासाठीं आलेला; तो, जुलुमानें नव्हे, पण युक्तीनें निघेल तितका पैसा काढून आपली विलायत भरतो; तो आमचा देशबंधु नव्हे; त्याला आमचा कळवळा कशानें येईल.? त्याचा धर्म त्याला चांगला वाटतो; तो जो स्वीकारील तो शाहाणा व मोठा; हिंदु धर्मास तो पाण्यांत पाहतो; हिंदूंविषयीं काय, पण मुसलमानांविषयीं पहावें तों तसेंच; एकंदरींत, गोडीच्या पोटीं येथील लोकांच्या हातीं खापर देऊन, त्यांस बाटवावें, असा सरकारचा हेतु आहे; अशा प्रकारच्या विचारांनीं लोकांचीं मनें भरलीं आहेत; आणि त्यांस अनुकूल दिसण्यासारखें असें एकादें कृत्य साहाजिक रीतीनें जरी सरकारच्या हातून घडलें, तरी तें आमच्या नाशार्थ त्यांनीं बुद्ध्या केलें, असें त्यांस वाटतें. आणि तेणेंकरून त्यांचीं मनें चल-

बिचल होऊं लागतात. ही भ्रांतिमूलक स्थिति पुष्कळ लोकांची आहे. आणि सरकारावर उठण्यास ती कांहीं अंशीं साक्षात किंवा परंपरेनें कारणीभूत होते. ही गोष्ट फार दुःखाची आहे. खरें पाहूं गेलें असतां, इंग्लिश सरकाराइतकें आपल्या प्रजेचें हित करणारें सरकार, आज पावेतों ह्या देशांत झालें नाहीं, असें म्हटल्यास चिंता नाहीं.

लार्ड दालहौसीनें एतद्देशीय पुष्कळ राज्यें खालसात केलीं, हें बंडाचें कारण होतें, असें कांहीं लोकांस वाटतें. पण तें सर्व खरें नाहीं. हें जर पूर्णपणें खरें असतें, तर जितक्या प्रांतांचें राज्य त्यानें खालासात केलें, तितक्या सगळ्या प्रांतांत बंड झालें असतें. पण, अयोध्या आणि झांशी ह्यां खेरीज दुसरे कोठें बंड झालें नाहीं. सर जान लारेन्स ह्यांचें म्हणणें असें आहे कीं, "बंडाचें खरें कारण केवळ शिपायांचें अज्ञान आणि दुर्बुद्धि होय."

सरकाराविषयीं शिपायांची नाखुषी, हें ह्या बंडाचें मुख्य कारण होय. हें कारण एकाएकीं उत्पन्न होऊन बंड उद्भवलें, असें कोणीं समजूं नये. ह्या कारणाचें बीज फार दिवसांमागें उत्पन्न झालेलें आहे, व त्याच्या अस्तित्वाची प्रतीतिही इंग्रज सरकारास आली आहे. ह्या बीजाचा मोड ज्या ज्या वेळीं सरकाराच्या दृष्टीस पडत गेला, त्या त्या वेळीं तो त्यांनीं तत्काळ तोडून टाकिला, ही गोष्ट खरी आहे; परंतु त्या बीजाचें समूल उत्पाटण त्यांच्यानें करवलें नाहीं; कारण तें मुळीं अशक्यच आहे. पहा. इ० स० १८२४ ह्या वर्षीं ब्रह्मदेशाशीं पहिली लढाई झाली, त्या वेळीं त्या मुलखीं जाण्याचा हुकूम झाला, तेव्हां बंगाल खात्याच्या शिपायांत मोठा गवगवा झाला; कितीएकांनीं नौकऱ्या सोडून दिल्या, आणि कितीएक तर नौकरींत असून, त्यांनीं, आम्हीं जात नाहीं, असें साफ सांगितलें. ती वेळ कसेंही करून सरासरी मारून नेली. पुढें, इ० स० १८५० त सर चार्लस नेपियरसाहेब हा कमांदर इन्चीफ असतां, आम्ही पंजाबांत नौकरी करितों, ह्यास्तव आमचे पगार वाढविले पाहिजेत, अशी बंगालच्या शिपायांनीं तक्रार काढिली. परंतु सरकारानें ती मान्य केली नाहीं, यामुळें ते इतके बिथरले कीं, ते आतां बंड करतील कीं काय, अशी मोठी भीति पडली. तो साहेब त्या प्रसंगाविषयीं एके ठिकाणीं असें म्हणतो कीं, "त्या वेळीं सक्त उपाय योजून मीं त्या बिघडूं लागलेल्या लोकांचा तत्काळ बंदोबस्त केला म्हणून बरें झालें; नाहींतर त्यांपासून हिंदुस्थानांतील इंग्लिश राज्यास खचीत मोठा धक्का बसला असता." बंगा-

लच्या सैन्यांत मुख्य दोन जातींचे लोक होते, ब्राह्मण आणि रजपूत; त्यांचें इतर जातींच्या शिपायांवर फार वजन असे. आणि ते असें समजत कीं, इंग्लिश लोकांचें राज्य कायतें आमच्या बळावर चाललें आहे; ह्मणून त्यांचें कल्याण किंवा अकल्याण हें आमच्या हातांत आहे; आणि आह्मीं एक होऊं तर, आह्मी ह्मणूं तें सरकाराकडून करवूं. पगार वाढविण्याविषयींचा अर्ज सरकार मनास आणीना; तेव्हां २३ व्या काळ्या पायदळ पलटणींतले लोक तर एकदा असें ह्मणाले कीं, "तीन चार पलटणी आह्मांस मिळूंद्या, ह्मणजे मग जें त्या करितील तें आह्मीही करूं." ही धमक जिरविण्यासाठीं, व तुह्मांवांचून आमचें अडावयाचें नाहीं हें दाखविण्यासाठीं, जी एक पलटण बिथरल्यामुळें कामावरून दूर केली होती, ती, गुरखे लोक चाकरीस ठेवून सर चार्लस नेपियर साहेबानें पुनः भरली. परंतु हें कृत्य सरकारास आवडलें नाहीं, आणि ही शिपायांची दुर्बुद्धि मोडून टाकण्याचें काम तसेंच मागें पडलें. ही शिपायांची खोड लार्ड दलहौसी साहेबांचे मनांत येऊन चुकली होती. ते एकदां ह्मणाले, " आलीकडे ह्या शिपायांस पगार फार फार मिळूं लागल्यामुळें हे शेफरले आहेत; सरकारानेंच त्यांना डोक्यावर चढविलें आहे, ह्मणून त्यांस हे नानाप्रकारचे चाळे सुचतात; ह्यापूर्वी असें बोलणें त्यांच्या तोंडांतून कधीं निघालें नव्हतें." आणखी हे साहेब आपलें काम सोडून हिंदुस्थानांतून जावयास निघाले, तेव्हां एका मोठ्या सभेंत बोलले कीं, "उघड शत्रूंशीं युद्ध करणें बरें. त्याच्या योगानें फारसे अनर्थ घडावयाचे नाहींत. पण जे लोक इमानी आणि विश्वासू असे सरकारास व त्यांच्यावरील अमलदारांस, ते अगदीं बिथरत पर्यंत वाटत असतात, त्यांचे हातून जीं घोर कर्में घडतील, त्यांची कल्पना देखील करितां यावयाची नाहीं. अशा बंडावलेल्या लोकांस पहिला बळी ह्मटला ह्मणजे त्यांचा अमलदार होय." अशा प्रकारें पुढच्या भयाविषयीं स्पष्टपणें दिक्प्रदर्शन झालें असतां त्याच्या निवारणाच्या उपायाकडे कोणीं लक्ष दिलें नाहीं. हिंदुस्थानांत शांतता झाली आहे, आतां तेथें सैन्याची फारशी गरज नाहीं, ह्मणून सरकारानें कितीएक पलटणी कमी सुद्धां केल्या.

लोकांमध्यें धर्मादि कारणांवरून जितका जितका मतभेद अधिक, तितका तितका त्यांत एकी होण्याचा संभव कमी, असा प्रायः नियम आहे. आणि ब्रंगालच्या सैन्यांमध्यें मुख्य जाती दोन, हिंदु आणि मुसलमान, ते सर्व

प्रकारीं एकमेकांशीं वांकडे, त्यांच्यांत कदापि एकमत व्हावयाचें नाहीं, असें खचीत समजून, सरकार त्याविषयीं अगदीं बेफिकीर असे. आणि ते एकत्र होऊन त्यांचे हातून ह्मणजे एकाएकीं मोठा दंगा होईल, असें कोणाच्या स्वप्नींही नव्हतें. परंतु, परमेश्वराची करणी किती अगाध आहे! प्रसंग आला तेव्हां सर्व गोष्टी एकदम घडून येऊन, बंड उठलें. तो प्रकार असा.

इ० स० १८५७ च्या आरंभीं सरकारानें बंगाल्यांतील शिपायांच्या पलटणींस नवीन प्रकारच्या निघालेल्या बंदुकी दिल्या. आणि त्यांच्या उपयोगास बेताचीं नवीं काडतुसें करण्याचा कारखाना, कलकत्त्यापासून चारपांच कोसांवर दमदम ह्मणून एक लष्करच्या छावणीचें गांव आहे, तेथें घातला. काडतुसें कशाचीं करितात, व त्यांत कांहीं अमंगळ पदार्थ घालतात कीं काय, ह्याविषयीं प्रथमतः कोणालाही संशय आला नाहीं. सर्व काम यथास्थित चाललें होतें. परंतु तेथें एके दिवशीं अशी एक चमत्कारिक गोष्ट घडली कीं, ती कानीं पडल्याबरोबर हिंदु व मुसलमान शिपायांचीं मनें एकदम एकत्र होऊन सरकारावर उठलीं. ती गोष्ट येणेंप्रमाणें. कोणी एक ब्राह्मण शिपाई, स्नान करून, हातांत पाण्यानें भरलेला गडवा घेऊन, रस्त्यानें आपल्या बिऱ्हाडाकडे चालला होता. त्याला या कारखान्यांतला नीच जातीचा एक चाकर भेटला. त्यानें त्या ब्राह्मणापाशीं पाणी प्यावयास मागितलें; तेव्हां ब्राह्मणानें त्यास उत्तर दिलें कीं, "गडवा तुला दिला, तर तो विटाळेल, ह्मणून मी तुला देत नाहीं." हें ऐकून त्या खलाशानें त्यास दबकावून सांगितलें कीं, "तुह्मी लोक जात जात ह्मणून फार उड्या मारतां अहां; जरा दमाखानीं घ्या; आतां जीं काडतुसें तयार होत आहेत, त्यांना गाईंची व डुकरांची चरबी लावीत असतात; तीं काडतुसें कांहीं वेळानें साहेब लोक तुह्मांला दांतांनीं तटातट तोडायास लावितील; मग आह्मीच पाहूं तुमची जात कशी काय सांवळी आहे ती." ही बोलाचाली होतांना तेथें कितीएक लोक जमले. त्यांनीं ती ऐकिली. ही झालेली हकीकत त्या ब्राह्मणानें व इतर लोकांनीं बाहेर सांगून जिकडे तिकडे पसरिली. गाईंचें नांव घेतल्याबरोबर हिंदूंच्या अंगावर रोमांच उभे राहिले; व डुकर हा शब्द कानीं पडतांच मुसलमान शिपायांचीं देहभानें सुटलीं. एकंदर दोन्ही जातींच्या लोकांस खचीत वाटलें कीं, सरकार आपले धर्म बुडवावयाचा यत्न करीत आहे, व तें आपणां सर्वांस जुलुमानें ख्रिस्ती कर-

णार आहे हें नीट नाहीं. ह्याप्रमाणें धर्माचा आवेश या लोकांचे अंतांत संचरला.

हाच बंडास आरंभ होय. शिपाई लोकांच्या डोक्यांत जें भलतेंच वेड शिरलें होतें तें काढून टाकण्यासाठीं त्यांच्या वरच्या अमलदारांनीं नाना प्रकारचे यत्न केले. परंतु ते सर्व व्यर्थ गेले. त्यांतला एक देखील उपयोगीं पडला नाहीं. आमच्या कारखान्यांतली चरबी राहूं द्या; तुम्ही बाजारांतून तेलमेण आणून तें आपले हातानें एकत्र करून काडतुसांस लावा, असें देखील साहेब लोकांनीं या शिपायांस सांगितलें. तेव्हां काडतुसांच्या कागदांतच कांहीं लबाडी असेल, असा संशय शिपायांनीं काढिला. एतावता त्यांच्या मनांतली कांक्षा फिटेना. इंग्रज लोक आपल्या धर्मावर उठले आहेत असें त्यांच्या अंत:करणांत पक्कें बिंबलें. तें कांहीं केल्या निघेना. शेवटीं ज्या ज्या ठिकाणीं काळे पलटणी लोक होते, त्या त्या जागीं बंड होण्याची भीति पडली. फार वेळ लोटला नाहीं तों, मिरत, बर्हमपूर, कानपूर, दिल्ली, लखनौ इत्यादि स्थळीं शिपाई लोकांनीं दंगे माजविले. त्यांच्या योगानें देश हैराण होऊन गेला; रक्ताच्या तर केवळ नद्या वाहल्या; हजारों लोक प्राणांस मुकले. शेवटीं, आपल्या बलिष्ठ इंग्लिश सरकारानें या दुष्ट बंडखोरांवर आपलें सैन्य पाठवून, त्यांचा संहार केला, आणि देशांत जिकडे तिकडे स्वस्थता पूर्वस्थितीस आणिली. ह्याबद्दल त्यांचे फार फार आभार मानणें योग्य आहे.

आतां खरोखर झटलें असतां ह्या एवढ्या प्रचंड बंडास कारण धर्माभिमान होय; दुसरें कांहीं नाहीं. परंतु हें बंड शाहण्या समंजस लोकांनीं योग्य कारण पाहून केलें नव्हतें. इंग्लिश सरकार ख्रिस्ती धर्मी आहे; इंग्लिश लोक ख्रिस्ती धर्मावर पूर्ण विश्वास ठेवितात; व परलोकीं उत्तम गति प्राप्त होण्यास तोच एक साधन आहे, असें ते मानितात; ह्या गोष्टी खऱ्या आहेत. व आपल्या धर्माविषयीं व ख्रिस्ती धर्माविषयीं पूर्ण माहिती करून घेऊन, आपला धर्म अज्ञानमूलक, खोटा, व ख्रिस्ती धर्म हा खरा मोक्षप्राप्तीचा मार्ग, असें समजून जो या धर्माचा स्वीकार करितो, तो शाहणा, सुधारलेला, व सदाचरणी, असें त्यांतले पुष्कळ लोक समजतात, हेंही खोटें नव्हे. परंतु, कोणास जुलुमानें ख्रिस्ती करावें, असा त्यांचा उद्देश मुळींच नाहीं; अथवा, द्रव्यलोभास्तव कोणीं ख्रिस्ती व्हावें, असेंही ते इच्छीत नाहींत.

असा आंतला खरा प्रकार आहे. मग लोकांनीं उगाच भलभलत्या कल्पना कां कराव्या. ?

बंडास मूळकारण धर्माभिमान तर खराच; पण त्याच्याही पलीकडचें मुख्य कारण म्हटलें तर अज्ञान होय. काडतुसांस गाईची व डुकराची चरबी लावितात, इतकें केवळ ऐकूनच मूर्ख लोक बिथरले; ऐकिलेली गोष्ट खरी किंवा खोटी ह्याचा कोणीं शोध केला काय. ? एक बोलला म्हणून दुसरा बोलला, आणि दुसरा बिघडला म्हणून तिसरा बिघडला. अशी अंधपरंपरा चालून अविचारी मूर्खांचा समाज जमला, आणि बंड माजलें. त्यास नाना, तात्या, बाळाराव, झांशीची राणी, इत्यादि डोयजड माणसें मिळालीं. इतक्यांनीं मिळून केलें तें काय. ? देशाची दुर्दशा; दुसरें कांहीं नाहीं.

ज्यांनीं एवढें अनावर कृत्य करून आपली फजीती, हजारों लोकांची इतिश्री, आणि स्वदेशाची धूळधाणी केली, त्यांस काय म्हणावें. ? कोणी शाहणा मनुष्य त्यांस शूर किंवा पराक्रमी म्हणेल काय. ? प्रांतांत चोर दरवडेखोर असतात, ते लोकांचीं घरेंदारें लुटून द्रव्य नेतात, किंवा थोडीबहुत हाणमार करितात, एवढेंच काय तें. पण हे बंडवाले त्यांहूनही दुष्ट होत. त्यांनीं गांवांचे गांव जाळून लुटून ओस पाडिले; व हजारों निरपराधी इंग्लिश बायकामुलांचे जीव घेतले; सरकारचे हजारों लोक मारिले, व लाखों रुपयांचे खजीने लुटिले; इतकेंही करून शेवटीं आपण धुळीस मिळाले; आणि आपणांवरील झालेल्या खर्चाचा बोजा आपल्या देशबांधवांच्या डोक्यावर चढविला; तेव्हां ह्यांच्या दुष्टपणास काय मर्यादा राहिली. ?

शिपायांच्या बंडाचा परिणाम.

इ० स० १८५७.

बंड हें देशाच्या महत्पापाचें फळ आहे. त्यापासून बरें होतें असें थोड्यांचें; नाश पुष्कळ पावतात. अठराशें सत्तावन सालच्या दंग्यापासून हिंदुस्थानांत जें थोडेंबहुत बरें वाईट झालें, त्यांतील मुख्य मुख्य गोष्टी येथें सांगतों.

ह्यां. ग्वाल्हेरचे शिंदे महाराज ह्यांस ह्या बंडापासून फार त्रास पोहोंचला; (अ तरी ते इंग्लिश सरकाराशीं इमानें इतबारें दोस्तीच्या नात्यानें वागले, बेइमान झाले नाहींत; ह्मणून इ० स० १८६० तल्या तहावरून त्यांस आणखी ३००००० रुपयांचा मुलूख द्यावयाचा ठराव झाला; कारण पडल्यास दत्तक घेण्याचा अधिकार त्यांस दिला; त्याप्रमाणेंच, आपल्या इच्छप्रमाणें इंग्लिश सरकारच्या ताब्यांतल्या गांवाचा मोबदला करण्याविषयीं, व ५००० पर्यंत पायदळ ठेवण्याविषयीं त्यांस मोकळीक मिळाली. शिवाय, त्यांचे दिवाण रावराजे दिनकरराव ह्यांस ५००० रुपयांची जमीन इनाम दिली.

बडोद्याचें गायकवाड सरकारही तसेंच इमानानें वर्तलें. ह्मणून, त्याजकडून जे दरसाल ३००००० रुपये इंग्रज सरकाराकडे येत असत, ते त्याजकडून घेऊं नयेत असा ठराव केला. आणि कारण पडल्यास दत्तक घेण्याची परवानगी दिली.

इंदूरच्या होळकर सरकारानेंही ह्या प्रसंगीं इंग्रज सरकाराशीं स्नेहभाव ठेविला, व त्याच्या विरुद्ध कांहीं गडबड केली नाहीं, ह्मणून त्यास, प्रसंग पडल्यास दत्तक घेण्याची परवानगी दिली.

जमखंडीकर श्रीमंत राजमान्य राजश्री रामचंद्रराव आपासाहेब पटवर्धन, ह्यांस कांहीं संशयावरून इंग्रज सरकारानें बरेच दिवस प्रतिबंधांत ठेविलें होतें. परंतु चौकशी अंतीं त्यांजवर कांहीं शाबिदो झाला नाहीं; ह्मणून त्यांस मुक्त करून, पुनः त्यांचें संस्थान त्यांस दिलें.

धारवाड जिल्ह्यांत बंड झालें. त्यास नरगुंदकर संस्थानी भास्करराव बाबासाहेब हे सामील असावे, असें सरकारास वाटल्यावरून, त्यांस कानउघडणीच्या चार गोष्टी सांगण्याकरितां, आसिस्तंत पोलिटिकल एजंत मेहेरबान मानसन साहेब, हे नरगुंदास जाण्याकरितां निघाले. त्यांस सदरहू नरगुंदकरांनीं ८०० लोकां सहवर्तमान येऊन, सुरवंद ह्या गांवीं मे महिन्याच्या २९ व्या तारखेस रात्रीं निजल्या जागीं ठार मारिलें. तेव्हां सरकारानें त्यांजवर फौज पाठवून, त्यांचें संस्थान जप्त केलें, आणि बाबासाहेबांस पकडून फांशीं दिलें. ह्या पुरुषाविषयीं मेजर जनरल लीग्रयांड जेकब ह्यांनां एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, "हा नरगुंदकर, महाराष्ट्र देशांतल्या सर्व संस्थानिकांमध्यें मोठा बुद्धिवान होता. त्याला विद्येची अभिरुचि फार होता. त्याच्या संग्रहीं तीन चार हजार संस्कृत ग्रंथ होते. त्याला मूलबाळ कांहीं

नव्हतें. त्यास दत्तक पुत्र घेण्याची परवानगी इंग्रज सरकार देईना, ह्मणून त्यास अतिशयित वाईट वाटून त्यानें सरकारावर उठण्याची ही संधीसाधिली असावी."

सुरापूरचा राजा व्यंकटआपा नाईक बळवंत बिहारी ह्यानें बंडाचा इरादा मनांत धरून, लढाऊ सामान तयार केलें. ह्मणून सरकारानें त्याजवर फौज पाठविली. तेव्हां तो भिऊन पळत सुटला. त्यास सरकारानें पकडून, त्याची चौकशी करून, त्यास काळ्या पाण्याची शिक्षा दिली. ती त्यास अतिदुःसह वाटून त्यानें पिस्तोलानें आत्महत्या करून घेतली. सरकारानें त्याचें राज्य खालसांत करून, त्याचे राणीस दरसाल २६८०० रुपये पेनशन करून दिलें.

ह्या ठोकळ ठोकळ गोष्टी सांगितल्या. हें बंड गरीब गुरीबांस सुद्धां कसकसें भोंवलें, ह्याचें सांगोपांग कथन करूं लागलों तर वेगळा एक मोठा ग्रंथ होईल. जे अपराधी होते, त्यांस शासनें मिळालीं, हें ठीकच झालें. परंतु कितीएक गरीब बिचारे निरपराधी लोक सुद्धां ह्या बंडाच्या सपाट्यांत चिरडून गेले, त्यांविषयीं फार वाईट वाटतें. कोल्हापूर, सातारा, इत्यादि ठिकाणीं ह्या बंडामुळें जे अनर्थ घडले, ते जर नुसते ऐकिले, तर डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागतात. ज्यांस बंड ह्मणजे काय, तें पुरतें ठाऊक नव्हतें, व नुसतें बोलतां सुद्धां येत नव्हतें, ते राजद्रोही, ह्मणून जर फांशीं अडकविले, तर त्यांजकडे पाहून कोणास वाईट वाटणार नाहीं बरें. ?

अठराशें सत्तावन सालच्या बंडानें हिंदुस्थानाचें कांहीं तरी बरें केलें काय. ? नाहीं. काडी इतकें देखील नाहीं. उलटें फार नुकसान केलें. तें कसें तें पहा. एक तर, हजारों लोकांची कत्तल उडविली; दुसरें, शेंकडों थोर कुळें धुळीस मिळविलीं; तिसरें, आह्मां सर्व रयतेस अशस्त्र केलें; चवथें, हिंदुस्थानच्या लोकांच्या शक्तीचा व शाहाणपणाचा जो भ्रमाचा भोंपळा होता, तो फोडिला; पांचवें, इंग्लिश लोकांचे मनांत आह्मांविषयीं अप्रीति उत्पन्न केली; सहावें, आमच्या डोक्यांवर कराचें ओझें लादिलें; अशीं आमचीं अनेक नुकसानें झालीं; व ह्यापुढें आणखी किती होणार आहेत, हें सांगवत नाहीं.

आधींच आपण जिंकलेले लोक. आपला हात खालीं. आपणांमध्यें राजबळ, द्रव्यबळ, किंवा बाहुबळ, ह्यांपैकीं एकही चांगलें नाहीं. अशा स्थितींत जर आपण बंडें वगैरे चाळे करूं लागलों, तर आपला परिणाम काय होईल; हा विचार बंडांतल्या प्रमुख लोकांच्या मनांत आला नाहीं, ही देशाच्या दुर्दैवाची गोष्ट होय. हिंदुस्थानास अनिष्ट ग्रह आले होते, ह्मणून

ह्यांस अशी दुर्बुद्धि सुचली, आणि एवढें अरिष्ट आपणांवर ओढवलें, असें म्हणून स्वस्थ रहावें. दुसरा उपाय नाहीं.

माझ्या एका मित्रानें ह्या बंडाविषयीं एक लहानसें मराठी पुस्तक लिहिलें आहे. त्यांतील 'तात्पर्य' ह्या सदराखालीं, त्यानें कितीएक वाक्यें फार चमत्कारिक रीतीनें लिहिलेलीं मला आढळलीं. तीं मी आपल्या वाचणाऱ्यांकरितां येथें उतरून घेतों. "नंतर, आज तीन वर्षं लढाया मारून, त्या थोरांनीं त्या चटोरा पोरांच्या नोरास चोराचे दोरापरी कापून, मोराप्रमाणें आपले शोभेचा जो तोरा, त्यास जोरा आणिला; व घोरास नाहींसें करून टाकिलें. पहा ! पहा ! गंगानदी पलीकडे त्या लुंगाहीन कंगालांनीं संगात्यासह दंगा शिंगांवर घेण्यांत आंगाकडे न पाहतां पिंगा घालून, ढंगाच्या रंगानें हंगाम समजून, झिंगा बरळतो त्यापरी इंगा फिरला नव्हता तोंपर्यंत चंगळ मांडिली होती. मध्य देशांत अरबांनीं, रोहिल्यांनीं, व भिल्लांनीं दुल्ला माजवून हल्ला चालविला. तेणेंकरून लोकांचा सल्ला व गल्ला, ह्यांवर डल्ला पडूब, अल्ला अल्ला असा एकच कल्ला उसळून गेला होता. आणि दंगेखोर शरीरानें धट्टेकट्टे असून भुट्टे चोरांप्रमाणें झुट्टेबाजी करून पैक्याचे गट्टे लांबविण्यांत हातांस घट्टे पाडीत होते. परंतु ज्या वेळीं इंग्लिश तोफखान्याचें दुट्टें मागें लागून गोळ्यांचे रट्टे बसले, व अंगाचे चट्टे निघाले, तेव्हां ते रणांगणीं पतन पावले." ह्या उताऱ्यांत अर्थ विशेष आहे असें नाहीं. पण थोडासा शब्दरचनेचा चमत्कार आहे, म्हणून त्यास येथें जागा दिली आहे.

हिंदुस्थानाची सांप्रतची स्थिति.

सध्याच्या काळाचें मुख्य लक्षण हें आहे कीं, मनुष्याचें पाऊल सुधारणेच्या मार्गांत दिवसेंदिवस पुढें पडत जावें. ही गोष्ट सर्व दुनयेला लागू आहे. तेव्हां त्यिच्या अमलांत आपलें हिंदुस्थान येतें हें उघड आहे. ज्या देशांवर जुलुमी व अडाणी राजे राज्य करितात, तेथें सुद्धां हा नियम चांगला स्पष्ट दृष्टीस पडतो. आणि आपल्या देशावर तर दयाळू, सुज्ञ, व नीतिमान् इंग्रज लोक राज्य करीत आहेत; तेव्हां ह्या देशांत अनेक प्रकारच्या सुधारणा होत आहेत, ह्यांत कांहीं नवल नाहीं. परमेश्वरकृपेनें हा क्रम

सुरक्षितपणें पुढें चालेल, तर कालेंकरून आमचें हिंदुस्थान सुधारणेच्या शिखरास जाऊन पोहोंचेल, ह्यांत कांहीं संशय नाहीं. आतां सांप्रतच्या स्थितीचें थोडेंसें वर्णन करूं.

लोक.—लोक पहिल्यापेक्षां आतां नरे आहेत. ह्या कालमाहात्म्येंकरून कितीएक थोर कुळें अन्नास मोताद झालीं आहेत, ही गोष्ट खरी आहे; व हिजबद्दल आह्मांस फार वाईट वाटतें. परंतु एकंदरीच्या मानानें पाहिलें असतां, दोनप्रहरची भ्रांत अशी कुटुंबें ह्या देशांत पूर्वी जितकीं असत, त्यांच्या पंचमांश देखील तशीं आतां आढळावयाचीं नाहींत. ह्याचें कारण झटलें तर, जमिनीची मोजपी झाली, तिजवरचा सारा पुष्कळ उतरला, आणि सरकारचा बंदोबस्त उत्कृष्ट आहे, हें होय. मागें ह्या सर्व गोष्टी कमी होत्या. तेणेंकरून लोकांची आणि त्यांत विशेषेंकरून गरीब लोकांची फार दुर्दशा असे. हें त्यांच्या सामान्य अवस्थेविषयीं झालें.

आतां विद्येविषयीं. लोकांत पहिल्यापेक्षां आतां विद्या विशेष आहे. लिहिणाऱ्यावाचणाऱ्यांची संख्या पूर्वीच्या पेक्षां सांप्रतची बरीच मोठी आहे. विद्या शब्दाचा वास्तविक अर्थ जरी फार थोड्यास कळतो, तरी आपणांस लिहितां, वाचतां आणि चालीचे हिशेब करितां यावे, असें बहुतेक सर्वांस वाटूं लागलें आहे. आणि सरकारानें कृपा करून जागोजाग शाळा घातल्या आहेत, हें त्यांच्या इच्छा पूर्ण होण्यास उत्कृष्ट साधन झालें आहे. तथापि, वडारी, धनगर, इत्यादि कितीएक जाती, ज्या अद्यापि पिढीजाद अक्षरशत्रु आहेत, झणजे ज्यांच्या वाडवडिलांनीं कधींच पाढ्यावर काळें केलें नाहीं, त्यांचीं मनें अद्यापि विद्येकडे वळत नाहींत. तीं वळविण्याचा कांहीं उद्योग होईल तर फार चांगलें होईल.

कायदा व प्रजेच्या नायानें आपले हक्क, हे आतां लोकांस बरेच समजतात. अमुक अमलदारानें आपणांवर जुलूम केला तर दाद कोठें मागावी, हें ते जाणतात. परंतु कितीएक अमलदार लोक अविद्वान्, जुलुमी, लांचखाऊ असे असल्यामुळें कधींकधीं अन्याय होतात. त्यांत ह्या देशची भाषा साहेब लोकांस चांगली येत नसल्यामुळें ते आपलें सर्व काम शिरस्तेदाराच्या मताप्रमाणें चालवितात. तेणेंकरून तेथेंही फार अन्याय होऊन, लोक बुडतात. भाषाभेदामुळें असे परिणाम होतात. जर लोक इंग्रजी शिकून साहेब लोकांस त्यांच्या भाषेनें आपली हकीकत कळवितील, तर सहसा अन्याय

णार नाहीं, अशी आशा आहे. अविद्येनें लोकांचें फार नुकसान होतें. लेहिणारे लबाड लोक, न लिहितां येणाऱ्या गरीबांच्या नांवाचे पाहिजेत तसे खोटे कागद बनावून त्यांस नाडितात, व भलभलतेच कायदे सांगून ठकवितात; ह्यास्तव सर्वांनीं विद्याभ्यास करावा, आणि आपलें हित साधावें, हें योग्य आहे.

लोकांच्या धर्माची स्थिति फार चमत्कारिक झाली आहे. कितीएक लोक स्वधर्म सोडून ख्रिस्ती झाले आहेत. कांहीं लोकांस कोणताच धर्म खरा नाहीं, असें वाटूं लागलें आहे. कितीएकांनीं आपल्या समजुतीप्रमाणें नवे पंथ काढिले आहेत. कितीएक आपल्या प्राचीन धर्मांस अनुसरून राहिले आहेत. व कितीएकांचें शहाणपण इतकें वाढलें आहे कीं, धर्म व देव हीं सगळीं थोथांडें आहेत, कांहींच खरें नाहीं, असें ते ह्मणतात. हा शेवटचाच वर्ग दिवसेंदिवस वाढत चालला आहे. आणि अशा लोकांस पाप-पुण्यामध्यें फारसा भेद दिसत नाहीं. ह्या घोंटाळ्याचा अखेर परिणाम काय होणार, तो आमच्या बुद्धीस अतर्क्य आहे.

बंदोबस्त व न्याय.—सांप्रतकाळीं देशांत बंदोबस्त फार चांगला आहे. चोराचिरट्यांचें फारसें भय नाहीं. 'ह्या राज्यांत काठीस सोनें बांधून काशीपासून रामेश्वरापर्यंत बेफिकीर जावें,' असें सर्व लोक ह्मणतात. शहरांतून जागोजाग पोलीसच्या चौक्या आहेत, त्यांच्या योगानें तेथें चांगला बंदोबस्त राहतो. तिबेत देशाप्रमाणें ह्या देशांत मोठ्या राजमार्गांवर पहारे ठेविलेले नाहींत; तरी पांथस्थांस बहुधा कोणत्याही प्रकारें इजा होत नाहीं. फार काय सांगावें, सरकारचें टपाल घेऊन एकटा डांकवाला भरमध्यरात्रीं आड वाटेनें पळत असतो; तरी कोणाला अशी छाती होत नाहीं कीं क्षणभर त्याला कोणी हरकत करील. देशांत खून दरोडेही कधीं कधीं होतात; परंतु, ज्यांचा पत्ता लागला नाहीं, असे शेंकडा दहा सुद्धां निघणें कठीण. अशा अपराधांचा शोध, ते घडून गेल्यावर पांचपांच दहादहा वर्षांनीं लागलेला आहे, अशीं उदाहरणें हमेषा आढळतात. सारांश, बंदोबस्त चांगला आहे.

तट्यांच निवाडे बहुधा उत्तम प्रकारें होतात. परंतु, कांहीं न्यायाधीश जुन्या समजुतीचे, धनलोभी, लांच खाऊ, असल्या कारणानें कधीं कधीं अन्यायही घडतात. देवघेव, मानपान, हक्क इत्यादिकांविषयीं वाद खालच्या कोर्टांनीं कसेही निबाडिले, तरी हैकोर्ट ह्मणून जें न्यायाधिकारी मुख्य कोर्ट

इलाख्याचे ठिकाणीं आहे, तेथें सत्य न्याय झाल्या खेरीज बहुधा राहत नाहीं कायद्याचा अर्थ करणें हें न्यायाधीशांच्या मर्जीवर असल्यामुळें, अथवा त्याच्या अर्थाविषयीं स्पष्ट निर्णय नसल्यामुळें खोट्याचें खरें व खऱ्याचें खोटें, असेंही कधीं कधीं होतें. कायद्यांतील शब्दाप्रमाणें बरोबर वागण्याविषयीं न्यायाधीशांस सरकारची सक्त ताकीद आहे, असें दिसतें. न्यायाधीश पक्कें जाणतो कीं, फिर्याद खोटी आहे, व आरोपित अपराधी नाहीं; तथापि साक्षीदार फिर्यादीस अनुकूल असें शपथेवर बोलले, ह्मणजे आरोपितास शिक्षा देणें न्यायाधीशास भाग पडतें. तसेंच, एकंदर गुन्ह्याच्या स्वरूपावरून व स्वतःच्या माहितीवरून जर न्यायाधीशास खचीत ठाऊक आहे कीं, अमुक मनुष्य खचीत अपराधी आहे; परंतु, जर त्यास कायदेशीर रीतीनें पुरावा मिळाला नाहीं, तर त्या अपराध्यास सोडून देणें भाग पडतें. अशीं उदाहरणें हमेषा पाहण्यांत येतात. गुन्हेगार पकडणें हें पोलिसाचें काम आहे. अपराधी सांपडला तर बरेंच झालें; तो सांपडला नाहीं, आणि त्याबद्दलची जबाबदारी आपले माथीं राहाणार, असें जर पोलिसाच्या अमलदारास वाटलें, तर तो, तो अपराध मुळींच घडला नाहीं, फिर्याद खोटी, असा घाट आणून आपणावरची जोखीम चुकवितो. आणि गुन्ह्याचा पत्ता लावण्याकरितां पोलिसचे लोक आरोपितांस मारहाण करितात, असाही पुष्कळ बोभाट आहे. व अशा आचरणाबद्दल पोलिसाच्या कितीएक लोकांस शिक्षाही मिळाल्या आहेत. कितीएक सेशन जज्ज तर भर कोर्तांत उघड बोलतात कीं, अपराध शाबीद होण्याचे कामीं पोलिसाकडून झालेला पुरावा कांहीं उपयोगाचा नाहीं. अशी पोलिसाची स्थिति आहे.

सोई.—परमेश्वरकृपेनें ह्या देशांत इंग्लिश सरकारचा अमल झाला आहे, तेणेंकरून रयत फार सुख पावली आहे. लोकांच्या मालमत्तेचें, जीवांचें व स्वतंत्रतेचें उत्तम प्रकारें रक्षण होतें, कोणावर जुलूमजबरदस्ती होत नाहीं, न्याय लवकर मिळतो, हे लाभ तर आहेतच. पण ह्या खेरीज ज्या कितीएक बिनमोल सोई ह्या राज्यांत रयतेस प्राप्त झाल्या आहेत, त्यांबद्दल तिनें त्या दयाळू प्रभूचे फार फार आभार मानिले पाहिजेत. सगळ्या सोईंबद्दल आमच्यानें येथें सांगवत नाहींत. पण त्यांतल्या कितीएकींचें कथन येथें करितों. १, रयतेस ज्ञानप्राप्ति व्हावी, ह्मणून जिकडे तिकडे शाळा स्थापिल्या आहेत. २, खुषकीनें जलद प्रवास करितां यावा, ह्मणून कितीएक मोठमोठ्या श-

रांच्या मध्यें दररोज आगगाड्या धांवत आहेत. ३, घटकेंत हजारों कोस मातमी पाठविण्यास तारायंत्रें तयार आहेत. ४, अर्धा आणा खरचिला ह्मणजे सहा मासे वजनाचें पत्र अथवा एक पैसा खरचिला ह्मणजे एक चकती हिंदुस्थानांत पाहिजे त्या ठिकाणीं जाते. ५, जे घाट पूर्वी घोड्यांस चढून जाण्यास कठीण होते, यांवरून खुशाल आतां पाहिजेत तितक्या गाड्या चालतात. ६, आंगच्या देवींनीं पुष्कळ मुलें पूर्वी मरत; आतां सरकारानें जागोजाग देवीदाक्तर ठेविले आहेत, ते देवी काढितात, तेणेंकरून त्या अनर्थापासून पुष्कळ मुलांच्या प्राणांचें रक्षण होतें. ७, मोठमोठ्या शहरांत दवाखाने आहेत, तेथें गरीबगुरीबांस औषधें फुकट मिळतात. ८, आगबोटींच्या योगानें विलायत व इतर दूरचे देश ह्मणजे अगदीं आंगणओसरी सारखे झाले आहेत. तिकडचा उत्कृष्ट उपयोगी माल ह्या देशांत येऊन फार थोड्या किमतीस मिळतो; तो इतका कीं, जी वस्तु आपण येथें एक आण्यास घेतों, ती, ह्या देशांत एक रुपया खर्चिला तरी देखील तयार व्हावयाची नाहीं. अशा सोई पाहूं लागलों तर पुष्कळ निघतील. परंतु, त्या सर्वांचें वर्णन करण्याचें हें स्थळ नव्हे. ह्मणून तूर्त इतक्याच पुरे करितों. आणि इतकेंच सांगतों कीं, हीं सर्व इंग्लिश राज्याचीं फळें होत.

जें हें राज्य आह्मां रयतेला इतकें सुखावह आहे, तें परमेश्वरकृपेनें आह्मांवर निरंतर असो, असें आह्मी इच्छितों.


रसिक जनांस प्रार्थना.

श्लोक.

हिंदुस्थानकथावनीं हुडकितां जीं हीं फुलें लाधलीं,
तीं यत्नें निवडोनि पुस्तकपुटीं, सर्वांपुढें ठेविलीं;
ह्यांची सार्थकता करा रसिकहो घेवोनि या हस्तकीं,
तेणें मी उपकार फार तुमचे मानीन कीं मस्तकीं. १

आर्या.

जो सर्वशक्तिमान् प्रभु, पाळी स्वेच्छें करोनि विश्व जस,
तो यश मद्यत्नातें, देइल मज हाचि पूर्ण विश्वास. १



समाप्त.